# ई-अभिव्यक्ती (मराठी) – दिवाळी अंक – 2024

अंक - 3




www.e-abhivyakti.com

।। श्री स्वामी समर्थ ।।

# ई-अभिव्यक्ती (मराठी) – दीपावली विशेषांक सन २०२४

मनामनातून तेवत राहो
सुविचार-प्रवर्तक ज्योती
ज्ञानाच्या तेजाने उजळो
अज्ञानी काळोखी वस्ती

ज्ञानब्रम्ह हे कवेत घेऊनी
सृष्टी सजावी रसवंती
त्यासह लाभो आपणा सर्वा
सुख, शांती अन यश कीर्ती



*या अंकात मोलाचे योगदान देणारे सर्व लेखक-लेखिका, कवी - कवयित्री, नामवंत चित्रकार, आणि समस्त वाचकांना दीपावलीच्या मनःपूर्वक असंख्य शुभेच्छा* 🪔 🪔🌹💐🙏

**विशेष आभार –**



**डॉ. भारती माटे** (चित्रकार, लेखिका आणि कवयित्री)

**शैक्षणिक अर्हता:** M. Com, CAIIB, Ph.D. (from Irvine (USA))

**Sub:** "Art History of Rangavali & Dry Frescos of Rangavali as Neo-Antiques".) संपर्क - ९८९०७२२१२०



**श्री संदीप राशिनकर** (चित्रकार आणि लेखक)

**शैक्षणिक अर्हता:** बी. ई. (सिव्हिल) संपर्क - ९४२५३ १४४२२ / ८०८५३ ५९७७०





## संपादकीय

**प्रिय वाचकहो**,

नमस्कार. दरवर्षी अगदी आनंदात दिवाळी साजरी केली जाते आणि ती संपली की आपण नकळतच पुढच्या दिवाळीची मनातल्या मनात वाट बघायला लागतो. पुढच्या वर्षी काही वेगळे करू... हे करू... ते करू... असे बरेच मनोरथ करतो... आणि त्यापैकीच एक इच्छा असते साहित्यिक मेजवानीचाही आनंद घेण्याची... मग पुढच्या वर्षी उपलब्ध असणारे सगळे दिवाळी अंक प्रकाशित झाल्या झाल्या विकत घ्यायचे हेही ठरते... आम्हाला खात्री आहे की यातला एक अंक नक्कीच असतो तो आपल्या “ई-अभिव्यक्ती” चा दिवाळी अंक. फरक इतकाच की हा अंक आणण्यासाठी कुठेही जावं लागत नाही... आणि तो विकतही आणावा लागत नाही ... त्यामुळे तो न मिळण्याची चिंताच नसते... कारण तो एका क्लिकवर उपलब्ध असतो. बरोबर ना...

... तर यंदाही त्याच साहित्यिक साजशृंगारासह सादर आहे “फ्लिप बुक” या डिजिटल स्वरुपातला आपला आवडता “ई-अभिव्यक्ती दिवाळी अंक २०२४”... नुकत्याच “अभिजात भाषा” हा दर्जा देऊन शासकीय पातळीवर गौरव झालेल्या आपल्या सालंकृत माय मराठी भाषेतला आपला अंक...

१९०९ साली कै. काशिनाथ रघुनाथ आजगावकर (का. रा. मित्र) यांनी त्यांच्या ‘मासिक मनोरंजन‘ या मासिकाचा “ऐतिहासिक” म्हणावा असा पहिला दिवाळी अंक प्रकाशित केला होता... आणि त्यावेळी नक्कीच त्यांनी कल्पनाही केलेली नसणार की त्यांनी सुरु केलेली ही दिवाळी अंकाची “प्रथा” पुढे जाऊन अशी डिजिटल अंकाच्या देखण्या रूपात साजरी झालेली पहायला मिळेल... अनुभवायला मिळेल. **आणि आज याच संदर्भातली आपणा सर्वांना सांगायलाच हवी अशी एक अतिशय आनंदाची आणि अतिशय अभिमानाची गोष्ट म्हणजे... आपला “ई-अभिव्यक्ति दिवाळी विशेषांक“ हा भारतातला असा पहिला दिवाळी अंक आहे जो “फ्लिपबुक” या स्वरूपात सादर केला जात आहे.**

आपल्या हिंदू सांस्कृतिक परंपरेत आनंददायी - उत्साहवर्धक अशा विविध सणांची मांदियाळी जशी आहे तसाच आवर्जून स्वर्गवासी पितरांचे - आप्त-स्वकीयांचे आदरपूर्वक स्मरण करण्यासाठी पितृपक्षाचाही त्यासह समावेश केलेला आहे. आयुष्यात सगळ्याच सुखद आणि दु:खद भावनांचे संतुलन राखले जावे हाच विचार यामागे असावा असेच म्हणावेसे वाटते. असेच संतुलन निसर्गाच्या बाबतीतही राखले जाणे किती महत्वाचे असते ते स्वतः निसर्गच वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्ती आपल्या पुढ्यात ठेवून आपल्याला वेळोवेळी दाखवून देत आलेला आहे... आणि सण-समारंभांचा आनंद साजरा करत असतांना या अशा संतुलनाचेही भान आपण जाणीवपूर्वक ठेवले पाहिजे... हा विचार या संपादकीयाच्या माध्यमातून पुन्हा आवर्जून अधोरेखित करावासा वाटतो. अशासारख्या असंख्य विचारांचे मंथन संवेदनशील असणाऱ्या प्रत्येक मनात अखंड सुरू असते... हे मंथन अनेक जण वेगवेगळ्या मार्गाने इतरांपर्यंत पोहोचवतही असतात... आणि असे वेगवेगळे विचार अनेकांपर्यंत पोहोचवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम असते ते म्हणजे ‘लेखन‘ गद्य आणि पद्य अशा दोन्ही पद्धतीचे लेखन... आणि दिवाळी अंक म्हणजे अशा अनेकविध विचारांची लिखित स्वरूपातली मेजवानीच !!!

आपला हा “ई-अभिव्यक्ती दिवाळी विशेषांक” ही वैविध्यपूर्ण कथा - कविता - लेख याद्वारा अनेक बुद्धिवंतांच्या लेखणीमुळे समृद्ध झालेला अंक आहे... आणि तो वाचण्यासाठी तितकेच प्रगल्भ असणारे आमचे असंख्य वाचक उत्सुक आहेत याची आम्हाला खात्री आहे. हा तिसरा दिवाळी विशेषांक आमच्या सर्व वाचकांना सप्रेम सादर करतांना आम्हाला अतिशय आनंद होतो आहे.

अंक दिवसेंदिवस अधिकाधिक समृद्ध व्हावा यासाठी संपादक मंडळ सतत प्रयत्नशील आहेच. या अंकासाठी त्यांना मोलाची साथ लाभली आहे ती डॉ. भारती माटे यांची. त्यांनी या अंकासाठी अतिशय आपलेपणाने सुंदर आणि अर्थपूर्ण मुखपृष्ठ तयार करून दिले आहे. शिवाय त्यांनी, तसेच श्री. संदीप राशिनकर यांनी अंक सजावटीसाठी त्यांच्या चित्र-कलाकृती नि:शुल्क उपलब्ध करून दिल्या आहेत. या दोघांचेही अतिशय मनःपूर्वक आभार.

हा अंक आपण आपल्या आप्त-स्वकीयांनाही वाचण्यासाठी उपलब्ध करून द्यावा... आपल्या प्रतिक्रिया नि:संकोचपणे कळवाव्यात. अशा प्रतिक्रिया आमच्या या साहित्यिक यात्रेसाठी प्रेरणादायकच असतील.

आपणा सर्वांना माझ्यातर्फे व संपादक मंडळातर्फे दीपावलीच्या असंख्य मंगलमय शुभेच्छा.

हेमंत बावनकर

**(हेमंत बावनकर)**
प्रधान संपादक

*(सम्पादक मंडळ (मराठी) - सौ. उज्ज्वला केळकर/श्री सुहास रघुनाथ पंडित /सौ. मंजुषा मुळे/सौ. गौरी गाडेकर)*

## ⁕ अंतरंग ⁕


| अ. क्र. | शीर्षक | साहित्य प्रकार | साहित्यिक |
|---|---|---|---|
| १. | दिवाळी आली हासत घरात | कविता | सौ. रेणुका धनंजय मार्डीकर |
| २. | आणि तरीही | कथा | श्री अरविंद लिमये |
| ३. | 'सं'चा अर्थ | लेख | श्री संभाजी बाबन गायके |
| ४. | असाच पाऊस पडत असावा | कविता | श्री सुहास रघुनाथ पंडित |
| ५. | गा बेटी गा | कथा | सौ. उज्ज्वला केळकर |
| ६. | गल्ली | लेख | श्री आनंद हरी |
| ७. | स्पर्श ओलाव्याचा | चित्रकाव्य | सुश्री मंजुषा सुनीत मुळे |
| ८. | सवत | कथा | सुश्री गौरी गाडेकर |
| ९. | आमचे हे हरवले | लेख | सुश्री राधिका माजगावकर पंडित |
| १०. | जुनेऱ्यासारखं | गझल | श्री राजकुमार कवठेकर |
| ११. | ध्यास | कथा | सुश्री सुचित्रा पवार |
| १२. | केव्ह इन द स्नो | पुस्तक परिचय | श्री मिलिंद दिवाकर |
| १३. | कारण | कविता रसग्रहण | सुश्री नीलिमा खरे |
| १४. | बॉन व्हॉयेज | कथा | सुश्री राधिका भांडारकर |
| १५. | रामप्रसाद: एका भारतीयाच्या अफाट जिद्दीची कहाणी | लेख | श्री विश्वास देशपांडे |
| १६. | कविता | कविता | प्रा. तुकाराम दादा पाटील |
| १७. | पथदर्शक | कथा | डॉ. ज्योती गोडबोले |
| १८. | सार्थ आम्हा अभिमान | लेख | सुश्री मंजिरी येडुरकर |
| १९. | निळे आभाळ | कविता | सुश्री प्रणिता खंडकर |
| २०. | मनातल्या उन्हात | कथा | डॉ. सोनिया कस्तुरे |
| २१. | झापडांच्या पलिकडे | लेख | श्री सुनील देशपांडे |
| २२. | आधुनिक नारीरंग | कविता | सुश्री ज्योती कुलकर्णी |
| २३. | आभाळमाया | कथा | श्री उद्धव भयवाळ |
| २४. | इन्व्हेस्टमेंट | पुस्तक परिचय | श्री नंदकुमार वडेर |
| २५. | उपचार | कविता | श्री अनिल वामोरकर |
| २६. | संध्याछाया | कथा | सुश्री प्रभा सोनावणे |
| २७. | गुणरत्नी हरित वसुंधरा | लेख | डॉ. मीना श्रीवास्तव |

| | | | |
|---|---|---|---|
| २८. | मतदार राजा | चित्रकाव्य | श्री आशिष बिवलकर |
| २९. | देवाच्या नावानं | कथा | श्री जगदीश काबरे |
| ३०. | बाटली आख्यान | लेख | प्रा. डॉ. सतीश शिरसाठ |
| ३१. | ती चित्रकार | कविता | सौ. अर्चना गादीकर निकारंगे |
| ३२. | असेही रक्षाबंधन | कथा | डॉ. शैलजा करोडे |
| ३३. | महाराज आणि... तो | लेख | श्री सुहास सोहोनी |
| ३४. | मौन | कविता | श्री प्रसाद साळुंखे |
| ३५. | उड्डाण | कथा | श्री भरत खैरकर |
| ३६. | मळ्यातील सुंदर दिवस | लेख | सौ.शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी) |
| ३७. | काव्यानंद "थट्टा अंगाशी आली" | कविता रसग्रहण | सुश्री अमिता कार्णिक पाटणकर |
| ३८. | सौदा | कथा | श्री सदानंद आंबेकर |
| ३९. | प्रतिसाद | पुस्तक परिचय | सुश्री वीणा रारावीकर |
| ४०. | सुखाचा त्रिकोण | कथा | सुश्री रश्मी पटवर्धन |
| ४१. | शृंगार रस | लेख | सुश्री अरुणा मुल्हेरकर |
| ४२. | वृंदाचा लेखन प्रवास | कथा | सुश्री अर्चना देशपांडे |
| ४३. | भयापासून अभयापर्यंत (५ पुस्तके) | पुस्तक परिचय | सुश्री तृप्ती कुलकर्णी |
| ४४. | मेनका | कथा | सौ. पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई |
| ४५. | बा सूर्या | लेख | प्रा. सौ. सुमती पवार |
| ४६. | द हिडन हिंदू (भाग१, २ व ३) | पुस्तक परिचय | श्री हर्षल सुरेश भानुशाली |
| ४७. | वंध्यत्व | कथा | प्रा. डॉ. जी. आर. प्रवीण जोशी |
| ४८. | चार धाम यात्रा | प्रवास वर्णन | सुश्री सुलभा सुभाषचंद्र तांबडे |
| ४९. | माझी मातृभाषा... माझा अभिमान | पत्र लेखन | सुश्री दीपा पुजारी |
| ५०. | प्रेम माझ्या नजरेतून | लेख | सुश्री संगीता कुलकर्णी |
| ५१. | जीवनातील संस्कृत भाषेचे स्थान आणि महत्त्व | लेख | सुश्री सुरेखा सुरेश कुलकर्णी |
| ५२. | आनंद | कविता | सुश्री दीप्ती कोदंड कुलकर्णी |

***(या अंकातील विविध प्रकारच्या साहित्यात व्यक्त केले गेलेले विचार आणि मते यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)***

***(सर्वांसाठी एक नम्र निवेदन: संगणकाशी संबंधित काही अपरिहार्य अशा तांत्रिक त्रुटींमुळे/कारणांमुळे (उदा. लिखाणाचा font बदलणे) या अंकातील साहित्य प्रकाशित करतांना काही चुका… जसे की काही शब्द वेगवेगळे छापले असले तरी प्रत्यक्षात जोडले जाणे इ.... अंक वाचतांना खटकू शकतात. आणि त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. पण अशा गोष्टी वाचक समजून घेतील ही अपेक्षा.)***

## 1. कविता - दिवाळी आली हासत घरात - सौ. रेणुका धनंजय मार्डीकर



*शरदाचे चमचम चांदणे दारात*
*दिवाळी आली हासत घरात॥धृ. ॥*

*गोमातेची मी पूजा केली*
*वसुबारसेला सांजवेळी*
*चमचमती तारका माझिया मनात*
*दिवाळी आली हासत घरात॥१॥*

*धनत्रयोदशी पहिले पाणी*
*धन्वंतरीची पुजू नाणी*
*अभंग स्नानाने झाली सुरुवात*
*दिवाळी आली हासत घरात॥२॥*

*दिव्यांची आरास घरादारास*
*रांगोळी छान लक्ष्मीपूजनास*
*आकाश कंदील शोभे अंगणात*
*दिवाळी आली हासत घरात॥३॥*

*फराळ सजला तबकात छान*
*देवाला नैवेद्य मानाचे पान*
*पाडवा मानाचा ओवाळणी थाट*
*दिवाळी आली हासत घरात॥४॥*

*भाऊ आला घरी थाट त्याचा करी*
*प्रेमाची भाऊबीज होते साजरी*
*निरांजनामध्ये हसे तेवताना वात*
*दिवाळी आली हासत घरात॥५॥*

*वृंदावनातील तुळशी माता*
*पणतिच्या ज्योतीने सजवू आता*
*पंचारती गाऊ तिची आर्त स्वरात*
*दिवाळी आली हासत घरात॥६॥*

**सौ. रेणुका धनंजय मार्डीकर, औसा मो. 8855917918**





## 2. कथा - आणि तरीही... - श्री अरविंद लिमये

जन्म आणि मृत्यूसर्वांच्याच बाबतीत अपरिहार्य. तरीही या दोन टोकांमधला जीवनप्रवासाचा प्रत्येकाचा मार्ग मात्र भिन्न असतो. काहींचा साधा, सरळ, निर्विघ्न.. तर काहींचा खाचखळग्यांनी भरलेला, वाटेवरच्या काट्यांचा..!

तोडकरबाईंचं आजवरचं आयुष्य तसं सरळ रेषेत गेलेलं. वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या तडजोडी त्यांनाही चुकल्या नव्हत्याच. तरीही निवृत्तीच्या जवळपास आलेल्या आयुष्यात आज त्या कृतार्थ होत्या. केवळ आर्थिक गरज म्हणून स्विकारलेला शिक्षकीपेशा त्यांच्या मानसिक समाधानाचा अखंड स्त्रोतच बनला होता जसा काही.

या सरळरेषेतल्या सहजसाध्या आयुष्यात त्यांच्या शिक्षकीपेशामुळे संपर्कात आलेल्या विद्यार्थिनींच्या त्या आवडत्या शिक्षिका होत्या ते त्यांच्या चांगल्या शिकवण्यापेक्षाही कणभर जास्त त्यांच्या सर्वांशी असणाऱ्या आपुलकीच्या वागण्या मुळे..!

आज शाळेच्या मधल्या सुट्टीत तोडकरबाई रेशनिंग ऑफिसमध्ये निघाल्या होत्या. निघताना 'यायला थोडा उशीर होईल' असं त्यांनी सांगून ठेवलं होतं. कारण उशीर होणार हे त्यांनी गृहीतच धरलेलं होतं. कारण याच कामासाठी अनेक हेलपाटे घालूनही त्यांचं काम झालं नव्हतं.

काम तसं अगदी साधं होतं. त्यांच्या मुलाचं रेशन कार्डवरचं नाव कमी करून तो दाखला त्यांना पुण्याला मुलाकडे पाठवायचा होता. मुलाच्या दृष्टीने काम महत्त्वाचं आणि तातडीनं होणं आवश्यक होतं पण या ऑफिसमधे मात्र पेपर जागचे हलायला तयारच नव्हते. त्यामागचे कारण न समजण्या इतक्या बाई मूर्ख नव्हत्या. पण पैसे देऊन काम करून घेणं त्यांच्या तत्त्वात बसणारं नव्हतं. व्यवस्थेतल्या या अव्यवस्थितपणाचा त्यांना नेहमीच संताप यायचा. तोच संताप आज इकडे येताना त्यांच्या मनात ठासून भरलेला होता. त्याचा प्रचंड स्फोट होणंच काय ते बाकी होतं. पण स्फोट झालाच नाही. कारण ऑफिसमधे आज त्यांचं हसतमुखानं स्वागत झालं..!

"बाई,.. तुम्हीइथं..?" काऊंटरवरच्या एका चुणचुणीत मुलीने त्यांना आपुलकीने विचारलं. ती कोण हे बाई आठवत राहिल्या.

"ओळखलं नाही.. हो ना? " तिने गमतीने विचारलं. नाही म्हणणं बाईंच्या जीवावर आलं.

"तू माझी माजी विद्यार्थिनी आहेस हे मी खात्रीने सांगते. " त्या हसून म्हणाल्या. " पण खरंच नाव आठवत नाहीय. तुम्हा मुलींच्यात खूप फरक पडतो गं. कसं आठवणार सांग ना तू. हे बघ, तू नाव सांग तुझं. नावावरून नक्की आठवेल सगळं" त्या मोकळेपणाने म्हणाल्या. तीही हसली. पण 'नाही' म्हणाली.

"तुमचं काम काय ते सांगा पाहू. ते आधी करते. ते पूर्ण होईपर्यंत तुम्हाला आठवते का बघू. हवं तर. तुम्हाला एक क्लूहीदेते. तुम्हाला चार वर्षांपूर्वी पत्र लिहिलं होतं एक. खूप मोठ्ठं. तुमच्याकडूननक्की उत्तर येईल याची खात्री होती. पण उत्तर नाही आलं. " ती बोलायची थांबली.

"पत्र.." बाई विचारात पडल्या.

"बरं मला सांगताय का काय काम होतं? " तिने विषयच बदलला. बाईनी काम काय होतं ते सगळं सविस्तर सांगितलं. तिने तत्परतेने सगळी कागदपत्रे पिंजून काढत त्यांचा अर्ज शोधून काढला. पुढे पंधरा-वीस मिनिटं तेच काम करत राहिली. अखेर दाखला तयार करून ती फाईल तिने सहीसाठी आत पाठवली. तेव्हाच ती रिलॅक्स झाली.

"बाई, सही व्हायला बराच वेळ लागेल. तुम्ही उगाच ताटकळत थांबू नका. मी नाव कमी केल्याचा दाखला स्वतः उद्या तुम्हाला शाळेत आणून देते. चालेल?"

न चालायचा प्रश्नच नव्हता. बाईंना तिचं खूप कौतुक वाटलं.

"थँक्स" त्या म्हणाल्या."

"थँक्स म्हणून मला लाजवू नका बाई."

“बरं, पण शाबासकी तरी देऊ की नको? " त्या कौतुकानं म्हणाल्या. ती समाधानाने हसली.

"आता तरी नाव सांगशील? " त्यांनी आग्रहानं विचारलं.

"मी पत्र पाठवलं होतं तुम्हाला. तेही विसरलात. हो ना? "

"नाही अगं, पण खरंच तुझं पत्र नव्हतं मिळालं गं. नाहीतर उत्तर लिहिलं असतं मी. हो की नाही? "

"मी अंजनी... अंजनी चाबुकस्वार. " ते नाव ऐकलं आणि कित्येक वर्षांपासून या नावाला चिकटून बसलेली अढी मनात जागी झाली. बाई आकसूनच गेल्या एकदम. पण ते सगळं बोलून दाखवायची ही वेळ नव्हती आणि जागाही. एरवीही मनातलं खुपणारं ते सगळं कधीच ओठावर आणायचं नाही असं बाईनी स्वतःला बजावलं आणि काहीच न घडल्यासारखं मोकळ्या हसल्या.

"अंजनी, तू..? किती फरक पडलाय तुझ्यात. इतक्या वर्षानंतर तुला ओळखणं शक्य तरी होतं का? " त्या सहजपणे बोलल्या खरं पण अंजनीच्या बाबतीतली मनातली अढी मात्र तशीच होती. "हे बघ अंजनी, उद्या अशीच लंचटाईममधे येऊन मी तो दाखला घेऊन जाईन. तू खरंच मुद्दाम शाळेत यायची तसदी नको घेऊ."

"तसदी कसली? मला नाही तरी शाळेत एकदा यायचं होतंच. मी येईन. नक्की येईन. "

"बरं ये. वाट पाहते " बाई म्हणाल्या. त्याखेरीज बाईंकडे पर्यायच नव्हता.

शाळेच्या कितीतरी माजी विद्यार्थिनींनीविविध क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवून आज मान्यवरांच्या पंक्तीत स्वतःचं स्थान निर्माण केलं होतं. त्यांच्याबद्दल शाळेला सार्थ अभिमानही होता. त्यांच्या तुलनेत ही अंजनी चाबुकस्वार एक अतिशय सामान्य मुलगी होती. तिने आवर्जून कौतुक करावं अशी चमक कधी दाखवलीच नव्हती. ना अभ्यासात, ना खेळात. त्यामुळे तिने काही कर्तृत्व गाजवायचा प्रश्नच नव्हता. ती रेशनिंग- ऑफिसमधे साधी क्लार्क तर होती. अर्थात तिच्या तिथे असण्याने आपलं रेंगाळलेलं काम तत्परतेनं झालं हे बाई मनोमन एकीकडे मान्य करीत होत्या, पण त्याचे जास्तीचे ग्रेस मार्कस् तिला द्यायला मात्र बाईंचं मन राजी नव्हतं. अंजनी चाबुकस्वारच्या बाबतीतल्या या कडवटपणाला ती स्वतःच जबाबदार आहे हे बाईना माहित होतं. त्या कडवटपणाचं कारणसुद्धा त्यांनी आजवर कुठेही वाच्यता न करता स्वतःच्या मनात कोंडून टाकलं होतं. त्यामुळेच ती दुसऱ्या दिवशी येईल याबद्दल बाईना खात्री वाटत नव्हती...! पण.. ती आली. त्यावेळच्या शिक्षिकांपैकी आता तोडकरबाईंखेरीज एक दोघीच होत्या. त्यांच्याशी औपचारिक बोलून ती तोडकरबाईंजवळ आली

"दाखला आणलास? "

"हो तर. पण बाई, आपण थोडा वेळ बाहेर जाऊ या? चहा घ्यायला? प्लीज चला. खरंतर कालच मी तुम्हाला आग्रह करणार होते. पण तुम्ही गडबडीत होतात आणि वर्किंग अवर्समधे बाहेर पडणं मलाही शक्य नव्हतं. "ती अजिजीनं म्हणाली. कपाळावर उमटू पहाणारी सूक्ष्मशीआठी बाईनी महत्प्रयासाने थोपवली.

"बरं चल." त्या मनाविरुध्द उठल्या. तिच्याबरोबर बाहेर पडल्या.

नववीत काठावर पास होऊन दहावीत गेलेल्या अनेक जणीत बराच खालचा नंबर असलेली ही अंजनी. अशा मुलींकरता विशेष मार्गदर्शनासाठी तोडकरबाईंनी घेतलेल्या ज्यादा तासांसाठीची ही विद्यार्थिनी. फॉर्म भरायच्या शेवटच्या दिवशी केविलवाणा चेहरा घेऊन तेव्हा ही तोडकरबाईंसमोर उभी होती. तिचे वडील एका पतसंस्थेत नोकरी करायचे. काही दिवसांपूर्वी ती पतसंस्था बंद पडली आणि हे कुटुंब उघड्यावर पडलं. फॉर्म भरायला पैसे नाहीत म्हणून वडील डोक्याला हात लावून बसले होते आणि ही एवढी निकड काढायची गळ घालत अंजनीबाईंसमोर उभी राहिली होती. प्रश्न फक्त अडीचशे रुपयांचा होता. कसलेही आढेवेढे न घेता बाईंनी पर्समधून अडीशे रुपये काढून तिला दिले होते.

"तुमचे उपकार मी कधीच विसरणार नाही बाई. हे पैसे मी लवकरात लवकर नक्की परत करीन. " बाईना नमस्कार करून ती गेली.. ते आता आठ वर्षांनंतर अशी अचानक भेटली. त्यावेळी बाईनी ते पैसे कर्ज म्हणून दिलेच नव्हते. मदत म्हणूनच दिले होते. त्यामुळे तिच्याकडून परतफेडीची अपेक्षा नव्हतीच. पण तिने आपण होऊन शब्द दिला होता आणि नोकरीत असूनही तो पाळला नव्हता याचं दुःख होतं. खरं तर बारावीनंतर ती नोकरीला लागल्याचं बाईंच्या कानावर आलं होतं. कुठे ते मात्र माहीत नव्हतं. पण ही पैसे परत करायला येणार असं मात्र वाटत होतं. तिने दिले तरी आपण ते घ्यायचे नाहीत असंही त्यांनी मनोमन ठरवून टाकलं

होतंच. पण बाईंना'नको ' म्हणायची संधीच तिने दिलेली नव्हती. स्वतः दिलेला शब्द तिनेच मोडला होता. अंजनी चाबुकस्वारबद्दल बाईंच्या मनात अढी होती ती यामुळेच.

"हा दाखला.. " हॉटेलमध्ये बसताच तिने त्यांच्या हातात एक एन्व्हलप दिलं आणि वेटरला दोन चहांची ऑर्डर दिली.

"अंजनी, खूप मोठं काम केलंस बघ. "

"नाही बाई. काम छोटंच होतं. तुमची गरज मोठी होती. म्हणून ते तुम्हाला मोठं वाटलं. " ती गंभीरपणे म्हणाली. " गरजेच्या वेळी तुमची मदत घेऊनच तर मी मोठी झालेय ".. तिचे डोळे भरूनच आले एकदम. तिने आवंढा गिळला. स्वत:ला सावरलं.

"बाई, काल मी म्हटलं होतं ना तुम्हाला, चार वर्षांपूर्वी मी तुम्हाला खूप मोठं पत्र पाठवलं होतं असं? तुम्ही पत्र मिळूनही उत्तर पाठवलं नाही असंच समजत राहिले मी इतकी वर्षं. तुम्ही पत्र मिळालं नाही म्हणालात आणि माझ्या मनात कुशंकेची पाल चुकचुकत राहिली. घरी जाऊन बाबांना खडसावून विचारलं, तेव्हा त्यांनी खरं काय ते कबूल केलं. त्यांना ते पत्र शाळेत तुम्हाला समक्ष नेऊन द्यायला मी सांगितलं होतंपण त्यांनी ते दिलंच नव्हतं. आपण किती चुकीची गृहितं मनात धरतो ना? आणि मग पुढची सगळी गणितंच चुकतात. बघा ना.. तुमचं उत्तर आलं नाही तेव्हा तुम्ही ते पाठवलं नाही असंच मी गृहीत धरून बसले. "

बाई मनोमन ओशाळल्या.

"जाऊ दे गं. त्याचं काय आता? "

"सगळ्याच गोष्टी समक्ष बोलता येत नाहीत बाई. म्हणून मी ते सगळं त्या पत्रात लिहिलं होतं. त्यावेळी तुम्ही मला मदत केलीत आणि त्या एका क्षणात माझा पुढचा सगळा मार्गच उजळून टाकलात. दहावीलाच बसू शकले नसते तर अंधारच होता सगळा. बारावी होईपर्यंत टायपिंग शिकले. छोट्या-मोठ्या नोकऱ्या करत बारावी झाले. तेवढ्या पुण्याईवर ही नोकरी मिळाली. पाच वर्षं कोल्हापूरला जाऊन येऊन करीत होते. गेल्याच आठवड्यात इथं सांगलीला बदली मिळाली आणि मी थोडी स्थिरावले. पहिल्या पगारापासून थोडे थोडे पैसे पाठवून तुमचे सगळे पैसे चार वर्षांपूर्वीच त्या पत्राबरोबर बाबांकडे दिले होते. पण.. " तिचा आवाज भरून आला तशी ती थांबली. बाईंनी तिचा हात हातात घेऊन तिला थोपटलं...

"...पण बाबांनी पैसे खिशात ठेवून पत्र फाडून टाकलं होतं..." तिला हुंदकाच आला एकदम.

" हे बघ, झालं ते झालं. त्याचा आता त्रास नाही करून घ्यायचा. आणि मला सांग, ते पैसे मी कर्ज म्हणून कुठे दिले होते? तुला मदत म्हणूनच दिले होते. हो की नाही? " बाईंनी तिला समजावलं. खरंतर हे सगळं ऐकल्यापासून त्यांना स्वतःलाच अपराधी वाटत होतं. तिला समजावताना त्या जशी काही स्वतःचीही समजूत घालत होत्या. बोलता-बोलता बाई हातातलं एन्व्हलप पर्समध्ये ठेवू लागल्या तसं अंजनीने त्यांना थांबवलं.

"दाखला बरोबर आहे ना ते पहा ना एकदा बाई"त्या हसल्या. दाखल्याचा कागद बाहेर काढून त्यांनी घडी उलगडली आणि त्या चपापल्या.

"अंजनी काय गं हे? "

"हे यापूर्वीच द्यायला हवे होते. तुमचे फक्त पैसेच परत केलेत बाई... वेळ नाही. ती मनात जपून ठेवतेय. "

"अगं पण.. हे इतके? सातशे रुपये? "

"नाही बाई. हे आठ वर्षांपूर्वीचे अडीशे रुपयेच आहेत. "

"वेडी आहेस का तू अंजनी? हे बघ, हे पैसे मी अजिबात घेणार नाहीये. तुला द्यायचे असतील तर ते एखाद्या गरजूला नेऊन दे. तरच मला बरे वाटेल. "

"चालेल. पण ते कामही तुमच्या हस्ते व्हावं असं मला मनापासून वाटतं. या शाळेच्या निमित्ताने माझ्यासारख्यखूप जणीभेटतीलच की तुम्हाला. या पैशांचा विनियोग कसा करायचा हे स्वातंत्र्य तुमचं. "

बाईंच्या प्रत्येक प्रश्नाला तिने अतिशय सौम्य शब्दात पण ठाम उत्तर दिलं होतं. आज बाई तिच्यासमोर हरल्या होत्या. गरजू मुलींसाठीच्या शाळेनं सुरु केलेल्यानिधीला अंजनीच्याच नावाने या सातशे रुपयांची देणगी देऊनही त्या स्वस्थ नव्हत्या. अंजनीबद्दल चुकीच्या पद्धतीने विचार करून मनात कडवटपणा जपल्याची खंत काही केल्या कमी होत नव्हती.

जेमतेम मार्क्स मिळवून कशीबशी पास होणारीही एक सामान्य मुलगी. आणि तरीही... अनेक कर्तृत्ववान आणि नावारुपाला आलेल्या इतर माजी विद्यार्थिनींपेक्षा बाईना ती आज खूप मोठी वाटू लागली..!

प्रतिकूल परिस्थितीतला, नियतीने आखून ठेवलेला तिच्यासमोरचा एरवी अंधारा वाटणारा मार्ग, पण त्या मार्गावरुनही न डगमगता ठामपणे चालताना या मुलीने अंत:प्रेरणेने जपलेल्या जीवनमूल्यानीच तिला हे मोठेपण बहाल केलेलं होतं..!!

**श्री अरविंद लिमये, सांगली मो ९८२४७३८२८८**





## 3. लेख - ‘सं’ चा अर्थ! - श्री संभाजी बबन गायके

पाच लाख, सदतीस हजार, साठ आणि साडेआठ टक्के या संख्या हा लेख वाचण्याआधी सहज लक्षात ठेवाव्यात.... पुढे यांचे अर्थ लागत जातील!

संस्कृतात ‘सम’ हा शब्द एक अव्यय आहे आणि संधी करताना त्याचा ‘सं’ होतो. ‘सं’ जोडलेले शेकडो शब्द संस्कृत, मराठी इत्यादी भाषांमध्ये आहेत. ‘सं’ चे सारखे, समान, औचित्य असेही अर्थ आहेत. भोगणे या क्रियापदाचे अनुभवणे, उपयोग करणे असे काही अर्थ आहेत. या ‘भोग’ शब्दाच्या आधी लागलेला ‘सं’ आणि या संगमातून तयार होणारा शब्द वाचून सर्वांच्याच भुवया उंचावतात... तो शब्द म्हणजे ‘संभोग’! एका प्रशिक्षण वर्गात स्त्री-पुरुष ‘संबोध’ हा शब्द उच्चारताना वक्त्याने त्याच्या भाषिक संस्कारानुसार ‘बो’ शब्दाचा उचार ‘भो’ केला आणि श्रोत्यांना पुढचा ‘ध’ नीट ऐकू न गेल्याने त्याला महिलांच्या नाराजीचा सामना करावा लागला! इथे न ऐकू  ‘ध’ चा ‘ग’ झाला! असो.

बलाचा वापर करून एखाद्याच्या मनाविरुद्ध केली गेलेली कोणतीहीकृती ‘बलात्कार’ ठरते. पण हा शब्द केवळ स्त्री-पुरूषांमधील लैंगिक संबंधाच्या बाबतीतच वापरला जातो, आणि त्यामुळे याचा उच्चार मनात वेगळीच प्रतिमा निर्माण करतो. तसेच भोगाचे आणि संभोगाचे झाले आहे. या शब्दाऐवजी समाज ‘सेक्स’ (नाम) हा इंग्लिश शब्द जास्त सोयीचा मानतो. या शब्दानंतर 'करणे' हे क्रियापद जोडले जाते. सेक्सचा अर्थ खरं तर लिंग (स्त्री की पुरुष) असा आहे. परंतू gender हा शब्द जास्त संयुक्तिक आहे.

जगाची निर्मिती, निर्माता आणि त्याचे उद्देश याचा उलगडा अजूनही निश्चित झालेला नाही. परंतू हे जग निरंतर सुरु राहावे, असा निसर्ग नावाच्या एका व्यवस्थेचा उद्देश असावा, असे दिसते. जगातील सर्व सजातीय सजीव एकमेकांशी विशिष्ट शारीरिक क्रिया करून प्रजनन करतात. ही प्रक्रिया आजवर तरी निरंतर चालत आलेली दिसते. आणि ही प्रक्रिया केवळ यांत्रिक नाही ठेवलेली निसर्गाने. किमान, मानवाच्या बाबतीत तरी या क्रियेत आकर्षण, प्रेम अशा बाबी पेरून ठेवलेल्या आहेत. क्रियेत सहभागी दोघांनाही सम-समान अनुभूती यावी अशी निसर्गाची आंतरिक इच्छा दिसते. आधुनिक कायद्यानेही अगदी पत्नीच्या मर्जीविरुद्ध प्रस्थापित केलेले शारीरिक संबंधही ‘बलात्कार’ ठरवले आहेत.

... निसर्ग पुरेसा स्वार्थी, विचारी आणि योजक आहेच!

प्राणिसृष्टीमध्ये मादीवर सक्ती, फसवणूक असा प्रकार सहसा आढळत नाही. आपला वंश अव्याहतपणे पुढे चालत रहावा, ही त्यांच्या संभोगामागे नैसर्गिक प्रेरणा असते. त्यांच्या जगात वासना ही प्रासंगिक असते. पण मानवाची वासना सकल प्राणिसृष्टीची मर्यादा ओलांडून भलत्याच मार्गाने खूप मोठा प्रवास करून बेफाम

पुढे चाललेली आहे. -- - हिंदू संस्कृतीने वासनेचा खेळ पुरता आधीच ओळखून मानव समाज कल्याणासाठी अनेक उपाययोजना करून ठेवल्या आहेत. सगोत्र विवाहातून बहुदा कमसर दर्जाची संतती निर्माण होते, हे पूर्वजांनी जाणले होते. म्हणूनच आई, बहिण, मुलगी ही नाती जन्माला आली. यातून समाज निरोगी राहण्याचा मार्ग प्रशस्त झाला.

संत, विचारवंत यांनी 'इंद्रिय निग्रह' ही एक महत्त्वाची बाब शिकवली. पण दुर्दैवाने अनेक पुरुषांना, विशेषतः प्रौढ व्यक्तींना असा निग्रह राखता येत नाही, असे प्रकर्षाने दिसून येत आहे. मागील काही वर्षांत, प्रौढ आणि त्यांनी विशेषतः बालकांवर केलेले लैंगिक अत्याचार यांची प्रकरणे मोठ्या संख्येने समोर येऊ लागली आहेत. आणि समोर न येणारी प्रकरणे हजारो आहेत. सध्याच्या आकडेवारीनुसार प्रौढ अर्थात वय वर्षे साठवरील गुन्हेगारांचे प्रमाण साडे आठ टक्के एवढे आहे! पाच लाख प्रकरणांमध्ये सदतीस हजार गुन्हे हे साठ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या आजोबा काका मामा, अंकल, चाचा इत्यादी इत्यादी नावांच्या आड दडलेल्या पुरुषांनी केलेले आहेत. यात अनेकांना तुरुंगवासही घडला आहे.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे विचार किमान हिंदूंच्या जीवन मंदिराचे चार स्तंभ मानले जातात. यातील 'कामा'पासून दूर राहणे अत्यंत कठीण असते. म्हणूनच ब्रह्मचर्य पालन केलेल्या व्यक्तीपुढे सामान्य लोक नतमस्तक होतात. कामवासना ही जरी नैसर्गिक असली तरी भोगाची पद्धती परंपरेने ठरवून दिलेली आहे. काम पूर्ण निषिद्ध मानलेला नाही. काही अपवाद वगळता बहुतेक संतांनी संसार करूनच परमार्थ साधावा, असा उपदेश केलेला आहे. कारण कामवासनेपासून बळेच दूर राहिल्याने तोटा होतो, हे अनुभवाने प्रत्ययास आलेले आहे. म्हणून विवाह हा संस्कार आला. आरंभी तर याबाबत आमंत्रण पत्रिकेत 'शरीरसंबंध'अशी संज्ञा सरळ सरळ वापरली जायची... व्यक्तीत कामवासनेचा आरंभ होण्याच्या सुमारास विवाह संस्कार केले जात, त्यामुळे व्यक्तीची एक चाकोरी ठरून जायची. उपजीविकेची व्यवस्था, अपत्यांची जबाबदारी, एकत्र कुटुंब पद्धती, धार्मिक संस्कार इत्यादी चक्रात कामवासनेचे उत्तम व्यवस्थापन होत असे. अतिरिक्त कामवासनेचा धर्माने स्पष्टपणे धिक्कार केला असल्याने तेच संस्कार मनावर बिंबवले जात असत. विशिष्ट वयात संसारातून माणूस परमार्थाकडे आपसूक ओढला जावा, अशी व्यवस्था होती. गावात तालीम असायची तसे हनुमंताचे मंदिरही असायचेच. काकड आरती, भजन, जागर, हरिनाम सप्ताह यात वेळ सत्कारणी लागायचा. काही काळापूर्वी सांसारिक कर्तव्ये पार पाडून वानप्रस्थ स्वीकारणे ही रीतही होती.

पण आधुनिक जीवनात या गोष्टी मागे पडत गेल्या आणि आजची भयावह परिस्थिती निर्माण झाली.

तारुण्यात वासनेचा समुद्र उधाणलेला असावा, यात काहीच आश्चर्य नाही. पण गात्रे थकलेली असताना काल्पनिक सुखाच्या मोहजालात स्वतः अडकून अजाण, निष्पाप जीवांना होरपळून टाकणा-या मोठ्या माणसांकडे पाहून घृणा येते. कामपूर्ती ही अनिवार्य गरज असल्याने आणि ती विहित मार्गाने पूर्ण होत

नसल्याने समाजमान्य नसलेले तरीही अपरिहार्य झालेले काही मार्ग अस्तित्वात आले. या मैलापाणी वाहून नेणा-या दुर्दैवी प्रकल्पांतून निम्मी अधिक घाण आपल्या नजरेआड वाहून जात आहे, हे सत्य आहे. अन्यथा परिस्थिती आणखी भयंकर झाली असती.

मुलेबाळे, संसार यात महिला लवकर गुंतत जातात. त्यांचे कामविषयक समायोजन पुरुषांच्या तुलनेत खूपच परिपूर्ण असते. एका अर्थाने निसर्गाला अभिप्रेत असलेली भूमिका महिला समर्थपणे निभावताना दिसतात. पण (काही) पुरुषांच्या बाबतीत असे घडताना आढळत नाही. कारण पुरुषांना वाम मार्गाचे वळण घेण्याची संधी सर्वाधिक असते. केवळ नजरेने केलेले बलात्कार सिद्ध होत नाहीत. पण गर्दीत हेतूपुरस्सर मारलेले धक्के, केलेले स्पर्श पदोपदी जाणवतात महिलांना, मुलींना आणि बालकांना. घरकामासाठी येणा-या (काही) महिलांना घरातील प्रौढ व्यक्तींकडून काही विचित्र अनुभव येण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुण्यातील सुसंस्कृत वसाहतीत घरकामासाठी येणा-या महिलेच्या छोट्या कन्येची हत्या याच प्रकारातून झाल्याचे निष्पन्न झाले होते. स्वत:च्या पोटच्या मुलींचे शारीरिक शोषण करणारे नराधम आढळतात. तसे अगदी लहान मुलांकरवी आपली वासना शमवण्याचा प्रयत्न करणारेही कमी नाहीत. 'पोक्सो' (The Protection of Children from Sexual Offences Act, 2012 )सारखा कडक कायदा अस्तित्वात आला, त्यानुसार काहींना शिक्षाही झाल्या. तरीही लहान मुलांचे प्रौढ व्यक्तींकडून होणारे लैंगिक शोषण थांबत नाही, असे बातम्यांतून दृष्टीस पडते. केवळ बालकेच नव्हे तर महिलाही या वयस्कर लोकांच्या तावडीतून सुटत नाहीत. हात हातात घेणे, खांद्यावर, पाठीवर थोपटणे याही कृतीमागे प्रत्येक पुरुषाचा उद्देश कसा असेल हे काही सांगता येत नाही.

यातूनच good touch, bad touch सारख्या गोष्टी निरागस लेकरांना शिकवाव्या लागत आहेत. यामध्ये खरोखरीचे प्रेमळ स्पर्श झाकोळले जात आहेत. पण त्याला इलाज राहिलेला नाही. जिथे जिथे म्हणून मुलांचे इतर पुरुषांशी सान्निध्य येईल, अशा सर्वच ठिकाणी अपार सावधानता बाळगावी हेच बरे. यातून बरेचदा पुरुषांची नाराजी पत्करावी लागणे, गैरसमज होणे इत्यादी बाबी घडू शकतात.... पण मूळ रोगच भयावह असल्याने त्याकडे डोळेझाक करणे बरे. कारण "सं'भोग म्हणजे या कृतीत सहभागी असलेल्या दोघांनाही समान आनंद हे तत्व प्रत्येकालाच समजेल असे नाही. "सं" चा अर्थ समजावून न घेणारे आणि ' काम म्हणजे पुरुषार्थ आहे ' याचा योग्य अर्थ ध्यानी न घेतलेले.. आदरणीय भासणारे, वयस्कर, पितृतुल्य पुरुष समाजात आहेत... आणि साडेआठ टक्के ही काही कमी टक्केवारी नाही!

**श्री संभाजी गायके, पुणे मो. 9881298260**

## 4. कविता - असाच पाऊस पडत असावा… - श्री सुहास रघुनाथ पंडित



*असाच पाऊस पडत असावा*
*रूजून यावे मनात काही*
*जलधारांच्या लेखणीतुनी*
*जलबिंदुंची झिरपे शाई*

*घन भरलेल्या सायंकाळी*
*धुंदकुंदश्या पाऊसकाळी*
*सर कोसळता उठे शिरशिरी*
*मनास यावी पुन्हा उभारी*

*उघडे पुस्तक वाचत जावे*
*टिपून घ्यावी सगळी टिपणे*
*समजून घ्यावी पानोपानी*
*उमलून आली हिरवी वचने*

*कधी असावे मुग्ध चांदणे*
*शुभ्र दुधाचे जसे पसरणे*
*भरून घ्यावे श्वासामधुनी*
*रातराणीचे धुंद बहरणे*

*उसळी मारून लाटांवरती*
*फेनील फुलांचे गुच्छ फुलावे*
*क्षणभर असती, क्षणात नसती*
*क्षणाक्षणाला फुलवित जावे*

*निसर्ग अवघा मनी फुलावा*
*गात्रांमधुनी भिनून घ्यावा*
*दिक्कालाच्या पल्याडचा तो*
*युगंधराचा ठावदिसावा*

श्री सुहास रघुनाथ पंडित. सांगली. मो. 9421225491

## 5. कथा - गा बेटी गा.... - सौ. उज्ज्वला केळकर



मधू बागेला पाणी देत होती. गुलबक्षीच्या ताटव्याजवळ आज मे फ्लॉवरचा दांडोरा उमडून आलेला होता. दांडोऱ्यावर हजारभर कळ्यांचं कणीस. काल तर तिथे काहीच नव्हतं. आज पापण्या मिटलेल्या गप्पगप्पशा कळ्या कणसात एकमेकांना बिलगून बसल्याहेत. उद्या बाहेरच्या परिघातल्या कळ्या डोळे उघडतील. लालसर गुलाबी केशरकाड्या दूर होतील. आतल्या वर्तुळातले गुलाबी केसर मुकुटासारखे पिवळे परागकोश माथ्यावर मिरवतील. परवाला त्याच्या आतल्या वर्तुळातल्या कळ्या उमलतील. तेरवाला त्याच्या आतल्या. चार-पाच दिवसात त्या दांडोऱ्यावर गुलाबी रंगाचा फुटबॉल झोकात झुलू लागेल.

आज बाळ पोटात ढुशा देतंय. नंतर लाथा झाडेल, वळेल, फिरेल आणि एक दिवस पोटातलं बाळ कुशीत येईल. गळामिठी घालील. पापे घेईल. ती विलक्षण उत्तेजित झाली.

झाडांना पाणी देऊन झालं. नंतर तिने पाईपमधून पाण्याचा फवारा अंगणावर उडवला. तापलेल्या मातीचा कण न् कण उमलत गेला. त्याच्या गंधाच्या लाटा उसळत उसळत तिच्यापर्यंत पोचल्या. आवेगाने, तिने त्या श्वासातून आपल्या शरीरात सामावून घेतल्या. त्या गंधाने तिची उत्तेजना अधिकच वाढली आणि तिच्या गळ्यातून स्वर पाझरू लागले. स्वर… ताना… स्वरांच्या आवर्तनात ती देखील झाडाझाडातून फुलपाखरासारखी भिरभिरू लागली. आता त्या स्वरांना शब्द भेटत गेले.

'केतकी गुलाब जुही चंपक बन फूले '

गातगातच ती आत आली. मागच्या व्हरांड्यात उभी राहून बागेकडे बघत ती गाऊ लागली. आलाप-तानांचे झुले हिंदोळू लागली.

साधना घरी आली. पण, मधूचं लक्षच नव्हतं. ती आपली गातच होती. स्वरांचा झरा अविरतपणे झुळझुळत होता. साधना चकितच झाली. कितीतरी दिवसांनी…वर्षांनी तिची लाडकी लेक गात होती. मनमोकळी होऊन गात होती. पण, आज असं काय घडलं? कितीतरी वर्षांपूर्वी तिने गाणारे आपले ओठ मिटून घेतले होते. गोड गळ्यावर अत्याचार केला होता. शपथ घ्यावी तसं गाणं सोडून दिलं होतं.

मधुवंतीचा आवाज अति मधुर सुरेल. ताला-सुरांची पक्की जाण. शाळेत असताना शाळेतली, शाळेबाहेरची गाण्याबद्दलची कितीतरी बक्षिसे तिने मिळवली होती. तिला खूप मोठी गायिका बनवण्याचं स्वप्नं तिच्या जन्मापासूनच निरंजन आणि साधना बघत होते. ' पहिली बेटी-सूरकी पेटी… ' तिच्या जन्मानंतर निरंजन म्हणाला होता. मधुवंती त्याची भारी लाडकी. निरंजन रियाजासाठी तिला घेऊन बसले की साऱ्या जगाचं भान विसरायचे. गातच राहायचे. धाकट्या अनूपला मात्र एका जागी मांडा ठोकून आलाप-ताना घोटायचा भारी कंटाळा. दहा मिनिटं एका जागी बसणं त्याला कठीण जायचं. गोड बोलून, चुचकारून, रागावून सगळं करून झालं. पण, तो भारी चंचल. मन एकाग्र करून एका जागी स्थिर बसणे त्याला मुळीच जमत नसे. शेवटी,

निरंजनने त्याचा नाद सोडला. आपल्या मुलीवर.. मधुवंतीवरच त्या दोघांनी आपल्या आशा केंद्रित केल्या. तिला ख्यातनाम गायिका बनवायचं. आपल्या घराण्याचा वारसा अधिक संपन्न करून तिच्या हाती सोपवायचा.

पण एक दिवस... निरंजनच घरातून निघून गेला.

जाता जाता मधूचं गाणंही घेऊन गेला.

कोणार्कच्या सूर्यमंदिरात संगीत महोत्सव होता. त्यासाठी निरंजन घरातून बाहेर पडला. मुलांच्या शाळा, साधनाची बँक... कुणालाच जाणं शक्य नव्हतं. मधूचं तर १० वीचं महत्त्वाचं वर्ष. निरंजनचं गाणं खूप चांगलं झालं असणार. दुस-या दिवशीच्या वृत्तपत्रातून त्याचा विस्तृत रिव्ह्यू आलेला. जाणकार संगीत समीक्षकांनी त्याचं खूप कौतुक केलेलं. मुरकती, मींड, लोच आणि मुख्य म्हणजे त्याच्या गाण्यातलं भावसौंदर्य, त्याची प्रयोगशीलता, नावीन्य .... वाचताना साधना-मधूच्या अंगावर रोमांच उभे राहिले. मधू तर दिवसभर आपल्या मन:चक्षूंपुढे निरंजनचं गाणं आठवत राहिली. त्याचा दमदार पूरिया... ‘रंग कर रसिया आओ अब...’तिच्या डोळ्यांपुढे शाळा नव्हतीच जणू. तिच्या डोळ्यापुढे आपल्या वडिलांची गाणारी मूर्ती... त्यांनी कुठे कोणते आलाप घेतले, ताना घेतल्या, मींड घेतली... हेच सारं तिला दिसू लागलं.

दुस-या दिवशी साधना बँकेतून घरी आली तर निरंजनने पाठवलेलं पत्र मिळालं...

‘छान! म्हणजे हा काही कोणार्कहून सरळ घरी येत नाही. कुठे कुठे हिंडून, मैफली गाजवून येणार स्वारी... त्याला कितीदा सांगितलं, अशी परस्पर आलेली आमंत्रणं स्विकारू नकोस... ’ असं पुटपुटत साधनानं पत्र फोडलं....

साधना,

गेले वर्षभर मी एका प्रचंड वादळात सापडलोय. संसार की संगीत... मला वाट दिसत नव्हती. भोवतीनं दाट धुकं आहे आणि मला श्वासही घेता येत नाही असं वाटत होतं.

मनाशी खूप झगडून मी संगीताच्या वाटेवर पावलं ठेवलीत. प्रज्ञा माझी साथसंगत करणार आहे. माझ्यासाठी केव्हापासून तिने आपलं घर सोडून यायची तयारी दाखवलीय. माझाच निर्णय होत नव्हता. वाटत होतं, मी तुझ्यावर खूप अन्याय करतोय. अजूनही वाटतंच. मी तुझा ऋणाईत आहेच. शेवटपर्यंत तसाच राहीन. तुझ्यामुळेच माझा कलंदराचा संसार मार्गी लागला. त्यासाठी तुला तुझं आवडतं संगीतही सोडावं लागलं, हे कसं विसरू? त्यासाठी तुला तुझी आवडती संगीताची करिअर सोडावी लागली, हे तरी कसं विसरू? पण, या कलंदराला साथ द्यायला, सावरायला, सांभाळायला तुझे हातच आता रिकामे नाहीत...

... वाचता वाचता साधनाच्या मनापुढे तिचा भूतकाळ उभा राहिला. गाण्यानेच त्यांना जवळ आणलं होतं. दोघेही साधुरामांचे पट्ट शिष्य. या दोघांबद्दलही खूप आशा बाळगून होते ते! आपल्या घराण्याचा नावलौकिक दोघेही वाढवतील याबद्दल साधुरामांची पक्की खात्री. गाता गाता दोघेही एकमेकांत गुंतत गेले. पुढे लग्न करून अगदी एकमेकांचे झाले. संगीताच्या क्षेत्रात दोघेही अजून धडपडत होते. अजून नाव व्हायचं होतं. दोघांनाही मैफलीसाठी स्वतंत्रपणे निमंत्रणे यायची. पुढे वर्षभरात मधू झाली आणि त्यांच्या लक्षात आलं,

दोघांनाही विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर घेऊन हिंडणं शक्य नाही. कुठे तरी स्थिर झालं पाहिजे. वाढल्या संसाराला स्थैर्य येण्यासाठी निश्चितपणे आणि नियमितपणे अर्थप्राप्ती होणारा व्यवसाय पत्करणं जरूर होतं. मग साधनाने नोकरी करण्याचा निर्णय घेतला. निरंजनने मात्र गाणं आणि गाणचं करायचं. साधनाला बँकेत नोकरी मिळाली. घराला स्थैर्य आलं. मधूच्या पाठीवर तीन वर्षांनी अनूप झाला. वर्षे सरत गेली. नावलौकिकाच्या पायऱ्या चढत निरंजन नामांकित गायक झाला. घराणेशाहीत बंदिस्त झालेल्या शास्त्रीय संगीताला त्याने अभ्यास, प्रयोगशीलता याच्या साहाय्याने नवी झळाळी, नवा चेहरा देण्याचा प्रयत्न केला. लोकसंगीताला शास्त्रीय बैठक देण्याचा त्याने प्रयत्न केला. हे सारं खूप लोकप्रिय झालं. रसिकांमध्ये, जाणकारांमध्ये त्याने स्वत:चं असे वेगळं स्थान निर्माण केलं.

अलीकडे अलीकडे साधनाला जाणवत होतं. स्वरांचा धागा पकडून निरंजन उंच उंच जातोय. त्याच्या दृष्टीच्या कवेत केवढा तरी विशाल विस्तार आहे. आपण मात्र जमिनीवरच उभे आहोत आणि तो सप्तसुरांचा धागा आपल्या हातून निसटत चाललाय. छे! केव्हाच निसटून गेलाय. आता आपलं गाणं हौशा नवशा गायिकेइपतपच! बँकेमधली नोकरी करताकरता इतके रूक्ष होऊन गेलो का आपण? कधी झालं असं? निरंजनच्या रियाजाच्यावेळी त्याने एखादी सुंदर जागा घेतली, एखादी अवघड तान घेतली तर पूर्वीसारखी आपली झटकन् दाद जात नाही. कामाच्या घाईत आपल्या लक्षातच येत नाही. कान जणू बधीर झालेले… त्या गाण्यातल्या, स्वरातल्या लावण्यकळा आपल्या मनाला उमगायच्याच नाहीत. निरंजनमधला कलावंत मग नाराज व्हायचा. पत्रातून त्याने हीच वस्तुस्थिती मांडली होती. पण, व्यवहाराच्या साऱ्या जबाबदाऱ्या पेलता पेलता ती इतकी थकून जायची की त्याला अपेक्षित असलेलं ताजं, टवटवीत, तरल मन तिच्याकडे उरलेलंच नसायचं.

पुढे मधू गाणं शिकायला लागली. तिचा आवाज, तिची गाण्यातली जाण पाहून साधनाने आपल्या आशा-आकांक्षा तिच्यावर केंद्रित केल्या. आपली स्वप्नपूर्ती ती तिच्यात शोधणार होती. मधूला चांगली गायिका बनवायचं. दहावीची परीक्षा झाली की तिच्या गाण्यावर भर द्यायचा. कॉलेजचं शिक्षण दुय्यम, असं त्यांनी केव्हाच ठरवून टाकलं होतं. मधूलाही दहावीचं वर्ष कधी पार पडतंय असं झालं होतं… आणि आज अचानक निरंजन घर सोडून गेला होता प्रज्ञाबरोबर…

प्रज्ञा तिशीच्या आसपासची. गेली पाच-सहा वर्ष त्याच्याकडे येतेय. ती पी. एच. डी. करत होती. ‘लोकसंगीताचा शास्त्रीय संगीताशी असलेला अनुबंध’ या विषयावर भारतभर फिरून तिने अनेक मोठमोठ्या गायकांबरोबर चर्चा केली होती. या संदर्भात निरंजनशी चर्चा करायला ती एकदा घरी आली आणि नंतर येतच राहिली. प्रबंध पूर्ण झाला. तिला पीएच. डी. मिळाली. पण निरंजनच्या गाण्याने प्रभावित होऊन ती त्याच्याकडे गाणं शिकायला येऊ लागली. आता तर बहुतेक मैफलींच्यावेळी त्याच्यामागे तंबोऱ्याच्या साथीला ती असते.

निरंजनने लिहिलं होतं,

‘प्रज्ञा माझी प्रेरणा आहे. चेतना आहे. माझी प्रतिभा आहे. स्वरदा आहे. माझे संगीतीय प्रयोग हे खरे तर आमचे संयुक्त प्रयोग आहेत. तिचा अभ्यास आणि चिंतनच मी माझ्या गाण्यातून लोकांपुढे मांडतो. नाही. ती नसली तर माझं गाणं संपून जाईल. ती असताना माझं गाणं रंगतं. फुलतं. मला नवीन नवीन काही तरी

सुचत रहातं. तिच्याशिवाय, गायक म्हणून मला अस्तित्व उरणार नाही. मी चुकत असेन. तरी, अनिवार्य आहे हे सारं…'

साधना सुन्न बधीरशी झाली. प्रज्ञा गेली पाच-सहा वर्षं घरी येतेय. ती गोड गळ्याची, सुरेल आवाजाची, काहीशी अबोल, शांत, प्रतिभावंत तरुणी साधनाला आवडायची. कळत नकळत आपलं तारुण्यरूप साधना तिच्यात शोधायची. धाकट्या बहिणीसारखं तिचं कौतुक करायची. निरंजनबद्दल तिच्या मनात भक्ती होती. साधना जाणून होती ते! 'तिची भक्ती प्रीतीत कधी रूपांतरीत झाली? बहिणीची सवत होण्यापर्यंतची वाटचाल कधी झाली? आपल्याला काहीच कसं कळलं नाही? '

एक काळ असा होता, साधना निरंजनची प्रेरणा होती. त्याची प्रतिभा जागृत करणारी चेतना होती. त्यावेळी त्याचं नाव झालेलं नव्हतं. एक उदयोन्मुख कलाकार म्हणून त्याच्याकडे खूप अपेक्षेने पाहिलं जात होतं. तेव्हा त्याचा रियाझ साधना समोर असल्याशिवाय होत नसे. कोणत्याही मैफलीच्या वेळी साधनाच तंबोऱ्याची साथ करत असे. संसार वाढला तसतशी ही साथ सुटत गेली.

निरंजनला गाण्यासाठी पूर्णवेळ मिळावा म्हणून साधनाने नोकरी पत्करली. मुलं झाली. घराचा व्याप वाढला. कामात, मुलांत, त्यांच्या आणि निरंजनच्या वेळा सांभाळण्यात साधना इतकी गुंतत गेली की गाण्याचा पदर तिच्या हातून कधी सुटला, ते तिचे तिलाच कळले नाही. गाण्यामुळे त्यांची ओळख झाली होती. ते परस्परांच्या जवळ आले होते. एकरूप झाले होते. परस्परांपासून दूर न जाण्याच्या शपथेने बांधले होते… 'कामाच्या रेट्यात प्रथम गाण्यापासून दुरावलो आणि आता निरंजनपासून…' साधनाला वाटत राहिलं.

पुढे पुढे निरंजनच्या रियाझाच्या वेळी आपल्याला तिथे थांबायला वेळ होईना. सुरुवातीला आपण तिथे थांबत होतो. त्याच्या नेमक्या जागा, सुरेख मींड, दमदार तान यांना दाद देत होतो. मन किती उत्सुक आणि टवटवीत होतं तेव्हा… काही काही वेळा तर आपण त्याला सूचनाही देत होतो. पुढं मुलं झाली. त्यांचं रडणं. आई हवी, हा हट्ट. त्याच्या रियाझात व्यत्यय नको म्हणून मुलांनाच दूर नेणं, मुलं मोठी झाल्यावर त्यांचे गृहपाठ, त्यांचे कार्यक्रम, शिवाय नोकरी, घरकाम या साऱ्याचा आपल्यावर उतरलेला शीण… पहिल्यासारखं आता निरंजनच्या आगेमागे करता येत नव्हतं. त्याचा आणि आपलाही संसार सावरता सावरता त्याच्या गाण्यापासून आपण दुरावत चाललो. आपलं स्वतःचं गाणं तर त्याहीपूर्वी केव्हाच सरलं होतं.

सुरुवातीला वाटायचं, आपण हळूहळू बधीर, बोथट होत चाललोय. नंतर नंतर हे वाटणंही बोथटून गेलं. रियाजाचे राहू द्या. प्रत्येक मैफलीला जाणंही अशक्य झालं. निरंजन नावलौकिक मिळवत गेला. पण, त्याची प्रेरणा, प्रतिभा म्हणून असलेलं आपलं स्थान हरवत गेलं आणि आता तर धक्काच… आपल्यापेक्षा १७-१८ वर्षांनी लहान असलेल्या आपल्या शिष्येबरोबर तो रहाणार. खरंय. त्याच्या नावाला वलय आहे. त्याहीपेक्षा जीव ओवाळून टाकावं असं त्याचं गाणं आहे. खरं आहे. प्रज्ञाही अतिसंवेदनाक्षम, तरल मनाची आहे. अभ्यासू आहे. त्याच्या सांगीतिकप्रयोगात तिचा मोठा वाटा आहे. हे सारं पटतंय आपल्याला. … पण, त्यासाठी खरंच दोघांनी एकत्र रहाणं अपरिहार्य आहे का? शिष्या मुलीसारखी असते ना?

सरत्या संध्याकाळी शिकवणीहून मधू परत आली. कोप-यात चपला आणि सोफ्यावर दप्तर भिरकावत तिने विचारलं, “आई, बाबा आले? सकाळीच येणार होते ना? “साधनाच्या चेहऱ्याकडे बघता बघताच तिच्या लक्षात आलं...बाबा आले नाहीत.

“शी:! नाहीच ना आले बाबा! कधी येणारेत? “मधू निरंजनची अतिशय लाडकी. ‘माझं गाणं हीच पुढे नेणार...’ असं सारखा म्हणायचा. आईपेक्षा बाबांशीच तिचं गूळपीठ जास्त जमायचं.

... साधनाने पत्र पुढे केलं. मधू दहावीत आहे. लहान नाही आता! आणि लपवणार तरी काय? आणि किती दिवस? नाहीतरी बाहेरच्या लोकांकडून काहीतरी कळण्यापेक्षा आपणच आपल्या मुलांच्या मनाची तयारी केलेली बरी.

पत्र वाचता वाचता मधूचे दात ओठात रूतले.

.... ‘आम्ही इंदौरला रहायचं ठरवलंय. माझ्या प्रकृतीला.. मुख्य म्हणजे गळ्याला मुंबईपेक्षा इंदौरची हवा जास्त मानवेल. मी तिथे नाही. मधूच्या गाण्याकडे लक्ष दे. तू देशीलच. मी येईन तेव्हा तिला तालीम देईन. तू येऊ दिलंस तर... सुट्टीत मधू माझ्याकडे येईल. परीक्षा झाली की तिला गाणं शिकायला तुळजापूरकरांकडे जाऊ दे... ’

पत्र वाचून मधू सैरभैर झाली..... ‘ शी:! आपले लाडके बाबा आपल्याला सोडून गेले... गाण्यासाठी... नकोच ते गाणं... ’

हातातल्या पत्राचे तिने अगदी बारीक तुकडे करून टाकले. ‘हं! पत्राचे तुकडे केल्याने का वस्तुस्थिती बदलणार आहे. ’ साधनाच्या मनात आलं. त्यानंतर मधूची मन:स्थिती खूपच बिघडली. एकीकडे तिला बाबांचा राग येत होता. तिरस्कार वाटत होता आणि त्याचवेळी तिला नको असताना बाबांच्या आठवणी भरभरून येत होत्या. त्यांचं हसणं... त्यांची थट्टा मस्करी... गाताना त्यांची लागणारी समाधी... त्यांनी लावलेला षड्ज्... त्यांच्या ताना... फिरक्या... आणि मग त्यांचं गाणंच फक्त तिच्या मनात गुंजत रहायचं. या साऱ्याचा तिच्या मनावर खूप ताण पडला. तिला डिप्रेशन आलं. तिच्या बिघडलेल्या मन:स्थितीतून तिला सावरायल साधनाला खूप प्रयास पडले. पण, हळूहळू ती नॉर्मलला आली. यानंतर मात्र तिने गाणं सोडलं ते कायमचं. कुणाच्याही समजावणी, धमकावणीला तिने भीक घातली नाही.

साधनाने किती वेळा सांगितलं... ‘तू गाणाऱ्याचा राग गाण्यावर काढतीयस बेटा... तसं करू नको. गाणं आनंददायी आहे. हट्टाने या आनंदास पारखी होऊ नको. ’

पण मधूने जणू आपले ओठ शिवून टाकले. गाणं म्हणणं सोडाच. ऐकणंही तिने सोडून दिलं. घरात रेडिओ, टी. व्ही. वर गाणं लागलं तरी खटकन् ती बटण बंद करायची.

... अशी ही मधू... आज चक्क गात होती. कितीतरी वर्षांनी... मधूलाही आईची चाहूल लागली. आईच्या विस्फारलेल्या डोळ्यांकडे बघताबघता तिच्या लक्षात आलं, आज अघटित घडलं. आपण गातोय. आपल्याला गावसं वाटतंय.... सकाळपासूनच. गाण्याची इतकी अनावर इच्छा आतून उफाळून आली की ती दाबून ठेवताच

आली नाही. इतकी अनावर… ‘आपल्या पोटात वाढणाऱ्या गर्भाच्या पेशी थेट आजोबांच्या पेशीशी नातं सांगणार आहेत की काय? त्याच्या धमन्यातून रक्ताबरोबरच स्वरांचा प्रवाह वाहणार आहे की काय? आपण नाही, आपल्या गर्भातील प्रत्येक पेशी जणू गात आहे आणि तिचा स्वर आपण मुखरित करतोय. आता कुणाचा तिरस्कार करणार आपण? कुणाला टाळणार? ‘

साधनाकडे लक्ष जाताच, मधू धावत तिच्याकडे गेली. तिच्या पायाशेजारी फरशीवर बसली आणि तिच्या मांडीत आपलं तोंड लपवलं. जणू तिनं काही गुन्हा केला होता आणि त्यासाठी ती लज्जित झाली होती.

साधनाने तिच्या डोक्यावरून ममतेने हात फिरवत म्हटलं ….

“गा बेटी गा! अगं, तुझ्या पोटात अंकुरणारं बाळ जसं ईश्वराचं देणं, तसं तुझ्या गळ्यातून उमटणारं गाणंही ईश्वराचं देणं … उतू नको, मातू नको, ईश्वरचं देणं अव्हेरू नको. ”

मधूने मान वर उचलली. कितीतरी दिवस तिच्या मनात तळात घोंघावणारं वादळ शमलं होतं. आपल्या पोटात अंकुरणाऱ्या त्या इवल्या गर्भानं काहीतरी नवीन जाणीव आपल्याला दिलीय असं तिला वाटत राहिलं…

**सौ. उज्ज्वला केळकर, निलगिरी, सी-५, बिल्डिंग नं २९, ०-३ सेक्टर - ५, सी. बी. डी. -  नवी मुंबई ,**

**पिन - ४००६१४ महाराष्ट्र मो.  836 925 2454, email-id - kelkar1234@gmail.com**



## 6. लेख - गल्ली... - श्री आनंदहरी



“छोड आये हम वो गलियां..” .... माचीस चित्रपटातील कितीही वेळा ऐकले तरी मनाला हूरहूर लावणारे गाणे टीव्हीवर लागले होते. हे गाणे ऐकताना कदाचित प्रत्येकजण भूतकाळात जात असावा.. जीवनातील प्रत्येक क्षण आपल्याला नवीन काहीतरी देत असतो असे म्हणतात. पण त्याचवेळी तोच क्षण आपल्याकडून काहीतरी घेत असतो असे मला वाटले.

आपली इच्छा असो वा नसो माणसाला जीवनात चालत राहावे लागतंच.. चालणं म्हणजे स्थलांतर असते.. निमित्त काहीही असो, कारण काहीही असो पण अस्तित्वापासून माणूस चालत आलेला आहे. स्थलांतरित होत आलेला आहे. हे स्थलांतर होत असले तरी माणूस मनाच्या पुस्तकाच्या पानांतजुन्या ठिकाणच्या आठवणींची मोरपिसे, सोनचाफ्याच्या फुलांच्या पाकळ्या, पाने जपून ठेवत असतो. कधीतरी ते पुस्तक उघडून ती मोरपिसे पाहतो, फुलांच्या पाकळ्यांचा, पानांचा सुगंध घेत असतो.. सुखावत ही असतो आणि हुरहूरतही असतो.

अचानक माझ्या मनाच्या पुस्तकातील माझ्या गावाचे, गल्लीचे पान उघडले आणि सोनचाफ्याच्या फुलाचा सुगंध दरवळू लागला. ‘ किती वर्षे झाली नाही आपली गल्ली, गाव सोडून? ‘ मनाने विचारलेल्या प्रश्नाने आठवणींचं मोहोळ उठलं आणि पावलांना गल्लीची ओढ लागली.. अगदी आषाढातवारकऱ्याला पंढरीची ओढ लागावी तशी....!

विचारांच्या, आठवणींच्या लाटा मनाच्या किनाऱ्यावर येऊन आदळत होत्या. प्रवाहित जीवनाचे वास्तवचित्र मनपटलावर साकारत होते.. कधी गडद होत होते कधी फिकट होत होत विरुनही जात होते. अलीकडच्या काळात आपण शिक्षण असो, नोकरी-व्यवसाय असो किंवा अन्य काही कारणांनी आपण आपले घर, गल्ली, गाव सोडून दूर जातो. आपण कुटुंबाशी जोडलेले राहतो.. गाव आपले वाटत असते ते आपलेच वाटत राहते.. पण त्यात आधीही थोडेसे अंतर असते आणि नंतरही. पण आपली गल्ली?

बालपणापासूनच आपली गल्ली ही अंगणापलीकडचे आपले घरच झालेले असते. त्या काळात घरात व्यतीत केलेल्या वेळेइतकाच वेळ आपण गल्लीत घालवलेला असतो. आयुष्यातला आपला पहिला मित्र, पहिला खेळगडी, पहिला सोबती गल्लीतलाच असतो.

मला आठवतं, शाळेत जाताना आम्ही सर्व गल्लीतली मुलं, मग ती कोणत्याही वर्गात शिकत असली तरी, एकमेकाला साद घालून, हाक मारून सोबतच शाळेत जात होतो आणि शाळेतून येताना गल्लीतले सगळे सोबतच घरी परतत होतो.

गल्लीतला थोडासा मोठा, वरच्या वर्गात शिकत असणारा मुलगा सर्वांचाच दादा असायचा. मुळात त्यावेळी पालकांना मुलांची काळजी कमीच असायची.. किंबहुना नसायचीच. त्यातही तो दादा सोबत आहे म्हणल्यावर

तर पालक मंडळीही निर्धास्त असायची. आणि तो दादाही मनापासून, आपलेपणाने, मायेने काळजीवाहक व्हायचा. दादाचा सर्वांना आधार ही वाटायचा आणि अभिमानही.

शाळेतून आले की अंधारून येईपर्यंत गल्लीत कुणाच्याही अंगणात खेळ रंगायचे. कबड्डी, खोखो, विटी-दांडू, बैदुल (गट्टया/गोट्या ), पाठशिवणी, लंगडी.. कोणताही खेळ असायचा. खेळ म्हटलं की दंगा आलाच... पण त्या दंग्याचा कुणालाच त्रास वाटायचा नाही. उलट कामे आटोपून निवांत झालेली बायका-माणसे खेळ बघत बसायची.. कुणी मागे पडतोय, हरतोय असे वाटत असेल तर त्याला उत्तेजना द्यायची.. मग जिंकणारा मुलगा त्यांच्या घरातला का असेना. घरातले पोर आणि शेजाऱ्याचं, दुसऱ्या कुणाचे पोर हा विचारही कधी कुणाच्या मनात येत नव्हता आणि हे नुसतं खेळण्याबाबतीत नव्हते तर खाण्या-पिण्याच्या बाबतीतही होतं. घरात आलेल्या प्रत्येक पोराला, किंबहुना कुणालाही घासातला घास दिला जात होता.

गल्लीतल्या कुठल्याही घराचं दार हे सकाळी उठल्यावर उघडले की रात्री झोपतानाच बंद व्हायचे. मोठी माणसे कुठं कामाला बाहेर गेली तरी जाताना दाराला नुसती कडी लावलेली असायची.. कित्येकांच्या घरी कुलूप नसायचंच. अगदीच कुठं परगावी जायचे झाले तर गल्लीत ज्याच्याकडे कुलूप असेल त्याच्याकडून मागून आणून लावलेलं असायचे आणि किल्ली शेजारी ठेवलेली असायची.

गल्लीत कुणाकडे आलेला पाहुणा हा साऱ्या गल्लीचा पाहुणा असायचा. सुख असो वा दुःख ते एकट्याचे कधीच नसायचे. अडी-अडचणीला मदतीसाठी कुणाला बोलवण्याची गरज कुणालाच कधी भासायची नाही. माहेरवाशीण सासरी जाताना ती दिसेनाशी होईपर्यंत सारी गल्ली तिला निरोप द्यायला उभी असायची आणि ती सुद्धा जाताना फक्त आई-बापाच्या नाही तर गल्लीतल्या सर्व ज्येष्ठांच्या पाया पडायची, कुशीत मुसमुसायची, डोळे टिपायची. कोणतेही नाते हे फक्त कुटुंबापूरते मर्यादित न राहता सर्व गल्लीचे होऊन गेलेले असायचे. गल्लीतल्या घरांना भिंती असल्या तरी त्या कधी मनांत भिंती निर्माण करू शकल्या नाहीत.

मनानं कधीच गल्लीत पोहोचलो होतो. गावात प्रवेश करताना पावले काहीशी रेंगाळत चालली होती. काहीसे नव्या-जुन्याला पहात, स्वीकारत, जुन्या आठवणी जागवत. रोज शाळेला जाय-यायची हीच वाट.. पायांच्या ओळखीची.. आपल्या खडबडीत देहावर तिने आता डांबराची शाल पांघरून घेतली असली तरी तिच्या ओळखीचा स्पर्श मनालाही जाणवत होता आणि पायांनाही..

माझी ओढाळ पावले गल्लीच्या दिशेनं चालली होती. कुठल्याही मार्गाने गावात आले की, जुन्या -जाणत्याने स्वागताला चार पावले पुढे यावे तशी पुढे येणारी तिळगंगा नदी... तिच्यावरचा पूल पार केल्याशिवाय किंवा तिला भेटल्याशिवाय कुठूनही गावातील बाजारपेठेत जाता येत नाही. पुलाच्या आधीच डाव्या हाताला छोटासा रस्ता धनंजय मठाजवळून गल्लीत घेऊन जाणारा. गल्लीच्या दोन्ही बाजूला दोन मठ.. दुसरा लिंगायत स्वामी मठ. या दोन मठांच्या मध्ये गल्ली कितीतरी पिढ्या सुखेनैव नांदत होती. धनंजय मठापासून काही पावलं चालत गेले कीछोटासा बोळ.. बोळातून बाहेर पडलं की आपण गल्लीत आलोय असे वाटायचे. घरांची तोंडे समोरासमोर दक्षिण उत्तर असणारी.. गल्ली पूर्व-पश्चिम वसलेली होती.

बोळातून गल्लीत आलो ते मनातल्या गल्लीच्या खुणा जागवत. काही किरकोळ बदल सोडले तर गल्ली तशीच होती. जिथं संपूर्ण बालपण गेले होते ते घर वार्धक्याच्या खुणा सांभाळत पण जसंच्या तसं ताठ उभे होते. ते अंगण, जिथली माती दुडूदुडू धावताना, खेळताना, पडताना पहिल्यांदा अंगाला लागली असेल, जसंच्या तसं होतं. घराच्याअंगणात एक मोठा बांधलेला तुळशीचा कट्टा होता त्यावरती तीन- चार माणसे निवांत बसून गप्पा मारू शकत होते. तुळशीकट्टा हा बालपणीच्या आठवणींचा कट्टा होता. माणूस मोठा होत जातो तेंव्हा घर-अंगणातून पहिले पाऊल बाहेर टाकतो ते गल्लीत. बालपणातील बराचसा काळ गल्ली म्हणजे त्याचं विश्वच असतं. जेंव्हा तो बाहेरच्या जगात प्रवेश करायचा तेंव्हा गल्ली म्हणजे घराच्या अंगणाबाहेरचे मोठं घर होऊन गेलेले असायचे...

गल्लीतील काही कुटुंबे विस्थापित झाली होती, काही नव्याने प्रस्थापित झाली होती. प्रत्येक व्यक्तीत काळानुरूप काहीसा बदल हा होत असतोच.. तसा गल्ली-गावातही होतो. जुन्या चित्रामध्ये रंगाचे काही फटकारे नव्याने मारल्यासारखा.. गल्ली तशीच दिसत होती. नव्या अलंकारांनी मढवल्यासारखी, सजवल्यासारखी. सारे डोळ्यांत साठवत बालमित्राच्या दारात उभा राहिलो.

" किती वर्षांनी आलास? "

खरंतर अनौपचारिक स्वागतात मधली सगळी वर्ष गळून गेली होती. किती बोलू अन किती नको असे होऊन गेलेलं. गप्पात जेवणाचेही भान उरले नव्हते.

" आलास ते बरे झाले.. मी सांगणार होतोच तुला 'येऊन जा ' म्हणून.. तुम्ही राहत होता ते घर पाडून नव्याने बांधणार आहेत. त्या आधी एकदा घर पहावंस... असे वाटत होते मला. "

माझ्या मनातल्या जागत्या घराच्या आठवणींवर निर्जन घराची सावली नको असे उगाच वाटून गेलं..

" नको.. येताना पाहिलं मी कुलूपबंद घर.. त्यापेक्षा आपण मठात जाऊया.. "

" मठात? "

बालमित्र काहीसा थबकला आणि क्षणभर काहीसा विचार करून ' चल ' म्हणाला.

बालपणी मठामध्ये चतुर्मासातचनव्हे तर रोज ग्रंथांचे पारायण, वाचन चालू असायचे. भजन चालायचे.

" आता मठात पारायण, भजन होते का रे? "

माझ्या प्रश्नाला काहीही उत्तर न देता तो नुसताच ' चल.. ' म्हणाला.

रस्त्यावरून मठाकडे वळलो. उजव्या हाताला पूर्वीच्या स्वामींच्या समाध्या.. त्यावर फुलांचा अभिषेक करणारी पांढऱ्या चाफ्याची झाडे तशीच बहरती होती. समाधीवर नतमस्तक झालो आणि मठाकडे वळलो.

मठाची इमारत भूकंपात जमीनदोस्त व्हावी तशी ढासळली होती. पायऱ्या चढून मठात प्रवेश करतानाच उजव्या हाताला समाधी. तिथं वर पत्र्याचे पान घालून सावली केली होती.. दगडी जोता मात्र तसाच होता. समाधीला नमस्कार करून आम्ही पायऱ्यांवर बसलो.

याच मठाच्या प्रांगणात बालपणी आम्ही गल्लीतली सगळी मुले खेळ खेळायचो. प्रत्येकाचेच सश्रद्ध असे वेगळेच नाते पारायण- भजनामुळे मठाशी जुळले होते. तिथल्या प्रसन्न वातावरणाने मन कसं निर्विकार आणि निर्विकल्प होऊन जायचे. आम्ही दोघे मित्र तर तिथं अभ्यास करत बसायचो. सुट्टीच्या दिवशी आणि परीक्षा जवळ आल्यावर तर दुपारच्या शांत -निवांत वेळी आम्ही दिवसभर मठातच असायचो. मठाशी आमचे आणखी एक वेगळे नाते निर्माण झाले होते. आमच्याबद्दल कुणी कुणाला विचारले तर ' मठात असणार ' हेच उत्तर दिले जात होते. त्या मठाची अशी अवस्था पाहून मन व्यथित झालं होतं. मठ पुन्हा बांधायला हवा यावर गावमत एक असले तरी आराखड्याबाबत बारा जणांची तेरा मतं होती.

आम्ही बराच वेळ गप्पा मारत पायरीवर बसून होतो. आमची गल्ली हळूहळू करत पूर्ण बदलली होती. निसर्गनियमाने काही पाने गळून गेली होती, काही नव्याने उमलली, फुटली होती. झाडाचा पसारा वाढून ते आणखी बहरल्यासारखे वाटावे तशीच गत गल्लीची झाली होती.. पण पण तो बहर बाह्यांगी दिसण्यापुरताच होता.. प्रत्यक्षात ते पूर्ण वठलेले होते.

गल्लीवरच्या गप्पातून एकच जाणवले होते आमची गल्ली आता गल्ली राहिली नव्हती. बंद दार संस्कृती तिथेही आली होती. घराच्या भिंती मनाच्या आणि जगण्यातल्याही भिंती झाल्या होता. गल्ली बाह्यरंगी काही अंशी तरी तशीच उरली असली तरी अंतरंगी पूर्ण बदलली होती. माणूस माणसापासून दुरावला होता. गल्लीचे घरपण पूर्ण हरवून गेले होते.

बालमित्र थांबायचा आग्रह करत होता.. त्या मातीशी जोडले राहण्यासाठीचा तो एकमेवा दुवा उरला होता. कामाची तातडी सांगून आणि पुन्हा येण्याचं आश्वासन देऊन मी बाहेर पडलो.

बाह्यांगी झालेला बदल माणूस स्वीकारू शकतो पण अंतरंगी झालेला बदल स्वीकारणे माणसाला जड जाते कारण त्यातील आपलेपणाच्या साऱ्याच खुणा हरवून गेलेल्या असतात..

माझी पावले परतीची वाट झपाट्याने चालू लागली होती. ...न रेंगाळता.. मागे वळूनही न पाहता.. गल्लीची ओढ हरवून गेल्यासारखी. अनोळखी गल्लीतून निघाल्यासारखी!

**श्री आनंदहरी, इस्लामपूर जि. सांगली - मो ८२७५१७८०९९**



## 7. चित्रकाव्य - “स्पर्श ओलाव्याचा” - सुश्री मंजुषा सुनीत मुळे





*नकोच घर ते ऐसपैस*
*अन नको वेगळी जागा*
*आनंदे डोलाया पुरतो*
*स्नेहभरला एकच धागा...*

*टोक जरी सापडलं त्याचं*
*घट्ट धरून ठेवते*
*बघता बघता नकळत मीही*
*बहराया लागते...*

*कोवळी कोमल पाने माझ्या*
*अंगोपांगी हळू उगवती*
*खडबडीत हे माझे अंग*
*अलगद लपेटून घेती...*

*अन अचानकच त्या पानांमागून*
*गोंडस इवली फुलं डोकावती*
*प्रेमाने मज जवळी घेऊन*
*आनंदाने न्हाऊ घालती....*

*प्रेमळ सुखद त्या ओलाव्याने*
*अंग अंग माझे मोहरते*
*आहे कोण मी, कुठली आहे*
*क्षणात सारे विसरून जाते...*

*पणप्रेमळ सजीवांचा या असतो*
*सहवास मोजक्या दिवसांचा*
*...परि भिंतीत चिणून गेल्यावरही*
*विसर न पडे त्या ओलाव्याचा...*

*सुश्री मंजुषा सुनीत मुळे, सांगली*



## 8. कथा - सवत... सुश्री गौरी गाडेकर



ऑफिसमधून आल्याआल्याच श्रीकांतनी कपाटातले कपडे काढून बॅग भरायला सुरुवात केली.

"टूरवर जायचंय? नका ना जाऊ. नाहीतर मीही येते तुमच्या बरोबर. "

"घरी चाललोय. "

"घरी? "

"प्रदीपचा फोन आला होता. मंदाची कंडिशन क्रिटिकल आहे. एक तर त्या दोघांना रजा घेणं शक्य नाही. शिवाय निदान तिच्या शेवटच्या दिवसांत तरी मी तिच्याजवळ असावं... जवळजवळ तंबीच दिलीय त्याने."

"जेवून जा. "

"नको. आताच निघतो. जेवायला तिकडेच येतो, म्हणून सांगितलंय. "

"निदान चहा तरी.... "

दोन क्षण विचार करून त्यांनी ' बरं ' म्हटलं.

अगदीच उपाशी नको जायला, म्हणून मग रवा भाजायला घेतला.

कधी ना कधी ही अशी वेळ येणार, ते आपल्या घरी निघून जाणार आणि मी एकटी पडणार, अशी भीती कायम माझ्या मनात असायचीच... आता तर मंदा 'जाई'पर्यंत ते तिथेच राहणार. ती गेल्यावरही मुलं, नातेवाईक बोलून बोलून त्यांच्या मनातलं गिल्ट अजूनचवाढवणार. मग कदाचित ते इथे परत कधीच येणार नाहीत.

रवा शिजल्यावर गूळ घालता घालता एकदम एक कल्पना सुचली. मग त्यावर उलटसुलट विचार करून, योग्य ते शब्द शोधून......

शिऱ्याचा पहिला घास घेताच त्यांनी ' वा! ' म्हटलं. हीच योग्य वेळ होती सुरुवात करायची.

"ती दोघं ऑफिसला जाणार. मग तुम्ही एकटेच कसं सांभाळणार मंदाला? "

"बघूया. "

दोन मिनिटं जाऊ दिली आणि मी म्हटलं, " तुम्हाला एकट्याला कठीण पडणार ते. मला एक मार्ग सुचतोय. सांगू? "

"सांग. "

"तिला इकडे आणा. "

"इकडे? कसं शक्य आहे हे? ती अजिबात येणार नाही. प्रदीप, प्रेरणाही तयार होणार नाहीत. "

" बरोबर आहे तुमचं. " मी दोन पावलं मागे आल्यासारखं दाखवलं, "चहा घ्या. थंड होतोय. "

बाऊलमधला शिरा संपल्यावर आणखी थोडा शिरा वाढला आणि त्यांना आवडतं तसं वर तूप घातलं. गरमगरम शिऱ्यावर पडलेल्या त्या तुपाच्या दरवळाने त्यांच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्याची खात्री झाल्यावर मी पुन्हा विषयाला हात घातला.

"तुम्ही रजा घेऊन राहिलात, तरी दिवसभर आणि रात्रीही तिच्या शुश्रूषेला तुम्ही एकटेच असणार. तिला इथे आणलंत, तर माझाही हातभार लागेल. माझ्याकडून जो अपराध घडलाय, त्याचं प्रायश्चित्त घेण्याची मला संधी मिळेल. ' नाही ' म्हणू नका. मी अगदी बहिणीसारखी तिची सेवा करीन. "

श्रीकांत विचारात पडले.

"दुसरं म्हणजे प्रदीप - प्रेरणाची किती धावपळ होईल, ऑफिस - पेशंट सांभाळताना? आणि त्यांना सांगा, ' ते - तेच नव्हे तर इतरही नातलग मंदाला भेटायला आपल्या घरी कधीही येऊ शकतात. मी अजिबात ऑब्जेक्शन वगैरे घेणार नाही. ' "

त्यांना थोडं थोडं पटायला लागलं होतं. तरीही....

"मी बॅग घेऊन जातो. म्हणजे ते तयार झाले नाहीत, तर...."

"नको. नको. बॅग नेली तर ते अजिबात तयार होणार नाहीत मंदाला इकडे पाठवायला. तुम्ही नुसतेच जा."

एकदा का श्रीकांत निघून गेले, की ते परत येतीलच, याची शाश्वती नाही. आणि मी तरी कोणत्या नात्याने त्यांना बोलवणार?

मागे मी हट्ट धरला होता, कागदोपत्री नसेना का, देवळात का होईना, पण आपण लग्न करूया. पण नाहीच ऐकलं त्यांनी.

मी तर आणखी पुढे पोहोचले होते, "माझ्यासाठी नाही, पण आपल्याला मूल झालं तर.... "

"मंदाला दोन्ही बाळंतपणात खूप त्रास झाला. तेव्हा डॉक्टर म्हणाले, ' आणखी चान्स घेऊ नका. ' म्हणून मी ऑपरेशन करून घेतलं. त्यामुळे तुला मूल होण्याची धास्ती नाही. "

"भीती नाही. उलट.... " पण त्यांनी मला पुढे बोलूच दिलं नाही.

श्रीकांत माझ्या आयुष्यात आले ते दिवस आठवले मला.

बाबा अचानक गेले. मला ऑफिसमध्ये फोन आला. जेमतेम वीस - बावीस वर्षांची होते तेव्हा मी. श्रीकांतनी पुढाकार घेऊन सगळं केलं. तसे आमचे नातेवाईक होते, पण नावालाच.

त्या धक्क्याने आई आजारी पडली. दीड - दोन वर्षं बिछान्यावर होती ती. ती गेली, तेव्हा मात्र मी अगदीच एकटी पडले. त्या दिवशी रात्री थांबलं तर पुढच्या १०-११ रात्रीही राहावं लागेल, या भीतीने सगळे नातेवाईक भराभरा निघून गेले. एकटंराहायच्या कल्पनेने मला रडूच यायला लागलं. छातीत धडधडायला लागलं. उलटी आल्यासारखं वाटायला लागलं. तेव्हा श्रीकांत थांबले सोबतीला. मग पुढच्या रात्रीही ते थांबायचे.

ते बाहेरच्या खोलीत आणि मी बेडरुममधे झोपायचो. सकाळी उठून चहासुद्धा न घेता ते आपल्या घरी जायचे. असं करताकरता शेवटची रात्र आली.

दुसऱ्या दिवशीपासून ते येणार नव्हते. माझी पाचावर धारण बसली. कल्पनेनेच मला खूप घाम येऊ लागला. पोटात ढवळायलालागलं. छातीत धडधडायला लागलं.

मी त्यांना म्हटलं, "उद्यापासून मी एकटीच झोपणार. कल्पनेनेच मला खूप भीती वाटते. खूप म्हणजे खूपच. अगदी फोबिया... मी एकटी नाही राहणार. तुम्ही असेच येत जा. नाहीतर मी तुमच्या घरी येत जाईन झोपायला. "

"मी विचार करून सांगतो. मिसेस काय म्हणते, तेही बघितलं पाहिजे. "

"मला एकटी सोडू नका, " असं म्हणत मी त्यांना बिलगले आणि हमसून हमसून रडले.

त्या रात्री आम्ही जवळ आलो.

मी उठवळ नव्हते. तेही सभ्य होते. पण आमच्यामध्ये घडू नये, ते घडलं होतं.

आता विचार केल्यावर वाटतं, माझ्या सब कॉन्शिअस माइन्डने माझ्या फोबियावर मात करण्यासाठी शोधून काढलेला तो मार्ग असावा...

मग रोज रात्री ते येऊ लागले.

पुढे कधीतरी घरातली रोजची भांडणं, मंदाचीकटकट वगैरे असह्य झाल्यामुळे ते इथेच राहायला आले.

आता मंदा इथे राहायला येण्याची शक्यता कमीच होती. म्हणजे श्रीकांतनाही बहुधा तिथेच राहावं लागणार. आणि मी इकडे एकटीच...

मला खूप घाम यायला लागला. छातीत धडधडायला लागलं. मळमळायला लागलं. आता भडभडून उलटी येणार, असं वाटायला लागलं.

तेवढ्यात बेल वाजली.

मी कशाकशाचा आधार घेत दारापर्यंत पोहोचले. दरवाजा उघडला. बघते तर काय? दारात श्रीकांत, त्यांच्यामागे मंदा. मंदाला दोन्ही बाजूंनी प्रदीप- प्रेरणाने आधार दिला होता.

त्यांना ' या ' म्हणून मी स्वयंपाकघरात गेले. तोंडावर पाणी मारलं. ग्लासभर पाणी घटाघटाघटा प्याले. नंतर खसाखसा तोंड पुसून बाहेर आले.

त्या तिघांनी मंदाला बेडरूममध्ये आणून बेडवर झोपवलं होतं.

मंदा तशी मनाविरुद्धच आली होती. प्रदीप, प्रेरणा तोंडाने "आईने इकडे यावं, हे आम्हाला अजिबात पटलेलं नाही, " असं म्हणत असली, तरी त्यांच्या चेहऱ्यावरचा सुटकेचा आनंद, त्यांनी कितीही प्रयत्न केला, तरी लपत नव्हता.

त्या रात्री श्रीकांतही आतच झोपले. मी हॉलमधला सोफा - कम - बेड उघडून त्यावर झोपले.

मंदाला झोप लागल्यावर श्रीकांत एकदोनदा बाहेर फेरी मारून गेले. मी गाढ झोपल्याचं नाटक केलं. पण मला अजिबात झोप येत नव्हती... आता काय करावं बरं?

दोन - तीन तास विचार केल्यानंतर एक आयडिया सुचली. बाया ठेवायच्या दोन. बारा - बारा तासांच्या. रात्रीची बाई बेडरूममध्ये मंदाबरोबर झोपेल. मग तर श्रीकांतना बाहेरच झोपावं लागेल ना!

दुसऱ्या दिवशी रात्री मंदा सांगत होती, "बाईला बाहेर झोपू दे. लागलं तर हाक मारीन मी. "

पण नशीब, श्रीकांतनी नाही ऐकलं. ती बाई विचित्र नजरेने त्यांच्याकडे बघत होती. पण त्यांनी लक्षच दिलं नाही.

अर्थात मंदाची तब्येत पाहता ही समस्या थोड्या दिवसांपुरतीच, फार तर काही महिन्यांपुरतीच होती. मग मी आणि श्रीकांत कोणत्याही गिल्टशिवाय एकत्र राहू शकू. कदाचित ते माझ्याशी लग्न करतील. लग्नाचा

विषय मी कितीही मागे टाकला, तरी मला श्रीकांतची पत्नी हे स्टेटस हवंहवंसंवाटत होतं, याची जाणीव मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात दडली होती, म्हणायची.

मंदा वारल्यावर तिचे दिवस वगैरे आटोपले, की आपण श्रीकांतकडे लग्नाचा विषय काढायचा. आणि यावेळी फक्त देवळातच नव्हे, तर लग्न रजिस्टरही करायचं, हे मी ठरवून टाकलं.

आणि अचानक विपरीतच घडलं.

एकदा जेवून झाल्यावर बसलो असताना, अचानक श्रीकांतना दरदरून घाम फुटला. त्यांच्या छातीत दुखायला लागलं. 'गॅसेस असतील', असं वाटलं. पण तरीही डॉक्टरांना फोन केला. डॉक्टर लगेचच आले. म्हणेपर्यंत त्यांना दुसरा अटॅक आला आणि डॉक्टरांच्या पुढ्यातच त्यांनी शेवटचा श्वास घेतला.

सगळे विधी माझ्याच घरात पार पडले.

वडिलांच्या अंत्यविधीसाठीही प्रतीक्षा आली नाही. तिच्या सासरच्यांनी श्रीकांतशी नातं तोडून टाकलं होतं. पण लग्न थाटामाटात करताना आणि हुंडा घेतला तेव्हा माझे पैसे चालले होते!

बारावं झालं, त्याच्या दुसऱ्याच दिवशी प्रदीप, प्रेरणा येऊन सांगायला लागले की प्रदीपचीट्रान्स्फर दिल्लीला झालीय. श्रीकांत गेले, त्याच दिवशी त्यांना कळलं होतं. पण घरात हे असं वातावरण असल्यामुळे त्यांनी आतापर्यंत सांगितलं नव्हतं. तीन-चार दिवसांत ते निघणार होते. घराचं स्थिरस्थावर झाल्यावर, नंतर येऊन मंदाला घेऊन जाणार, म्हणाले.

श्रीकांतनी मला सुरुवातीलाच सांगितलं होतं, की मंदाकडे नातेवाइकांचं येणं -जाणं असतं. तसा त्यांचा गोतावळाही मोठाच होता. शिवाय ती सासर-माहेरच्या सगळ्यांना धरून होती. त्यामुळे दोन-तीन दिवसांतून कोणीतरी भेटायला यायचंच.

मला तिचा हेवा वाटायचा बरेचदा. कारण आई-बाबा असताना आमच्याशी संबंध ठेवून असणारे नातेवाईक बाबांच्यामृत्यूनंतर येईनासे झाले. तेव्हा आईचं आजारपण सुरू झालं होतं. आणि नोकरी करत असले, तरी मी वयाने अगदीच लहान. त्यामुळे त्यांनी हातपुढे केला, तर आम्ही त्या हातालाच लटकू, अशी भीती वाटली असेल त्यांना. आई गेल्यावर तर काय? एका तरुण मुलीची जबाबदारी म्हणजे लग्न आणि एकंदरीतच सगळा खर्चाचा मामला. त्यामुळे सगळ्यांनीच काढता पाय घेतला. आणि श्रीकांतशी संबंध जुळल्यावर तर काय? सगळ्यांनी मला बाकायदा वाळीत टाकलं.

श्रीकांत गेल्यानंतर मात्र सगळं चित्रच पालटलं. हळूहळू करत मंदाचे नातेवाईक यायचे बंद झाले.

त्याउलट माझ्या नातेवाइकांनी फोन करायला सुरुवात केली. म्हणजे "बाकीचे काहीही म्हणोत, मला मात्र तुझी काळजी वाटते.... " वगैरे.

एक दिवस तर एक भाचा चक्क घरातच टपकला.

"हे बघा आंटी. मी स्पष्ट बोलणारा माणूस आहे. पुढे कॉम्प्लिकेशन्स होण्यापेक्षा तुम्ही सरळ विल करून ठेवा. मी मदत करतो तुम्हाला. "

त्याच्या बोलण्याने मी सावध झाले. त्याला चहापाणी देईपर्यंत मी विचार करून घेतला. मग सांगितलं, " तू म्हणतोस, ते बरोबर आहे. पण खास विल करण्यासारखं माझ्याकडे फारसं काही नाहीय. "

"हे घर.... "

"या घरावर माझं नाव असलं, तरी कागदोपत्री ते श्रीकांतच्याच नावावर आहे. नॉमिनी त्यांचा मुलगा आहे. त्यामुळे त्याने जर मला घराबाहेर काढलं, तर कुठे जायचं, हा प्रश्नच होता. आता तू एवढी आपुलकी दाखवतोयस, म्हटल्यावर मी तुझ्याकडे येईन. शिवाय बँक बॅलन्स फारसा नाही. आमचा जॉइंट अकाउंट होता. त्यांच्या संसारासाठी ते त्यातले पैसे काढायचे. आता हिच्या आजारपणात मीच खर्च करतेय. "

जेमतेम चहा पिऊन तो उठून गेला.

त्याच्याकडून माझ्या इतर नातेवाइकापर्यंत ही बातमी पोचली असावी. कारण नंतर इतरांचे फोन येणं बंद झालं.

आताआताशा मलाही थोडं थकल्यासारखं वाटायचं. शरीर वयाची जाणीव करून द्यायला लागलं होतं.

रात्री दोन - तीनदा वॉशरूमला जायला उठावं लागायचं. एकदा उठले, की पाऊण - एक तास तरी झोपच यायची नाही. कधीकधी तर अजूनही जास्त वेळ. रात्रीच्या त्या भयाण वेळी आयुष्याचा पट डोळ्यांसमोरून सरकायचा. तसं श्रीकांतमुळे मला कधीच एकटीला राहावं लागलं नव्हतं. घरच्यांचा रोष, बाहेरच्यांकडून बदनामी.... सगळं पत्करून ते मला सोबत करत होते.

आताही शेजारच्या खोलीत का होईना, पण मंदा आणि तिची बाई आहे म्हटल्यावर जाग वाटायची. उद्या प्रदीप तिला घेऊन गेला, तर मात्र माझ्यावर एकटेपणाची शिक्षा भोगायची पाळी येणार.

प्रदीप, प्रेरणा दिल्लीला जाऊन दीड - दोन महिने झाले, तरी ते मंदाला नेण्याची गोष्ट काढीनात.

एक दिवस मंदाने मला बोलावून घेतलं. बाईला खोलीबाहेर जायला सांगितलं. जाताना दार बंद करून घ्यायलाही सांगितलं आठवणीने.

"बस. मला बोलायचंय तुझ्याशी. "

मी बसले. ' काय बोलायचं असेल हिला? ' याचा विचार करायला मी सुरुवात करणार, तेवढ्यात ती बोलायला लागली, "हे बघ, नमिता. ज्याच्यामुळे आपल्यात तेढीचं नातं होतं, तोच या जगात राहिला नाही. त्यामुळे

आपला आता काहीच संबंध नाही. तरीही तू मला अजून तुझ्या घरात ठेवून घेतलं आहेस, त्याबद्दल मी तुझी मनापासून आभारी आहे. माझं रक्ताचं नातं, ही पोटची पोरंही मला विसरून गेलीत. प्रदीप येईल आणि मला घेऊन जाईल ही आशा मी मनातून काढून टाकलीय. माझी जबाबदारी अंगावर पडेल, या भीतीने माझी भावंडंही फिरकायची बंद झाली. माझी तुला एक विनंती आहे. एक बरासा वृद्धाश्रम बघ आणि माझी तिकडे सोय कर. यांचे जे काही पैसे माझ्या वाट्याला आले असतील, त्यातून त्याचेचार्जेस भरले जातील, अशी व्यवस्था कर. मला शक्य तेवढ्या लवकर तुझ्या घरातून आणि तुझ्या आयुष्यातून बाहेर पडायचंय. "

"मी करते चौकशी. "

... मी तिला आश्वासन दिलं खरं, पण मध्यरात्री जाग आल्यावर पुन्हा तो एकटेपणाचा राक्षसमला भेवडावू लागला. उलटसुलट सगळ्या शक्यता तपासून झाल्यावर मी निर्णय घेतला. त्यासंबंधी सकाळी तिला सांगायचं, असं ठरवल्यावर मला गाढ, शांत झोप लागली. कित्येक दिवसांनी.

दुपारी जेवणं आटोपल्यावर मी मंदाला सांगितलं, "हे बघ, मंदा. आपलं दोघींचंही त्या माणसाशी एकच नातं होतं. म्हणजे कायदेशीरदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या त्या नात्याला वेगवेगळी नावं असतीलही. पण आपल्या दोघींच्या दृष्टीने आपलं त्याच्याशी फक्त शारीरिक नातं होतं. त्याचं प्रेमबीम असेलही आपल्यावर. पण तरीही त्याने दोघींवर अन्यायच केला. तू लग्नाची बायको असूनही त्याने तुझ्याशी प्रतारणा केली. आणि मी...? माझ्यासारख्या शिकल्यासवरलेल्या, चांगल्या पदावर नोकरीकरणाऱ्या हुशार, आत्मनिर्भर बाईला त्याने'रखेली' च्या पायरीवर उतरवलं."

मंदाच्या डोळ्यांत माझ्याविषयी कणव दाटून आल्यासारखं वाटलं.

"पूर्वी मी तुझा राग - राग करायचे, मंदा. हेवा वाटायचा मला तुझा. पण आता मात्र त्यातलं काहीच वाटत नाही. पुलाखालून बरंच, नव्हे सगळंच पाणी वाहून गेलंय. आता तर वरचा पूलही कोसळून पडलाय. खाली कोरडेठाक आहे, म्हटल्यावर पुलाचीही आवश्यकता उरलेली नाही. आता आपल्या दोघींच्यात उरलंय दुःखाचं नातं. समदुःखी आहोत आपण. त्या नात्याला साक्षी ठेवून सांगते, तू इथेच राहा. वृद्धाश्रमात वगैरे जायची आवश्यकता नाही. आपण दोघी एकमेकींच्या सोबतीने उरलेलं आयुष्य जगूया. "

ती डोळ्यांनीच बोलली. मला जवळ बोलावलं तिने. मी मिठी मारली तिला. आता फक्त मी आणि मंदा दोघीच होतो. आम्हाला एकमेकींच्या शत्रू बनवणारे श्रीकांत कुठेच नव्हते.

**सुश्री गौरी गाडेकर, 1/602, कैरव, जी. ई. लिंक्स, राम मंदिर रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई 400104. मो नं. 9820206306**

## 9. लेख - आमचे हे हरवले. - सुश्री राधिका माजगावकर पंडित



'केल्याने देशाटन अंगी येते शहाणपण 'याची प्रचिती लग्नानंतर मला भरपूर आली. वेगळ्या अनुभवाला दरवेळी सामोरं जावं लागलं. परक्या शहरात, अनोळखी भागात धीटपणा कसा दाखवावा? याचा 'अर्थ' मिस्टरांनीअगदी नववधू असतानाच माझ्यापुढे ठेवला. लग्नाआधी आप्पा बळवंत चौकापासूनपुणे स्टेशन पर्यंत आपण एकट्या नीट पोहोचू की नाही? ह्या विचारानेच धास्तावलेली मी, पुढच्या गाड्या कुठून कुठे जाणार? कुठल्या गाडीत किती नंबरच्या रेल्वे डब्यात बसायचं? वगैरे कसरतकरतांना पुढच्या कल्पनेनेच माझ्यातली मीधसकायची. आणि अहो मंडळी! लग्नानंतर अशा नवलाईच्या दिवसातपंडितांनी अमृतसरच्या ह्याsss भल्या मोठ्या स्टेशनवर मला एकटं सोडलं होत. तो किस्साही मजेशीर आहे.

त्याचं असं झालं, हे रेल्वेचे जावई त्यामुळे कुठल्याही जंक्शनवरठामपणे उतरणार आणि सराईतपणे पुढे जाणार. अहो पण सर्कस असायची ती माझीच की हो! . सतत मनात भीती, आपण रस्ता चुकू की काय! ह्यांचीआणि माझी चुकामूक झाली तर? ह्या विचाराने, मी अगदी यांच्यावर डोळा ठेवून असायची. कारण कुठल्याही स्टेशनवर पंडित अगदी अंगात आल्यासारखे पुढे पुढे धावायचे आणि फरपटत भेलकांडतमी मागे असायची, कुठलंही स्टेशन आल्यावर उडी मारून नवरोजी खाली उतरायचे आणि प्लॅटफॉर्मवरच्या गर्दीत मागे वळूनहीन बघतागडप व्हायचे. मग काय रेल्वे डब्याच्या खिडकीतून मी काय यांच्यावर डोळा ठेवणार? बसायची मग हातावर हात ठेवून, ' विठ्ठल विठ्ठल ' म्हणत. गाडी सुटायची वेळ व्हायची, लाऊड स्पीकरवरून पुन्हा पुन्हा अनाउन्समेंट व्हायची. अमुक अमुक गाडी काही मिनिटातच प्लॅटफॉर्म नंबर दोन वरून सुटेल. आणि हाय रे देवा! ती नेमकी आमचीच गाडी असायची, आणि ह्यांचा पत्ता नसायचा. काय सांगू तुम्हाला? त्यावेळी उतरणंहीमुश्किल, आणि गाडीतबसणंही मजबूर होत असे. मनातल्या मनात विठ्ठल नामाचा गजर वेगाने सुरू व्हायचा.

आणि कळस म्हणजे एकदा तर शिट्टी वाजून गाडी सुटलीपण, तरी हे गृहस्थ गुप्तच होते. मग काय! गाडीचा वेग, मनातली धडधड, आणि राम नामाचा जप या तिघांची तिहेरी स्पर्धा चालायची, मनातल्या मनात. रामाचा धावा करताना टाळ्या वाजवायच्याच बाकी होत्या. त्या पण वाजवल्या असत्या वारकऱ्यांसारख्या. पण ही बाई वेडी आहे की काय! असं लोकांना वाटेल म्हणून आजूबाजूचंभान ठेवून हात बांधून मी गप्प बसले होते तेव्हां. शेवटी डब्यातली लोकच माझ्या मदतीला धावली. कुणी म्हणालं, "क्या कमाल का आदमी है आपका हजबंड। गाडी छूट गई । फिर भी प्लॅटफॉर्मवर क्या कर रहा है ये अवलिया? " मनांत म्हणाले, 'सद्गृहस्था ते माहित असतं तर मी कशालाप्रश्नचिन्हात अडकले असते.? ' दुसरा म्हणाला, "कोई बात नही, आप अगले स्टेशन पर उतर जाना।" ।तिसऱ्यानी त्याला खोडून काढलं "नही रे! अगले स्टेशन

पर गाडी थोडी देरही रुकती है, अब दिल्ली दूर नही । दिल्ली बडा जंक्शन है। गाडी आधा घंटा रुकेगी. आप आरामसे उतर जाना बहेनजी दिल्लीमे." मीचरफडले 'अरे महाभागा! आराम से उतरून 'मै जाऊ कहाँ? '

फुकटचे सल्ल्यावर सल्ले मला गर्भगळीत करीत होते. इतक्यात कुणीतरी मराठी वयस्कर बाई माझ्या हिरव्या चुड्याकडे बघून कळवळली, "अरेरेरे बिच्चारी! अवघड आहे, आता कुठे जाईलही नवोढा? कुठल्या कुठे पोहोचेल, ह्या अशा अनोळखी शहरांत, आणि कसं होणार आता हीच? " एकानी मुक्ताफळ उधळली, "अरे दिल्ली मे गुंडे लोक तो बहोत है।" गाडीचा वेग विमानाला लाजवेल असा वाढला होता. मागे फिरायचे परतीचे दोर केव्हाच कापले गेले होते. कारण भुसावळ अगदी लांब ssलांब खूपमागे पडलं होत. बसायचं सीट ते दरवाजा अशा माझ्या उगीचच फेऱ्या वाढल्या होत्या. इतक्यात आवेगाने एक दादी माँ किंचाळली, "अरे भाई कोई उसको संभालो, नही तो डर के मारे वो दरवाजे के बाहर छलॉग मारेगी । मुझे मालूम है महाराष्ट्रीयन लडकिया कमजोर और डरपोक दिलवाली होती हैं "ऐकलं आणि माझा पुतळाच झाला. काय बिशाद आहे माझी चालत्या गाडीतून उडी मारण्याची. थांबलेल्या गाडीतून सुद्धामी पटकन उतरू शकले नसते..

गाडी सुसाटपळतच होती. छोटी छोटी स्टेशन मागे पडत होती. घरापासून लांब लांब कुठल्या कुठे जाऊन मी धडकणार होते. गाडी जरा कुठे थांबली की मी दरवाज्याकडे धाव घ्यायची आणि टाचा उंच करून करून हे कुठे दिसतात का अगदी नजरेची दुर्बिण करून बघायची. एवढ्यात डब्यातील काही लोक आरडाओरडा करायला लागली, "अरे भाई दरवाजा बंद करो तेज हवा आ रही हैं । "इथे माझी हवा उडालीयआणि याला थंडी वाजतेय. तेवढ्यात शिट्टी वाजली गाडी थांबली आणि सुटली. तरी पण पंडितांचापत्ता नव्हता. अखेर मोठं स्टेशन आलं. आता डब्यातल्या डब्यात धावाधाव करून दमछाक झालेली मी बाकावर बसकण मारून डोळे मिटून गप्प बसले. आणि ...

... आणितेवढ्यात ओळखीचा आवाज कानावर आला, " काय ग राधिका झोपलीसकी काय? "

मी मनात म्हणाले 'गृहस्था होश उडाले इथे माझे! झोप कसली कर्माची लागतीय? 'माझा रागरंग बघून यांनी पिल्लू सोडलं, 'मस्तपैकी चहा आणू का तुझ्यासाठी? ' मी घुश्यातच होते, म्हणाले, "नकोय मला चहा घसाकोरडा पडलाय माझा. पाणी हवय मला." त्यावर हे दरवाज्याकडे वळले आणि म्हणाले, "पाणीचहवंय ना.. त्यात काय? समोरच तर नळ आहे. आत्ता आणून देतो मी पाणी. "मी मात्र घाबरले. आहे का आता! परत तेच रिंगण, परतह्यांचं खाली उतरणं, पुन्हा अंतर्धान पावणं आणि पुन्हा माझं ताटकळणं –. "नकोय मला पाणी "असं म्हणून मी ह्यांना खाली बसवलं. डब्यातल्या लोकांनी माझी घालमेल पाहिली होतीच. या गदारोळातत्यांना माझी घबराहटचांगलीच परिचयाची झाली होती. त्यातल्या एका पैलवानाने ह्यांना डाफरले, "अरे कुठे निघालास? बैसगपगुमानबाकावर. आणि काय रे.. कुठे होतास इतका वेळ? पोरगी किती घाबरली होती "... माझ्याकडे कटाक्षटाकून अहो म्हणाले, " कमालच आहे तुझी!

तुलाएवढं घाबरायला काय झालं? मी इथेच तर होतो. आपल्या डब्याजवळपोहोचायच्याआधीच गाडी सुटली. कुठेही घुसलो तरी, रेल्वेआपलीच तर आहे. घुसलो एका डब्यातयोगायोगाने टी. सी. ओळखीचा निघाला. मग बसलो आरामात त्याच्याशी गप्पा मारत. हयाँ एवढी काय काळजी करायची? गाडीत मागच्या शेवटच्या डब्यात तर होतो मी. वेडीच आहेस. ".. बघितलंत ना! मी वेडी आणि हा सगळा सावळा गोंधळ घालणारे हे मात्र शहाणे, प्रश्न विचारणारा पहिलवान निरुत्तर होऊन आ वासूनहयांच्याकडे बघतच राहिला.

काय सांगू तुम्हाला! मी मात्र तेव्हापासूनधसका घेतला होता यांच्या गाडीतून खाली उतरण्याचा..

तरमंडळी अशी ही आमची लग्नानंतरची नव्या नवलाईचीप्रवासी गाथा. नंतर मात्र मी चांगलीच होशियार झाले. मुलं मोठी झाल्यावर हे गाडीतून खाली उतरायला लागले की मी मुलांना खूण करायची. मुलं ही तरबेज झाली होती. बाबा उठले की त्यांच्या शर्टाला धरून आमचे बाळ गोपाळ बाबांना खेचून खाली बसवायचेआणि तारस्वरात भोकाड पसरायचे. मग काय! बाल हट्टापुढेशरणागती. पण मग नंतर नव्याची नवलाई संपली. आणि मी चांगलीचएक्सपर्ट झाले. धडाधड एकटीने खूप प्रवास केले. तिथेही मला सहप्रवाशांनी खूप मदत केली.

पण त्या रेल्वे प्रवासातील अनुभवाला आणि तुम्हाला पण धन्यवाद... बरं का! .

**सौ. राधिका माजगावकर पंडित. पुणे - 51 मो. 84 510 27 554.**



## 10. गझल - जुनेऱ्यासारखं... श्री राजकुमार दत्तात्रय कवठेकर



*जरी गोडीगुलाबीने जगाशी वागतो आहे*

*फणा माझ्यावरी जो.. तो.. तरीही काढतो आहे...*

*पुन्हा हे नाटकी त्यांचे रडू अन् आर्जवी भाषा*

*विनासायास मी त्यांच्या गळाला लागतो आहे...*

*कशाला आसवे ढाळू? कुणाचा मी करू धावा?*

*स्वतःसाठी रडे जो तो, कुणी ना पावतो आहे...*

*तुझ्याशी काय मी बोलू? भेटता काय मी सांगू?*

*विचारानेच या एका पुन्हा मी ग्रासतो आहे...*

*किती घालू पुन्हा टाके, कितीदा टीप ही मारू*

*जुने-यासारखा इथे-तिथे मी फाटतो आहे...*

*चुकीने या जराश्या ते किती रागावले सांगू*

*सुताने स्वर्ग त्यांच्यातील जो तो गाठतो आहे...*

*किनारा... ही जरी कोजागिरी... ना घास पोटाला*

*जणू माध्यान्ह, चंद्राने तसा मी भाजतो आहे...*

*उरी साठून मी होतो; तुझ्या एकाच भेटीने*

*प्रवाहासारखा आता वहातो... वाजतो आहे...*

*खुलासा दे, दिलेला शब्द का तू पाळला नाही*
*दिले आयुष्य जे माझे कुठे मी मागतो आहे?...*

*"जगा आता तरी या ओळखायाला हवे रे तू..."*
*पुन्हा झाल्या प्रकाराने मला मी सांगतो आहे...*

*कुणी ना थांबतो आहे कधी जाणून हे घेण्या*
*'कुणासाठी? कशासाठी? अरे मी धावतो आहे'...*

*नव्याने मी पुन्हा येथे जगाया सिध्द होणारा*
*जुनी मी कात काळाची...मनाची टाकतो आहे...*

*तरी मी बोललो होतो नको हा सोस स्वप्नांचा*
*किती ठेचा मनाला... पायही रक्ताळतो आहे...*

*अरे! ना दुःख हे माझे, नसे आक्रोश हा माझा*
*'बिचाऱ्यांच्या' व्यथेने जीव हा केकाटतो आहे...*

*किती मागून मी धावू, म्हणू "व्हा सोबती माझे"*
*जथा जो तो सुखाचा नेहमी हुलकावतो आहे...*

*कधीही तू पुन्हा येशील याची खातरी आहे*
*'मला' मी याचसाठी आजही सांभाळतो आहे...*

**श्री राजकुमार कवठेकर, ओंकार अपार्टमेंट, डी बिल्डिंग, शनिवार पेठ, आशा टाकिज जवळ, मिरज**
**मो ९४२११०५८१३**

## 11. कथा - ध्यास... सुश्री सुचित्रा पवार



आज सातवीच्या शालांत परीक्षेच्या निकालाचा दिवस. गुरुजी प्रत्येक विद्यार्थ्याला बोलवून निकालपत्र हातात देत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उत्सुकता, कुतूहल, अधीरता आणि भय स्पष्टपणे दिसत होतं. सुनील सुद्‌धा आपल्या निकालाची आतुरतेने वाट बघत होता पण मनात धाकधूक होती. सरांनी सुनीलच्या नावाचा पुकारा केला. धडधडत्या काळजाने सुनील पुढं गेला, निकालपत्र हातात घेऊन अधीरतेने एक नजर टाकली दोन तीन विषयांच्या खालील लाल रेषा पाहून त्याचा चेहरा खर्रकन उतरला. पोटात भीतीचा गोळा उठला. आता आई आबांना काय सांगायचं? आपल्या साठी आपले आई आबा किती कष्ट करतात आणि एक आपण साधं पास देखील होऊ नये? आता आई आबांना काय सांगायचं? त्यांना कसे तोंड दाखवायचे? आपल्या शाळेसाठी ते किती खस्ता खातात! आपल्याला कुठले कष्ट पडू नये म्हणून किती जपतात;आणि आपण साधं पास होऊ नये? शाळा सोडून द्यावी आणि शेतात जावे का? आपल्याला पण वाटतं की आपणही इतरासारखं पास व्हावं, शाळा शिकावं, चांगलं काम करून आई आबांना सुखात ठेवावं पण गणित जमत नाही, इंग्रजी कळत नाही आणि इतिहास पाठ होत नाही. नकोच ते काही, पेक्षा शाळाच सोडून द्यावी. आई आबांना शेतात मदत करावी, गुरे चारावी.... सुनील विचार करत एकटाच रस्त्याने चालला होता...

रस्त्यात एके ठिकाणी माणसांचा घोळका उभा होता आणि डमरूचा आवाज येत होता. तोही त्या दिशेने गेला आणि त्या गर्दीत मिसळला. टाचा वर करून त्याने घोळक्याच्या आत डोकावले. एक गारुडी जादूचे प्रयोग करत होता. काहीतरी मंत्र पुटपुटला की हातातील वस्तू गायब व्हायची. दुसऱ्याच क्षणात हवेतून नाण्यांचा पाऊस पाडायचा, लोक टाळ्या वाजवायचे. बोलत बोलत तो साप ठेवलेल्या टोकरीवर हलकेच थोपटायचा. "छु... " म्हणलं की बंद मुठीतील वस्तू गायब व्हायची. सुनील भान हरपून खेळ बघत बसला. मग गारुड्याने पोतडीतून बासरी काढली, सापाच्या टोकरीचे झाकण उघडले न बासरी वाजवायला सुरुवात केली. टोकरीतून नाग बाहेर आला आणि आपला फणा काढत इकडे तिकडे बघू लागला. त्याच्या डोक्यावरील दहाचा अंक बघून लोकांनी हात जोडले. गारुडी हात जोडून पैशांची मागणी करू लागला. कुणी पाच पैसे, कुणी दहा पैसे दिले. कुणी गर्दीतून काढता पाय घेतला. नागाला टोकरीत बंद करून गारुड्याने पोतडीच्या दुसऱ्या कप्प्यातून एक ताईत काढला... " कुणाचं मूल सतत आजारी असंल, कोण पेपरात नापास होत असंल, चक्कर येत असंल, डोकं दुखत असंल, जनावर आज्यारी पडत असंल तर हयो ताईत गळ्यात बांधल्यावर सगळं प्रश्न चुटकीत सुटणार बघा. दोन रुपये, दोन रुपये.. ".. गारुडी हातातील ताईत नाचवत रिंगणात फिरत होता, त्याचा लहान मुलगाही पाठोपाठ लोकांकडे हातात ताटली घेऊन पैसे मागत होता. सुनीलला वाटले आपणही एक ताईत घेऊन गळ्यात बांधावा आणि दरवर्षी पास व्हावे. पण सुनीलकडे दोन रुपये नव्हते.

सुनील हातातील निकालपत्र घेऊन पळत घरी सुटला. देवळीत तांब्याखाली ठेवलेली किल्ली घेऊन कुलूप काढले, खाऊच्या पैशातली दोन रुपयांची एक नोट घेऊन दार बंद करून तो गारुड्याकडे निघाला. मघाच्या ठिकाणी गारुडी दिसला नाही, खेळ बंद करून तो निघून गेला होता. सुनीलने इकडे तिकडे शोध घेतला पण गारुडी दिसला नाही. सुनीलला रडू आले. हातातील नोट घेऊन तो मागे फिरला व शेताच्या दिशेने जाऊ लागला. इतक्यात चौथीचे माळी गुरुजी सायकलवरून शेतात जात असलेले दिसले. सुनीलचा पडका चेहरा पाहून गुरुजींनी त्याला विचारले, "काय झालं रे सुनील? आणि आज तुमच्या परीक्षेचा निकाल होता ना? पास झालास का? " गुरुजीनी असे विचारताच सुनील मोठ्याने रडू लागला. "काय झालं नीट सांग पाहू? आणि पैसे घेऊन कुठं निघालास? "सुनीलने त्या गारुड्याच्या ताईतची जादू सांगितली. तसे गुरुजी हसू लागले...

"अरे वेड्या, असे ताईत बांधून कुणी पास होत असते का? तसे असते तर शिक्षक, शाळा, पुस्तकं निर्माण झाली असती का? कष्ट केल्याशिवाय कुठलीच गोष्ट साध्य होत नसते. "

"मग मी ही खूप अभ्यास करतो की गुरूजी.. " सुनील मधेच म्हणाला.

"शिवरायांनी किती संकटातून स्वराज्य निर्मिती केली. बघ, स्वराज्यावर किती संकटे आलेली, त्यांनी कोणता ताईत बांधलेला तुझ्या वाचनात आले का? उलट आपल्या बुद्धीचातुर्याने त्यांनी सर्व संकटांवर मात केली. स्वराज्य निर्मितीचा घेतलेला ध्यास हेच त्यांच्या यशस्वीतेचे कारण आहे. या ध्यासासाठी त्यांनी जीवाची पर्वा न करता अनेक संकटांना धैर्याने तोंड दिलं. स्वामी विवेकानंद, गांधीजी, फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर अशी कितीतरी उदाहरणे आहेत ज्यांनी आपल्या धेय्याचा ध्यास घेतला म्हणून ते यशस्वी झाले, आदर्श ठरले. आपण त्यांच्या कथा नुसत्या वाचायच्या नसतात, तर त्या आत्मसात करून त्यांनी घालून दिलेल्या आदर्शमार्गावरून चालायचं असतं. द्रोणशिष्य एकलव्याची कथाही तुला माहीतच आहे. आपल्या गुरूचा पुतळा बनवून त्याने स्वतःच धनुर्विद्येचा ध्यास घेतला म्हणून तो श्रेष्ठ धनुर्धर झाला. तूही असा ध्यास घे, कच्च्या विषयांवर बारकाईने लक्ष दे, काही नडले अडले तर माझ्याकडे ये मी तुला मार्गदर्शन करेन पण एवढ्या तेवढ्या अपयशाने खचून जाऊ नको आणि छोट्याशा यशाने हुरळूनही. "

"पण गुरुजी मी आता आई आबांना तोंड कसे दाखवू? मला खूप भीती वाटते. "

"चल, मी येतो तुझ्यासोबत. " - गुरुजींनी सुनीलला सायकलवर बसवून त्याच्या शेताकडे घेऊन गेले. सकाळ पासून सुनीलची वाट बघणारे आई आबा सुनीलला बघताच आनंदून गेले. सुनीलचा रडवेला चेहरा पाहून आईआबांनी गुरुजींना खुणावून विचारले. गुरुजींनी सांगितले सुनील यावर्षी नापास झालाय पण पुढं चांगला अभ्यास करेल आणि पास होईल, यावर्षीची त्याची फी मी भरेन. आईने सुनीलला जवळ घेतले. " गुरुजी सांगत्याल तसं कर बाळा." आई म्हणाली.

त्या दिवशीपासून सुनीलने अभ्यासाचा ध्यास घेतला. दररोज गुरुजींच्या घरी अभ्यासाला जाऊ लागला. गुरुजींनी प्रथम त्याचेमागचे कच्चे विषय पक्के करून घेतले. नेमकं काय अडत होतं त्याची पुन्हा पुन्हा उजळणी करून घेतली. इतिहासातील पाठ पुन्हा पुन्हा वाचून सुनील सर्वविषय समजून घेऊ लागला.

शाळा सुरू झाली. गुरुजींनी त्याची फी भरली. त्याच वर्गात पुन्हा बसायला सुनीलला लाज वाटू लागली पण थोड्याच दिवसात त्याला सवय होऊन गेली. आता मागे हटायचं नाही अशी पक्की खूणगाठ त्याने आपल्या मनाशी बांधून घेतली. वर्गातपहिल्या पाच क्रमांकात येणाऱ्या हुशार होतकरू मुलांशी त्याने मैत्री केली आणि जोमाने अभ्यासाला लागला. पहिली चाचणी झाली, सुनील सर्व विषयांत उत्तीर्ण झाला. पुढं वार्षिक परीक्षेतही चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला... पुढे दहावीच्या बोर्ड परीक्षेतही चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षणासाठी दुसऱ्या गावी गेला.

मग त्याने मागे वळून बघितले नाही. ' कमवा व शिका ' योजनेतून त्याने आपले सर्व शिक्षण पूर्ण केले व आपल्या गुरुजनांचे व आईवडिलांचे ऋण कायम लक्षात ठेवून त्यांचे श्रम सार्थकी लावले.


आज सुनील शहरातील नामांकित वकील असून त्याच्यासारख्या अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतो, गरजू मुलांना शिक्षणासाठी मदत करतो... माळी गुरुजींचा वारसा पुढं चालवतो आणि थकलेल्या आईवडिलांची मनोभावे सेवा सुद्धा करतो!

**सुश्री सुचित्रा पवार, तासगाव, सांगली Wtsp -९५६१०७०८०६**



# 12. पुस्तक परिचय - Cave In The Snow - श्री मिलिंद  दिवाकर





***पुस्तकावर बोलू काही : “Cave In The Snow“***

***लेखक: Vicky Macanzy***

***अनुवाद: श्री  मनीषा पोतनीस***

***परिचय : श्री  मिलिंद दिवाकर.***

जगण्यात येणारे विरोधाभास अपरिहार्यपणे आपल्या समोर येत असतात.  कधी आपण अंतर्मुख होऊन ह्या विरोधाभासी जाण्याचे अर्थ आपापल्या कुवतीनुसार लावत असतो.

वैयक्तिक जीवन जगताना किंवा सभोवताली घडणाऱ्या अन्याय, दुःख, वेदना, पिडा, संकट अनुभवताना…  असं का? कशासाठी? कोणामुळे? …  असे प्रश्न मनाला नक्कीच पडतात…  परिस्थितीच्या रेट्यात पिचलं जाणं हेच आयुष्य का? असा ही संभ्रम पडतो.

काही जण परिस्थितीशी तडजोड करून मोकळे होतात तर काही सोपा सोयीस्कर मार्ग काढून सुटका करुन घेतात.  काही जण मात्र ह्या दुःख, पीडा, वेदनांनी अस्वस्थ, बेचैन होऊन उठतात…  मी कोण? माझ्या जगण्याचे प्रयोजन काय? अशा प्रश्नांची उकल व्हावी, म्हणून शोध घेऊ लागतात.  अंतःप्रेरणाउसळी मारू लागते…  अभिप्सा जागू लागते अणि एक दिवस निर्णय होतो…  रूढी परंपरा ह्यांचंबंधन तोडलं  जातं…  सुरक्षिततेच्या कवचाला तोडून…  ध्यास लागतो…  मी कोण? हे जग असंका? सत्य काय? हे जाणून घेण्याचा….  इथूनच सुरूहोतो अध्यात्माचा, अद्भुताचा, रहस्यमय असा गूढ प्रवास.

अशाच एका अज्ञाताच्याप्रवासाला निघालेल्या युरोपियन तरुणीच्या आध्यात्मिक प्रवासाची कहाणी वाचनात आली अणि गलबलून जायला झालं.

विकी मॅकेंझी ह्यांनी लिहिलेलं…  ’ज्योना पेरि ‘ह्या ब्रिटिश तरुणीच्या कहाणीवरचं" केव्ह इनद स्नो "हे पुस्तक वाचतांनाकैक प्रश्न पडू लागले.  कधी गहिवरून आलं तर कधी विषमतेच्या सनातन शापाने अस्वस्थ व्हायला झालं.

स्त्रियांच्यासमानतेच्या, स्वातंत्र्याच्या खूप चर्चा झाल्या…  आमच्या देशात स्त्रीला खूप स्वातंत्र्य असल्याचे दावे ही झाले.  पण खरंच असं झालं आहे का? आजही कॉर्पोरेट, यांत्रिकी, मेडिकल क्षेत्रात दुय्यम वागणूक थांबली आहे का हा

प्रश्न आहेच? दुर्दैव असं की अध्यात्मही ह्यातून सुटू शकलं नाही... हीच बाब पिडा देऊन जाते. स्त्री स्वातंत्र्य, समानता हा विषय मला मांडायचा नाहीये...

... सत्य शोधण्याचा ध्यास लागलेल्या एका साधिकेला पुरुषप्रधानव्यवस्थेत मिळालेल्या, अपमानित करणाऱ्या, केवळ स्त्री म्हणून दुय्यम वागणूक देत साधनेचा अधिकार नाकारणाऱ्या व्यवस्थेमुळे उद्‌विग्न व्हायला होतं. अध्यात्म पाखंडीपणातूनसुटलं नाही हेदुःख तर आहेच, पणत्याहीपेक्षा केवळ स्त्री म्हणून... तिचं शरीर साधनेसाठी योग्य नाही, स्त्रीची मानसिकता साधनेला अनुकूल नसते, असले अतार्किक समज निर्माण करून, जिवाचे आणिशिवाचे मीलन घडवून येण्यात अडथळा आणणाऱ्या पाखंडी आध्यात्मिक पुरुषांची चीड मात्र आल्याशिवाय राहत नाही.

विदुषी गार्गी, मैत्रेयी, उमा भारती यांच्या ह्या मातीत... आपला भारत देश महान वाटतो. नीटसे, फ्राईड, काफ्का ह्या अस्तित्ववादी माणसांमुळे... पाश्चिमात्य विचारसरणीमुळे... नीतिशास्त्र वगैरे आलं, आम्ही ते डोळे झाकून स्वीकारलं अणि तेच खरं मानून manners, education, सभ्यता, असल्या गोष्टी खऱ्या मानून स्वीकारलंही. वेदकालीन स्त्री-पुरुष समानता जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणी विसरून पाश्चिमात्य विचार योग्य मानून चालू लागलो... हे दुःख आणि समानतेच्या गर्तेत अडकून पडलो.

ज्योना पेरि ऊर्फ नझिन पालमोलाही (ज्योनाचंसंन्यस्त नाव) ह्या विषमतेच्या जाचातून जावं लागलं... ते सोसून तिच्या असीम ध्येयानंतिने केलेल्या प्रवासाची ही कहाणी सनातन प्रश्नांना उजागर करते...

ल्हासामध्ये १२वर्षांच्या खडतर साधनेचा प्रवास अंगावर काटा आणतो. कधी तिला उपाशी राहावं लागलं, कधी बर्फामुळे तिच्या गुहेत तिच्या जीवावर बेतलेला प्रसंग सुन्न करून टाकतो. प्रतिकूल निसर्ग, निःशब्द वातावरण, बर्फाळटेकडीवरचं एकलकोंडं आयुष्य... चिटपाखरूहीनसलेल्या ठिकाणी राहणं, जंगली जनावरं, अगदी प्रातर्विधीची सोयही नाही अशी जागा... ह्या सगळ्यांवर मात करणारी तिची दुर्दम्य ध्येयासक्ती... खरोखरच अचंबित करून जाते.

एवढे तपस्वी जीवन जगून साधनेत अगदी ध्येयाच्याजवळ असताना... साधनेच्या शेवटच्या पर्वात... शेवटच्या एकट्याने 3 महिने नितांत गुप्त साधना करण्यासाठी... १२ वर्षांची साधना पूर्ण होण्याची वेळ आलेली असताना... तिबेट चीनच्या ताब्यात जाणं अणि चिनी पोलिसांनी तिला गुहेतून हिसकावून लावणं... तिच्या १२ वर्षांच्या तप - साधनेचाअसा शेवट डोळ्यात पाणी आणल्याशिवाय राहत नाही...

पुन्हा हे विसरून ती आपल्या देशात जाते. तिथे ही पीडितांना, जिज्ञासूंना मार्गदर्शन करत राहते.. अध्यात्म साधनेची असाधारण शक्ति आपल्या पर्यंत पोहोचवून जाते.

खेद वाटतो तो हाच कीतिची साधना, तपस्या पूर्ण झाली नाही.... जर पूर्ण झाली असती तर ती स्त्री- दलाई लामा कदाचित ठरली असती... तिचे गुरू तिचा आध्यात्मिक अधिकार नेहमीच मान्य करीत असत.

पुन्हा एकदा व्यवस्था जिंकली.... हरली ती गार्गी, मैत्रेयी... पण ही साध्वी मात्र अजून उभी आहे.. कणखर.

**श्री मिलिंद दिवाकर मो. ९०११९८८३७८**

## 13. काव्यानंद - “कारण” - सुश्री मंजुषा सुनीत मुळे - रसग्रहण - सुश्री नीलिमा खरे



आपल्या सभोवती घडणाऱ्या घटनांकडे सजगपणे पाहण्याचा दृष्टिकोन जाणीवपूर्वक जपणारे मन त्या त्या घटित बाबींबद्दल जिज्ञासू असते, ते अशा घटना घडण्याचे कारण विशेष, त्याचे परिणाम, तसेच त्यातील अहितकारक, क्वचित प्रसंगी अनाकलनीय बाबींबाबतही कारणमीमांसा व उपाय या सगळ्याबद्दल ते सहजपणे विचार व विवेचन करत असते. कवयित्री मंजुषाताई मुळे यांच्या "कारण" या शीर्षकाच्या कवितेतूनत्यांच्या मनातल्या एका अनोख्या प्रश्नाचे कारण व त्यातील आशय आणि विचार आपण आज जाणून घेणार आहोत…

**कारण…**

*सूर्य थांबला, चंद्र थांबला, ग्रह तारे सारेच थांबले*

*भांबावून अन आश्चर्याने पृथ्वीगोल हा पाहू लागले…*

*इतकी वर्षे जिला पाहिली, शांत प्रसन्नशी चमचमतांना*

*आता दिसे का फिकूटलेली… ही विझल्यापरी ते समजेना…*

*काय जाहले काय बिनसले… विचारात या सारे बुडले*

*अज्ञ परी ते फारच सारे, कारण त्यांना नाही उमगले…*

*उमगावे तरी कसे तयांना, पृथ्वी त्यांच्याहून वेगळी*

*वेगवेगळे भार पेलता, मुकी बिचारी थकून गेली…*

*"माझ्या गर्भातून जन्मली जीवसृष्टी ही आगळी वेगळी“*

*गर्वाने या फुलून जाऊन तोरा आपला जपत राहिली…*

परि…

*परि याच जीवांनी घात की केला*
*‘नाळ तोडू‘ हा विडा उचलला*
*माय धडपडे ज्या सुखवाया…*
*बाळ तोचि जीवावर उठला…*

***दुःख तिचे हे केविलवाणे सांगावे परी कुणाला कसे***

***दातही आपले ओठही आपले, समजावावे कुणाला कसे…***

***विचारात या बुडून गेली धरणी केविलवाणी बिचारी***

***ग्रह-तारे हे बाप-बंधू परि, समजती लेक ही सुखी संसारी…***

***सौख्यवंत ते तिच्याहून परी… त्यांना नाही 'माणूस-ओळख'***

***मग त्यांना तरी कसे कळावे, पृथ्वीचे का उदास हे मुख….***

**रसग्रहण –**

***सूर्य थांबला, चंद्र थांबला, ग्रह तारे सारेच थांबले***

***भांबावून अन आश्चर्याने पृथ्वीगोल हा पाहू लागले…***

खरंतर पृथ्वीवर जगणाऱ्या जीवांना अंतरिक्ष, सागर व एकूणच निसर्ग याबद्दलकुतूहल, जिज्ञासा असते. त्यातल्या सहजासहजी समजून न येणाऱ्या अज्ञात बाबी मोहविणाऱ्या असतात. मुद्दाम थांबून ते बघण्याची, जाणण्याची वृत्ती माणसाच्या मनात असते. या कवितेत मात्र निसर्गातील काही गोष्टी थांबल्या आहेत. साहजिकच हे असे का झाले असावे याचे कारण शोधण्याचा प्रयत्न, या निसर्गातील थांबलेल्या गोष्टींच्या अंतरातील भाव जाणून कवयित्रीने केला आहे.

सूर्य, चंद्र, ग्रह तारे हे सर्व थांबलेत. त्यांचे लक्ष कुठल्यातरी वेगळ्या गोष्टीकडे गेल्याने ते भांबावले आहेत हे ध्यानात आल्याने ती घटलेली घटना नक्कीच आश्चर्याची, नवलाची व अनपेक्षित असणार याची वाचकांना खात्री होते. त्यांचेही कुतूहल जागे होते. 'भांबावणे' या शब्दातून हा बदल किंवा ही घटना काहीशी विपरीत, अतर्क्य तर नाही ना असा काहीसा भाव नक्कीच मनात डोकावतो. काय घडले आहे ते स्पष्टपणे सांगून कवयित्री सुरुवातीलाच याचा उलगडा करते. सूर्य, चंद्र, ग्रह तारे थांबले आहेत हे एक मोठे आश्चर्य वते पृथ्वीगोलाकडे अचंबित नजरेने पाहतआहेत हे दुसरे नवल! खरंतर तसे पाहिले तर ते रोजच पृथ्वीला पाहत असतात पण आज असे काहीतरी विशेष काय घडले आहेजे पाहून, भांबावूनते सारे थांबले आहेत व पृथ्वीकडे बघत आहेत. काय घडले असावे याचे कुतूहल, याची उत्कंठा वाचकांच्या मनातही जागी होते.

***इतकी वर्षे जिला पाहिली, शांत प्रसन्नशी चमचमतांना***

***आता दिसे का फिकूटलेली.. ही विझल्यापरी ते समजेना***

जिला वर्षानुवर्षे शांत, प्रसन्न आणि त्यामुळे एका अलौकिक तेजाने, समाधानाने चमचमताना, चमकताना पाहिले.. ती पृथ्वी आज अचानकच त्यांना विझल्यासारखी, फिकूटलेली वाटते आहे. "फिकूटलेली" या शब्दामुळे ती खंतावली असावी, तिच्या अंतरंगात काहीतरी सल असावा याकडे निर्देश केला आहे. कारण साधारणतः

असे असले की माणूस फिकूटल्यासारखा, विझल्यासारखा भासतो. व असेच काहीसे पृथ्वीच्या बाबतीत दिसून येत आहे. हे असे का झाले असावे याचे कारण त्यांना समजलेले नाही. चेहऱ्यावरील तेज निमाले की विझलेपणाचा भाव चेहऱ्यावर येतो तसा पृथ्वीच्या चेहऱ्यावर दिसून आलेला आहे. इथे पृथ्वीला चेतनारूप देऊन चेतनागुणोक्ती अलंकार साधला आहे.

***काय जाहले काय बिनसले... विचारात या सारे बुडले***

***अज्ञ परी ते फारच सारे, कारण त्यांना नाही उमगले...***

काय झाले, घडले की ज्यामुळे काहीतरी बिनसले आहे याच्या कारणमीमांसेत, विचारात ते सारे बुडले आहेत. "बिनसले" या शब्दातून सुरळीत चाललेले बिघडले ही भावना जाणवते. "बुडले" या शब्दातून खोल विचारात बुडले आणि हा विचार करता करता "बुडले" म्हणजे अस्त पावले असाही अर्थ अभिप्रेत असावा. दिवस रात्रीचा युगानुयुगांचा खेळ तसाच चालू आहे हे ध्यानात येते. परंतु त्यांना घडलेल्या घटनेविषयी तसेच पृथ्वीच्या मनोवस्थेविषयी काहीच ज्ञान नसल्यामुळे ते अज्ञ आहेत. किंबहुना ते अज्ञ आहेत म्हणूनच त्यांना काही समजणे अवघड आहे. घडलेल्या घटनेच्या वास्तवालाविवेकपूर्ण उत्तर त्यांना सापडत नाहीये. त्यांना परिस्थितीविषयी काहीच उमगून येत नाही. "उमगून" या शब्दामुळे प्रयत्न करूनही समजले नाही हा भावविशेष विशेषत्वाने लक्षात येतो.

***उमगावे तरी कसे तयांना, पृथ्वी त्यांच्याहून वेगळी***

***वेगवेगळे भार पेलता, मुकी बिचारी थकून गेली...***

कवयित्रीला जाणीव आहे की हे सूर्य, चंद्र, ग्रह, तारे यांनासारे काही उमगणार नाहीकारणपृथ्वी त्यांच्याहून खूप वेगळी आहे. त्यांची व पृथ्वीची जातकुळी निराळी आहे. पृथ्वीच्या जडणघडणीचा विचार तिच्याहून वेगळे असलेले ते कसा बरे करू शकणार? ती कशी वेगळी आहे हे सांगताना पृथ्वी वेगवेगळे भार पेलून थकून गेली आहे हे स्पष्ट केले आहे. हा भार वेगवेगळ्या प्रकारचा आहे. लोकांचा, लोकांच्या चुकीच्या वर्तनाचा, पर्यावरणीय समतोल बिघडण्याचा, माणुसकी हरपत चालल्याचा, कृतज्ञतेचीजाण नसलेल्या लोकांच्या मनातील भावनांचा भार पृथ्वी सोसते आहे. सगळ्यांचा भार पेलता पेलता ती मूक झाली आहे. बिचारी पूर्णपणे थकून गेली आहे.

***"माझ्या गर्भातून जन्मली जीवसृष्टी ही आगळीवेगळी "***

***गर्वाने या फुलून जाऊन तोरा आपला जपत राहिली***

फरक विशद करताना कवयित्रीने सूचित केले आहे की पृथ्वीला मनापासून असे वाटते आहे की तिच्या गर्भातून, उदरातून ही आगळीवेगळी मनोहर, नयनरम्य, रमणीय, जीवसृष्टी जन्मली आहे. साहजिकच या कर्तृत्वाचा गर्व होऊन फुलून जाऊन (म्हणजे गरजेपेक्षा जास्त व वृथा अभिमान बाळगून) ती आपला तोरा जपत राहिली आहे. "तोरा" शब्दातून ऐट, दिमाख, कल्पनेतला अवाजवी अहंभाव लक्षात येतो. तसेच तिला उशिराने झालेल्या वास्तवाची जाणही लक्षात येते.

परि ….

***परि याच जीवांनी घात की केला***

***'नाळ तोडू' हा विडा उचलला***

***माय धडपडे ज्या सुखवाया…***

***बाळ तोचि जीवावर उठला***

बदललेल्या परिस्थितीचे कारण आता लक्षात येत आहे. ज्या जीवांना जन्माला घातलेव या ज्या ' कर्तृत्वाचा 'अभिमान पृथ्वी बाळगून आहे, त्याच जीवांनी घात केला, विश्वासघात केला, दगा दिला. उदरातून जन्माला आलेल्या व या अर्थाने तिच्याशी जी नाळ जुळलेली आहे ती नाळच तोडण्याचा जणू विडा त्यांनी उचलला हे सत्य सांगितले आहे. "विडा उचलला" हा अतिशय यथार्थ वाक्प्रचार -मनात आलेले मिळवल्याशिवाय राहणार नाही, ते केल्याशिवाय थांबणार नाही हा भाव सूचित करतो. उदरातून जन्म देणारी ही माय बाळाच्या सुखाकरता, त्याला सुखविण्याकरता निरंतर धडपडत असते. परंतु तोच बाळ तिच्या जीवावर उठला आहे, तिचा विनाश कसा होईल या दृष्टीने त्याची पावले पडत आहेत. पृथ्वीच्या उदरातून जीवसृष्टी निर्माण झाली हे वैश्विक सत्य आपण मानतो. त्या अर्थाने ही जीवसृष्टीची माता आहे. परंतु तिच्याशी कृतघ्न होऊन तिला हानी पोहोचेल असे वागून माणूस तिच्याशी असलेली नाळ तोडू पाहत आहे असा वास्तववादी भावार्थ.

***दुःख तिचे हे केविलवाणे सांगावे परी कुणाला कसे***

***दातही आपले ओठही आपले, समजावावे कुणाला कसे***

स्वजनांकडून… त्यातही उदरात ज्याचा भार वाहिला त्या संततीकडून झालेली आणि सतत होत असलेली तिची हानी काळजाला फारच क्लेशदायक ठरत असल्याने पृथ्वी मनातून खंतावली आहे. तिच्याप्रमाणेच हेदुःखही जणू केविलवाणे झाले आहे. आणि आता हे कुणाला आणि कसे सांगावे हा प्रश्न गहन ठरत आहे. "आपलेच दात आपलेच ओठ" या उक्तीनुसार ते कुणाला सांगणे श्रेयस्कर वाटत नाही. त्यामुळे तिचे हे दुःख केविलवाणे झाले आहे. येथे योजलेला चेतनागुणोक्ती अलंकार अतिशय उत्तम… व्यक्त करता न येण्यासारखे दुःख भोगायला लागत असल्यामुळे पृथ्वी व तिचे ते दुःख दोन्ही दीनवाणे झाले आहे असा एकंदरीत अर्थ. आणि अशा या परिस्थितीत कोणी, कुणाला आणि कसे समजवायचे या प्रश्नाला उत्तर नाही.

***विचारात या बुडून गेली धरणी केविलवाणी बिचारी***

***ग्रह-तारे हे बाप-बंधू परि, समजती लेक ही सुखी संसारी***

अशा दारुण व विदारक घटनाक्रमामुळे दुःखाच्या विचारात बिचारी व केविलवाणी झालेली धरणी बुडून गेली. येथेही "बुडून" शब्दावरील श्लेषात्मक भावार्थ अतिशय उत्तम. तसेच चेतनागुणोक्ती अलंकार कवितेतील भावार्थाला पूरक ठरतो. जिच्याकडे पाहून जिची कीव करावी असे वाटते अशी परिस्थिती धरणीची झालेली आहे हे लक्षात येते. पृथ्वीची उत्पत्ती सूर्य आणि ग्रह ज्या सौर नेब्युलामध्ये उपस्थित होते त्या लहान कणांच्या वाढीमुळे झाली असे मानले, तर या दृष्टीने ग्रह तारे हे पृथ्वीचे बाप- बंधूसमान होतात ही एक

सुंदर कल्पना केलेली आहे. या भौगोलिक सत्याचे अस्तित्व लक्षात घेतल्याने वडील व भावासमान असलेले ग्रह तारे यांना आपली लेक "दिल्या घरी "सुखी आहे असे वाटत आहे. ते तिच्या सुखाच्या भ्रामक कल्पनेत असल्याने त्यांना तिचे आंतरिक दुःख समजत नाही.


***सौख्यवंत ते तिच्याहून परी... त्यांना नाही 'माणूस-ओळख'***

***मग त्यांना तरी कसे कळावे, पृथ्वीचे का उदास हे मुख - - -***

कवयित्रीला मनातून आता असे वाटते आहे की हे सूर्य, ग्रह, चंद्र, तारे पृथ्वीपेक्षा सौख्यवंत आहेत... कारण त्यांना माणसाची ओळख नाही. ते माणसाशी परिचित नाहीत वत्याच्या वागण्याची, वर्तणुकीची ओळख त्यांना नाही. अर्थात माणसाच्या दुराचारी वागण्यापासून ते कित्येक योजने दूर आहेत. त्यामुळे त्यांना त्रास, दुःख होण्याची शक्यता नाही. "सौख्यवंत" या शब्दातून सुखरूप व समाधानी असण्याची अवस्था अधोरेखित होते जी कवितेतील आशयाला अतिशय अनुरूप व पूरक आहे. अशा तऱ्हेच्या परिस्थितीत पृथ्वीचे उदास झालेले मुख व त्यामागचे कारण त्यांनाकसे बरे कळणार? अर्थात कळणारच नाही हा भावार्थ!

अतिशय साधी, सोपी भाषा, कवितेतील भावनेला व आशयाला महत्व, साहित्यिक अलंकारांचा सुयोग्य वापर, कवितेला असलेली नादमयता, कवितेतील विषयाचा सार्वत्रिक सत्य-संदर्भ व सद्य परिस्थितीवर केलेले विश्लेषणात्मक विवेचन... ही या कवितेची बलस्थाने आहेत. कविता वाचून आचार व विचारात माणसाने बदल घडवून आणला तर ते स्वागतार्ह ठरेल. व संपूर्ण विश्वाच्या व तदनुषंगिक जीवसृष्टीच्या हिताचा ठरेल हे निश्चित! असा हा दृष्टिकोन जागविण्याचे काम करणारी ही कविता आहे असे मला वाटते. व यासाठी कवयित्री नक्कीच कौतुकास पात्र आहे.

**सुश्री नीलिमा खरे मो ९८२२०५७४५८**



## 14. कथा - बॉन व्हॉयेज… सुश्री राधिका भांडारकर



भूतकाळाच्या आठवणीत रमून वर्तमान काळ आपल्याला हवा तसा रंगवता येत नाही. वर्तमानात जे असतं, जे घडतं ते एक तर स्वीकारावं लागतंनाहीतर मनात जाणवणाऱ्या यातनांच्या रेषांना पुसावं लागतं किंवा मनात वाहणाऱ्या विचारांशी झुंजावं लागतं. तर्कवितर्क करून शांतही करावं लागतं.

गेले आठ-दहा दिवस आरतीचं हेच चालू आहे. जवळजवळ दहा वर्षांनी विशाल भारतात आलाय. तेही आक्काने कळवलं म्हणून कळलं. अक्का फोनवर एवढंच म्हणाली," विशाल कालच येथून निघालाय परवा पहाटेपर्यंत मुंबईला पोहोचेल. दोघेही येत आहेत. फक्त दोन आठवड्यांसाठी. संजयाच्या वडिलांची तिथल्या बँकेतली काही खाती बंद करायची आहेत आणि विस्मयाच्या लग्नाचीही काही खरेदी त्यांना करायची आहे. तसा त्यांचा कार्यक्रम एकदम पॅक्ड आहे. रात्र थोडी आणि सोंगं फार असेच म्हणूया… पण मी तुझा नंबर त्याला दिला आहे. तो करेलच तुला फोन."

आक्काशी बोलणं झाल्यानंतर उगीचच आरतीच्या मनात येऊन गेलं की आक्का थोडी डिस्टर्ब्ड वाटते. विशाल आवर्जून आरतीला भेटेल याची तिला काही खात्री वाटत नसावी. कसं असतं ना? मनाला जे घडावं किंवा जे नक्की घडेलच असं वाटत असतानाच तसं जर नाही झालं तर मग काय? ही भावनाही कातरते.

आरतीने मात्र अंजुलाही विशालच्या आगमनाची बातमी दिली. तिलाही खूप आनंद झाला. तिने तर लगेच ठरवूनच टाकलं. "एखादा सोयीचा दिवस ठरवून, त्यांनाच विचारून आपण मस्त गेट-टुगेदर करूया. माझ्याकडेचजमूया. मी नीतालाही फोन करून कळवते. ती पण येईल. मुंबई –पुणे अंतर काही फार नाही आणि शिवाय विशालला भेटण्याची उत्सुकता सर्वांना आहेच की! "… आरती नुसतंच "बरं" म्हणाली. एक्साईटमेंट होतीच पण जरा लो प्रोफाइलच राहूया नाही का?

खूप आठवणीहोत्या. विशाल भोवतीच्या, अक्का विषयीच्या…

आक्काच्या आयुष्यातला तो एक काळवंडलेला काळ. रविदादा जीवावरच्या दुखण्यातून उठलाहोता इतका गोरागोमटा, पहाडासारखा माणूस कसा पार आक्रसून गेला होता. एक व्याधी बरी होताना दुसऱ्या अवघड व्याधींनी हात धरले होते ते जन्मभरासाठीच. त्याला पुनर्जीवन मिळालं होतं हेच देवाचं देणं आणि आक्काचं सौभाग्य. विशाल अवघा दहा महिन्याचा होता. रविदादाच्या दुखण्यामुळे डोक्यावर कर्जाचा भार झाला होता. त्यातून आक्काच्या सासरच्या माणसांनी आक्काला पूर्ण पाठ दाखवली होती. मुळातच त्यांना आक्का आणि रविदादाचा आंतरजातीय विवाह मान्यच नव्हता. त्यातून त्यांची मनं संकुचित, रूढी परंपरांनी बुरसटलेली. रविदादाच्या दुखण्याचं सारं खापर त्यांनी आक्काच्याच माथी फोडलं. त्यांच्या दृष्टीने आक्का म्हणजे अवगुणी, अपशकुनी, कर्मकरंटी होती. त्यांच्या मुलाला तिने जाळ्यात अडकवले होते. इतकंचनव्हे तर त्यांचे वैवाहिक जीवन संपुष्टात यावे म्हणूनही त्यांनी त्यावेळी प्रयत्न केले. विशाललाही तिच्यापासून हिसकावून घेण्याचा

प्रयत्न केला. पण रविदादाचं आक्कावर अतिशय प्रेम होतं. खरं प्रेम होतं. त्याने मात्र आक्काचा हात कधीच सोडला नाही.

“पुन्हा घर बसवू, संसार सावरू, विशालला मोठं करू, सगळी कर्ज फेडू आणि प्रेमाने राहू. सगळी जळमटं दूर होतील एक दिवस.” असे आश्वासन त्याने अक्काला दिलं. एक तुटत असलेला किनारा आक्का आणि रविदादाच्या एकमेकांवरच्या निस्सीमप्रेमामुळे पुन्हा सावरला. शिवाय आरती, अंजू, नीता, आई-बाबांनी आक्कालापूर्णपणे आधार आणि सहाय्य दिले. आर्थिक, शारीरिक, मानसिक सर्वतोपरी. विशालचे भविष्य घडविण्यासाठी आजी– आजोबा आणि मावश्या मनापासून वचनबद्ध राहिले आणि हे सगळं अंतरात वाहत असणाऱ्या एका निर्मळ प्रेमाच्या प्रवाहामुळेच साध्य झालं.

या प्रेमाच्या छायेखाली विशाल वाढत होता. तसं म्हटलं तर आरती, अंजू या लहानच होत्या. पण या लहान वयात त्यांनी जणू काही विशालसाठी एक समांतरमातृत्व स्वीकारलं. विशालच्या आवडीनिवडी, त्याचे हट्ट, अभ्यास, त्याचं मोठं होणं, त्याचं भविष्य, याच केंद्राभोवती विशालचे मातृ-आजोळ फिरत होते.

आक्का आणि रविदादाही प्रचंड मेहनत करत होते. बाबांनी त्यांना स्वतःच्या उद्योगाची काही दालने उघडून दिली होती आणि त्यांच्या आर्थिक व्यवस्थेचा मार्ग खुला करून दिला होता.

हळूहळू विशाल मोठा होत होता, घडत होता. कधीकधी आक्का आणि रविदादाला घरी परतायला रात्री खूप उशीरही व्हायचा. अशावेळीविशाल न खातापिता गॅलरीत बसून रहायचा मातापित्यांची वाट पाहत. तेव्हा आरतीमावशी त्याच्याजवळ सोबत रहायची. त्याला गोष्टी सांगून त्याचं मन रमवायची. त्या वेळेचा विशालचा केविलवाणा चेहरा पाहून तीही द्रवायची.

कितीतरी वेळा शाळेच्या पुरस्कार वितरण समारंभासाठी, विशालकरिताआरती आणि अंजू त्याचे पालक म्हणून जात, कारण आक्का आणि रविदादांना नेमकं त्याचवेळी जपान सिंगापूरहून आलेल्या डेलिगेट्सच्या स्वागत समारंभाला जायचं असायचं किंवा असंच काहीतरी न टाळता येण्यासारखं महत्त्वाचं कारण असायचं.

कालचक्र थांबत नाही. परिस्थिती बदलते. रविदादा आणि आक्काची परिस्थिती सुधारत होती. त्यांनी स्वतःचं घरही घेतलं. धंद्यात प्रगती केली. विशाल तर जात्याच हुशार होता. शिवाय बाबांचे प्रोत्साहन आणि शिकवणी यातून तो एखाद्या कमळासारखा पूर्ण फुलत होता. बऱ्याच वेळा विशाल बाबांबरोबर बागेतही काम करायचा. बाबांना माती आणून दे, नवीन झाडांसाठी खड्डे खणून दे, एखाद्या सुकलेल्या झाडालाही पुन्हा छाटून खतपाणी घालून संजीवन देण्याचा प्रयत्न करणे... वगैरेसारखी मातीतली कामं बाबांबरोबर करायला त्याला खूप मजा वाटायची. शिवाय यासोबत बाबा त्याला गीता, ज्ञानेश्वरीतले जीवन सिद्धांतही उकलून दाखवायचे. या सगळ्यात विशाल मनापासूनरमायचा. आक्काचीबिघडलेली, तुटलेलीसासरची नातीही आता सुधारू लागली होती. शेवटी रक्ताची ओढ असतेच ना? विशाल त्यांच्यातही रमू लागला होता आणि आक्काचं मन इतकं मोठं की तिने सगळ्यांना माफ करून टाकलं होतं. जुनं सगळं पार विसरून जायचं ठरवलं होतं. असा एक

संस्काराचाहीकिनारा असतो. अखेर त्या संस्कारगंगेच्या किनारीविस्कटलेली आयुष्यं, नाती एकत्रितपणे येऊन कधीतरी स्थिरावतातच.

काळ वाहतो, दुष्टचक्र संपते, ग्रहदशाही बदलते…लहान –लहान म्हणून अत्यंत लाड करणाऱ्या मावश्यांपेक्षाही विशाल आता उंच, तेजस्वी, बुद्धिमत्तेने चमकू लागला होता. मावश्याही भरून पावल्या. आनंदाची घागर त्यांच्या मनात ओसंडत होती. ज्यासाठी अट्टहास केला होता त्याची पूर्तताहोत होती.

काही अपरिहार्य, आपल्या हाती नसलेल्या… प्रिय व्यक्तींच्या वजाबाक्या झाल्या आयुष्यात. बाबा गेले, आजी गेली. त्यांच्या जाण्याने विशाल काहीसा ढासळला पण जीवन कोणासाठी थांबत नाही. कालांतराने मावश्यांचीही लग्नं झाली पण नाती घट्ट होती. जीवनाच्या वाटा बदलल्या, किनारे बदलले पण एकमेकांविषयीच्या भावना त्याच, तशाच होत्या.

विशालने त्याच्याच पसंतीच्या मुलीशी लग्न जमवले. आक्का आणि रविदादाने त्यांच्या लग्नाचा बार थाटामाटात उडवला आणि या सोहळ्याचा आनंद आक्काच्या दोन्ही परिवाराने पुरेपूर उपभोगला. विशालचे लग्न म्हणजे फक्त विवाह सोहळाच नव्हता तर तुटलेल्या नात्यांचाही तो एक सुंदर मिलन सोहळा होता.

काही वर्षांनीविशाल आणि संजया स्वतःचंदैदिप्यमान भविष्य घडविण्यासाठी परदेशी रवाना झाले. या साऱ्या घटनांना कितीतरी वर्षे लोटली. सुख झेलता झेलता दुःखही मागे सावलीसारखं असतं का? खरं म्हणजे आता आक्काआणि रविदादांनी एक किनारा गाठला होता. आता हातात हात घालून शांतपणे, स्वस्थपणे फक्त चालायचं होतं… पण नियतीला ते मान्य नसावं. रविदादा अचानक हे जग सोडून अनंतात विलीन झाला आणि पुन्हा एकदा आक्काएकाकीपणाच्या कोशात गेली आणि त्याही वेळेला तिच्याभोवती बहिणींचं मजबूत कडं होतं.

काही वर्ष अशीच गेली. अक्कालाही आता उतारवय जाणवू लागलं होतं. विशाल संपूर्णपणे त्याच्या विश्वात गुंतलेला होता. जिथे एका पिढीचा किनारा स्तब्ध होतो तिथून पुढे पुढच्या पिढीच्या किनाऱ्याची वाटचाल सुरू होते. अखेर हा नियतीचाच नियम असते ना?

सगळ्या नियमपूर्तींची कागदपत्रे तयार झाल्यावर आक्काने विशालसोबत राहण्यासाठी या देशाचा निरोप घेतला. हे “वंदे मातरम” आक्काला तसे सोपे नव्हते. तिचाइथल्या गणगोतात जीव अडकलेला होता. पण तेव्हाही आरतीने तिला धीर दिला. “आक्का! शो मस्ट गो ऑन. जा तू. तुझा हा निर्णय योग्यच आहे. आमचे तुझ्यावर अखंड प्रेम आहे. विशालवरही पूर्ण भरवसा आहे. तो तुझी काळजी घेईलच. तुझे उर्वरित आयुष्य मुलगा सुनेसोबत, नातवंडांसमवेत सुखाचे जावो.”

आरतीकितीतरी वेळ विचारात डुबली होती. स्वतःभोवती घडणारे भावनिक बदल तीपेलवण्याचा प्रयत्न करत होती. विशाल भारतात आल्यापासून आरतीच्या मनात त्याच्या आवडीचं काय बनवावं याचे विचारही घोळत होते. आरतीची लेक म्हणाली, ”मम्मी आपण जेवण ऑर्डरच करूया का? ”

आरतीलाही आता झेपत नाही. आजकाल तिचे खांदे, गुडघे दुखतात, ॲसिडिटीचा प्रचंड त्रास आहे तिला पण तरीही ती लेकीला म्हणाली,

"नको ग! इतक्या वर्षांनी तो भेटणार. त्याला मी माझ्या हातचं खाऊ घालेन ना. अळूच्या वड्या करू का? कीसोलकढी? त्याला खिमा –पावही खूप आवडतो. अगबाई! आणि दहीवालं काही नको बरं का? दही लहानपणापासून खातच नाही तो."

दोन आठवड्यातला एक आठवडा तर संपला होता. विशालचा फोन नाही, मेसेज नाही. आरती अस्वस्थ. म्हणजे ती त्याला फोन करूच शकत होती. तिच्या मनात कुठलाच आकस नव्हता पण जेटलॅग असेल, तो बाहेर असेल, व्यस्त असेल, कदाचित नेटवर्क नसेल अशा कारणांनी ती स्वतःलाच समजावतहोती. पण विशालच्या मुक्कामाचा एक एक दिवस मात्र उलटत होता.

मनात विचारांचा गोंधळ चालू असतानाच फोन वाजला. तो उचलताना आरतीच्या संपूर्ण देहात उसळलेला भावनांचा कल्लोळ तिला स्वतःलाही उमजत नव्हता. आनंद, उत्सुकता, माया, प्रेम... काळीज भरलं होतं. "माया अशी कुठे तुटते का? येईलच तो वेळात वेळ काढून..."

"आरतीमावशी मी काही आता येऊ शकत नाही. दादा काकांजवळ बसलो होतो. आता तुझ्याकडे यायला वेळ नाही. आजच रात्रीची फ्लाईट आहे. अजून बरंच पॅकिंग पण व्हायचंय," … बस! एवढंच?

फोन कट झाला. आरतीला एक निसटती भावनाही स्पर्शून गेली असावी… 'ज्या मावशीने तुला अंगाखांद्यावर खेळवले तिच्याबाबतीत त्यानेएवढे कोरडे असावे? तिच्यासाठी त्याच्याजवळ दहा मिनिटेही नसावीत? त्याला दादाकाका जवळचा का वाटावा? ' असा संकुचित प्रश्न तिच्या संस्कारी मनाला अजिबात शिवला नाही, शिवाय कडू इतिहासातल्या आठवणींचा संदर्भही आता नको. पण नकळतपणे पापण्या मात्र अनावर होऊन ओलावल्या. त्याच वेळी आरतीच्या लेकीने पाठीमागून तिच्या खांद्यावर हात ठेवला,

"मम्मी नको इतकं वाईट वाटून घेऊस. त्याला खरंच वेळ नसेल. अगं ज्याचे त्याचे किनारे वेगवेगळे असतात. प्रत्येकाची वाट बदलते, दिशा बदलते आणि तुला सांगू का.. एकंदरच आमच्या पिढीची, जीवनातली चॅलेंजेस खूप अवघड आहेत आणि मम्मी असं समज ना कोणत्याही कारणाने तू त्याच्यावर राग धरणारच नाहीस, त्याला समजून घेशील याची खात्री असणार त्याला. एक प्रकारे नकळत त्याने तुझ्यावरचा हक्कच नाही का सिद्ध केला अशा पद्धतीने? "


"हो बेटा! असंच असेल. मला नाही वाईट वाटत. रागही नाही आला. अग! आता आम्ही पिकली पाने आमच्या मुखातून शब्द निघणार ते फक्त आशीर्वादाचे."...

"विशाल कुठेही रहा, सुखी रहा! या सांजवेळी किनाऱ्यावर उभे राहून साक्षीभावाने मी तुला डोळा भरून पाहीन...बॉन व्हाॅयेज.."

**सुश्री राधिका भांडारकर, पुणे मो. ९४२१५२३६६९**

## 15. लेख - रामप्रसाद: एका भारतीयाच्या अफाट जिद्दीची कहाणी -

## श्री विश्वास देशपांडे



गेल्या जून २०२४ या महिन्यात आम्ही युरोप ट्रीप करून परत आलो. ट्रीपहून परत आलो तरी प्रवासातील काही आठवणी मनात रुंजी घालत होत्या. जे जे काही पाहिले आणि अनुभवले ते ते सांगावे या भावनेतूनच एक हृद्य हकीगत सांगणार आहे. ही एका भारतीय व्यक्तीची अत्यंत प्रेरणादायी अशी सत्यकथा आहे. काही कारणास्तव फक्त नाव बदलले आहे.

या कथेचा नायक आहे रामप्रसाद. हा रामप्रसाद मूळ राजस्थानचा. आई-वडील अशिक्षित. परिस्थिती अत्यंत हलाखीची. रामप्रसादही घरच्या परिस्थितीमुळे फार काही शिकू शकला नाही. लिहिता वाचता येत होते म्हणूनच काय तो साक्षर आहे असे म्हणायचे. पण शिकलेला नसला तरी रामप्रसाद हरहुन्नरी होता. अंगात काम होते, कष्ट करण्याची तयारी होती. फारसा शिकलेला नसला तरी व्यवहारचातुर्य मात्र जवळ होते. रामप्रसादाच्या हाताला चव होती. तो उत्तम स्वयंपाक करायचा. मग स्वयंपाकाची छोटी मोठी कामे घ्यायला लागला. घरखर्चासाठी आईवडिलांना हातभार लावू लागला.

रामप्रसादच्या ओळखीचे कोणीतरी इटलीत जाऊन अशाच प्रकारची कामे करीत होते. त्यांनी रामप्रसादलाही तिकडे उत्तम संधी आहे असे सांगून बोलावून घेतले. रामप्रसाद जाणार तरी कसा? जवळ पैसा नाही, पासपोर्ट, व्हिसा नाही, इटालियन भाषा तर सोडाच पण इंग्रजीचा देखील गंध नाही. पण तो हार मानणाऱ्यातला नव्हता. त्याने मित्रमंडळी, नातेवाईक आदींकडून परतीच्या बोलीवर मिळतील तसे पैसे जमा केले. पासपोर्ट, व्हिसा काढला आणि मुंबईला आला. मुंबईहून थेट इटलीतील मिलान या ठिकाणी पोहोचला. ही गोष्ट असेल १०-१२ वर्षांपूर्वीची. मिलान मध्ये एका हॉटेलात तो शेफ म्हणून कामाला लागला. दिवसाचे १२ ते १४ तास कष्ट करून अतिशय हलाखीत तो जगत होता.

पुढे पिसामधील एका रेस्टॉरंटमध्ये अधिक पैसे मिळतील असे त्याला कळल्यावरून तो मिलानमधील काम सोडून पिसामध्ये दाखल झाला. मिलानपेक्षा येथील वातावरण चांगले होते. त्याच्या जोडीला हॉटेलमध्ये जेवण वगैरे बनवणारी आणखी दोन तीन मुले होती. ती मंडळी इटालियन फूड बनवायची. पिसामध्ये अनेक भारतीय पर्यटनासाठी येत असत. त्यांना भारतीय पद्धतीचे जेवण हवे असायचे. रामप्रसाद त्यासाठी तयारच होता. त्याने इटालियन जेवण कसे बनवायचे हे तर शिकून घेतलेच, पण भारतीय पद्धतीचे त्याचे जेवण पर्यटकांना आणि ग्राहकांना खूपच आवडू लागले. याच दरम्यान हॉटेलमधील इतर इटालियन शेफ मुलांनी त्याच्याकडूनच भारतीय पद्धतीचे जेवण कसे बनवायचे हे शिकून घेतले.

आता रामप्रसादच्या जीवनात आणखी एक महत्वाचे वळण आले. या हॉटेलमध्ये काम करणाऱ्या एका इटालियन मुलीशी त्याचे प्रेमाचे धागे जुळले. आतापर्यंत त्याच्यावर प्रेम करणारी अशी व्यक्ती कोणीच

नव्हती. राजस्थानातून एकटा आलेल्या रामप्रसादवर मनापासून माया आणि प्रेम करणारी मैत्रीण त्याला मिळाली.

हॉटेलमालकाला त्यांच्या प्रेमसंबंधांची कुणकुण लागली. त्याच्या हॉटेलमधील इतर इटालियन मुलेही भारतीय पद्धतीचे जेवण बनवायला शिकलीच होती. तेव्हा आता त्याला रामप्रसादची गरज नव्हती. रामप्रसादला त्याने आता तुझी जरुरी नाही असे सांगून घालवून दिले. आताच कुठे स्थिरस्थावर होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या रामप्रसादला पुन्हा रस्त्यावर यावे लागले. त्याचे ज्या मुलीवर प्रेम बसले होते, तिच्या घरच्यांचा त्यांच्या लग्नाला विरोध होता. पण लग्न करण्याचा दोघांचा निश्चय पक्का होता. दोघांचे विचार जुळत होते आणि दोघेही एकमेकांना अनुरूप होते. त्यामुळे लवकरच त्यांचे शुभमंगल झाले. आता तर नोकरीची जास्त गरज होती कारण त्याच्यावर त्याची आणि पत्नीची अशी दुहेरी जबाबदारी होती. पण त्याने हार मानली नाही.

हॉटेलमधील येणारे बरेच भारतीय पर्यटक रामप्रसादला ओळखत होते. दरवर्षी विविध भारतीय पर्यटन कंपन्या हजारो पर्यटकांना घेऊन इटलीत येतच होत्या. त्यांनी रामप्रसादला स्वतःचेच हॉटेल सुरु करायला सांगितले. त्याला उत्तेजन देण्यात केसरी टूर्स, वीणा वर्ल्ड आदींचा महत्त्वाचा वाटा होता.

स्वतःचे हॉटेल सुरू करण्याइतका पैसा त्याच्याजवळ नव्हता. एका पिकनिक स्पॉटमधील मोकळ्या जागेत तात्पुरती व्यवस्था त्याने केली आणि भारतीय पद्धतीचे जेवण देणे सुरु केले. या दरम्यान एक बंद पडलेले हॉटेल त्याने भाड्याने घेतले आणि त्याचे नूतनीकरण केले. त्यासाठी बराच पैसा लावला. शिवाय हॉटेलमालकाला दरमहा भाडे देऊ लागला. आता पर्यटकांची छान सोय झाली. रामप्रसादचे हॉटेल चांगले चालू लागले. बायकोची चांगली साथ होती. पण रामप्रसादची ही प्रगती आधीच्या इटालियन मालकाला पाहावली नाही. त्याने त्या हॉटेलमालकाशी संपर्क साधला. रामप्रसाद दरमहा जेवढे भाडे देतो त्यापेक्षा जास्त भाडे मी देतो असे सांगून त्याला ती जागा खाली करायला लावली. बिचारा रामप्रसाद पुन्हा रस्त्यावर आला. पण तो खचून गेला नाही. पुन्हा आपल्याला काय करता येईल यासाठीचे प्रयत्न त्याने सुरूच ठेवले.

एका ठिकाणी एक बंद पडलेले गॅरेज आहे असे त्याला कळले. त्याच्या संबंधितांनी त्याला ही माहिती कळवली. ती जागा अगदी पडीक आणि घाणेरडी होती. ही जागा आपल्याला विकत घेता येईल का असा तपास त्याने केला. इटलीमध्ये आणि तेही कायम पर्यटकांची गर्दी असलेल्या पिसामध्ये जागा घेणे ही सोपी गोष्ट नाही. जागेचे दर तिथे खूपच जास्त आहेत. त्यात एक भारतीय माणूस ही जागा विकत घेऊ पाहतो म्हणून स्थानिकांनी बरीच अडवणूक केली. पण रामप्रसादचा निर्धार पक्का होता. त्याने बरीच जमवाजमव केली. जवळ होते नव्हते ते सारे विकून टाकले. ते गॅरेज विकत घेतले. आता त्याची दुरुस्ती करून त्या ठिकाणी हॉटेल निर्माण करायचे होते. पुन्हा तो जिद्दीला पेटला. नातेवाईकांकडून, बँकेकडून कर्ज घेतले. मोडकळीस आलेल्या घाणेरड्या जागेचा आता कायापालट झाला होता. तिथे हॉटेल उभे राहिले होते. खूप सुंदर आणि अत्याधुनिक नसेल, पण स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न वाटेल अशा जागेत त्या गॅरेजचे रूपांतर हॉटेलमध्ये झाले. रामप्रसाद पुन्हा उत्साहाने कामाला लागला. हॉटेल चांगले चालू लागले. उत्तम भारतीय पदार्थ आणि इटालियन पास्ता, पिझ्झा वगैरे पदार्थ रामप्रसादच्या हॉटेलात मिळायला लागले. त्याच्या व्यवसायात त्याच्या सहधर्मचारिणीची सुरेख साथ होती. अशातच त्याला एक गोड बातमी मिळाली. तो लवकरच बाबा होणार

होता. एका शुभदिनी त्याला पुत्ररत्न प्राप्त झाले. रामप्रसादाच्या नशिबात चांगल्या दिवसांची सुरुवात झाली. छोट्या बाळाचे हसणे पाहून तो आपले श्रम विसरून जात होता.


पण हाय रे दैवा! रामप्रसादाच्या भाग्याला पुन्हा दृष्ट लागली. २०१९ कोरोना महामारीची सुरुवात झाली आणि लवकरच ती जगभर पसरली. सारे जनजीवन जणू ठप्प झाले. पर्यटन व्यवसाय थांबला. पर्यटनावर ज्यांचे व्यवसाय अवलंबून होते, ते सारे व्यावसायिक आर्थिक मंदीच्या गर्तेत सापडले. रामप्रसादला आपले हॉटेल तर बंद करावे लागलेच पण रोजचा खर्च कसा भागवावा हा प्रश्न पडला. लोकांकडून उसने घेतलेले पैसे, बँकेचे कर्ज कसे फेडावे याचा मोठाच मानसिक ताण आला. थोडी निराशा जरूर आली. पण संकटाचे दिवस कायम थोडेच राहतात? हळूहळू कोरोनाने माघार घेतली. विस्कळीत झालेले जनजीवन पूर्वपदावर येऊ लागले. आर्थिक संकटात सापडलेले व्यवसाय हळूहळू सावरू लागले. रामप्रसादला पर्यटकांनी, पर्यटन करणाऱ्या कंपन्यांनी धीर दिला. मदतीचा हात दिला. पर्यटनस्थळे पुन्हा गर्दीने फुलू लागली. रामप्रसाद पुन्हा एकदा नव्या उमेदीने कामाला लागला. इटलीत, पिसामध्ये पर्यटकांची गर्दी वाढू लागली. रामप्रसादचे हॉटेल पुन्हा गजबजले. पर्यटकांना आता त्यांचे आवडते स्वादिष्ट खाद्यपदार्थ मिळू लागले.

रामप्रसादचा गोड छोकरा आता तेथील शाळेत जातो. रामप्रसादलाही आता कामापुरती इटालियन भाषा येते. सोबत त्याची गोड इटालियन पत्नी मदतीला आहेच! वीणा वर्ल्ड तर्फे आम्ही त्याच्या हॉटेलात जेवणासाठी येणार हे जेव्हा त्याला कळले, तेव्हा त्याला खूप आनंद झाला आणि त्याने आमच्यासाठी इटालियन पास्ता, पिझ्झा आणि भारतीय वेगवेगळे पदार्थ बनवून मनापासून आमचे स्वागत केले.


रामप्रसाद आता पूर्वीसारखे खूप काबाडकष्ट करत नाही. त्याच्या हाताखाली माणसे आहेत. आपल्या उमद्या स्वभावाने त्याने अनेक माणसे जोडली आहेत. तो फक्त आता हॉटेलवर लक्ष ठेवतो आणि व्यवसाय कसा वाढवता येईल या दृष्टीने प्रयत्न करतो. आज त्याला सुखाचे दिवस आले आहेत.

अपार कष्ट आणि अभूतपूर्व जिद्दीची रामप्रसादची ही कहाणी प्रेरणादायी आहे. भारतीय माणसाला अभिमान वाटावा अशी आहे.

**श्री विश्वास देशपांडे, चाळीसगाव मो. ९४०३७४९९३२**



## 16. कविता - मज वाटते… प्रा तुकाराम दादा पाटील



*पाऊस होत कविता, बरसून खूप जावी*
*काळीज भिजवणारी, ती भावना बनावी*
*निरखून वास्तवाला, ती शब्दबद्ध व्हावी*
*मज वाटते रसिका कविता अशी असावी - -*

*स्वर कोकिळे परी ती, गाण्यात गुंग व्हावी*
*फुलपाखराप्रमाणे, नयनास ती दिसावी*
*एकांत लाभला की, ओठावरी रुळावी*
*मज वाटते रसिका कविता अशी असावी - -*

*अंधारल्या मनाची साथी बनून जावी*
*आनंद वाटताना हळुवार ती हसावी*
*विषयात गुंफलेली, आपलीच धून गावी*
*मज वाटते रसिका कविता अशी असावी - -*

*घनगूढ वास्तवाची, गाणी तिनेच गावी*
*ताला-सुरात रचना, व्हावी अती प्रवाही*
*बटमोगऱ्यापरी ती गंधाळुनी फुलावी*
*मज वाटते रसिका कविता अशी असावी - -*

*गतिमान वास्तवाची ती सारथी बनावी*
*संस्कार द्यावयाची निष्ठा तिने जपावी*
*माणूसकी जपाया मग सिद्ध हस्त व्हावी*
*मज वाटते रसिका कविता अशी असावी - -*

**प्रा तुकाराम दादा पाटील - मुळचा पत्ता - मु.पो. भोसे ता.मिरज जि. सांगली - सध्या रॉयल रोहाना, जुना जकातनाका वाल्हेकरवाडी रोड चिंचवड पुणे ३३ दुरध्वनी - ९०७५६३४८२४, ९८२२०१८५२६**

## 17. कथा - पथदर्शक… डॉ. ज्योती गोडबोले



आज प्रतिमा अगदी वैतागून गेली होती. सकाळपासून तिचा दिवसच वाईट गेला होता. तिच्याजुळ्या मुलींनी जीव नको केला अगदी… कामवाल्या बाईची चार दिवस सुट्टी होती. मुलींना तयार करून एकदाचे शाळेच्या बसमध्ये बसवून दिल्यावर तिला जरा सुटका मिळाली.  नवरा निनाद आजबाहेर जेवणार होता. कसली मीटिंग होती म्हणे ऑफिसची…. आता घरी ती आणि सासूबाईच.

किराणा आणायला, कपडे इस्त्रीला टाकायला म्हणून प्रतिमा बाहेर पडली. जेवण झाल्यावरजरा पडावं म्हणून आडवी झाली तर डोळाच लागला तिचा.

सासूबाईंनी हाक मारली. "प्रतिमा चहा घेतेस का? दमतेस ग फार तू. मुली कमी त्रास देत नाहीततुला. लहानच आहेत ग त्या अजून. घे चहा." एवढ्यानेही प्रतिमेला भरून आलं.

"जिजी, कधी मोठ्या होतील हो या सायली जुईली? मला कंटाळाच येतो बघा हे सगळं संभाळायचा. कशी पूर्वीच्या काळी बायका पाच-सहा पोरं संभाळायच्या? "

जिजी हसल्या. अग तो काळ वेगळा होता प्रतिमा. चूल आणि मूल हेच आयुष्य ग बाईचं. आता तसं कुठंय? तुम्हा मुलींना कुठे घरी बसायला आवडतं? होतील बरं मोठ्या बघता बघता… तरी तुला एक मुलगा हवा बाई व्हायला. निनाद एकुलता एक आहे आमचा. वंश पुढे नको का चालायला? " असं म्हणतजिजी तिथून निघून गेल्या.

प्रतिमा हे ऐकूनच हादरली. हेत्यांचे असलेविचार नव्हते माहीत तिला…

सकाळीलवकर उठून फिरायला जायची प्रतिमा. जवळ छान बाग होती. हाच काय तो वेळ तिचा असा तिला मिळायचा. आजही ती तशीच गेली होती. ठराविक व्यायाम करून ती बाकावर बसली. शेजारी एक गृहस्थ येऊन बसले… असतील तिच्या वडिलांच्यावयाचे… "मी इथं बसू का? मला थोडी चक्कर येतेय. ".. " बसा नाकाका." प्रतिमाने त्यांना बसवले आणि आपल्या बाटलीतलं पाणी दिलं.

"काका, आता बरं वाटतंय का? कुठं रहाता तुम्ही? " त्यावर ते म्हणाले, "अग आता बरा आहे मी. होतं मला असं कधीतरी. थँक्स ग मुली." "काका थँक्स काय. मी येते पोचवायला तुम्हाला. जवळच रहाता का? माझ्याटू व्हीलरवर येईल का बसता? " प्रतिमाने त्यांना घरी पोचवले. आणि ती पटकन घरी गेली.

कामे वाट बघत होतीच तिची… पुढचे दोन दिवस तिला बागेत जायला वेळच झाला नाही.. मग पुन्हा जेव्हा ती बागेत गेली तर काका बाकावर बसले होते.

"अग दोन दिवस आली नाहीस का? बरी आहेस ना? "

"हो काका. पण वेळ होत नाही हो काहीवेळा…"

"चल येतेस का घरी? चहा करूनच आलोय मी."

प्रतिमा आणि काका तिच्याटूव्हीलरवरून त्यांच्या घरी गेले… बंगल्याबाहेर पाटी होती. डॉ विश्रामगोरे…

प्रतिमा म्हणाली, “काका म्हणजेते प्रसिद्ध सायंटिस्ट गोरे तेतुम्हीच का? सॉरी... मी ओळखलंच नाही हो तुम्हाला.”

काका हसले, “अग हो... मीच तो. पण त्यात विशेष काय? आता तर मी निवृत्त झालोय... केली इतकी वर्षे नोकरी, मोठी पदे भूषवली, आता छान जगतोय निवृत्त आयुष्य...“

प्रतिमाने त्यांच्याकडे निरखून बघितलं... किती रुबाबदार होते ते... लख्ख गोरेघारे देखणे आणि शुभ्र केस अगदी शोभूनच दिसत होते त्यांना... अतिशय भव्य बंगला आणि नीट जोपासलेली बाग सुद्धा...

काकांनी तिच्या हातात चहा दिला... “काका एकटेच असता का इथे? कधी बघितलं नाही मी फारसं तुम्हाला...”

“हो गं... मी एकटाच असतो इथं. माझी पत्नी जाऊन सहा वर्षे झाली... मुलगा खूप मोठ्या पोस्टवर बंगलोरला आहे. मुलगी दिल्ली जवळच... मी मुलाकडे जातो वर्षातले तीन महिने, पण एरवी इथेच असतो. मी छान गुंतवून घेतलंय स्वतःला... आमचा क्लब आहे, शिवाय मी पीएचडी चा गाईड आहे, ती मुलं येतात... कामाला नोकर, स्वयंपाकाला गडी... सगळं आहे नीट...“ काका म्हणाले.

प्रतिमाला कौतुक वाटलं. ती घरी आली आणि निनादला सांगितलं हे सगळं. तो म्हणाला, “बाप रे. अग पद्म सन्मान मिळालाय त्यांना. फार मोठा माणूस आहेत बरं ते. बघ किती साधे आहेत.“

त्या दिवसापासून प्रतिमा काकांबरोबर वॉकला जाऊ लागली... किती बहुश्रुत आणि व्यासंगी होते गोरेकाका... एक दिवस बोलता बोलता म्हणाले,

”प्रतिमा, तू काय शिकली आहेस ग? कुठे जॉब करतेस का? ”

प्रतिमा खिन्न होऊन म्हणाली, ”काका, मी मायक्रोबायॉलॉजी मध्ये एम, एस सी. आहे हेच विसरून गेलेय. मला चांगलंडिस्टिंगशन होतं बघा. पण मग निनादचं चांगलं स्थळ आल्यावर मी लग्नाला नकार देऊ शकले नाही. चांगली लेक्चररची पोस्ट आली होती तीही घेतली नाही मी. मग काय! लगेचचजुळ्या मुली झाल्या मला... कसलं काय काका. मला मान वर काढायलाही वेळ होत नाही घरातून आणि संसारातून“... प्रतिमाच्या डोळ्यात पाणी आलं.

गोरे काकागंभीर झाले. ”अग ठीक आहे ग... आपल्या सगळ्या इच्छा पुऱ्या होत नाहीत कधी... पण इच्छा शक्ती असेल तर कोणीही अडवू शकत नाही बघ... तुला आहे ना करिअर करायची इच्छा? मग निघेल की मार्ग... पण इतके वर्ष अशी कशी गप्प बसलीस तू प्रतिमा? तुझा नवरा नाही काम्हणाला की नोकरी कर, पुढे शीक? ”

“छे हो काका... टिपिकल इंडियन नवरा आहे तो.. माझे आई वडील, माझं, मुलींचं सगळं नीट झालं पाहिजे... आणि मी मिळवतोय की भक्कम... काही गरज नाही तू बाहेर जाण्याची... यावर काय बोलू मी काका? माहेरीही आई बाबा हेच म्हणतात... माझी घुसमट कोणालाच समजत नाही“ खिन्न होऊन प्रतिमा म्हणाली...

”किती वय आहे मुलींचं तुझ्या? “

“आता आठ वर्षाच्या आहेत त्या. आणि बऱ्याच इंडिपेंडंट झाल्या आहेत आता.”

“हो का? मगहोईल होईल ग नक्की काही तरी… निघेल मार्ग बघ…” काका आपलेपणाने म्हणाले.

त्या दिवशी प्रतिमाच्या सुप्त इच्छेनेपुन्हा डोके वर काढले… निनादशी बोलण्यात अर्थच नव्हता… प्रतिमाने आपली डिग्री, मार्कलिस्ट कपाटातून बाहेर काढली… किती सुंदर मार्क्स होते तिला…

त्या दिवशी ती मार्केटमध्ये गेली असताना तिला रेणू भेटली. रेणू तिच्याच बरोबर एमेस्सी झाली आणि नंतर पीएचडी करून एका कॉलेजमध्ये चांगल्या पोस्टवर होती…

“काय प्रतिमा, आज इकडे कुठे? “

“अग रेणू हेच मी तुला विचारतेय. तू कशी इकडे मार्केट मध्ये ग? बरा वेळ मिळाला बाईना आज.“

यावर रेणू म्हणाली, ”बाई ग… संसार कोणाला सुटलाय? तुझं बरं आहे बाई. घरीच असतेस… मस्त संसार एके संसार चाललंय तुझं… मला किती आघाड्यावर लढावं लागतं याचीतुला कल्पनाही येणार नाही… घरी आलं की मुलं सासू नवरा सगळे वाटच बघत असतात माझी… मगकाय… लगेच घरची नोकरी सुरू… ” रेणू म्हणाली.

पण हे बोलताना रेणू खुशीत होती… कुठलाहीमनस्ताप होत असलेलादिसत नव्हता तिला… प्रतिमा एवढीच होती रेणू… पण किती लहान दिसत होती ती… छानसा हेअर कट तिला शोभून दिसत होता… आणि सुरेखसा भारी पंजाबी ड्रेस… प्रतिमाने स्वतःकडे बघितलं. चुरगळलेला ड्रेस…. कसेतरी बांधलेले केस आणि पायात किती जुनाट चपला… रेणूचेशूज किती मॉडर्न आणि भारी दिसत होते… प्रतिमाच्या डोळ्यात अचानकच पाणी आलं…

रेणू एकदम चपापली, ”काय झालं प्रतिमा? मी काही तुला लागेल असं बोलले का? सॉरी हं. पण असं पाणी का डोळ्यात? चल, जरा समोर बसूया त्या कॅफेमध्ये. आहे ना वेळ? चल बघू… किती तरी महिन्यांनी भेटतोय आपण…” रेणूने प्रतिमाला बोलू न देता त्या कॅफेत नेलं.

“आता बोल… सगळं सांगून टाक. काय सलतंय तुला? हे आयुष्य तू तुझ्याच मर्जीने स्वीकारलं आहेस ना? मग आता कसली खंत? उलट मी तुझी आभारी आहे, कारण तू लेक्चररची पोस्ट नाकारलीस म्हणून ती मला मिळाली… मग मी जॉब करत पीएचडी पूर्ण केलं… हे सगळं श्रेय तुला जातं प्रतिमा.“

”छानच झालं तुझं रेणू. मला अभिमानच वाटतो तुझा. पहिल्यांदा मी संसारात रमून गेले पण नंतर मात्र मलाखंत वाटू लागली की हे काय आयुष्य माझं? त्यात जुळ्या मुली झाल्या. मग तर मला माझंअसं जगच उरलं नाही ग. सतत घरदार, सासू सासऱ्यांची आजारपणं, मुलींच्या मागण्या… मी उरलेच कुठे प्रतिमा म्हणून? आता अगदी कंटाळून गेलेय ग मी. साध्या साध्या गोष्टींसाठी मला निनादवर अवलंबून राहावं लागतं… तो नाही म्हणाला तर मन मारावं लागतं मला… मला आता समजतं आहे की बाईला आर्थिक स्वातंत्र्य नाही म्हणजे ती शून्य आहे… काय करू काही समजत नाही ग…” प्रतिमा रडायला लागली…

तिचं हात हातात घेत रेणू म्हणाली, ”अशीहरू नकोस ग प्रतिमा. निघेल मार्ग नक्की… मीही करते प्रयत्न तुझ्या जॉबसाठी… आता आपण संपर्कात राहू एकमेकींच्या… पूस बघू डोळे… नक्की निघेल मार्ग…”

प्रतिमा नवीन बळ घेऊन घरी गेली…

दुसऱ्या दिवशी बागेत गोरे काका भेटले… प्रतिमा म्हणाली, “काका, मला असं नुसतं घरी नाही बसायचं हो… काल माझी मैत्रीण भेटली… किती स्मार्ट कॉन्फिडन्ट आणि आत्मविश्वासाने जगतेय ती… माझं आयुष्य नुसतं वाया गेलं आणि जातंय… मला काही सुचत नाहीये आणि नेमकं काय करावं तेही कळत नाहीये काका.“

काका म्हणाले, “प्रतिमा तुझाबायोडेटा देऊन ठेव मला… बघूया काही होतं का…”

आता यालाही दोन महिने होऊन गेले होते.

एक दिवस काका म्हणाले, ”प्रतिमा, एक उत्तम संधी आहे… एका मोठ्या संस्थेत तुला नोकरी मिळण्या सारखी आहे बघ… सध्या लीव्ह व्हेकन्सी वर चार महिने काम आहे. त्यानंतर बघ काय होते ते…. उद्या जाऊन भेट… मीबोलून ठेवलंय त्या लोकांशी…“

“थँक्स काका… मी नक्की जाऊन भेटते उद्याच… सांगते काय होतं ते तुम्हाला… किती आभार मानू तुमचे. माझे कोणीही लागत नसताना तुम्ही प्रयत्न करताय माझ्यासाठी… “प्रतिमा खाली वाकली आणि तिने नमस्कार केला गोरे काकांना… ”काका, आशीर्वाद द्या मला…”

“होईल ग सगळं छान बेटा… छान दे इंटरव्ह्यू…”

प्रतिमा त्या ऑफिस मध्ये गेली… तिचा इंटरव्ह्यू खूप छान झाला. आठ दिवसांनी तिला अपॉइंटमेंट लेटर मिळालं… तोपर्यंत तिने घरी हे कोणालाच सांगितलं नव्हतं. आता मात्र प्रतिमाने निनाद घरी आल्यावर सगळ्याना हॉलमध्ये बोलावलं…

… “मला असा असा जॉब मिळालाय… सध्या चारच महिने आहे… पण मी पुढच्या आठवड्यात जॉईन होणार आहे… काळजी करू नका. आपल्या मंजुळाबाई सकाळीच कामाला येतील… मी शक्यतो सगळं करून जाईन.”

“हे तू कोणाला विचारून ठरवलंस ग? आणि त्या बाईंचा पगार कोण देणार? मी एक पैसा देणार नाही तुला प्रतिमा…“… निनाद कडाडला.

प्रतिमा हसली आणि म्हणाली, “हे मला माहीतच आहे निनाद… तू नकोच देऊ मला पैसे… मी माझ्या पगारातून देईन त्यांचा पगार… आणि आई मी काही नवीन करायचं ठरवतेय तर करू द्या ना… इतके वर्ष घरात बसून काढली पण आता मुलीही मोठ्या झाल्या… मला प्लीज जाऊ दे. उपयोग करू दे ना मला माझ्या शिक्षणाचा…”

यावर प्रतिमाचे सासरे म्हणाले, “जरूर जा तू प्रतिमा… मी आणि जिजी करू तुला मदत… सगळा विचार करून तू बाई पण ठेवणार आहेस ना, मग नुसती देखरेख करायला आमचं काय जातं? जा तू. बघू तर काय होतं ते… आणि तूउगीच वाकड्यात शिरू नकोस निनाद… इतकीहुशार मुलगी घरी बसली हेच आश्चर्य आहे. पण ती काही करू बघतेय तर करू देत… कर प्रतिमा तू ही नोकरी “

प्रतिमाला गहिवरून आलं…

ती पुढच्याच आठवड्यात जॉईन झाली... किती नवीन विश्व होतं ते... तिला ते काम अतिशय आवडलं... थोड्याच दिवसात प्रतिमातिथे रुळूनगेली... घरीही सगळी घडी छान बसली... मंजुळाबाई सगळं छान करायला लागल्या... मुलींनाही त्यांचा स्वयंपाक आवडायला लागला...

बघता बघता चार महिने संपत आले. एक दिवस तिला बॉसने केबिनमध्ये बोलावलंआणि म्हणाले,

"प्रतिमा मॅडम, बसा ना... तुमचं काम अगदी छान आहे... तुम्ही कायम करू शकाल का ही नोकरी? तुम्ही ज्यांच्या बदलीवर काम करत आहात त्या मिस्टर मेनन ने राजीनामा दिला आहे.... ते परदेशात जात आहेत... जमेल का तुम्हाला कायम? तुम्हाला पे राईज तर मिळेलच पण सगळे फायदे मिळतील. एक विचारू का तुम्हाला? तुम्ही पीएचडी का करत नाही? जरूर विचार करा. म्हणजे मग एकदम मोठ्या पोस्टवर जाल. वयही लहान आहे तुमचं..."

प्रतिमाला खूप आनंद झालं. ती लगेच म्हणाली... "सर मी तयार आहे कायम ही नोकरी करायला... उलट आभारच मानते मी तुमचे आणि त्या मेनन सरांचेही..."

सर हसले आणि म्हणाले, "आता असंच पीएचडीचं ही घ्या मनावर..."

प्रतिमा त्या दिवशी गोरे काकांकडे गेली..." काका, पेढे घ्या... काय हो जादू केलीत तुम्ही... मला त्यांनी पर्मनंट करायचं ठरवलंय... आणिपीएचडी केलं तर आणखी वरची पोस्ट मिळेल म्हणाले... तुमचे उपकार कसे फेडू मी काका? उद्या ना तुम्ही आमच्या घरी जेवायला या. केवळ मला तुम्ही नोकरी मिळवून द्यायला मदत केली म्हणून नाही हं मी बोलवत... पण मला फार इच्छा आहे तुम्ही आमच्या घरी यावं... यालका?"

"अग, येईन की... त्यात काय एवढं! उलट मलाच मस्त तुमच्या घरचं जेवण मिळेल..."...

त्या रविवारी गोरेकाका प्रतिमाच्या घरी जेवायला आले. सगळ्यांनी त्यांचं खूप छान स्वागत केलं... एवढा मोठा पद्म पुरस्कार मिळालेला शास्त्रज्ञ आपल्या घरी येतोय याचं फार अप्रूप वाटलं सगळ्यांना... निनादभारावून गेला त्यांना बघून आणि आपल्या साध्यासुध्या बायकोवर ते मुलीसारखी माया करतात हेजाणून... त्या सगळ्यानाकौतुकही वाटलं त्यांचं.

गोरे काका सगळ्याचं कौतुक करत मनापासून जेवले... म्हणाले" मंडळी, आता माझी बंगलोरला जायची वेळ झाली. आता तीन महिने मी तिकडे असणार... तुमची खूप आठवण येईल मला... प्रतिमाने मला फार जीव लावला हो... गुणी मुलगी आहे तुमची ही फार... निनाद, खरं सांगू का? मी प्रतिमामध्ये माझी मुलगी श्रेया बघतो. आता सांगायला हरकत नाही... ही माझी श्रेया अत्यंत हुशार आहे... माझ्या मुलापेक्षाही जास्तच म्हणा ना... अगदी सहज यशाच्या पायऱ्या चढत ती डॉक्टर झाली... किती अभिमान वाटला मला आणि तिच्या आईला तिचा... श्रेया एक दिवस तिच्या वर्गातल्या मुलाला घेऊन आली... तोही डॉक्टर होताच... पण आपल्या जातीचा नाही... तरी हरकत नव्हती आमची... आम्ही छान लग्न करून दिलं... फार श्रीमंत जमीनदार लोक होते ते. पण त्यांचं गाव म्हणजे खेडंच होतं अगदी... दिल्लीजवळच होतंपण फार आतला अगदीमागासलेला भाग तो...आम्ही ते बघूनच हादरून गेलो... ही मुलगी इथे कशी प्रॅक्टिस करणार? तिकडे तर बायका घराबाहेर पडलेल्याही दिसेनात आम्हाला... तिचं लग्न पार पडल्यावर आम्ही इकडे परत आलो... एक वर्षाने श्रेया बाळंतपणासाठी आमच्या घरी आली... आली ती पूर्णपणे बदललेली... जणू आपण डॉक्टर

आहोत हेच तीविसरलेली होती... साडी, भरगच्च दागदागिने, भांगात सिंदूर आणि लठ्ठ झालेली ही श्रेया आम्हाला बघवेनाच... 'तू दवाखाना नाही का काढलास' असं विचारलं तर म्हणाली, ' बाबा, काही गरज नाही मला त्याची... आमच्याकडे अफाट पैसा शेतीवाडी, जमिनी आहेत. मग कुठे मी दगदग करू दवाखान्याची? सचिन मला लाखो रुपये देतो हातात. मी अगदी सुखात आहे बाबा... 'ती बेफिकीर होती आणि बाळंतपण झाल्यावर नवरा न्यायला आला, त्याच्या भपकेदार गाडीत बसून निघून गेली. जातांना आम्हालाही दोन लाख रुपये देऊन गेली. आम्हाला अतिशय वाईट वाटलं. एक हुशार सोन्या सारखी डॉक्टर वाया गेली आणि तिला त्याची काहीही खंत नाही हे त्याहूनही वाईट होतं... भाऊ तर तिच्याशी बोलतसुद्धा नाही आणि मीही तिच्याकडे जात नाही ... हे मी कोणाला कधी सांगत नाही... पण तुम्ही फार चांगले लोक आहात... या प्रतिमाची स्वतःच्या पायावर उभे रहायची, आपली अस्मिता जपायची धडपड मी बघितली... मनात आलं... ' कुठे ही निष्पाप, जिद्दी मुलगी आणि कुठे माझी पूर्ण कायापालट झालेलीऐदी झालेली निष्क्रिय डॉक्टर मुलगी...' मी प्रतिमाच्या डोळ्यातली जिद्द बघितली... काहीतरी करून दाखवायची उमेद बघितली. तिच्यासाठी पटेंटण करायचं ठरवलं. नशिबाने त्यात मला यश आलं आणि हिला सहज जॉब मिळाला... आता बघा... कशी पटकन कायम झाली नोकरीत... ते मात्र तिच्या कष्ट आणिमनापासून केलेल्या श्रमांवर... आणि तुमचेही कौतुक करायलाच हवे... तुम्ही आई-वडलांसारखे तिच्या पाठीशी उभे राहिलात... आणिनिनाद, आता नाही ना विरोध आमच्या प्रतिमाला? "गोरे काका हसत म्हणाले...

"नाही हो काका, आणि आता ती थोडीच ऐकणार आहे माझं... सुरवंटाचं फुलपाखरू झालंय आता... केवढा पगार मिळवतेय ती आणि पीएचडी साठी रजिस्ट्रेशन करून आली सुद्धा... "निनाद कौतुकाने म्हणाला आणि त्यानेगोरे काकांना नमस्कार केला.

"काका, तुमचे आभार मानत नाही असेच मला तुमच्या ऋणातच राहू द्या..." प्रतिमाने काकांच्या हातात उत्तम सुटाचे कापड दिले... काकानी तिला जवळ घेतले... अशीच मोठी हो ग बाळा... आणि मग हळूच विचारलं, "ते वंशाचा दिवा आणायचे काय झाले? ? "

यावर सासूबाई हसल्या आणि म्हणाल्या, "नको नको... या दोन दिवल्या किती गोड आहेत... आमच्या... प्रतिमाने ती वाट बंद केलीय आता..." निनाद प्रतिमा हसायला लागले.

काका उठले... म्हणाले, "चला आता मला निघायला हवं मंडळी. आता आपली भेट तीन महिन्यांनी..." हळूच डोळे पुसतगोरे काका जिना उतरू लागले.

**डॉ. ज्योती गोडबोले मो. ९८२२६३९४७१**



## 18. लेख - सार्थ आम्हा अभिमान - सुश्री मंजिरी येडूरकर



*अर्थं सुखं कीर्तिरपीह मा भूदनर्थ एवास्तु तथापि धीराः ।*

*निजप्रतिज्ञामनुरुध्यमाना महोद्यमाः कर्म समारभन्ते ॥*

जे लोक धाडसी, मेहनती व निश्चयी असतात ते आपलं ध्येय गाठण्यासाठी वाटचाल करताना, येणाऱ्या अडचणी, संभाव्य धोके, त्या मार्गावर अप्राप्य असणारी कीर्ति, सुखसमृद्धी अशा कोणत्याच गोष्टींनी (विचारांनी) विचलित होत नाहीत. (मागे हटत नाहीत) म्हणजेच त्यांनी निवडलेल्या मार्गावर वाटचाल करण्यापासून त्यांना कोणी रोखू शकत नाही.

या कोटीतील पुरुष, ज्याचे भविष्य कथन गुहागरच्या माधवराव गाडगीळ वकिलांनी असे केले होते...

"हा पुढेखचित मोठा माणूस होणार व खात्रीने तो नशीब काढणार."

१८५९ साली गुहागरमध्ये विद्वत परंपरा असणाऱ्या वामनशास्त्री खरेंच्या पोटी हा लखलखता हिरा जन्माला आला. त्याचाच पुढे वासुदेव शास्त्री झाला. परंपरागत चालत आलेले वेदाध्ययन करण्यास वासुदेव तयार झाला नाही. पण मराठी व्याकरण, कविता यांचा अभ्यास, अचाट स्मरणशक्ती, अलौकिक बुद्धिमत्ता यामुळे वडिलांना त्याला खूप शिकवावे असे वाटत होते. पण वडिलांच्या अचानक झालेल्या निधनामुळे हे स्वप्न अपुरेच राहिले. वासुदेवाला लहानपणापासूनचशीघ्र कविता करण्याचा नाद होता. गावात त्याकाळी उत्सवामध्ये दशावतारी खेळ, राम-रावणादिकांची किंवा इतर पौराणिक प्रसंगांची नाटके करण्याची प्रथा होती. त्यासाठी वासुदेव नाटके काव्यासह रचून देत असे, नाटक करणाऱ्यांना अभिनय शिकवीत असे. त्यामुळे नाटक हे जनतेशी संवादाचे माध्यम असते, प्रेक्षकाला तत्व विचार व मूल्य विचार करण्यास भाग पाडणारे असते. याची जाणीव लहान वयातच झाली. त्यामुळे त्यांच्या नाटकात देश विचार, भोवतालची सामाजिक, राजकीय परिस्थिती असायची.

ते गुहागरला रमले नाहीत, त्यांना साताऱ्याच्या आचार्य गजेंद्र गडकरांकडे जाऊन संस्कृत शिकण्याची प्रचंड इच्छा होती. पण घरच्या परिस्थितीमुळे ते शक्य होत नव्हते. त्यांच्या शीघ्र कवित्वावर, बुद्धीमत्तेवर श्रीमंत मलकापूरकर, श्रीमंत कागलकर खुश झाले होते, त्यांच्या मदतीने त्यांनी मलकापूरला काही काळ श्रीखंडे यांच्याकडे शास्त्राभ्यास सुरु केला. तिथेही फार दिवस राहू शकले नाहीत. पुन्हा गुहागरला परत आले. १८७५ साली अखेरीस जे घराबाहेर पडले ते पुन्हा परत घरी गेले नाहीत. साताऱ्याला राहून आचार्य गजेंद्रगडकर यांच्याकडे संस्कृत शिकले. त्याच काळात त्यांना 'महाराष्ट्र मित्र' या साप्ताहिकासाठी संपादकीय लेख लिहून

देण्याचे काम मिळाले. साताऱ्यातील अडीच वर्षात ते संस्कृतमधून कविता करू लागले. संसार सुरु झाला असल्यामुळे पोटपूजेसाठी काही केले पाहिजे म्हणून त्यांनी पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नोकरी धरली. ही शाळा चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनी स्थापन केली होती. पुण्याला नारायणशास्त्री गोडबोले यांच्याकडे मनोरमा, शब्दरत्न या उच्च व्याकरण ग्रंथांचा अभ्यास सुरु केला. त्यावेळी 'काव्येतिहास संग्रह ' या मासिकाच्या संस्कृत भागाचे संपादन विष्णुशास्त्री चिपळूणकर करीत होते. तेही शिक्षक होते. त्यांची रत्नागिरीला बदली झाल्यावर त्यांच्या जागी हे काम वासुदेवशास्त्री करू लागले. इथेच त्यांच्यामध्ये इतिहास संशोधनाचे आकर्षण व आवड निर्माण झाली. पुण्यात त्यांची ओळख बऱ्याच विद्वान लोकांशी झाली, त्यात लोकमान्य टिळक, आगरकर, सार्वजनिक काका हे होतेच. त्याशिवाय श्रीधर दाते, माधवराव कुंटे हेही होते. स्वदेशीच्या आग्रहासाठी समाज प्रबोधन करण्यासाठी शास्त्रींनी कीर्तने लिहिली. गावोगावी जाऊन तेकीर्तने करू लागले. टिळकांनी जे केसरी नावाचे वर्तमानपत्र सुरू केले त्याचे केसरी हे नाव वासुदेवशास्त्रींनी सुचवले होते. त्यावर जो ध्येयदर्शक श्लोक होता तोही त्यांनीच सुचवला होता. पुण्यातील नोकरीला जेमतेम अकरा महिने झालेआणि मिरजेला इंग्लिश स्कूल - जे नंतर मिरज हायस्कूल या नावाने सुरू झाले. मिरजेचे स्टेट कारभारी यशवंत केळकर यांनी, टिळकांच्या सल्ल्याने खरे शास्त्रींना संस्कृत शिकविण्यासाठी मिरजेला बोलावून घेतले. पण अध्यापनात त्यांचे मन रमेना म्हणून ते काही महिन्यांची रजा घेऊन उज्जैन येथे गेले होते. तेथेच राहावे असा विचार होता पण दरम्यानच्या काळात मिरजेला मळे संस्थानातील दप्तरासारखा ऐतिहासिक कागदपत्रांचा साठा त्यांना अचानक मिळाला आणि मग याचसाठी केला होता अट्टाहास असे झाले. मग त्यांनी मिरज सोडण्याचा विचार शेवटपर्यंत केला नाही. शास्त्रीबुवांनी नंतर मिरजेला स्वतःच इंग्रजीचा अभ्यास सुरू केला. इंग्रजीमधील अनेक ग्रंथांचे वाचन केले.

सुरुवातीच्या काळात वासुदेवशास्त्री यांनी समुद्रकाव्य (१८८४), यशवंतराव महाकाव्य (१८८८), फुटकळ चुटके (१८९१) हे तीन काव्यसंग्रह प्रसिद्ध केले. ही काव्ये म्हणजे काव्यबद्ध केलेल्या, घडलेल्या कथा आहेत. तसेच गुणोत्कर्ष नाटक (१८८५) लिहिले. त्या काळी हे नाटक खूप गाजले. पण नंतरच्या काळात ते इतिहास संशोधनात इतके व्यस्त झाले की नाट्य लेखन झालेच नाही. १९१३ सालच्या दरम्यान महाराष्ट्र नाटक मंडळीचे लोक आले आणि एक नाटक लिहून मागू लागले. आर्थिक ओढाताण चालूच होती त्यामुळे उत्पन्नात भर पडेल या उद्देशाने त्यांनी नाटक लिहून देणे कबूल केले. त्यांच्या मागणीप्रमाणे 'तारामंडल' हे त्यांनी गद्य नाटक लिहिले. नंतर चित्रवंचना, कृष्णकांचन, शिवसंभव, उग्रमंगळ अशी पाच संगीत नाटके लिहिली. त्यांनी काव्याप्रमाणेनाटकातही राष्ट्रीय उन्नतीला पोषक असेच लेखन केले. शेवटचे देशकंटक हे नाटक १९२२ मध्ये बळवंत संगीत नाटक कंपनीकरता लिहिले. पण कंपनीच्या व्यस्त वेळापत्रकातून या नाटकाला रंगमंच मिळेल असे वाटले नाही. त्यामुळे त्या नाटकाचा सांगितिक बाज काढून त्यांनी ते नाटक महाराष्ट्र नाटक मंडळाला दिले. १९२४ ला ते नाटक रंगभूमीवर येणार हे नक्की झालं आणि अचानक वयाच्या ६६ व्या वर्षी वासुदेवशास्त्री यांची प्राणज्योत मालवली. शेवटी त्यांच्या मुलाने... यशवंतरावांनी ते नाटक पुन्हा बलवंत

नाटक मंडळाला दिलं. बाळाजी शास्त्री यांनी नाटकातल्या पदांची रचना केली आणि १९३० मध्ये हे नाटक रंगमंचावर आलं. प्रा. विजय तापस म्हणतात की "देशकंटक हे नाटक म्हणजे सत्तेने बेफाम झालेल्या, विधी निषेधाला तिलांजली देणाऱ्या, स्वतःच्या बाईबाजीला उदात्त रूप देऊ पाहणाऱ्या भुजंगराव या सरदाराची कहाणी जरी नाटकात दिसत असली तरी ती तेवढ्यापुरती मर्यादित नाही. भुजंगाच्या जागी 'ब्रिटिश राजवट', तो जिच्यावर लैंगिक सुखासाठी अत्याचार करू पाहतो त्या मालतीच्या जागी 'भारत माता' आणि मालतीचा पती असलेल्या हिम्मतरावांच्या जागी लढाऊ बाण्याचा 'सशस्त्र क्रांतिकारक' उभा करून जर आपण नाटक पाहायला सुरुवात केली तर आपल्याला जे नाटक दिसू लागेल तेच नाटक खरे यांना कदाचित अभिप्रेत आहे. हिम्मतराव जे वागतो आणि मालतीची भुजंगाच्या कैदेतून जी सुटका करतो तोच खरे यांनाअभिप्रेत असलेला राष्ट्रवाद आहे हे आपण विसरून चालणार नाही. भुजंग, मालती, हिम्मतराव आणि यांच्यासहित इतर पात्रांकडे आपण पाहायला लागलो की ही कथित पात्रं विविध वृत्ती प्रवृत्तींची चिन्ह- व्यवस्था आहे आणि या चिन्हांचा जीवित धर्म 'राष्ट्रवादाची जोपासना' हाच असल्याचं आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही".

ऐतिहासिक लिखाण करताना वासुदेवशास्त्री यांनी मळे दप्तराबरोबर कुरुंदवाड, इचलकरंजी इत्यादी संस्थानांची दप्तरे पाहिली. याशिवाय जहागिरदार, इनामदार, तैनातदार अशा घराण्यांकडून जेवढा जुना पत्रव्यवहार मिळेल तेवढा त्यांनी गोळा केला. त्यांचे पहिले ऐतिहासिक पुस्तक म्हणजे नाना फडणवीस यांचे चरित्र … व त्यानंतर इतिहास संशोधन, संपादन, प्रकाशनयाचा प्रचंड उद्योग त्यांनी केला. ऐतिहासिक लेखसंग्रह नावाचे मासिक काढून ते त्यांनी तीन वर्षे चालवले. मग ते ऐतिहासिक खंड प्रसिद्ध करू लागले.

हे काम करताकरताच 'अधिकार योग' (किंवा नानास (पेशवे) राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास), इचलकरंजी संस्थानचा इतिहास, मालोजी व शहाजी, मराठी राज्याचा उत्तरार्ध, हरिवंशाची बखर (किंवा पटवर्धन सरदारांच्या हकिकती) अशा इतर ग्रंथांचे संपादन त्यांनी केले. याशिवाय ' प्रोफेसर लठ्ठे व परशुराम भाऊंची छत्री ' ही लेखमाला, ‘चालू भाषेतील ऐतिहासिक शब्द‘ हा निबंध, 'मराठे व इंग्रज' या ग्रंथास उपोदघात म्हणजेच प्रस्तावना, 'ग्रँड डफ च्या चुकांचे हप्ते' ही लेखमाला असे बरेच इतर लेखन त्यांनी केले.

वासुदेवशास्त्री यांनी ऐतिहासिक खंडाचे १९२४ पर्यंत बारा भाग प्रकाशित केले, शेवटचे तीन भाग त्यांचे चिरंजीव यशवंतराव खरे यांनी संपादित केले आहेत. १९२२ च्या अखेरीपासून त्यांची तब्येत जरा ढासळू लागली. बारावा भाग पूर्ण करण्याची ओढ, वसईच्या तहापर्यंत आणखी तीन चार भाग लिहायला हवेत त्यासाठी चार-पाच वर्ष तरी जगायला हवे असे त्यांना वाटत होते. 'शिंदे यांचे हिंदुस्थानात प्रयाण' या प्रकरणाची १००-१२५पाने रोज आठ-दहा तास बसून त्यांनी तयार केली. त्यावेळी उठून बसल्यावर शरीर एका बाजूस कलंडायचे म्हणून त्यांनी आपल्या भोवती गाद्या, तक्के असे उंचवटे उभे केले होते. २५ मे १९२४ ला त्यांचा बारावा खंड लिहून पूर्ण झाला आणि त्यांनीतक्क्यावर जी मान टाकली ती टाकलीच. पुढे सोळा

दिवसांनी त्यांचा अंत झाला. " ज्या दिवशी लिखाण पूर्ण झाले तेव्हा त्यांच्या मुखावर प्रसन्नता दिसली. योग समाधी लागल्यावर योग्याच्या मुखावर जी दिव्य प्रसन्नता येते ती प्रसन्नता हीच असावी. " असे त्यांचे चिरंजीव यशवंतराव यांनी सांगितले. शेवटचे हे दिवस ते भ्रमात असायचे पण त्यावेळी सुद्धा इतिहासच बोलायचे. ' यशवंतराव होळकर ने सोलापूर जाळले ', ' पुणे लुटले '... इतिहास हा त्यांचा श्वास होता, प्रत्येक घटनेला ठोस आधार देऊन ते आपले मत मांडत होते, त्यामुळे त्यांचे लिखाण अविवादित, अबाधित राहिले.

वासुदेव शास्त्री संशोधन कार्य ज्या ठोसपणे, ज्या शास्त्रशुद्ध पद्धतीने करायचे त्यावरून त्यांच्या कामाची पद्धत, विद्वत्ता, त्यांची विवेचन करण्याची पद्धत, सारग्रहण करण्याची क्षमता सारंच अद्भुतहोतं. काव्य, इतिहास लेखन, इतिहास संशोधन व संपादन, नाटक, या सर्व क्षेत्रातला हा एक अधिकारी पुरुष होऊन गेला. आणि त्याची कर्मभूमी सांगली मिरज परिसर असावी ही आपल्यासाठी प्रचंड अभिमानाची गोष्ट आहे. तुम्हाला इतिहासात एक अग्रणी नाटककार - एक अधिकारी पुरुष असा त्यांचा उल्लेख मिळणार नाही, इतरांचा इतिहास लिहिणारा हा अवलिया स्वतःचं कौतुक करणार नाही आणि त्याचं कौतुक करावं एवढा मोठा माणूस त्याच्यानंतर या भूमीत जन्मालाच आला नाही.

वासुदेवशास्त्री नोकरी करून रात्रीच्या वेळी इतिहास लेखन करत बसत. रोज वर्तमानपत्राचे वाचनकरणे, इंग्रजी व संस्कृत विषयांचा अभ्यास, वाचन चाले. एवढ्या सगळ्यातून वेळ काढून मैदानी खेळ खेळणे, पोहणे, सोंगट्या, बुद्धिबळ हे खेळ खेळणे चाले. त्यांना व्यायामाची ही आवड होती. हे सारं कमी म्हणून की काय ते मिरजेच्या बाळकृष्ण बुवा यांच्याकडे तीन-चार वर्षे गाणे शिकत होते, जयदेव कवींचे ' गीत गोविंद ' ते गात असत. असे ते सर्वव्यापी होते.

मिरजेच्या भट यांनी त्यांचे चरित्र लिहिले आहे. वासुदेवशास्त्री यांच्याबद्दलते म्हणतात, "इतिहास प्रकाशन कार्यरूपी प्रचंड वृक्षाचे ते शाखा पल्लव होत. यांच्या छायेत कोणीही इतिहास-लालसा असणारा मनुष्य क्षणभर विसाव्यासाठी बसला तरी तो सुख पावेल. हा कार्य-वृक्ष एकट्याच्या एकनिष्ठ स्वार्थ -त्यागाचे खतपाणी घालून संगोपिला व वाढविला ही गोष्ट कौतुकास्पद आहे."

लोकमान्य टिळकांना त्यांची होणारी आर्थिक ओढाताण कळत होती. ग्रंथ संपादनाचं काम हे किती खर्चिक असतं याची कल्पना त्यांना होती. लो. टिळकांनी आपल्या भाषणातून साऱ्या मराठी बांधवांना आवाहन केलं होतं. ते म्हणाले, "पूर्वजांच्या यशोदुंदुभिचा तुम्हास आदर असेल, तुम्ही आपल्या पूर्वजांच्या रक्तामांसाचे आहात याबद्दल जर त्यांची स्मृती कायम ठेवावी असे वाटत असेल तर सर्व आळस, हलगर्जीपणा टाकून या कार्यास मदत करा. व तशी मदत करणे हे प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाचेकर्तव्य आहे".

महाराष्ट्रीय ज्ञानकोशात त्यांचे छोटेसे चरित्र, संशोधक असा निर्देश करून वाङ्मय स्मारक ठेवले आहे. पुण्याच्या इतिहास संशोधन मंडळात त्यांचे तैलचित्र समारंभाने लावण्यात आले आहे. वासुदेवशास्त्री यांचे चरित्र लिहिणारे दामोदर भट, वरचेवर त्यांच्या घरी जाऊन त्यांच्यावर उपचार करणारे, थोडीतरी विश्रांती घ्या असे जीव तोडून सांगणारे डॉ. वाटवे, डॉ. भडभडे, याशिवाय वेळोवेळी मदत करणारे स्टेट कारभारी आगाशे, श्री. प्राणी, त्रिंबक साठे, वासुदेव शास्त्रींचे लाडके विद्यार्थी भास्करराव महाबळ... अशी सारी निस्पृह माणसे काळाच्या उदरात लोप पावली. पण त्यांनी उभे केलेले वासुदेवशास्त्र्यांचे खरे स्मारक 'खरे मंदिर' मात्र अजूनही मिरजेला दिमाखात उभे आहे. ११ जून १९२४ ला हा निष्काम कर्मयोगी आत्मा, प्रत्यक्ष उत्तरायणात, परब्रम्हात विलीन झाला. या गोष्टीला १00 वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने त्यांचे स्मरण करावे व पुढच्या पिढीला त्यांची थोडी ओळख करून द्यावी यासाठी हा लेखप्रपंच!

**अशा या निष्ठावंत, बुद्धिमंत, कर्मयोग्याला शतशः दंडवत!!!**

**सुश्री मंजिरी येडूरकर मो. 942109661**

*(**आधार** - दामोदर भट यांनी प्रसिद्ध केलेले वासुदेव शास्त्री यांचे चरित्र.)*



# 19. कविता - निळे आभाळ... - सुश्री प्रणिता खंडकर



*निळ्या निळ्या आभाळाला,*
*ओढ सागराची,*
*प्रतिबिंबित जळात,*
*छाया निळाईची!*

*निळ्या निळ्या आभाळाला,*
*चिंता धरित्रीची,*
*कसे, काळे काळे मेघ,*
*करतात दाटी!*

*निळ्या निळ्या आभाळाला,*
*खुळावे बिजली,*
*गडगडाटाच्या संगे,*
*सर पावसाची!*

*निळ्या निळ्या आभाळाला,*
*साथ चांदण्याची,*
*पांघरून घेते कशी,*
*शाल पौर्णिमेची!*

*निळ्या निळ्या आभाळाला,*
*झाक गूढतेची,*
*लोपतो का चंद्रमा हा,*
*अवसेच्या राती!*

*निळ्या निळ्या आभाळाला,*
*सय का फुलांची,*
*दवबिंदू ओघळूनी,*
*दिठी पाकळीसी!*

*निळ्या निळ्या आभाळाला,*
*साद पाखरांची,*
*येता पंखांमध्ये बळ,*
*गगन भरारी!*

*निळ्या निळ्या आभाळाला,*
*आस वसुधेची,*
*उगवती चंद्र - सूर्य,*
*साक्षीला, क्षितिजी!*

*निळ्या निळ्या आभाळाला,*
*धून मुरलीची,*
*विश्वरूप होई कान्हा,*
*रास वृंदावनी!*


**सुश्री प्रणिता खंडकर, सध्या वास्तव्य… डोंबिवली, जि. ठाणे ईमेल pranitakhandkar@gmail.com**

**केवळ वा◌ॅटसप संपर्क.. 98334 79845.**

## 20. कथा - मनातल्या उन्हात... - डॉ. सोनिया कस्तुरे



तसा तो खूप चांगला, प्रेमळ, जाणीवा जाग्या असलेला, इतरांच्या मदतीला धावून जाणारा, अनेक प्रसंगातून व्यवस्थित वाट काढत पुढे जाणारा, सामाजिक भान असलेला .... पण राग जास्त, आपण म्हणतो तेच बरोबर, आपण म्हणतो तसंच घडलं पाहिजे कुटुंबात, नात्यात, अगदी समाजातही. दुसऱ्यांची मतं खोडून काढायची घाई फार, समोरच्याचे ऐकून न घेता स्वतःचेच रेटायचे. त्याच्या या वृत्तीमुळे ती खूप त्रस्त असायची. तो इंजिनियर होता. कंपनीत असिस्टंट मॅनेजर पदावर काम करत होता.

त्याच्या स्वभावात चांगले गुण आणि वाईट गुण दोन्ही एकाच वेळी वास्तव करत होते. बाहेर कुठेही काहीही अडचण झाली, कुणी त्याचे ऐकले नाही तर घरात येऊन तो चिडचिड करायचा. राग-राग करायचा. ती स्वतःचे मत मांडायला गेली, सामाजिक गोष्टीतील अनेक अडचणी सांगायला गेली तर हा तिच्या अंगावर धावून जायचा. त्याला वाटायचे की त्याला ती समजून घेत नाही. ती वास्तव मांडायला जायची पण घडायचे वेगळेच. प्रत्येक माणूस वेगळा असतो हे त्याला समजून घेता येत नसे. किंबहुना पटत नव्हते. आपण विचार करतो तसाच सर्वांनी विचार करायला हवा... कारण आपला विचार योग्य आहे अशा अविर्भावात तो बोलत राहायचा. आपले बोलणे बडबड होऊ लागले आहे हे त्याच्या ध्यानीमनी शिवतही नसे. हिने त्याच्या 'हो' ला हो मिळवले तरच त्याला बरे वाटायचे.

ती स्वयंभू, स्वाभिमानी, सर्जनशील आणि सहनशील होती. तिला पटल्याशिवाय ती कोणतीच गोष्ट स्वीकारत नसे. ती स्वतंत्र विचारांची होती. शिकलेली होती. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होती. बँकेत नोकरी करत होती. एखाद्या व्यक्तीला आणि त्यात स्वतःच्या बायकोला काही स्वतंत्र विचार असतो हे कुठल्याच नवऱ्याला, कोणत्याही काळात तसे पटण्यासारखे नसते. आणि हे ती जाणून होती. पण काही अपवाद नक्कीच असतात हे तिला माहीत होते. आज ना उद्या तो बदलेल या विश्वासाने ती आपल्या मुला-बाळांच्याकडे बघून त्याच्यासोबत आनंदाने राहत होती.

एकदा अशीच एक सकाळची वेळ, कोणती तरी सुट्टी होती. त्यामुळे कामावर जाण्याची दोघांना घाई नव्हती. कुठल्यातरी कारणामुळे त्यांच्यात मतभेद झाले. वादावादी झाली. त्याचे म्हणणे तिला अमान्य होते आणि ती तिचा मुद्दा मांडत होती. त्याला राग अनावर झाला. तो तिच्या अंगावर धावून गेला आणि जोरात तिच्या उजव्या कानाखाली त्याचा हात गेला. आणि त्या कानातून जोरात कळ येऊन अतिशय वेगाने वारा कानात शिरतोय अशी तिला जाणीव होऊ लागली. क्षणभर तिला काहीच कळेनासे झाले. ती त्याला काही बोलली नाही. एकदम शांत झाली. त्याच्या रागीट वृत्तीची तिला कीव आली.

मुले सुट्टी असल्याने शाळेत गेली नव्हती. कामवाली मावशी अजून कामावर येणार होती. मुलं त्यांच्या खोलीत, भाऊ बहिण दोघे सापशिडी खेळत होती. “तुला साप गिळेल बघ हं... थोडं जपून खेळ! ” असे एकमेकांना सुचवत होती. त्यामुळे एवढा प्रकार घडला तरी तिने तोंडातून ‘ब्र’ काढला नाही. अश्रू पापण्यांपलिकडे तिने लपवून ठेवतले. अश्रू गालावरुन ओघळू दिले नाहीत.

तिने कान नाक घसा तज्ज्ञ / इ. एन. टी. स्पेशालिस्टला फोन केला. त्यांची अपॉइंटमेंट घेतली. संध्याकाळची वेळ मिळाली. ती एकटीच डॉक्टरांच्याकडे गेली. ते डॉक्टर या दोघांच्याही ओळखीचे होते. चेकअप केल्यानंतर लक्षात आले की तिच्या कानाचा पडदा ज्याला tympanic membrane म्हणतात तो फाटला होता. त्यांनी सांगितले की, याला ट्रीटमेंट अशी काही नसते. एक महिना कानात वारा व पाणी जाऊ द्यायचे नाही हीच त्याची ट्रीटमेंट. खूप मोठी काही अडचण नाही म्हणल्यावर तिचा जीव भांड्यात पडला. पण तिला एक महिना तोंड धुतांना, आंघोळ करतांना, गाडी चालवतांना व्यवस्थित काळजी घ्यावी लागणार होती.

त्याच्या अशा वागण्याने तिचा एकदा चष्मा तुटला होता. दरवेळी तो तिला पत्र लिहायचा. माफी मागायचा. स्वतःचे वागणे चुकीचे होते हे तो खूप वेळा कबूल करायचा. पण झालेली घटना खूप विदारक असायची. काहीही केले तरी या गोष्टी, या जखमा भरून येण्यासारख्या नव्हत्या.

या माणसाचे काय करावे हे तिला सुचत नव्हते. म्हणून ती एकदम शांत व्हायची. त्याच्या बाकीच्या इतर चांगल्या गोष्टींचा विचार करून या घटना एक्सीडेंट म्हणून सोडून द्यायचे की यालाच सोडून द्यायचे हे तिला समजायचे नाही. सभ्य आणि शालीन वृत्तीमुळे अशा गोष्टी बाहेर कोणाला तिने कळू दिल्या नाहीत. आई-वडिलांना या गोष्टीमुळे त्रास होऊ नये असे तिला वाटायचे. शिवाय आई वडील मध्ये पडून तरी कोणता निर्णय घेणार होते? स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवायला खंबीर असले पाहिजे असा तिचा विचार होता. तिचा निर्णय तिलाच घ्यावा लागणार होता.

मुली शिकल्या, स्वयंभू होऊ लागल्या. ‘आता पुरुषांना बदलायला हवे, पण लगेच बदल होणार नाही. हा transition period आहे. संक्रमणाचा काळ आहे. आपण धीर सोडायला नको‘ असा विचार तिच्या मनात येत होता.

मुलांना बाप हवा म्हणून, नवरा म्हणून अडचणीचा असला तरी बाप असल्याची जबाबदारी त्याला योग्य रितीने पार पाडायला ती भाग पाडत होती. स्वतःला समजून घेऊन एकमेकांना परत परत शोधायचे आणि परत परत समजून घ्यायचे असेल तर दूर होऊन चालणार नाही. सोबत राहायलाच हवे. आणि जगात एखाद्या पुरुषाला बदलण्याचा प्रयत्न करायचा झाला तर नवऱ्यात बदल घडवून आणावा असं तिचं मन म्हणत होते. म्हणून तिने त्याच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला... माणसांच्या बदलण्यावर तिचा विश्वास होता.

मुलांची शाळा, खेळ, अभ्यास, गॅदरिंग व स्वतःचं काम, यात ती पूर्ण गढून गेली. तशा मागच्या सर्व गोष्टी मागेच पडल्या. तोही स्वतःला बदलण्याचा प्रयत्न करत होता. अधे-मधे अनेक नातेवाईकांच्या अनुषंगाने बरेच चांगले वाईट प्रसंग घडत होते. अनेक चुकीच्या किंवा अयोग्य आठवणींना मेंदूत एका कप्प्यात घालून तिने तो कप्पा पूर्णपणे बंद करुन, जणू कुलूपच घालून टाकले होते. अशी अनेक वर्षे गेली. तो तिला कमी दुखावण्याचा प्रयत्न करत होता. पण त्याचा मूळ स्वभाव अधूनमधून डोकं वर काढत होता. तरीही सामंजस्याने सुखी आनंदी म्हणण्यासारखा सहजीवनाचा भाग पुढे चालत राहिला. मुले मोठी झाली. ज्याच्या त्याच्या ठिकाणी बाहेर शिकायला गेली. स्थिरस्थावर होण्याच्या मार्गावर होती.

मुले बाहेर गेली तशी घरात ही दोनच माणसं राहिली. आता मात्र मनात काळे ढग एकवटू लागले. कधी कधी डोळ्यातून बरसू लागले.

या माणसासोबत आपण राहू शकणार नाही अशी शंका तिच्या मनात सतत डोकावू लागली. तरी ते दोघे आपापल्या कामात व्यस्त होते. बऱ्यापैकी आनंदी वाटण्याजोगे सारे काही होते. सगळे काही बरे चालले आहे असे वाटत असतानाच अचानक तिला अधूनमधून मागच्या गोष्टी आठवू लागल्या तसे तिला अस्वस्थ वाटू लागले. ती त्या आठवणी पूर्णपणे पुसून टाकण्याचा प्रयत्न करत होती पण जसजशा पुसाव्यात तसतशा त्या उफाळून येत होत्या. हे तिला जाणवत होते. तिने मेंदूतील एका कप्प्यात कुलपात ठेवलेल्या ज्या काही जखमा होत्या त्या कप्प्याचे कुलूप अचानक तुटले होते. आणि त्या कप्प्याचे दार निसटल्याची जाणीव तिला झाली. मग दोघात साधे मतमतांतर झाले तरी तिला तो ट्रिगर पॉईंट होऊ लागला आणि त्या सगळ्या खपली धरलेल्या जखमा भळभळून वाहू लागल्या होत्या. तिचे blood pressure वाढले. Hyperthyroidism चा त्रास सुरु झाला. झोप कमी झाली. राग अनावर होऊ लागला. नवरा आता चांगला असला तरी जुन्या जखमांमुळे त्याचा तिरस्कार वाटू लागला. या सगळ्यांचा तिच्या कामावर खूप परिणाम होऊ लागला.

खरंतर तिला तिच्या या उतारवयात आनंदी राहायचे होते. रिटायर व्हायला सहाच वर्षे राहिली होती. पण मनातला गुंता वाढत चालला होता. तिच्या वेदना अतिशय तीव्र होत होत्या. ती व्यवस्थित गाढ झोपू शकत नव्हती. अंगात hot flashes निर्माण व्हायचे. बदला घेण्याची भावना तिच्या मनात निर्माण व्हायची. एकदा त्याला जोराची कानाखाली वाजवावी असा विचार तिच्या मनात येऊ लागला. स्वप्नात सुध्दा ती त्याला मारायला हात उचलायची पण हात उचलला जायचा नाही. हात जड व्हायचा. आणि ती खडबडून जागी व्हायची. त्याला मारायच्या हेतूने लाटणे उशाला घेऊन झोपायची. या माणसासोबत आपण का राहतो हा प्रश्न तिची पाठ सोडत नव्हता. पण ती स्वतःला या विचारांपासून बाजूला नेण्याचा प्रयत्न करत होती. बदला घेणं हा तिचा स्वभाव नव्हता, पण विचारांचे वादळ काही केल्या थांबत नव्हते. नकारात्मक विचारांनी तिचे डोके सुन्न होई. विचारांचे चटके तिला सोसेनासे झाले होते. व्यवस्थित झोप नाही, नीट जेवण नाही. डोक्यात

केवळ नवऱ्याविषयी द्वेष भावना आणि विचारांचा गोंधळ होता. पण तरीही तो तिला हवा होता. वयाच्या या टप्प्यावर विस्कटणं तिला नको होतं...

मुलांचे संगोपन व शिक्षणासाठी करिअर निवडीच्या वेळी तिने खूप वेळा एका कौन्सिलरची मदत घेतली होती.

स्वतःच्या मानसिक अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी आता परत ती मानसोपचार तज्ञाकडे गेली. त्यांनी काही औषध देऊन तेथील काऊन्सिलरची मदत घ्यायला सांगितली... हे कौन्सिलर म्हणजे सायकोथेरपीस्ट. या आधी ती खूप वेळा त्यांना भेटलेली होती. पण आताची गोष्ट वेगळीच होती. नेहमी हसतमुख असणारी ती आज वेगळीच वाटत होती. तिला जे काही होत होते ते मनमोकळेपणाने कौन्सिलरला सांगता येत नव्हते. बोलता बोलता ती खूप खूप रडायची. तिला हुंदके आवरणे कठीण व्हायचं. तिसऱ्या सीटिंगनंतर ती कुठेतरी थोडी बोलती झाली.

तिच्या नवऱ्याला विश्वासात घेऊन कौन्सिलरने तिच्या मानसिक अवस्थेविषयी त्याला सांगितले. त्याने तिला विश्वास दिला की तो तिच्यासोबत आहे. तो तिच्यासाठी हवे ते सगळे बदल करण्याचा प्रयत्न करत होता. पण तिच्या मनावर झालेल्या जखमा अजिबात नाहीशा होत नव्हत्या. Menopausal symptoms चा ही विचार झाला. तिच्या साठलेल्या या असंख्य अगणित जखमांवर आलेली खपली कोणत्याच ठिणगीने परत रक्तबंबाळ होऊ नये यासाठी तिला कोपिग मेकॅनिझम शिकायची गरज होती. अल्बर्ट एलिसची रॅशनल बिहेवियरल थेरपी शिकण्याचा ... आत्मसात करण्याचा तिने आटोकाट प्रयत्न केला. आपल्या मनाला आपणच छान माया आणि सावली देऊ शकतो हे तिला लक्षात आले.

अनेक प्रतिकूल घटनांचा मनावर ताण येणारच. पण आपल्या सदविचारांचा पाऊस पाडून असे होरपळणे आपण थांबवू शकतो. हे तिला कौन्सिलरकडून कळले. Forget and forgive सोबत acceptance वाढवून उर्वरित आयुष्य मित्र मैत्रिणींत मिसळून आनंदाने जगण्याचा सल्ला तिला कौन्सिलर कडून मिळाला. आठ-दहा दिवस मुलीकडे, एक-दोन महिने मुलांकडे जाऊन ती त्यांच्यासोबत राहू लागली. स्वतःकडे ती तटस्थ आणि त्रयस्थपणे पाहू लागली.

ती स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करत होती. पण त्याच काळात त्याला हार्ट अटॅक आला. त्यावेळी ते एकमेकासोबतच होते. स्वतः गाडी काढून तिने त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं. डॉक्टरांनीएन्जीओग्राफी केली... तर दहा ब्लॉक्स असल्याचे दिसले... लगेच एन्जीओप्लास्टी करण्याचा निर्णय घेतला गेला, आणि तो वाचला. मरणाच्या दारातून तिने त्याला परत आणले होते. वेळेवर हॉस्पिटलमध्ये नेऊन तिने त्याचे प्राण वाचविले म्हणून त्यानेतिच्यासमोर हात जोडले, त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले, आणि प्रेमाचा झरा नव्याने प्रवाहित झाला.

मनातल्या उन्हाने ग्रीष्मरुप धारण केले की, होरपळणे आणि करपणे ओघाने आलेच. या उन्हात तिने मनातील थकीत कचरा जळला आणि विचारांच्या थंडगार पावसाने मनाचे अंगण धूवून काढले. आणि स्वतःचे जगणे आनंदी केले!

*दया, क्षमा, शांती, करुणा तेथे माणसाची वस्ती...*

*त्याने तिला कृतज्ञतापूर्वक ग्रीटिंग दिले आणि लिहिले...*

*"आता उतरणे चालू झाले ...*

*किती पायऱ्या उतरायच्या हे ना तुला माहीत, ना मला...*

*का आपण मधेच घरंगळतो कोणास ठाऊक...?*

*चुका मान्य करू, माफ करू...*

*मी तुझा, तू माझी... हे नव्यानं अनुभवू*

*उरलं-सुरलं जगणं सुंदर करु...!*

*चल परत एकदा अनोळखी होऊ...!*

*पुन्हा नव्यानं एकमेकांना समजून घेऊ...!*

*म्हातारपण सुखात घालवू...!*

*... ती खूप दिवसांनी मन भरून हसली...*

**डॉ. सोनिया कस्तुरे विश्रामबाग, जि. सांगली मो 9326818354**



## 21. लेख - झापडांच्या पलीकडे… श्री सुनील देशपांडे



एकंदर लौकिक आयुष्य आणि आध्यात्मिक आयुष्य याचा आपण प्रचंड घोळ करीत असतो. तो घोळ एका गोष्टीमुळे होतो, ती गोष्ट म्हणजे ‘परमेश्वराची भक्ती.. परमेश्वराची कृपा आणि त्यामुळे अडचणीतून मुक्ती‘ या संकल्पनेवर दृढ विश्वास.. म्हणजेच अंधविश्वास असणे. वस्तुस्थितीवर विश्वास ठेवण्यापेक्षा संकल्पनेवर विश्वास ठेवणे हीच अंधश्रद्धा.

सावरकरांनी यावर प्रचंड टीका केली आहे आणि खूप आसूड ओढले आहेत. मी सावरकरवादी असल्यामुळे त्याच संकल्पनेतून विचार करीत असतो. परमेश्वर मुळातच अस्तित्वात नाही. तो संकल्पना स्वरूपात आहे. आपल्या बुद्धीची जेवढी पोहोच आहे त्या पलीकडे काय आहे हे माहीत नाही म्हणून तेथे परमेश्वर आहे असे गृहीत धरू. अशा पद्धतीची ही संकल्पना असल्याने त्याला अस्तित्व नाही. ते फक्त काल्पनिक स्वरूप आहे. प्रत्येकाने स्वतःच्या मानसिक समाधानासाठी आणि त्यामुळे स्वतःचे मानसिक उत्थान होईल असे वाटत असेल तर आणि एक विशिष्ट उपासना पद्धती वापरून जर मनाला आनंद मिळत असेल तर ती करावी सुद्धा. परंतु त्यातून लौकिक जगामध्ये काही फायदा मिळतो अशी अपेक्षा करणे हे सर्वथैव अतार्किक आहे. अर्थात सावरकरांच्या परमेश्वरी संकल्पनेवर त्यांनी मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव या निबंधात सविस्तर चर्चा केली आहे. सावरकरांच्या निबंधाच्या पुस्तकात ‘ सामर्थ्य आहे चळवळीचे ‘ हा निबंध यावर अधिक मल्लिनाथी करतो. ते म्हणतात ‘ सामर्थ्य आहे चळवळीचे जो जे करील तयाचे ‘ येथपर्यंतच मला मान्य आहे. परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे. या ओळीतील भगवंताचे अधिष्ठान हे कुठेही लौकिक आयुष्यात उपयोगी पडत नाही. धर्माचरणामुळे भगवंत प्रसन्न होतो आणि भक्ताचे रक्षण करतो असे मानणे हेच इतिहासाच्या कोणत्याही भागात दृष्टिक्षेप टाकल्यास सत्य वाटत नाही.

हजारो वर्षांपूर्वी अखंड भारत हा अफगाणिस्तानपासून इंडोनेशियापर्यंत पसरलेला होता असे म्हणतात. अर्थात त्याचे पुरावे ही सापडतात. एवढा जर समर्थ हिंदू धर्म होता तर तो इतक्या छोट्या प्रमाणात सीमित का झाला? त्या काळात तर भगवंताचे अधिष्ठान हे खूपच मोठ्या प्रमाणावर होते. धर्माचरण आणि तुम्ही म्हणता असे ईश्वरभक्तीचे जे काही स्वरूप असावे असे तुमचे म्हणणे आहे ते सर्व सध्याच्या काळापेक्षा खूप मोठ्या प्रमाणावर तेंव्हा घडत असे. तरीही हिंदू धर्मीयांच्यावर झालेली आक्रमणे आणि त्यांचे झालेले पराभव त्या कोणत्याही क्षणी या हिंदूंचा कोणताही परमेश्वर सहाय्यासाठी धावून आलेला नाही. तसे असते तर आज अखंड भारत सध्याच्या भारताइतक्या छोट्या आकारात शिल्लक उरला नसता. सिकंदराचा पराभव करणारा चंद्रगुप्त हा चळवळीच्या सामर्थ्याचे प्रतीकच आहे. चंद्रगुप्ताचा गुरु चाणक्य याने त्याच्या कोणत्याही ग्रंथामध्ये धर्माचरणाचे अवडंबर अथवा रूढी यावर भर दिलेला नाही. नैतिकता आणि माणसांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी आवश्यक ती राजकीय परिपक्वता. त्याचप्रमाणे शक्यतो प्रत्यक्ष युद्ध न खेळता गुप्तहेरांच्या सहाय्याने आणि शत्रूच्या गोटात विशिष्ट संकल्पना (आजच्या भाषेत त्याला नॅरेटिव्ह असे म्हणू) पसरून युद्ध जिंकणे यावर भर दिला आहे. नंदराजाच्या विरोधात झालेल्या मोहिमेत त्याने या संकल्पनेचा प्रत्यक्ष

उपयोग आणि वापर केलेला आहे. त्यामुळे त्याला फारसे युद्ध खेळायची गरज भासली नाही हे लक्षणीय आहे. ईश्वरी उपासना आणि त्याचे अवडंबर याला फारसे महत्त्व दिलेले नाही.

तरीसुद्धा त्यानंतर अनेक वर्षांनी पुन्हा धर्माचे अवडंबर निर्माण झालेच. काही राज्यकर्ते स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी काही धर्ममार्तंडांना हाताशी धरून स्वतःच्या आणि धर्माचरणाशीसंबंधित व्यक्तींच्या स्वार्थापोटी किंवा पोटार्थी स्वार्थासाठी काही रूढी निर्माण करतात. त्या समाजामध्ये पसरवतात. संबंधितांचा स्वार्थ वा पोटार्थ साधतात. म्हणून मग धर्माचे अथवा उपासना पद्धतीचे अवडंबर निर्माण होते.

गजनीच्या मोहम्मदाने सोमनाथ मंदिर लुटले त्या वेळेला सर्व ब्राह्मण मंडळी मोठमोठ्याने शत्रुनाशक मंत्राचा जप, मृत्युंजय मंत्राचा जप अशा अनेक मंत्र जपांनी आणि अधिष्ठानांनी या आक्रमकाचा नाश ईश्वर करेल या भावनेने पछाडलेले होते. परंतु अत्यंत कठोरपणाने धर्माचरण करणाऱ्या या मंडळींच्या सहाय्याला तो परमेश्वर काही आला नाही. एकदाच नाही तर अनेकदा त्याने या मंदिराची लूट केली. कारण त्या मंदिराकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात धनसंपत्ती होते की एका स्वारीमध्ये सर्व लूट घेऊन जाता येणे शक्य नव्हते. तरीसुद्धा कोणीही सामर्थ्यवान तेथे उभा न राहिल्याने नुसत्या भगवंताच्या अधिष्ठानाने सोमनाथ मंदिराचे नष्टचर्य संपले नाही. उलट संपूर्ण विनाश झाला.

अल्लाउद्दीन खिलजी जेव्हा दक्षिणेत आला तेव्हा त्याने देवगिरीचा पाडाव केलाच. परंतु दक्षिणेतील मंदिरांपर्यंत विध्वंस करत अनेक महिलांवर अत्याचार केले, लूट केली, अनेकांना धर्मांतरितकेले. अनेक मंदिरांची दुर्दशा करून त्या मंदिरांमधील मूर्ती पायरीमध्ये घालून त्यावर पायरी बांधून त्या मंदिरांवर मशिदी बांधल्या. पण त्या वेळेला हिंदू काय करत होते?

हिंदूचा देव त्या वेळेला ज्ञानेश्वरांची भिंत चालवत होता. सेना न्हाव्याच्या रूपात बादशहाची दाढी करत होता. परंतु हा परमेश्वर त्या अल्लाउद्दीन खिलजीला नाही नष्ट करू शकला.

हे परमेश्वरी अवतारांचे विडंबनच नाही काय? परमेश्वराचे स्तोम कमी करून चळवळीचे सामर्थ्य उभे करणारे छत्रपती शिवाजी राजे आणि थोरले बाजीराव पेशवे यांना मात्र खरे यश मिळाले. या दोन व्यक्तींनी कधीही मुहूर्त पाहून कुठलीही गोष्ट केली नाही. धर्माचे अधिष्ठान हे लोकांच्या श्रद्धेसाठी मंदिरातच मर्यादित प्रमाणात ठेवले आणि लोकांच्या मनातच ठेवले. स्वतःच्या कृतीत त्यांनी फक्त चळवळीचे सामर्थ्य उभे केले. त्याचा परिणाम म्हणजे या दोन व्यक्तींमुळेच हिंदुत्वाची लाज थोडीफार शिल्लक राहिली.

चंद्रगुप्त किंवा छत्रपती शिवाजी राजे किंवा थोरले बाजीराव पेशवे देवधर्म अथवा कर्म करण्याच्या कोणत्याही गोष्टीत अडकून राहिले नाहीत. स्वतःच्या बुद्धी आणि शक्ती सामर्थ्यावर मोठे झाले. परमेश्वराला तुमच्या मनात आणि देवघरात ठेवा.. व्यवहारात आणू नका.. तरचतुम्हाला तरणोपाय आहे.

एवढे असून सुद्धा एवढ्या मोठ्या अत्याचारांमध्ये कुठेही परमेश्वरी चमत्काराचा लवलेशही न आढळता जगामध्ये हिंदू नाडले गेले, पिडले गेले, मारले गेले आणि धर्मांतरित केले गेले. ते सुद्धा एकदा दोनदा नाही तर सतत हजार ते पंधराशे वर्षे.

एवढं असूनसुद्धाधार्मिक मंडळी देवाने केलेल्या किंवा देवाकडून अपेक्षित असलेल्या संभाव्य चमत्कार व धर्मरक्षण क्रियेवर विश्वास ठेवून भक्ती मार्ग हाच धर्म रक्षणाचा मार्ग आहे अशा पद्धतीने श्रद्धा ठेवून असतात. छोट्या छोट्या योगायोगाने घडलेल्या गोष्टींवर ईश्वरी चमत्कार म्हणून विश्वास टाकून अंधश्रद्धांच्या आहारी जातात. मी माझी सारी भिस्त परमेश्वरावर अथवा कोणत्यातरी महाराजावर टाकून देणार म्हणजे ते महाराज अथवा ईश्वर माझे भले करतील किंवा रक्षण करतील. अशा अंधविश्वासात, स्पष्टच सांगायचे झाले तर त्या अंधविश्वासाच्या नशेमध्ये गुंग होऊन जातात.

या उलट ब्रिटिश, ख्रिश्चन धर्म सुद्धा प्रचार करत होते परंतु त्यांनी येशू ख्रिस्ताची अहिंसा फक्त चर्चमध्ये टांगून ठेवली. हिंसा आणि अत्याचार यामधूनच स्वतःचे सामर्थ्य उभे केले. शांततेसाठी निर्माण झालेल्या इस्लाम धर्माच्या अनुयायांनी सुद्धा फक्त आक्रमकपणातून आणि अन्याय आणि अत्याचार या मार्गाने जगभर धर्मप्रसार केला. बुद्ध धर्माला सुद्धा ज्या राजांनी राजाश्रय दिला त्या राजांच्या सामर्थ्यामुळे तो धर्म अनेक ठिकाणी टिकला. तरीही कम्युनिझम आल्यानंतर बौद्ध धर्माचा अनेक ठिकाणी अस्त झालाच. इस्लाम धर्माचे अनुयायी आणि ख्रिश्चन धर्माचे अनुयायी यांनी जगभर धर्मप्रसार केला आणि अखंड भारत हा खंडप्राय भारत बनून आजच्या छोट्या आकारात राहिला. अर्थात तोही ब्रिटिशांच्यामुळेच. अन्यथा छोटी छोटी राज्ये मुस्लिमांनी जिंकून घेऊन धर्मांतरित करून संपूर्ण भारत इस्लाममय केला सुद्धा असता.

आपले सामर्थ्य, आपली शक्ती, आपली बुद्धी, याच गोष्टी आपल्याला या जगात सामर्थ्यवान बनवतील. ' दोन शब्दात दोन संस्कृती ' या सावरकरांच्या निबंधात हेच त्यांनी प्रतिपादित केले. धर्माच्या रूढींना चिकटून बसण्यापेक्षा जर परिवर्तनीयता ठेवली आणि धर्माचे सुद्धा नियम कायदे आधुनिक काळाप्रमाणे बदलते ठेवले तरच आपण टिकू शकणार आहोत. सावरकरांनी हिंदू हा शब्द धर्मासाठी न वापरता संस्कृतीसाठी वापरला आहे. हिंदुत्व हे राष्ट्र धर्मासाठी प्रेरक म्हणून आधारभूत घेतले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जी व्यक्ती कोणत्याही उपासना-पद्धतीचा अवलंब करीत असेल तरीही, जर त्या व्यक्तीच्या निष्ठा या फक्त हिंदुस्तानच्या भूमीशीबांधील असतील तर ती व्यक्ती हिंदूच आहे. मग ती व्यक्ती वैयक्तिक आयुष्यात उपासना इस्लाम व ख्रिश्चन धर्माची का करीत असेना, ती व्यक्ती मी हिंदूच मानेन. उपासना पद्धतीपेक्षा राष्ट्रधर्म व राष्ट्रनिष्ठा या श्रेष्ठ आहेत हेच त्यांचे प्रतिपादन होते. माझ्या निष्ठा जर या राष्ट्राच्या बाहेर मी समर्पित करीत असेन तर माझी उपासना पद्धती कुठलीही असली तरी मी हिंदू नाही. इतक्या समर्पकपणे त्यांनी हिंदुत्वाची व्याख्या धर्मापासून वेगळी केलेली आहे. उपासना पद्धतीपासून वेगळी केलेली आहे. म्हणूनच हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व म्हणण्यापेक्षा, राष्ट्रीयत्व हेच हिंदुत्व ही त्यांची व्याख्या होती. जातीपाती आणि उपासना पद्धती यांच्या पलीकडचा विचार त्यांनी मांडला. म्हणूनच त्यांचे इतर हिंदुत्ववाद्यांशी पटू शकले नाही.

' धर्म हा देव्हाऱ्यात ठेवा आणि व्यवहारात शक्ती, बुद्धीचा वापर करा 'हाच संदेश इतिहास आपल्याला देतो आहे. ख्रिश्चनांनी धर्म हा फक्त चर्चमध्येच मर्यादित ठेवला. स्वतःच्या शक्ती बुद्धीच्या जोरावर अधिक आधुनिक बनत सामाजिक आणि औद्योगिक तसेच आर्थिक विकास करून घेतला. धर्मपीठाला विरोध करून धर्मपीठाचे म्हणणे चुकीचे आहे हे अनेक शास्त्रज्ञांनी सिद्ध केल्यानंतर धर्मपीठाच्या मतांना गुंडाळून ठेवून, भौतिक प्रगती ख्रिश्चन धर्मियांनी करून घेतली. म्हणूनच विज्ञानाचा विकास झाला.

तरीसुद्धा परमेश्वर भक्ती, भजन पूजन आणि तत्सम गोष्टीमध्ये आपण अडकून पडलो तर शिल्लक असलेला हिंदुस्तान नष्टचर्याच्याच मार्गाने जाईल. इतिहासापासून एवढा बोध आपण न घेतल्यास आपल्यासारखे करंटे आपणच.

पूर्वीच्या अखंड बंगाल मधल्या दुष्काळाच्या वेळेला विवेकानंदांनी शंकराचार्यांना जो संदेश पाठवला होता त्यात ते म्हणतात, " मोडून टाका तुमचे मुकुट आणि सिंहासने, फेकून द्या तुमचे दंड. आज बंगालमधल्या दुष्काळात उपाशी तडफडणाऱ्या व्यक्तींना जर तुम्ही अन्न देऊ शकत नसाल तर हिंदू धर्मांतरित झाल्याशिवाय राहणार नाहीत. "विवेकानंदांच्या या इशाऱ्याचं फलस्वरूप आज बंगाल आणि बांगलादेश या स्वरूपात दिसत आहे. शंकराचार्यांची सिंहासने मात्र टिकून आहेत. त्यांची श्रीमंती कुठेच कमी झाली नाही. परंतु नागालँड, मणिपूर बांगलादेश आणि बंगाल येथील प्रश्न निर्माण होण्याचे मूळ कारण ते आहे, हे अजूनही कोणी मान्य करत नाही.. का?

श्रेष्ठ अशा भक्तिमार्गाचे पालन करणाऱ्यांची संख्या किती कमी झाली? किती हिंदूंचे शिरकाण झाले? किती लोक मेले? हिंदुत्व भक्तीमार्गातच अडकून पडले तर तो श्रेष्ठधर्म, नष्टधर्म होऊन जाईल. शक्ती आणि बुद्धी या गोष्टी भक्तीमार्गापेक्षामोठ्या आहेत या सत्याचा स्वीकार केला नाही तर हिंदू धर्म शेवटचे आचके घेत राहील हेच सत्य आहे.

आज आधुनिक जगामध्ये शक्तीपेक्षा सुद्धा बुद्धीचा वापर जास्त करून शक्तिमान लोकांना सुद्धा नामोहरम करता येते हे इस्रायल या छोट्याशा राष्ट्राने सिद्ध केले आहे. म्हणजे शक्तीपेक्षाही बुद्धी श्रेष्ठ हे तर आज आपण प्रत्यक्षात पाहतो आहे. अर्थात भक्तीमार्गाची व त्यायोगे निर्माण झालेल्या अंधश्रद्धेची झापडे डोळ्यावर ओढून अंध बनायचे असेल तर अशा लोकांना कोण वाचवणार?

**श्री सुनील देशपांडे मो - 9657709640 email : sunil68deshpande@outlook.com**



## 22. कविता - आधुनिक नारीरंग... - सुश्री ज्योती कुळकर्णी



*(पुरुषांच्या मनात शिरून लिहिलेली एक कविता)*

आधुनिक युगातली अत्याधुनिक नारी तू

स्वतःचे अस्तित्व तर जपायलाच हवे

दुसऱ्यांचे अस्तित्व नाकारायलाच हवे का?

उच्चविद्याविभूषित आहेस तू

जीवन आणि शिक्षण याची

सांगड घालून जगावे लागते

तुला हे माहिती आहे की नाही

मला नाही माहिती

आधुनिक युगातली अत्याधुनिक नारी तू...

तुला राधा व्हायचे नाहीये नं!

सवतीला सलणारी

राधा तू होऊच नकोस

कायदा तर आता

एकपत्नीत्वाचाच आहे

तुला नि मला पाळायलाच हवाय

स्त्री-पुरुष नात्यातला

हळुवार असलेला

गोडवा तरी जपशील का?

आधुनिक युगातली अत्याधुनिक नारी तू...

या काळात सीताही व्हायचे नाहीये

अग्निपरीक्षा देणारी सीता तू होऊच नकोस
तुला नि मला विश्वासावरच जगायचंय
अन्याय तर अजिबात सहन करू नकोस
अन्यायाविरूद्ध लढायला कायदा तुझ्या बाजूने आहे
एकटीच लढायला तूही समर्थ आहेस
पण अन्याय होतोय हे कसं ठरवशील गं?
दुसऱ्यावर अन्याय करायचा हक्क तुला आहे का गं?
विचार कर गं!
आधुनिक युगातली अत्याधुनिक नारी तू...

सीतेच्या काळात, बापाच्या माघारी,
आपलं म्हणून लव-कुश वाढवणारे
ऋषी मुनि तरी होते
आपल्या गोंडस पिल्लाचे भावविश्व उधळण्याचा
कुणा एकाविना सोडून जाण्याचा
तुला नि मला अधिकारच काय गं?
आधुनिक युगातली अत्याधुनिक नारी तू....

आधुनिक युगातली असलीस तरी
स्त्री म्हणून तू महानच आहेस गं!
पातिव्रत्याच्या व्याख्या तर बदललेल्याच आहेत
राजा राममोहन-रानडे-फुले-कर्वे-टागोर
या पुरूषांनीच त्या बदलायला शिकवलंय
खरंच! तुला उर्मिला व्हायची गरजच नाहीये

गांधारी व्हायचीही गरज नाहीये

अंध पतीचे डोळे होण्याचा विचार

उच्च विचारांचेच प्रतीक बरं का!

जुन्या मूल्यांची मोडतोड करतांना

एक मात्र लक्षात ठेव!

सुवर्णमृग मागण्याचा स्त्रीसुलभ लाडिक हट्ट

नाही करता येणार तुला

आधुनिक युगातली अत्याधुनिक नारी तू....

आणखी एक लक्षात ठेव

संसारासाठी सायकल असते दोन चाकी

एकाने निखळून पडायचे ठरवले तर

दुसरेही मोडून पडणारच

सोबत चालायचे असेल तर चेनचा दुआ हवाच

अन्यथा...

सर्कशीतल्या एकचाकी सायकलचा

पर्याय तुझ्यासमोर होताच!

मनाप्रमाणे भरारी घेण्याचे स्वातंत्र्य तुला होतेच

मीरेप्रमाणे आपलेच भावविश्व उभारण्याचे

स्वातंत्र्य तुला होतेच

कारण...

आधुनिक युगातली अत्याधुनिक नारी तू...

**सौ. ज्योती कुळकर्णी, अकोला मोबा. नं. ९८२२१०९६२४**

## 23. कथा - आभाळमाया... - श्री उद्धव भयवाळ



आज सकाळपासून वसंतराव अस्वस्थ होते. घरामध्ये इकडून तिकडे सारख्या फेऱ्या मारीत होते. बाहेर आभाळ भरून आले होते. आकाशात ढगांनी दाटी केली होती; आणि इकडे वसंतरावांच्या मनात विचारांनी गर्दी केली होती. त्यांची ही अस्वस्थता शालिनीबाईंच्या नजरेतून काही सुटली नाही. कारण, काही तरी मोठे कारण घडल्याशिवाय ते असे अस्वस्थ होणार नाहीत याची शालिनीबाईंना पक्की खात्री होती. मागील जवळजवळ पस्तीस वर्षांच्या संसारामध्ये वसंतरावांचा धीरोदात्त स्वभाव, कुठल्याही प्रसंगी पटकन निर्णय घेण्याची त्यांची क्षमता आणि कुठल्याही परिस्थितीला खंबीरपणे तोंड देण्याची त्यांची वृत्ती शालिनीबाईंना ठावूक होती. त्याचप्रमाणे त्यांना वसंतरावांची आणखी एक गोष्ट माहित होती. ती म्हणजेमनामध्ये कितीही खळबळ असली तरी ती खळबळ त्यांच्या चेहऱ्यावर कधीही दिसत नसे. मग आजच असे काय घडले होते? शालिनीबाईंनी खोदून, खोदून विचारण्याचा बराच प्रयत्न केला पण त्यांचा तो प्रयत्न व्यर्थ गेला. विचार करता करता शालिनी यांच्या लक्षात एक गोष्ट आली. सकाळी नाश्ता झाल्यानंतर वसंतरावांनी चहा करायला सांगितला आणि त्या दरम्यान त्यांना त्यांच्या मोबाईलवर एक फोन आला. फोन आल्याबरोबर ते किचनमधून समोरच्या हॉलमध्ये आले आणि त्यांनी मोबाईलवर बोलायला सुरुवात केली. बोलत बोलत ते समोरच्या अंगणात आले आणि अंगणातील झोपाळ्यावर बसून फोनवर बोलू लागले. ते काय बोलत होते किंवा कुणाशी बोलत होते हे काही शालिनीबाईंना समजले नाही. दोन कपांमध्ये चहा ओतला आणि दोन्ही कप घेऊन त्या समोर अंगणात आल्या. त्यातील एक कप समोर अंगणात झोपाळ्यावर बसलेल्या वसंतरावांच्या हातात दिला आणि दुसरा कप स्वत:साठी ठेवत त्यासुद्धा झोपाळ्यावर बसल्या. तोपर्यंत वसंतरावांचे फोनवरचे बोलणे संपले होते. पण चेहरा एकदम त्रस्त दिसत होता. हातात आलेला चहाचा कप पटकन तोंडाला लावून अक्षरशः त्यांनी एका घोटात चहा संपवला. शालिनीबाईंना त्यांची अस्वस्थता जाणवली. त्यांनी चहा पीत पीत वसंतरावांना विचारले, "कुणाचा होता फोन? "

"असाच होता. " वसंतराव म्हणाले.

"कशासाठी होता? " शालिनीबाईंनी विचारले.

"काही महत्त्वाचा नव्हता. तू नकोस टेन्शन घेऊ. "

वसंतरावांचे हे बोल ऐकून शालिनीबाई क्षणभर विचारात पडल्या आणि चहाचे कप घेऊन घरामध्ये निघून गेल्या. शालिनीबाई हॉलमध्ये येऊन त्यांची ही अस्वस्थता बघून काही न बोलताच पुन्हा आपल्या कामाला लागल्या. दरम्यान वसंतराव "जरा बाहेर जाऊन येतो" असे किचनकडे पाहून म्हणत कपडे बदलून आणि पायात चप्पल सरकवून बाहेर पडले.

कामातून थोडी उसंत मिळताच शालिनीबाई समोर हॉलमध्ये येऊन सोफ्यावर टेकल्या आणि पेपर चाळू लागल्या. पण का कोण जाणे वर्तमानपत्रात आज त्यांचे मन लागेना. अप्पासाहेबांची मघाची अस्वस्थता सारखी त्यांच्या नजरेसमोर येत होती. म्हणून त्यांनी हातातील वर्तमानपत्र बाजूला टीपॉयवरठेवून दिले आणि डोळे मिटून त्या तश्याच बसून राहिल्या. मिटलेल्या डोळ्यांपुढे भूतकाळातील अनेक घटना समोर येऊ लागल्या…

… नागपूरच्या रावसाहेब बासरकरांची एकुलती एक लाडकी कन्या शालिनी औरंगाबादच्या एका सरकारी खात्यात उच्च पदावर काम करणाऱ्या आणि आई वडिलांना एकुलता एक असलेल्या वसंत नरहरराव देशमुख या तरुणाशी विवाहबद्ध होऊन साधारणत: पस्तीस वर्षांपूर्वी औरंगाबादला आली.

वसंतचे वडील औरंगाबादच्याच एका सरकारी शाळेमध्ये मुख्याध्यापक होते, तर आई सरलाताई ही गृहिणी होती. वसंतच्या लग्नानंतर शालिनी त्या घराशी पटकन एकरूप झाली. कडक स्वभावाचे सासरे आणि शिस्तप्रिय सासूबाई यांच्या सहवासात शालिनी अगदी तावून सुलाखून निघत होती. पुढे शालिनीला दिवस गेले आणि घरामध्ये एक आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शालिनीच्या सासूबाईंनी शालिनीला काय हवे, नको ते अगदी मनापासून बघितले. वास्तविक पहिले बाळंतपण माहेरी करण्याचा रिवाज असतो. पण शालिनीच्या सासूबाईंनी आपल्या पतीचा विचार घेऊन शालिनीच्या आई वडिलांना फोन करून कळवून टाकले की, शालिनीचे बाळंतपण इथेच होणार. शालिनीचे वडील जेव्हा 'रितीरिवाजानुसार बाळंतपण नागपूरला करू' असे म्हणू लागले तेव्हा शालिनीच्या सासूबाई म्हणाल्या,

"अहो, मला लेक असती तर नसते का मी तिचे बाळंतपण इथे केले? माझी हौस आहे. मी शालिनीचे बाळंतपण इथेच करणार. मला मुलगी नाही. शालिनीला जर मुलगी झाली तर आम्हाला खूप आनंद होईल. पण परमेश्वर जो कौल देईल, तो आम्ही आनंदाने मान्य करू. "त्यांच्या आग्रहाला अर्थातच शालिनीच्या आईवडिलांनी मान दिला आणि शालिनीचे बाळंतपण औरंगाबादलाच करण्याचे ठरले. दरम्यान, शालिनीचे आईवडील औरंगाबादला येऊन दोन दिवस राहून गेले. त्यामुळे शालिनीलाही खूप छान वाटले.

शालिनीचे बाळंतपण ठरल्याप्रमाणे औरंगाबादलाच झाले. शालिनीने एका गोंडस मुलाला जन्म दिला. सारे घर आनंदाने न्हाऊन निघाले. शालिनीच्या सासूबाई म्हणाल्या, "आपण याचे नाव बाळकृष्ण ठेवू. " बाळकृष्ण हे नाव सर्वांनाच आवडले आणि बाळाचे बारसे थाटात झाले. बाळकृष्णच्या बाललीलांनी सर्वांना मोहवून टाकले. बाळकृष्ण जसजसा मोठा होऊ लागला, तसतसे, त्याच्या ममी पपांना आणि आजी आजोबांना त्याचे खूपच कौतुक वाटू लागले. त्याचे दुडूदुडू चालणे, त्याचे बोबडे बोलणे, याचे सर्वांनाच अप्रूप वाटू लागले. ममी, पपा आणि आजी, आजोबांच्या सहवासात बाळकृष्ण मोठा होत होता.

बाळकृष्णचे शालेय जीवन, त्याचे महाविद्यालयीन जीवन, त्याचे इंजिनिअरिंगच्या परीक्षेतील घवघवीत यश, ह्या साऱ्या घटना एखाद्या चित्रपटाप्रमाणे जसजश्या शालिनीबाईंच्या मन:चक्षूसमोरून भरभर पुढे सरकू

लागल्या, तसे शालिनीबाई यांच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. पण नंतर लगेच मामंजी नरहरराव यांची सेवानिवृत्ती; आणि सेवानिवृत्तीनंतर काही दिवसातच त्यांना आलेले आजारपण आणि त्या आजारपणातच मामंजींचे झालेले दु:खद निधन या घटना डोळ्यासमोर तरळल्या. मामंजींच्या जाण्यानंतरचा सासूबाईंचा उदास चेहरा नजरेसमोर येताच शालिनीबाईंच्या डोळ्यातून घळघळा अश्रू येऊ लागले. मामंजीच्या जाण्याने खचलेल्या सासूबाईंना या धक्क्यातून सावरायला बराच वेळ लागला. दरम्यान बाळकृष्णही एका नामांकित कंपनीमध्ये नोकरीस लागला. बाळकृष्णला लागलेली नोकरी आणि त्यानंतर त्याचे लग्न करून टाकण्यासाठी सासूबाईंनी धरलेला हट्ट, हे सारे शालिनीबाईंना आठवले. तसेच आजीचा लग्नासाठीचा आग्रह बाळकृष्णलाही मान्य करावाच लागला आणि लवकरच बाळकृष्णचे नाशिकच्या स्नेहाशी लग्न झाले. स्नेहाचे वडील रामराव भालेकर हे एक मोठे बिझनेसमन होते.

घरामध्ये नवी सून आली आणि घरात एकप्रकारचे चैतन्य आले. पण सूनबाई थोडी आढ्यताखोर आहे, हे शालिनीबाईंच्या लवकरच लक्षात आले. तरीही शालिनीबाई तिच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करू लागल्या. कारण त्या खूपच सहनशील होत्या. पण कसचे काय! थोड्याथोड्या कारणावरून त्या दोघींमध्ये खटके उडू लागले. एकदा काही कारणास्तव चकल्या करायच्या होत्या. तर स्नेहा गॅसवर कढई ठेवून चकल्या तळू लागली. तेव्हा शालिनीबाई तिला म्हणाल्या,

"अगं, गॅस खूपच मोठा झाला. थोडा कमी कर ना. मंद आचेवर चकल्या छान तळल्या जातात." तेव्हा स्नेहाने ताडकन उत्तर दिले,

"माझ्या कामात कुणी ढवळाढवळ केलेली मला चालत नाही. नाही तर मग तुम्हीच तळा या चकल्या."

... अशावेळी बाळकृष्णही बायकोचीच बाजू घेत असे. सरलाताईंनीही स्नेहाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण पालथ्या घड्यावर पाणी. तशातच सरलाताई आजारी पडल्या. त्या कायम अंथरुणाला खिळूनच राहू लागल्या. शालिनीने सासूबाईंची मनोभावे सेवा केली. पण पिकलं पान कधी न कधी गळणारच. एके दिवशी सकाळी सरलाताई इहलोक सोडून गेल्या.

हळूहळू हे दु:खही सर्वजण विसरले. काळ पुढेपुढे सरकत होता. एक दिवस वसंतरावांनीही प्रकृतीच्या कारणास्तव नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेतली. तशातच घरामध्ये बाळाच्या आगमनाची चाहूल लागली आणि सर्वांचाच आनंद द्विगुणीत झाला. स्नेहाचे बाळंतपण रिवाजाप्रमाणे नाशिकला माहेरी झाले. स्नेहाला मुलगा झाला. शालिनीबाई आता आजी झाल्या. घरामध्ये आनंदीआनंद झाला. वसंतराव आणि शालिनीबाई यांनी एकमेकांचे अभिनंदन केले. तसेच त्या दोघांनी बाळकृष्णचेही अभिनंदन केले. स्नेहा माहेराहून बाळाला घेऊन आली. शालिनीबाई तर नातू घरी आल्यापासून खूपच खूश होत्या. बाळ बहुतेकवेळा त्यांच्याकडेच असायचे. खूपच गोड होते बाळ. बाळाचे बारसे थाटात करण्याचे ठरले तेव्हा तर शालिनीबाईंना काय करू आणि किती करू असे होऊन गेले. बारशाच्या दिवशी स्नेहाचे आई वडील आले. बाळाचे नाव नीरज ठेवण्यात आले. बारसे

धामधुमीत पार पडले. स्नेहाचे आईवडील तसेच इतर सर्व पाहुणेमंडळी दुसऱ्या दिवशी आपापल्या गावी निघून गेली आणि पुन्हा स्नेहाच्या चेहऱ्यावरचे भाव शालिनीबाईंच्या लक्षात आले. त्यांनी स्नेहाला बोलते करण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. स्नेहाला रुसायला थोडेसेही कारण पुरत असे. स्नेहाला उशिरापर्यंत झोपून राहण्याची सवय होती. त्यामुळे सकाळी बाळ आणि ती सोबतच उठायची. म्हणून एकदा शालिनीबाई तिला शांतपणे म्हणाल्या,

"लेकरू सकाळी उठायच्या आत आपण उठून पटपट काम आवरून घ्यावं. लेकरू उठल्यावर ते काम करू देत नाही." तर स्नेहा ताडकन म्हणाली, मला माझ्या झोपेबद्दल कुणी बोललेलं अजिबात चालत नाही, हे मी याआधीही तुम्हाला सांगितलेलं आहे. "

रात्री शालिनीबाईंनी वसंतरावांकडे स्नेहाच्या वागण्याबद्दल नाराजी व्यक्त केली. तेव्हा वसंतरावम्हणाले, "असतो एकेकाचा स्वभाव. एवढं मनाला नकोस लावून घेऊ. " तो विषय मग तिथेच संपला. पण दिवसेदिवस बाळकृष्णच्या वागण्यातही शालिनीबाई तसेच वसंतराव यांना बदल जाणवू लागला. स्नेहा तर शालिनीबाईंचा अपमान करण्याची एकही संधी सोडीत नसे. एके दिवशी सकाळी शालिनीबाई आणि स्नेहामध्ये कशावरून तरी बाचाबाची झाली. बाळकृष्ण संध्याकाळी घरी आल्याबरोबर स्नेहाने सकाळचे सारे तिखटमीठ लावून बाळकृष्णला सांगितले. रात्रीची जेवणे होईपर्यंत बाळकृष्ण आणि स्नेहा, दोघेही गप्प गप्पच होते. जेवण आटोपल्यावर सर्वजण समोरच्या हॉलमध्ये टी. व्ही. पाहत बसलेले असतांना अचानक बाळकृष्णने रिमोट हातात घेऊन टी. व्ही. बंद केला आणि बोलण्यास सुरुवात केली.

... बाळकृष्ण म्हणाला, "आई, बाबा, मी औरंगाबादची ही नोकरी सोडून पुण्याला शिफ्ट होतोय. पुण्याच्या एका कंपनीमध्ये मी ऑनलाईन इंटरव्ह्यू दिला आणि उत्तीर्णही झालो. पॅकेजही चांगले आहे. अर्थातच मला स्नेहाला आणि नीरजला तेथे नेणे भाग आहे. कारण स्नेहाही इथे बोअर झाली आहे. तिचे आणि आईचे जराही पटत नाही. "

बाबांनी त्याला त्याच्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण तो हट्टसोडेना.

"तुम्ही काही म्हणा बाबा. पण पुढच्याच महिन्यात आम्ही शिफ्ट होतोय. यावर पुन्हा चर्चा नको." बाळकृष्ण म्हणाला.

"अरे, आमचा तर विचार कर. तुझ्या बाबांनी तब्येतीमुळे नोकरी सोडली अन् तुम्ही असे अचानक निघून गेलात तर आम्हाला काय वाटेल याचा विचार तरी कर. घरामध्ये भांड्याला भांडे लागतच असते. "शालिनीबाई म्हणाल्या. तितक्यात स्नेहा बाळकृष्णला म्हणाली," पुरे करा आता अन् चला झोपायला. इथे राहण्याची हौस फिटली माझी. " स्नेहा असे म्हणताच बाळकृष्ण तिच्यासोबत बेडरूमकडे निघून गेला. नंतर बराच वेळ शालिनीबाई आणि वसंतराव बोलत बसले.

दुसऱ्या दिवशी सकाळी वसंतरावांनी बाळकृष्णला त्याच्या निर्णयावर फेरविचार करण्याचा सल्ला दिला पण व्यर्थ. नीरज आपल्यापासून दूर जाणार म्हटल्यावर तर शालिनीबाईंना अन्न गोड लागेना.

आणि अखेर तो दिवस उगवला. सर्व सामानाची बांधाबांध झाली; तेव्हा स्नेहा शालिनीबाईंकडे पाहून म्हणाली, "मला लग्नामध्ये माहेरहून ज्या वस्तू आल्या तेवढ्याच घेऊन चाललोत आम्ही." शालिनीबाईंना तर काहीच सुचेना. छोट्या नीरजच्या तोंडावरून हात फिरवितांना तर त्यांना रडूच कोसळले. वसंतरावांनी त्यांना कसेबसे सावरले. टेम्पोमध्ये सर्व सामान रवाना झाले. टेम्पोच्या पाठोपाठ कारने बाळकृष्ण, स्नेहा आणि छोटा नीरज, हे सारे निघाले. त्यांना निरोप द्यायला शेजारच्या पार्वतीबाई आणि विश्वंभररावही आले होते. बाळकृष्णची कार नजरेआड होताच शालिनीबाई पार्वतीबाईंच्या गळ्यात पडून हमसून हमसून रडल्या. " तुम्हीच सांगा, आम्ही असा काय गुन्हा केला म्हणून मुलगा आणि सून आम्हाला सोडून निघून गेले? " पार्वतीबाईंनाही काय बोलावे ते कळेना. त्यांनी शालिनीबाईचे सांत्वन केले.

दिवसामागून दिवस जात होते. शालिनीबाई कधीकधी स्नेहाला फोन लावून ख्यालीखुशाली विचारायच्या तर स्नेहा त्रोटक उत्तर देऊन फोन ठेवून द्यायची. शालिनीबाईनानीरजची खूप आठवण यायची. जवळजवळ दोन वर्षांपासून बाळकृष्ण इकडे आला नाही अन् हे दोघे तिकडे गेले नाहीत.

... अशा विचारचक्रामध्ये शालिनीबाई असतांनाच वसंतराव घरामध्ये आले. वसंतरावांनीहाक मारली तश्या त्या भानावर आल्या. त्यांनी वसंतरावांकडे बघितले. वसंतरावांच्या चेहऱ्यावरील ताण आता नाहीसा झाला होता.

"आता तरी सांगा ना, मघाशी एवढे टेन्शनमध्ये का होतात ते? " शालिनीबाईंनी विचारले.

"हो, हो, सांगतो.“ वसंतराव म्हणाले.

"स्वारी खुशीत दिसतेय" शालिनीबाई मनाशीच म्हणाल्या. वसंतराव हॉलमधल्या एका खुर्चीवर बसले तेव्हा शालिनीबाईनी दुसऱ्या खुर्चीवर त्यांच्या शेजारी जाऊन बसल्या.

वसंतराव सांगू लागले, "हे बघ, मघाशी मी तुला जरा त्रस्त दिसलो. त्याचे कारण म्हणजे तो फोन बाळकृष्णचा होता. कधी नव्हे ते बाळकृष्णने स्वत: होऊन फोन केला. तो बराच वेळ माझ्याशी बोलत होता. इथल्या पूर्वीच्या कंपनीशी त्याचे बोलणे झाले आहे म्हणाला. तो परत इथेच नोकरी करू इच्छितो. ते दोघेही मागील दोन वर्षांपासून आपल्याशी संबंध तोडून टाकल्यासारखे वागले. अन् आता हा बेटा म्हणत होता की, आपल्यापासून दूर गेल्यावर स्नेहाला तिची चूक कळलीय. ती परत औरंगाबादला यायचं म्हणतेय. आपण सारे आता एकत्र आनंदाने राहू असे म्हणत होता. मला मात्र त्याचे इथे परत येण्याचे त्याने दिलेले कारण पटेना. म्हणून मी पुन्हा, पुन्हा विचारले. तेव्हा खरे कारण पुढे आले. तो म्हणत होता की, इथून गेल्यानंतर थोड्याच दिवसांनंतर बाळ वारंवार आजारी पडू लागले. डॉक्टरांनी औषध दिले की बरे वाटायचे. लहान मुलांची

दुखणी अशीच असतात म्हणून त्या दोघांनीही बाळाच्या आजाराकडे दुर्लक्ष केले. मागच्या आठवड्यात दुसऱ्या एका डॉक्टरांना दाखविले तेव्हा डॉक्टरांनी विचारले, "घरी कोण कोण असते."

तेव्हा याने सर्व वृत्तांत सांगितला. तेव्हा डॉक्टर म्हणाले की, “बाळाची तब्येत छान आहे. मात्र त्याला आजी, आजोबाचा लळा लागलेला आहे. पण इतके छोटे बाळ भावना व्यक्त करू शकत नाही. एक तर त्याच्या आजीला अन् आजोबांना इथे घेऊन या किंवा तुम्ही त्याला तिकडे घेऊन जा. आजीला पाहताच बाळ अगदी ठणठणीत बरे होते की नाही बघा."

"पण मी त्याला माझे मत सांगितलेच नाही. जो मुलगा आणि जी सून क्षुल्लक कारणावरून घर सोडून जाते त्यांच्याविषयी मला अजिबात कळवळा वाटत नाही. "

"अहो, ते स्वत: होऊन येतायत ना... मग त्यांना येऊ द्या की. त्यांना त्यांची चूक कळली हे पुष्कळ झाले. आणि नीरज बाळाला केव्हा पाहीन असे झाले आहे मला. " शालिनीबाई म्हणाल्या.

"तेच तर. द्विधा मनस्थिती झाली होती माझीही. पण वारंवार नीरजचा चेहरा डोळ्यासमोर येऊ लागला. तुझीही इतक्या दिवसाची घालमेल मला दिसतच होती. म्हणून माझा बालमित्र भीमराव याच्याकडे जाऊन मन मोकळे केले. भीमरावचे सुद्धा हेच मत पडले की, त्यांना आपण इथे येऊ द्यावे. भीमराव म्हणाला, 'सुबह का भूला शामको घर आये तो भूला नही कहलाता'. मलाही त्याचे म्हणणे पटले आणि बाळकृष्णला परत इथे येऊ द्यावे असे माझे मन म्हणू लागले. म्हणून भीमरावकडे असतांनाच मी बाळकृष्णला फोन लावला आणि "तुम्हा सर्वांचे स्वागत आहे" असे सांगितले. एखाद्या आठवड्यात येतील ते इकडे. " वसंतराव म्हणाले.

"किती आनंदाची बातमी सांगितली हो तुम्ही! मी देवापुढे साखर ठेवते. माझा आनंद गगनात मावेना. " शालिनीबाई म्हणाल्या.

... "अगं हो, हो, किती घाई करशील! देवापुढे साखर नंतर ठेव. बाहेर बघ जरा. पावसाची किती छान रिमझिम सुरु झालीय. चल थोडे अंगणातल्या पावसात भिजू या! " असे म्हणून वसंतरावांनी शालिनीबाईना ओढतच अंगणात नेले. दोघेही पावसात मनमुराद भिजत होते. अंगणात पावसाच्या थेंबांचे नर्तन सुरु होते आणि इकडे या दोघांच्याही मनात आनंदाचे मोर थुई थुई नाचत होते.

**श्री उद्धव भयवाळ, १९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी, गादिया विहार रोड, शहानूरवाडी, औरंगाबाद -४३१००९**
**मोबाईल: ८८८८९२५४८८ / ९४२११९४८५९ email: ukbhaiwal@gmail.com**

## 24. पुस्तक परिचय - इनव्हेस्टमेंट (कथासंग्रह) परिचय : श्री नंदकुमार वडेर



*पुस्तक : "इनव्हेस्टमेंट" (कथासंग्रह)*

*लेखक : रत्नाकर मतकरी*

*प्रकाशक : मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस*

*परिचय : नंदकुमार वडेर*

श्री. रत्नाकर मतकरी हे नाटक, एकांकिका, बालनाट्य, कथा, गूढकथा, कादंबरी, ललित लेख, वैचारिक साहित्य अशा बहू आयामी साहित्य प्रकारांत दर्जेदार लेखन करणारे साहित्यिक, रंगकर्मी, दिग्दर्शक, निर्माता आणि चित्रकार होते. त्यांच्या वास्तववादी शैलीतल्या आठ कथांचाहा संग्रह! आजच्या समाजजीवनातील अधोगतीचे, अनेक भीषण सामाजिक समस्यांचे वास्तववादीचित्रण या संग्रहात केलेले आहे. मात्र अनेक पातळ्यांवर भ्रष्ट होत चाललेल्या या समाजातहीअधूनमधून डोकावणाऱ्या, नैतिकता, प्रेम, तत्वनिष्ठा, धैर्य इत्यादी सद्‌गुणांचीहीदखल ते आर्वजून घेतात. या कथालेखनामधल्या त्यांच्या वैविध्यपूर्ण शैलीमधून मतकरींमधला नाटककार दिसून येतो.

या सर्व कथांमध्ये 'शो विंडो' ही कथा सोडून बाकी कथा प्रामुख्याने ' सदैव पैसा आणि पैसा ' ह्या केंद्राभोवतीच फिरत असल्याचे अधोरेखित होते. 'जे हवे आहे ते मिळवणे' हा सध्याच्या पिढीचा जणू मूलमंत्रच आहे, आणिया अनुषंगाने'इनव्हेस्टमेंट' हे या संग्रहाचे शीर्षक साजेसंच आहे.

यातील सगळ्याच कथांचे नायक म्हणजे उच्च मध्यमवर्गाची आजच्या काळातील भौतिक सुखाच्या मागे पळणारी मानसिकता अधोरेखित करणारी पात्रे आहेत. पैशाच्या ओघामुळे समाजात निर्माण झालेली उच्चभ्रू मध्यमवर्ग व कनिष्ठ मध्यमवर्ग ही नवी जातिव्यवस्था, त्यामध्ये निर्माण झालेली दरी, शिक्षण व्यवस्थेत बुद्धीपेक्षा पैशाला आलेले महत्त्व, शिक्षण संस्थाचालकांचा श्रीमंत पालकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, पैशाच्या जोरावर आपण न्यायदेखील विकत घेऊ शकतो, हा श्रीमंत वर्गात निर्माण झालेला समज, तसेच पैश्याच्या जोरावरकुणाकडूनही सगळं काही मिळविता येतं ही प्रवृत्ती झालेली मानसिकता... या सगळ्या गोष्टी या कथांमध्ये उत्तम चित्रित केलेल्या आहेत. अहंकार जपण्यासाठी साम दाम दंड भेद या सगळ्या मार्गांचा वापर कसा सर्रास सगळीकडे केला जातो, कोणाकडूनही नकार घेण्याची सवय नसल्याने या ना त्या मार्गाने स्वत:ला

हवंते कसं मिळवलं जातं, हे कटू सत्य या कथानायकांच्या व्यक्तिरेखांमधून लेखकाने चपखलपणे दाखवले आहे. अर्थात या कथांमधून केवळ वाईट माणसं दिसतात असं नाही. त्यात आपल्या आजूबाजूला दिसतात तशी सर्वच प्रकारची माणसं आहेत... काही अतिशय भली, काही तडजोडी करणारी, काही सुखवस्तू, काही स्वार्थी, काही वैयक्तिक प्रगतीचा विचार करणारी, तर काही त्या प्रगतीपलीकडे काहीच पाहू न शकणारी.

या गोष्टी आहेत साध्या माणसांच्या, कदाचित थोड्या अधिक हुशार, अधिक एफिशियन्ट माणसांच्या, जी आल्या प्रसंगासमोर हताश होऊन न राहता त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या निर्णयाला विशिष्ट अर्थ देऊन ते ज्या परिस्थितीत आहेत त्या परिस्थितीच्या चौकटीकडे लक्ष वेधणं, अशी चौकट असतेच याची जाणीव करुन देणं, हा या कथांमागचा हेतू असावा असे खात्रीने वाटते...

नैतिकतेचे अध:पतन झालेल्यांबद्दल काही लिहितांनाफक्त पैसा कसा मिळवावा, यश कसं मिळवावं, पैसा कसा खावा, कसा चारावा, काळा पैसा कसा असतो हेच लिहावं लागतं आणि दुर्दैवाने जनतेलाही हेच करावं लागतं–. हीचकालची, तशीच आजची आणि बदल न झाल्यास उद्याचीहीशोकांतिका असणार आहे यात मात्र तीळमात्र शंका राहणार नाही -हेच या कथांमधून वाचकाला प्रकर्षाने जाणवेल. आणि हेच या कथासंग्रहाचे सार आहे.

खरं तर यातली प्रत्येकच कथा आत्ताच्या वास्तवाचे इतके ठोस आणि तंतोतंत चित्र वाचकांसमोर उभे करते की प्रत्येक कथेचे वेगवेगळे परीक्षण करण्याचा मोह अनावर होतो. पण तो मोह आवरून या कथांचा फक्त परिचय करून देण्याचा माझा हा प्रयत्न आहे.

**शीर्षककथा 'इन्वेस्टमेन्ट'**

कोणती नैतिक मूल्ये सांभाळायची आणि कोणत्या मूल्यांना मूठमाती द्यायची, याबद्दलच्या वैचारिक गोंधळाखाली दडपून गेलेल्या व्यक्तिरेखा मतकरींनी 'इन्व्हेस्टमेंट' मध्ये उभ्या केल्या आहेत. अध:पतन झालेल्या तरुण वर्गाचे नायिका प्राची प्रतिनिधित्व करते. पण उलट बाजूला आहे ती नायकाची आई, जी जुन्या रूढी आणि संस्कारांना धरुन आहे... आपल्या नीतीमत्तेच्या कल्पना ती सोयिस्करपणे बदलू शकत नाही. या दोघींच्या मध्ये आहे नायक आशिष, जो प्रगतीचं मूल्यही ओळखतो आणि संस्कारांची किंमतही जाणतो. पण त्यामुळेच या दुहेरी जबाबदारीत त्याची फरफटही होते. आपला मुलगा सोहेलची खुनाच्या खटल्यातून निर्दोष मुक्तता करून देणाऱ्या वकील संदेश गडकरांना त्यांच्या फीचा चेक देताना आशीष म्हणतो की, "क्रिमिनल लॉयर संदेश गडकरांना दिलेला हा चेक ही आम्ही सोहेलच्या भविष्यासाठी केलेली'इन्वेस्टमेन्ट' समजतो..."आणि हीच खरी या कथेची टॅग लाइन आहे. या 'इन्वेस्टमेन्ट' वर आधारित मराठी चित्रपटाला, सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचासामाजिक जाणिवेचाराष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे. आणि त्याची पटकथा, दिग्दर्शन मतकरी सरांचेच आहे, हे इथे नमूद करायलाच हवे.

**दुसरी कथा - 'चरित्र'**

बिल्डर दास्ताने यांच्या पंचावन्नाव्या वाढदिवसाच्या समारंभाच्या वेळी त्यांच्या चरित्र प्रकाशनाचा विचार येतो त्यावरची ही कथा आहे. समाजात प्रतिष्ठा मिळावी म्हणून तर चरित्र लिहून घ्यायचंय असं स्वतःदास्ताने

कबूल करतात. आणि केवळ पैश्याकरिता स्वत:च्या तत्वाला विकणारे लेखक बाजारात असतात असा त्यांचा (गैर) समज असतो. लेखक प्रसाद खांडवेकर हा तसाच एक लेखक असणार हे गृहीत धरले जाते आणि त्यानेच चरित्र लिहून दिले पाहिजे असा येनकेन प्रकारे पिच्छा पुरवला जातो. पण स्वतंत्र आणि बाणेदार व्यक्तिमत्वाच्या लेखकाला मनासारखं लिहिण्याचं स्वातंत्र्य आणि त्यातून मिळणारे समाधान एव्हढीच माफक अपेक्षा असते. “ नैतिकतेचे अध:पतन झालेल्या अशा चरित्रात फक्त पैसा कसा मिळवावा, यश कसं मिळवावं, पैसा कसा खावा, कसा चारावा, काळा पैसा कसा असतो … हेच चित्रित करावं लागतं.. ”. हे प्रसाद खांडवेकरचंम्हणणं हीच या कथेची टॅग लाइन आहे असंमला वाटतं.

**तिसरी कथा - ‘शो-विंडो-‘**

एका विकृत मनोवृतीच्या माणसाची ही कथा आहे. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे असंमानणाऱ्या पुरुषाला सुखासिन आयुष्यात बायको, मुलगा, घर, गाडी, स्वत:चा जाहिरातीचा व्यवसाय असं सगळं असतांनाही समोरच्या ऑफिसातलीफॅशन डिझायनर, व्हेनिशियन ब्लाइंड वर करून पहातांना शो विंडो मध्ये दिसते. आणि तो विवाहित नायक एकतर्फी प्रेमात पडतो. आजच्या काळातही अशा घटना सतत कुठेना कुठेतरी घडत असतात. स्वरूप वेगवेगळे असले तरी त्यातला तपशील तोच समानधर्मी असतो. अशा प्रेमातले छुपे उद्देश, ते साध्य करण्यासाठी अवलंबले जाणारे चुकीचे - बहुतांशी अनैतिक मार्ग, इतरांची फक्त बघ्याची भूमिका, कडक वाटणारे पण प्रभावीपणे वापरले न जाणारे कायदे आणि तरुण वर्गाच्या नैतिक अध:पतनाचे भेडसावणारे वाढते प्रमाण, या सगळ्यावर या कथेत प्रश्नचिन्हे उभी केलेली आहेत, आणि कथानायक अशा वर्गाचे प्रतिनिधित्व करतो.. कथेच्या शेवटी नायकाची बायको त्याचंघर सोडून जाताना चिठ्ठी लिहिते त्यात म्हणते “आपला संसार एक शोभेचा देखावा होता. ’ अ विंडो डिस्प्ले ‘. तो कायम टिकणंशक्यच नव्हतं. तू पुन्हा लग्न करू नकोस. तुझ्यासारखा विकृत माणूस…… ” हे बोलणं आणि शेवटचे हे अपूर्ण वाक्यच या कथेची टॅग लाइन ठरायला काही हरकत नाही.

**चौथी कथा - ‘पप्पू दादा-’**

पौगंडावस्थेतील मुलाच्या गुन्हेगारीची ही कथा आहे. अत्यंत गरीबी, शिक्षणाचा अभाव, तुटपुंज्यामिळकतीत कुणाचंच पोट भरत नाही, याचा सल त्याच्या मनात ठसठसत राहिलेला असतोनि अख्खं आयुष्य कुरतडत राहतो.. दुर्बलतेपुढे हतबल होऊन व्यसनाचा आधार घेतला जातो. बरेचदा आईवडिलांचं वर्तन बेजबाबदार असतं, त्यांची मुलं वाईट मार्गाला लागतात. व्यसनाधीनता व गुन्हेगारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अश्या कुटुंबातील मुलांना ना घरातून योग्य संस्कार मिळतात ना शिक्षण.. सदैव पैसा आणि पैसा ह्या भोवतीच यांचं जग फिरत असल्याने बालमनावर हाच विचार कोरला जातो. पण घरच्या गरिबीचा भस्मासुर जेव्हा पेटून उठतो, त्यावेळी सिनेमाचं अनुकरण करण्याचं धाडस तो मुलगा करतो. श्रीमंताच्या मुलाच्या अपहरणाने, मुबलक खंडणीनेपैसा मिळवून गरिबीचा प्रश्न कायमचा सोडवायचा हा एकमेव हेतु पप्पूदादा या कथानायकाच्या मनात येतो…. आणि त्या प्रयत्नात पुढे काय काय घडतं याचं हृद्य चित्रण या कथेत आहे. पण गुन्हेगारीलासुध्दा सहृदयतेची झालर असते हेही या कथेत आवर्जून दाखवून दिलंआहे…

"ज्याचं तोंडही बघायला नको, त्याचंच डोकं मांडीवर घेऊन आपण आता काळजी करत बसलो आहोत! " हे नायक पप्पूदादाचंस्वगत ही याकथेची टॅग लाइन म्हणायला हरकत नाही.

**कथा पाचवी- 'रोझ-डे: वन लाईन-'**

फिल्म इंडस्ट्रीतला एक संवेदनशील, कमर्शियली यशस्वी लेखक 'रोझ-डे' ही कॉलेज जीवनातील प्रेमकथा अपूर्णावस्थेत असतानाच हे जग सोडून जातो. पटकथेच्या भाषेत सांगायचे तर.. वन लाईन सिनारीओ म्हणतात तशी ही कथा. कथानायक मॅक्स अध:पतन झालेल्या तरुण वर्गाचे प्रतिनिधित्व करतो. तर नेहा ही कथेची नायिका... सुस्वरूप, देखणी, मध्यमवर्गीय कुटुंबातली मुलगी. आणि सर्वेश हा तिला आवडणारा मुलगा.... अशी प्रेमाच्या त्रिकोणाची परिमिती असलेली ही कथा.. मग फिल्मीस्टाईलने हिरोला मारहाण, सर्वेशचा नाद सोडण्यासाठी नेहाला सतत धमकावणे असे मॅक्सचे खलनायकी डावपेच खेळणे.. आणि शेवटी ती आपली होणार नाही असे समजताच तिच्यावर पाशवी बलात्कार करणे अशा घटना घडतात. ती आजारी पडते, एड्सची बाधा झाल्याचं तिला डॉक्टर सांगतात तेव्हा ती पूर्णपणे कोलमोडून पडते. सर्वेशलाही टाळते. मनावर दगड ठेऊन त्याला झिडकारते. सर्वेश उधवस्त होतो.. मॅक्सला पश्चाताप होतो.... या वळणाने जाणारी ही कथा.

एड्स ही समस्या कॉलेज जीवनाचाही भाग होतेय.. त्याचबरोबर एड्सला पॉजिटिव विचारानं तोंड देणारे तो आणि ती आणि बाधितांचा स्वीकार करणारे कुटुंबीय समाजात वाढत जातील का? ही काळाची गरज आहे का? .. हा प्रश्नया कथेतून प्रतिबिंबित केलेला आहे. " आम्ही त्याला पैसा दिला पण संस्कार दिलेच नाहीत? -पण असे घातक संस्कारतरी आम्ही कुठे केले? " मॅक्सच्या आईवडिलांची ही बोलकी अपराधी भावना हीच या कथेची टॅग लाइन ठरावी.

**कथा सहावी - 'फॅक्टरी-'**

गरिबी आणि असुरक्षितता या दोन्ही गोष्टींचा समाजात नेहमीच गैरफायदा घेतला जातो. जे लोक श्रीमंत आणि शक्तीशाली असतात, त्यांच्या मर्जीप्रमाणे पोलिस कृती करतात. गरीब व दुर्बल व्यक्तींना समाजात तेच गुन्हेगार बनवतात. इथे उदासीन पोलिसांची माणुसकीशून्य वागणूक मनाला चटका लावते.

मुलं दत्तक देण्याचा हजारो कोटीचा व्यवसाय करणाराएका ट्रस्टचा सर्वेसर्वा विरेंद्र सिंह... त्याचा व्यवसाय.. (की धंदा? ) भारताप्रमाणेच अन्य बड्या देशातही पसरला आहे. ठिकठिकाणच्या आश्रमातल्या मुली वापरायच्या, कधी कधी त्यांची खोटी खोटी लग्न लावून सरकारकडून स्पेशल ग्रांट्स घ्यायच्या. या मुलींनी मुलं जन्माला घातली की त्या मुलांचा कब्जा घ्यायचा आणि त्यांना विकायचं... अनुज अग्रवालसारखे अय्याशी, श्रीमंत घराण्यातील बहकलेले तरुण या मुलींशी पाचसहा महिन्यासाठी लग्न लावतात, मुलींचा वापर करतात, वर ट्रस्ट कडून ठरलेले पैसे मिळवतात, बदल्यात त्यांना मुलं जन्माला घालून देतात. ही अशी उच्चपदस्थ, धनदांडगी मंडळी पद्धतशीरपणे सामान्यांच्या बुद्धीच्या आकलनापलीकडची narration-ecosystem-आणि discourse अशी यंत्रणा राबवतात... - या सगळ्या अतिदाहक वस्तुस्थितीचे चित्रण या

कथेत प्रभावीपणे केलेले आहे. कथेच्या शेवटी स्नेहाधार आश्रमातल्या पितळे बाईंची बोलकी प्रतिक्रिया हीच या कथेची टॅग लाइन ठरते.

**कथा सातवी- 'वाल्याची बायको.'**

पुराणातल्या कथेतील दरोडेखोर वाल्याकोळीचे वंशज आजच्या आधुनिक काळातही जागोजागी दिसून येतात. मात्र आता पूर्वीच्या पध्दतीत आमूलाग्र बदल करून त्यांनी वाटमारी चालूच ठेवलेली आहे हे वास्तव या कथेत दाखवून दिलेले आहे. एक महापालिका कारकून ते विद्यापीठाच्या कुलगुरूपर्यन्त आणि लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षापर्यंतचा कथानायक पद्मनाभने केलेला प्रवास आणि आपल्या पत्नीला, प्रज्ञाला सतत अंधारात ठेऊन आपल्या काळ्या कृत्याने पाडलेला पैशाचा पाऊस … तिला गप्प करत पर्यायाने या कृत्यासाठी तो तिची मूकसंमती गृहीत धरतो. कोर्टात साक्ष देतेवेळी प्रज्ञा न्यायमूर्तींना विनंती करताना म्हणते, " काही प्रमाणात मलाही कोर्टानं शिक्षा द्यावी. पतीनं गैरमार्गानं मिळवलेलं वैभव काही दिवस तरी मी भोगलं आहे. नकळत का होईना, त्याच्या पापाच्याफळाचा आस्वाद मी घेतला आहे, त्यासाठी मलादेखील शिक्षा व्हायला हवी…" प्रज्ञाची ही कबुलीच या कथेची टॅग लाइन का ठरू नये! .

**कथा आठवी - 'ईमोशनल ब्रेक -'**

ही कथा वरील सात कथांहून वेगळ्या ढंगाची कथा आहे. एका छोट्या पडद्यावरील सिरियलमध्ये काम करणाऱ्या कलाकारालात्याच्या सिरियलच्या प्रवासात आलेल्या अनुभवाची ही कथा आहे.. निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, लेखक, यांच्या संयुक्त कामगिरीने सिरियलची निर्मिती होत असते, पणयाचा सर्वाधिकार मात्र त्या चॅनेलमालकाकडे असतो. टीआरपी च्या नावाखाली जो काही सावळागोंधळ घालण्यात येतो त्याचे पैसेच पैसे छापले जातात. बुद्धीचे दिवाळे निघालेले, आशयहीन कथा, नीतीमत्तेला पायदळी तुडवून, हिणकस, बीभत्स प्रसंगांची रेलचेल करून, प्रेक्षकांच्या माथी मारण्यात वाकबगार असलेली ही चॅनेल्स आपल्या व्यवसायात किती माहिर असतात हेच या कथेत दाखवलं आहे. प्रेक्षकांना काय आवडतं यापेक्षा आपण जे दाखवतो त्यातच प्रेक्षकांची आवड निर्माण करायची जीवघेणी स्पर्धा तर सगळ्या स्तरावर सुरू असतेच. शेवटी हे सारं पैशाच्या जोरावरच होत असतं, पैशामुळेच निभावतं.. पैशातच संपतं.. हे सामान्य प्रेक्षकांना जरी कळत नसलं, तरी कलाकार? कलाकाराने आपला स्व:त:चाही विचार करायला हवा. मैत्री, प्रेम, निष्ठा, यांना सिरियलच्या जगात किंमत असते का? …हा कथेतून पुढे येणारा प्रश्न हीच या कथेची टॅगलाईन म्हणता येईल..

… एकूणच या कथासंग्रहाबद्दलसांगावंसं वाटतं की ओघवती चित्रदर्शी भाषाशैली, प्रसंगोपात्त आशय खुलवणारे नाट्यमय संवाद, कथेला प्रवाही करणारी आखीव रेखीव प्रसंग-मांडणी, कथेच्या आरंभापासून ते शेवटपर्यंत उत्कंठा वाढवत नेण्याचे कसब, विविध पात्रांमधून होणारे मनुष्य स्वभावाचे वैविध्यपूर्ण दर्शन, त्यांचे व्यवहार, भावभावनांचे कंगोरे… हे मतकरी सरांचे खास गुण विशेष … त्यामुळेचएकदा वाचावयास हाती घेतलेलं हे पुस्तकं आठही कथा वाचून झाल्यावरच खाली ठेवलं जातं. आणि मतकरी सरांच्या सगळ्याच पुस्तकांच्या बाबतीतली हीच तर खासियत आहे..

**श्री नंदकुमार पंडित वडेर, विश्रामबाग, सांगली. मो ९९२०९७८४७०**

## 25. कविता - उपचार - श्री अनिल वामोरकर



*नकोत उपचार*

*अंतरीचा दीप*

*एक पुरेसा...*

*नको नीर*

*निर्मळ मनाने स्नान*

*पुरेसे...*

*नको क्षीर*

*धवल मनाच्या पंचामृते अभिषेक*

*पुरेसे...*

*नकोत वसने*

*साधनेने पुसू अंग*

*पुरेसे...*

*नकोत धूप*

*परिमळ कर्तव्याचा*

*पुरेसा...*

*मानस पूजा*

*करू सद्गुरूंची*

*तेवढी पुरेशी...*

**श्री अनिल वामोरकर अमरावती मो ९९२३५१४३९०**

## 26. कथा - संध्याछाया... - सुश्री प्रभा सोनावणे



तिलोत्तमादीदी माझी मामेबहीण! मी आता पंच्याहत्तरी ओलांडली, ती माझ्याहून दहा वर्षांनी मोठी, मी अगदी लहान असल्यापासून तिलोत्तमादीदीचा लाडका आहे.

मेहुणे मिलिट्रीत असल्यामुळे कडक शिस्तीचे! त्यांच्या नेहमी बदल्या होत असत, तिलोत्तमादीदी कधी त्यांच्याबरोबर तर कधी मुंबईतसासूसासऱ्यांजवळ रहात असे.

आम्हाला दोघांना चित्रकलेची आवड, साहित्याची संगीताची आवड, आम्ही एकमेकांना स्वतः काढलेली भेटकार्ड पाठवायचो!

तिलोत्तमादीदीला दोन मुलगे राहुल आणि कुणाल!

मला आजोळी जायला लहानपणापासून खूप आवडतं! माझी आईही एकुलती एक बहिण, चारही भावांची लाडकी! आम्ही सर्व आत्तेमामे भावंडं आजही भेटतो! काही भावंडे कालवश झाली!

... पण मला आज आवर्जून सांगायचंय ते तिलोत्तमादीदी विषयी. ती हुशार होती, पण त्या काळात मुलींची लवकर लग्न होत असत त्याप्रमाणे मॅट्रिक झाल्यावर तिचं लग्न झालं! पण सासर सुशिक्षित, सासरे प्रोफेसर, सासूबाईपण हुशार, वाचनाची आवड असलेल्या, शिक्षणाची आवड असलेल्या, "आम्ही तिलोत्तमाला पुढे शिकवू " म्हणाल्या! तिलोत्तमादीदी मुळातच हुशार असल्यामुळे पुढे शिकली. ग्रॅज्युएट झाली! एका पाठोपाठ दोन मुलांचे जन्म, या सांसारिक जबाबदाऱ्या निभावत असताना काहीतरी नवीन नवीन शिकण्याकडे तिचा कल असे!

सासरी सतत पाहुणे रावळे, त्यामुळे बराच वेळ स्वयंपाकघरातच जायचा! तिलोत्तमादीदीवर अन्नपूर्णेचा वरदहस्त! मी अनेकदा तिच्या घरी जायचो, तिच्या हातचं जेवलेलो आहे! तिनं केवळ रांधा, वाढा, उष्टी काढा एवढंच केलं नाही! स्वतःमधील कलागुणांना जोपासलं, मुंबईतील वनिता समाज संस्थेची ती सक्रिय सभासद होती! वाचनाची आवड असल्यामुळे, पुस्तकांचा संग्रह भरपूर होता!

माझ्या दृष्टीकोनातून तिलोत्तमादीदी आदर्श महिला, आदर्श गृहिणी, आदर्श पत्नी, आदर्श आई आणि नंतरच्या काळात आदर्श सासू आणि आदर्श आजीही! खूप निगुतीने संसार केला तिनं! सगळ्यांसाठीच कष्ट केले! सासू सासऱ्यांची आजारपणं पार पाडली..... दोन्ही मुलांकडे खूप लक्ष दिलं, एक मुलगा डॉक्टर तर दुसरा वडिलांसारखा मिलिट्रीत ऑफिसर! मुलांची वेळेवर लग्न झाली. सूनाही उच्चशिक्षित, जाॅब करणाऱ्या......

नातवंडं झाली.... सूना ऑफिसमधे जाणार म्हणजे नातवंडांनासांभाळणं आलंच! नातवंडं पाळणाघरात ठेवायची वेळ आली नाही! आजी आजोबा नातवंडाची काळजी घेत! पण अचानकच आमच्या मेहुण्यांचं हृदयविकाराने निधन झालं! दीदी काही काळ गप्प झाली, पण कालांतराने सावरली!

मी तिलोत्तमादीदीला सतत कार्यमग्नच पाहिलं आहे! ऐंशी वर्षाची होईपर्यंत ती घराचे पूर्ण व्यवस्थापन करत होती! हाताखाली चार कामवाल्या असायच्या!

मोठा मुलगा राहुल डॉक्टर, त्याची बायको रेश्मा इंजिनियर होती! या दोघांनी तिलोत्तमादीदीचा ऐंशीवा वाढदिवस खूप थाटामाटात साजरा केला.. तारांकित हॉटेल मधे! आम्हा सर्व नातेवाईकांना बोलवलं होतं! आम्ही सर्वजण खूष होतो! तिलोत्तमादीदी म्हणत होती, "कशाला एवढा खर्च करायचा? एवढ्या पैशात माझ्या नातीचं लग्न होईल! "

काळानुसार तरुण पिढीची खर्च करण्याची वृत्तीही वाढली आहे! मुलं आफाट पैसा मिळवतात आणि तेवढाच खर्चही करतात! तिलोत्तमादीदीही सढळ हाताने खर्च करणारी! सासरची आणि माहेरची वडिलोपार्जित भरपूर शेतीवाडी होती.. त्याची भलीमोठी रक्कम तिला मिळाली होती. शिवाय ती दिवंगत ब्रिगेडियरची पत्नी होती, ती पेन्शन सुद्धा होती! तिलोत्तमादीदी विधायक काम करणाऱ्या अनेक संस्थांना भरपूर देणग्या देत असते!

मी सुद्धा निवृत्त झाल्यावर सामाजिक कार्य करीत असतो, त्यासाठीही दीदीने मला अनेकदा देणगीचे धनादेश दिले आहेत!

दीदीचा धाकटा मुलगा लेफ्टनंट कर्नल कुणाल सैन्यातून निवृत्ती घेऊनमुंबईत स्थायिक झालाय! त्याची मुलं परदेशात शिकताहेत!

दीदीचा ऐंशीवा वाढदिवस म्हणजे तिची मुलंही आता साठीच्या आत बाहेरची! जीवनात खूप यशस्वी झालेली! आम्हा सर्व नातेवाईकांना तिच्या समृद्ध जीवनाचं दर्शन घडलं होतं! राहुल -रेश्मा, कुणाल- क्रांती, चार नातवंडं.. सारेच दीदींचा ऐंशीवा वाढदिवस साजरा करत होते! आमचे मेहुणे स्वभावाने खूप कडक होते! दीदी कलासक्त, कोमल स्वभावाची! दोघांचा संसार यशस्वी करण्यात तिलोत्तमादीदीचा मोलाचा वाटा आहे. आज ब्रिगेडियर साहेब हवे होते, असंच दीदीला वाटत असणार!

या घटनेला आता सहा वर्ष उलटून गेली! मी मुंबईत गेलो की तिलोत्तमादीदीला भेटायला जात होतो, दीदी आता संसारातून निवृत्त झाली होती! तिची देखभाल करायला एक स्वतंत्र मोलकरीण होती! प्रशस्त फ्लॅट, नोकर -चाकर, दाराशी चार चारचाकी, ड्रायव्हरसकट! सारं सुखासीन आयुष्य! सगळ्या बहिणींमधे दीदी वेगळी होती, म्हणून भाग्यशालीही!

मी तिलोत्तमादीदीच्या नेहमीच संपर्कात राहिलो. ती बदलीच्या गावी असो की, मुंबईत! तिचा सगळा जीवन प्रवास मी पाहिला होता, ती अतिशय समजूतदार, कलागुणसंपन्न सुगृहिणी होती! तिची मुलं सूनाही तिची खूप काळजी घेत होते, हे मी प्रत्यक्ष पहात होतो! मागच्या भेटीत मी तिला तिची जुनी पत्रं, जुनी चित्रंदाखवायला नेली होती! ...पत्रे, टेलिफोन, मोबाईल अशी आमची बदलत गेलेली संपर्क साधने!

हल्ली तिलोत्तमादीदीचा अनेकदा फोन येतो, " प्रकाश, अरे तुझ्या जवळपास कुठे वृद्धाश्रम आहे का? मला वृद्धाश्रमात जाऊन रहावसं वाटतंय! "

तिला म्हटलं, " तुझ्या घरात तुझी जेवढी काळजी घेतली जातेय तेवढी कुठल्याच वृद्धाश्रमात घेतली जाणार नाही "

.... इतकं आरामशीर आयुष्यअसताना तिला असं का वाटत होतं? तर ती म्हणायची ‘ हा सोन्याचा पिंजरा आहे, बोलायला माणसं नाहीत, कामवाल्यांशी किती बोलणार? ’ म्हटलं फोनवर बोलत जा.... तर ती म्हणाली, " जो तो ज्याच्या त्याच्या व्यापात, एक शाळेतली मैत्रीण फोन करायची.... तिचा फोन यायचा बंद झालाय.... ती गेल्याचंही कोणी कळवलं नाही! "

तिचं मानसिक संतुलन बिघडलंयकी काय? अशी मला शंका यायची, कारण मधेच तिचा फोन यायचा. “माझी मुलं मला खूप चांगलं सांभाळतात, काहीच कमी पडू देत नाहीत! "

... परत आठ दिवसांनी वृद्धाश्रमाची चौकशी! ... तिला कोणाशी आणि काय बोलायचं होतं?

‘आपण सगळेच एकटेच असतो आयुष्यभर,’ मी तिलोत्तमादीदीला माझ्यापरीने समजवण्याचा प्रयत्न करीत होतो! मध्यंतरी ती घरात पडली, दुखापत झाली! सेविका जवळपास असल्यामुळे लगेच हॉस्पिटलमधे नेता आलं! परवा तिला भेटायला गेलो तर ती वॉकर घेऊन चालत होती! खूप वेळ बोलत होती, लहानपणाच्या आठवणी! मधेच विस्मरण होत होतं! मी असतानाच तिच्या दोन्ही सूना आल्या... त्या सासूशी ज्या पद्धतीने वागत बोलत होत्या त्यावरून त्यांचे संबंध एकमेकींशी खूप चांगले असल्याचं जाणवत होतं!

पंधरा दिवसांनी तिचा परत फोन आला, " प्रकाश अरे तू माझं काम केलं नाहीस.... मला वृद्धाश्रमात रहावसं वाटतंय"

परत थोड्या वेळाने तिचा फोन आला, "अरे मी काय म्हटलं ते विसरून जा! "

या संदर्भात तिच्या मुलांशी बोलावं का असा विचार मी करत होतो, चेंज म्हणून एखाद्या ओल्ड एज होम मधे तिची मुलंही तिला ठेऊ शकली असती. पण मी तिच्या मुलांना असं सांगणं मला बरं वाटलं नाही! तिची मुलं तिची खूपच काळजी घेत होती हे मला दिसत होतं!

मी आज खूप दिवसानंतर तिला फोन केला! तब्येत कशी आहे? विचारलं, तर ती म्हणाली, “ एकदम ठणठणीत आहे! ये भेटायला, तुझ्याशी बऱ्याच गप्पा मारायच्या आहेत! ”

मला दिदीचा प्रॉब्लेम समजला, तिला ज्या विषयावर बोलायचंय, ते ऐकून घेणारं कुणीतरी पाहिजे आहे!

वृद्धाश्रमातले समवयीन तरी तिचं ऐकून घेतील असं तिला का वाटत होतं? हल्ली कोण कुणाचं ऐकून घेतं? सगळ्यांना स्वतःचंच पुराण सांगायचं असतं!

"संध्याछाया "तिला खूप उशीरा.. म्हणजे ऐंशीव्या वर्षानंतर घाबरवायला लागल्या आहेत. तिच्याजवळ सांगण्यासारखं खूप होतं पण ऐकणारं कोणीच नव्हतं!

हा अनुभव मी स्वतः घेत होतो. कुठल्याही मित्राला फोन केला की तो स्वतःचीच गाऱ्हाणी ऐकवायचा, मी कशासाठी फोन केलाय याची साधी चौकशीही नाही! जवळचे जे तीन चार मित्र होते त्यांचा हाच अनुभव येत होता! हल्ली मी मित्रांना फोन करणं सोडून दिलंय आणि आत्मसंवादात जास्त रमतो, त्यामुळे माझ्या समाज कार्यासाठी मी जास्त वेळ देऊ शकतो!

माझ्या अठ्ठ्याऐंशी वर्षाच्या बहिणीला मी हे सांगू शकणार नव्हतो.. पण एक चांगला श्रोता म्हणून मी अधूनमधून तिला भेटायला जाऊशकणार होतो... आयुष्य नीट समजूनघेता आलं नाही... आहे त्यात समाधान मानता आलं नाही.. तर दीर्घायुष्य हा शापच आहे माणसाला!

**सुश्री प्रभा सोनवणे, “सोनवणे हाऊस”, ३४८ सोमवार पेठ, पंधरा ऑगस्ट चौक, विश्वेश्वर बँकेसमोर, पुणे 411011 मोबाईल-९२७०७२९५०३, email- sonawane.prabha@gmail.com**



# 27. लेख - गुणरत्नखणी हरित वसुंधरा - डॉ. मीना श्रीवास्तव



नमस्कार प्रिय मैत्रांनो!

भारतीय तत्वज्ञानाप्रमाणे पृथ्वी (क्षिति), जल(आप), अग्नि(ताप), वायु(पवन) व आकाश(शून्य) यांना पंचतत्व किंवा पंचमहाभूते म्हणून संबोधतात. ब्रह्मांडात प्रकृतीपासून् उत्पन्न सर्व वस्तूंमध्ये पंचतत्वांचे वेगवेगळे प्रमाण पूर्वनिर्धारित असते (आपण त्यातलेच). आपल्या उत्पत्ती नंतर या सर्व वस्तू नश्वरतेमुळे कालांतराने पंचतत्वात विलीन होतात (इथेही आपण त्यातलेच! ). या पंचतत्वात पृथ्वी हे तत्व एकमात्र देवीचे स्वरूप आहे आणि सूर्य हा एकमात्र देव म्हणून वंदनीय आहे. आता या प्रत्येकाचे घटक जाणून घेऊ.

- **पृथ्वी-** माती, दगड व त्यापासून निर्मित सर्व जड, कठीण, घन पदार्थ
- **आप (जल)-** पाणी, वाफ, ढग व सर्व द्रव, ओलेतथा मृदू पदार्थ
- **तेज (अग्नी)-** ऊर्जा, अग्नी (क्षेपणास्त्र), किरणे, प्रारणे (Radiation), उष्णता, वीज, प्रकाश या स्वरूपात
- **वायू-** हवा, चैतन्य, हालचाल, चलनवलन, तरलता आणि वेग
- **आकाश-** अवकाश, अस्मान व पोकळी

आपल्या भारतात विभिन्न ठिकाणी या पंचमहाभूतांची देवस्थाने सुद्धा आहेत, ती अशी: पृथ्वी- कांचिवरम, आप-जम्बुकेश्वर, तेज-अरुणाचल, वायू-कालहस्ती व आकाश-चिदंबरम.

**जागतिक वसुंधरा दिन**

२२ एप्रिल २०२४ रोजी आपण जागतिक वसुंधरा दिन साजरा केला. आपण पृथ्वीला माता म्हणून संबोधतो. ऋग्वेद संदर्भित पृथ्वीच्या हिंदू देवीचा उल्लेख "पृथ्वी" असा केलाय. ती स्त्री-शक्तीचे प्रतिनिधित्व करते, पृथ्वीची देवी ही पृथ्वीचाच अवतार आहे. तिचे दुसरे नाव भूमादेवी आहे, ज्यावरून भू, भूमी, भूदेवी ही नावे प्रचलित झाली. अवनी, बहुमोल रत्नखणी अन सद्गुणखणी वसुंधरा (संपत्तीची धनीण), रसा म्हणजे (जिच्याभोवती अनेक समुद्र प्रवाहित होत असतात), धरणी किंवा धरित्री (जी धरून ठेवते) अशी कैक मनोरम नावे धारण करून एकाहून एक सुंदर गुणचित्रे अन रूपचित्रे यांचे दर्शन घडवणारी आपलीच, म्हणजे, जिच्याशी आपली "अतिपरिचयात अवज्ञा" अशी नाळ जोडली आहे ती पृथ्वी! अशी आई जी आपली जैविक जन्मदा नसूनही तिची माया तसूभरही कमी होऊ देत नाही! जी आपल्याला बाराही महिने अन्नरस पुरविते, तिच्यासाठी आपण वर्षातून एकच दिवस २२ एप्रिल हा "जागतिक वसुंधरा दिवस", हा नेमून दिला आहे (तो ही १९७० सालापासून), हा त्या जगन्मातेवर काव्यात्मक अन्याय नाही का? ही सारी माझीच लेकरे असून माझ्यावर

असा सूड का उगवताहेत हा प्रश्न देखील जी विचारणार नाही, तीच ही अभागी भूदेवी! तसेही आपण आता सर्रासपणे वर्षातला "एकच दिवस" हा जागतिक मातृदिन, पितृदिन वगैरे वगैरे साजरा करतोच की! हा दिवस पण तसाच नावापुरता साजरा करायचा की त्यात अजून काही प्रेरक असावे, त्याबद्दल माझे हे विचारमंथन!

एकीकडे पृथ्वीला देवतेचा दर्जा द्यायचा अन दुसरीकडे तिलाच काळसर्पासारखा विळखा घालून उन्मत्तपणे विष ओकायचे! मानवासारखी कृतघ्न जात शोधून सापडायची नाही! त्या सहनशील माऊलीने किती घाव झेलायचे मुकाट्याने? आपण तिच्या अंगावरील हिरव्याजर्द वृक्षांच्या पैठणीची पार लक्तरे करून टाकली. तिच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या झऱ्यांची अन नद्यांची निव्वळ डबकी करून टाकली. मानवाची मस्तवाल मर्दुमकी निरपराध जनावरांच्या शिकारीत बंदिस्त झाली. डोंगर खणले, नद्या, समुद्रकिनाऱ्यांवर अतिक्रमण झाले, वाळूचा उपसा झाला. उपवने, बागबगीचे, मोकळी मैदाने, काही म्हणून काही सुटले नाही, कॉँक्रीटच्या जंगलांच्या विळख्यातून! जी वनराई देवराईच्या रूपात लसलसलेल्या लावण्याच्या लेण्याने सदैव लगडलेली असायची व पशु-पक्ष्यांचा आधारवड होऊन त्यांचे भरण-पोषण करायची, तिच्या साजऱ्या अन गोजिऱ्या रूपाचे चिपाड झाले, चरकातून काढलेल्या उसासारखे! यावरच थांबेल ती मानवजात कसली? क्रूरतेचा कळस गाठत, जे जे पृथ्वीला हानिकारक आहे ते आणि तेच करायचा त्याने चंग बांधलाय! "आम्ही कोण म्हणून काय पुसता? " या अहंकारयुक्त दर्पात प्रदूषणाचा जो ब्रह्मराक्षस पैदा केला, तो आता भस्मासुराचा अवतार घेऊन समग्र मनुष्यजातीचाच घास घ्यायला निघालाय! वायूप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, एक एक नाव घ्या अन ते १०० टक्के पक्की हजेरी लावणारच ही भीषण परिस्थिती! मानवनिर्मितीचे कोडकौतुक करता करता हे आगंतुक पाहुणे न बोलावता कसे टपकले हे कळलेच नाही!

भूमातेच्या या दारुण दशेला मी सोडून सर्व जबाबदार आहेत, यादी तयारच आहे की! (केंद्र आणि राज्य सरकार, नगरपालिका, ग्रामपंचायत, समाज, संकुलातील आख्खे लोक, सख्खे आणि सावत्र शेजारी, बांधकाम व्यावसायिक, कारखानदार, परकीय शक्ती आणिकही कोण कोण असेना का, पण तो मी नव्हेच! ) हा जबाबदारी झटकण्याचा हा उपक्रम लवकरात लवकर बंद पाडला पाहिजे. जेव्हा आपण एक बोट दुसऱ्याकडे दाखवतो, तेव्हा आपलीच उरलेली चार बोटे आपल्याला वाकुल्या दाखवत असतात, हे लक्षात आणून द्यायला दुसरे कोणी हवेच का?

आता हे सर्व कोण, केंव्हा आणि कसे निस्तरणार? तहान लागल्यावर का होईना, आपण विहीर खणायचा मुहूर्त काढलाय! या चळवळीचा व्यावसायिक वातावरण, राजकीय वातावरण आणि हवामानावर कारवाई यांच्यावर अपेक्षित परिणाम साधला जाईल ही अपेक्षा. आपल्या लाडक्या वसुंधरेला तिचे गत वैभव परत मिळवून देण्यासाठी मळलेल्या वाटा सोडून नवीन वळणे शोधण्याचे संबंधितांनी (अर्थात आपण सर्वांनी) मनावर घ्यायला हवे.

**वसुंधरा दिनाची सुरुवात कशी झाली?**

वसुंधरा दिन (पृथ्वी दिवस) साजरा करण्याची कल्पना सर्वप्रथम शांतता कार्यकर्ते जॉन मॅककोनेल यांनी १९६९ मध्ये युनेस्कोच्या परिषदेत मांडली होती. सुरुवातीला हा दिवस साजरा करण्याचा उद्देश पृथ्वीचा सन्मान करणे हा होता. वसुंधरा दिन पहिल्यांदा २२ एप्रिल १९७० रोजी अमेरिकेत साजरा करण्यात आला. १९९० मध्ये, डेनिस हेसने हा दिवस जागतिक स्तरावर साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला ज्यामध्ये १४१ देश सहभागी झाले होते. आजच्या घटकेला वसुंधरा दिन अंतर्जालात १९३ हून अधिक देश सहभागी आहेत, हे अभियान विविध स्तरातील अंदाजे २०००० भागीदार आणि संस्था यांच्या कार्याने व्यापलेले आहे.

दरवर्षी जागतिक वसुंधरा दिनाची थीम पृथ्वीशी निगडित समस्या आणि तिचे निराकरण या बाबीशी संबंधित असते. २०२४ मधील या दिनाची थीम आहे - 'प्लॅनेट वर्सेस प्लास्टिक' (Planet Versus Plastic -पृथ्वी ग्रह विरुद्ध प्लास्टिक). या थीमचा उद्देश एकल उपयोग प्लास्टिक (single use plastic) चा वापर बंद करणे आणि त्याच्या पर्यायांच्या शोधावर भर देणे आहे. वाढते प्लास्टिक प्रदूषण हे पर्यावरण प्रदूषणाचे एक प्रमुख कारण असल्याचे दिसून आले आहे. दरवर्षी ४०० दशलक्ष टनांहून अधिक प्लास्टिकचे उत्पादन केले जाते, त्यातील निम्मे प्लास्टिक एकदाच वापरण्यासाठी (एकल वापर प्लास्टिक अर्थात सिंगल यूज प्लास्टिक) डिझाइन केलेले आहे.

**प्लास्टिक प्रदूषणाची कारणे**

प्लास्टिकचे उत्पादन करतांना जीवाश्म इंधन वापरतात, जे ग्रीन हाऊस गॅस (कार्बन डाय ऑक्साईड) बाहेर टाकते आणि जागतिक तापमान वाढवते. एकल वापर प्लास्टिक, मुख्यत्वे करून प्लास्टिकच्या पिशव्या, स्ट्रॉ आणि पाण्याच्या बाटल्या यांचा अतिरेकी वापर हे वाढत्या प्लास्टिक प्रदूषणाचे प्रमुख कारण आहे. प्लास्टिक कचऱ्याचे चुकीचे व्यवस्थापन (मुख्यत्वे कचऱ्याचे वर्गीकरण न करणे) व कचराकुंडीच्या बाहेर किंवा इतरत्र प्लास्टिक फेकल्यास प्लास्टिक जलमार्ग आणि महासागरांमध्ये प्रवेश करून सागरी जीवन आणि पर्यावरणास हानी पोहोचवू शकते. या प्लास्टिकचे विघटन होण्यास १००० हून जास्त वर्षे लागतात, शिवाय हे विषारी रसायनाच्या रूपात विघटित झालेले प्लास्टिक पर्यावरण कलुषित करीत राहते. सागरी जीवनावर प्लास्टिक प्रदूषणाचा परिणाम होतो. महासागरांतील कासव, मासे आणि इतर जलचरांच्या जीवांची हानी होते. तसेच जलमार्ग प्रभावित होतात. नद्या आणि नाले प्लास्टिकच्या कचऱ्याने तुंबू शकतात, ज्यामुळे पूर येतो आणि प्रदूषण होते. यात आपल्या पिण्याचे पाणी देखील प्रदूषित होते. यामुळे जैवविविधता (biodiversity) कमी होत आहे. प्लास्टिकच्या विषारी रसायनांनी मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होतो.

**प्लास्टिक प्रदूषणावर मात करण्याचे मार्ग**

प्लास्टिक प्रदूषणावर मात करण्याकरिता रिड्यूस, रीयूज और रीसायकल, हे तीन आवश्यक R अर्थात उपाय आहेत. एकल वापर.. प्लास्टिकचा वापर कमी करून त्याऐवजी शाश्वत पर्याय अर्थात नैसर्गिक साहित्य वापरावे. या लढ्यात जनजागृती करणे महत्त्वाचे आहे. सामाजिक जागरूकता अभियान, तसेच समाजप्रबोधनासाठी समाज माध्यमे खूप परिणामकारक ठरतात. एकल-वापर प्लास्टिकचे उत्पादन आणि वापर मर्यादित करणारी सरकारी धोरणे आणि नियम यांचे पूर्ण कसोशीने पालन करणे गरजेचे आहे. तसेच प्लास्टिक प्रदूषणावर मात करण्यासाठी समुद्रकिनारे, बगीचे, इतर सार्वजनिक ठिकाणे आणि संकुलात स्वच्छता अभियान आयोजित करून आपण प्लास्टिक कचऱ्याचे नियोजन करू शकतो.

एकल उपयोग प्लास्टिक वर बंदी आणायच्या अनुषंगाने १ जुलै २०२२ पासून अनेक एकेरी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तू आणि डिस्पोजेबल प्लास्टिक उत्पादनांवर भारत सरकारने बंदी घातली आहे. ही एक चांगली सुरुवात आहे. अशा अनेक प्लास्टिकच्या वस्तू आहेत ज्या भारतीय ग्राहक नियमितपणे वापरत असतात. आपण बारकाईने पाहिल्यास, या यादीतील बंदी घातलेल्या सर्व वस्तूंकरता पर्याय उपलब्ध आहेत. ते व्यवहार्य, हरितप्रेमी आणि पर्यावरणासाठी पोषक आहेत. बघू या ती यादी अन पर्याय!

प्लास्टिकच्या काड्या असलेले इअरबड्स ऐवजी लाकडी काड्या आणि कागद किंवा रिसायकल केलेल्या कागदाच्या काड्या असलेले इअरबड्स

फुग्यांसाठी प्लास्टिकच्या काड्या असलेले फुगे ऐवजी कागद किंवा पुनर्नवीनीकरण केलेल्या कागदापासून बनवलेल्या काड्या असलेले फुगे

- प्लास्टिकचे ध्वज ऐवजी कागद किंवा टिकाऊ कापडांनी बनवलेले ध्वज.
- कँडी स्टिक्स आणि आइस्क्रीम स्टिक्स ऐवजी लाकडापासून बनवलेल्या काड्या
- प्लास्टिक ऐवजी ज्यूट, कापड, कागद किंवा पुनर्नवीनीकरण केलेल्या कागदाने केलेली सजावट.
- प्लास्टिक प्लेट्स आणि ट्रे ऐवजी सियालीची पाने, उसाची चिपाडे, तांदळाचा भुसा, अरेका पाम अथवा गव्हाचा कोंडा वापरून बनवलेल्या प्लेट्सचा वापर
- चिकणमाती, बांबू आणि कॉर्न, ऊस आणि याम या वनस्पतींपासून बनवलेल्या कप आणि ग्लासचा वापर
- काटे, चमचे, चाकू आणि ढवळण्याची साधने याकरता बर्चवुडने बनवलेली कटलरी
- प्लास्टिक स्ट्रॉ ऐवजी कागद आणि गवत वापरून बनवलेले स्ट्रॉ
- मिठाईच्या बॉक्सभोवती प्लास्टिकची फिल्म्स गुंडाळण्याकरता अथवा पॅकिंगकरता कागद किंवा पुनर्नवीनीकरण कागदाचा वापर

- आमंत्रण पत्रिका छापण्याकरता पुनर्नवीनीकरण केलेल्या कागदाचा उपयोग
- सिगारेट पॅकेटमध्ये प्लास्टिक ऐवजी बायोडिग्रेडेबल प्लास्टिक वापरणे

कांही संशयात्मे असा तर्क करू शकतात की प्लास्टिकच्या तुलनेत बदली पर्याय महाग आहेत. एकच उदाहरण द्यायचे तर साधारणपणे एकल वापर प्लास्टिकच्या प्लेटची किंमत ४ रुपये असेल तर तशाच बायोडिग्रेडेबल आर्सिया पाम प्लेटची किंमत २५ रुपये आहे. मैत्रांनो, हे खरे आहे की काही बायोडिग्रेडेबल पर्याय असलेल्या वस्तू महाग आहेत. याचे मुख्य कारण आहे त्यांची मर्यादित मागणी आणि त्यांचे नवजात घरगुती उद्योगांद्वारे उत्पादन. मात्र एकल वापर प्लास्टिकच्या वस्तूंवर बंदी आणल्याने या पर्यायांना अधिकाधिक मोठी बाजारपेठ लाभून त्यांच्या किमती आपोआपच कमी होतील आणि त्यांच्या गुणवत्तेत देखील सुधारणा होईल हे नक्की. याशिवाय या बाजारपेठेत स्पर्धा निर्माण झाल्याने साहजिकच किमती कमी होतील.

बऱ्याच डिस्पोजेबल प्लास्टिकच्या वस्तूंचे समाधानकारक पर्याय अजूनही उपलब्ध नाहीत त्यांच्यात प्रामुख्याने मध्ये डेअरी आणि एफएमसीजी (जलद-गतिमान ग्राहक वस्तू) खाद्यपदार्थांसाठी वापरात असलेले प्लास्टिक पॅकेट, द्रवपदार्थांसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या, अन्न वितरण कंटेनर, थर्माकोल आणि ई-कॉमर्स कंपन्यांद्वारे मुबलक प्रमाणात वापरले जाणारे प्लास्टिक कव्हर यांचा समावेश आहे. तशी ही यादी लांबलचक आहे.. याकरता युद्धपातळीवर जागतिक स्तरावर प्रयत्न सुरु आहेत. सीवीड या सागरी वनस्पतीपासून बनलेले प्लास्टिक आणि ऑक्सो-बायोडिग्रेडेबल प्लास्टिकचा शोध हे महत्वाचे आहेत. मात्र तोवर एकल प्लास्टिकचे रीसायकलिंग यावर आपण आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे

प्रिय वाचकहो, या अनुषंगाने रामकथेतील एक प्रसंग आठवला. समुद्रावर सेतू बांधत असतांना सामर्थ्यवान वानरसेना मोठमोठे दगड समुद्रात टाकत होती. मात्र तेव्हांच एक सानुली खार स्वतःच्या अंगावर जमेल तेवढी वाळू लपेटून समुद्राच्या पाण्यात ती अंग झटकायची, आता तिला लगडलेली वाळू किती, अन काम किती अवाढव्य! पण त्या इवल्याशा खारुताईचा हा उदात्त हेतू जाणून रामाने तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवर प्रेमाने आपली पुण्यश्लोक बोटे फिरवली! ती पवित्र नक्षी आजही तिच्या प्रत्येक पिढीच्या पाठीवर दिमाखात उमटतेय. आपण देखील वसुंधरा संवर्धनाच्या कार्यात असाच खारीचा वाटा उचलायला हवा! आपली मेहनत आणि वेळ या कामासाठी राखीव ठेवा. या लहान लहान गोष्टींपासून आपणच आपली सुरवात करावी. ‘थेंबे थेंबे तळे साचे’ या उक्तीनुसार कुठलेही लहान काम वाया जात नाही. हजारोंनी केलेली लहान लहान कामेच इतिहास घडवतात, याची साक्ष इतिहासच देतो. काही मुद्दे थोडक्यात मांडते,

- प्रत्येकाने घरात आणि घराभोवती सारखीच स्वच्छता ठेवावी. आपल्या अंगणातील पारिजातकाची फुले शेजारी पडू देत, पण आपला कचरा नको!

- निसर्गास पोषक असे कपडे वापरावे, काही उदाहरणे अशी: सेंद्रिय किंवा पुनर्नवीनीकरण (recycled) केलेला कापूस किंवा पॉलिस्टर, सेंद्रिय लिनेन किंवा बांबू, , Econyl (पुनर्नवीनीकरण केलेले नायलॉन) इत्यादीपासून तयार केलेले कपडे आरामदायक व पर्यावरणस्नेही असतात.
- एकल वापर प्लास्टिकचा कमीत कमी वापर करा.
- वृक्षतोड-बंदीच्या चळवळीत सक्रिय सहभाग घ्या. रोपटी लावण्याचे उपक्रम हाती घेतल्यास, ती नुसती लावून चालणार नाही, तर जगवावी लागतील. बीजारोपणाच्या कार्यक्रमांना हजेरी लावणे, प्रवासात बीजांची पखरण करणे, घरात, अंगणात, संकुलात जमेल तितकी रोपटी लावून त्यांचे संवर्धन करणे ही कामे आपण करू शकतो.
- आपण शक्यतोवर स्थानिक हंगामी भाज्या आणि फळांचा वापर करायला हवा. ती बहुदा स्वस्त आणि मस्त असतात. इतर देशातील जे जे (भाज्या आणि फळे) आहे तेच उत्तम आणि पौष्टिक आहे, असे आजकाल बऱ्याच लोकांना वाटते. मित्रांनो, आपल्या प्रिय पृथ्वीने त्या त्या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती समजून, तसा जीवनरस आपल्यासाठी निर्माण केला आहे, आपण आपल्यासाठी उपलब्ध असलेल्या या स्थानिक अन्नरसाचे मुक्तपणे सेवन करावे.
- कोळसा, नैसर्गिक वायू, पेट्रोलियम आणि जल उर्जा या पारंपारिक ऊर्जा संसाधनांचा वापर कमी करून सौर, बायोमास, पवन, बायोगॅस आणि भरती-ओहोटी, भू-औष्णिक या अपारंपारिक ऊर्जा संसाधनांकडे मोठ्या प्रमाणावर कसे वळता येईल याचा विचार होणे फार गरजेचे आहे.

मंडळी, बऱ्याच वर्षांपूर्वी नागझिऱ्यातील जंगलाला आम्ही भेट दिली आणि रात्री मुक्काम पण केला. तिथे कमालीची शांतता होती, सोबतीला होते जनावरांचेच आवाज. सकाळी जाग आली, तेव्हा पक्षांचा मधुर कलरव सप्तसुरात कूजन करीत होता! तिथल्या वनाधिकाऱ्यांबरोबर झालेला संवाद माझ्या अजूनही लक्षात आहे. पेपरात नुकत्याच वाचलेल्या बातमीच्या आधारे मी त्यांना विचारले, "आजकाल वाघ मानव वस्तीत का घुसतात? " त्यांनी लगेच अतिशय समर्पक उत्तर दिले.. " ते तर त्यांच्याच वस्तीत आहेत, आपणच त्यांच्या वस्तीत घुसलोय! ”

प्रिय वाचकहो लेखाच्या आरंभी आपण बघितले की आपले शरीर पंचतत्वांनी बनले आहे. जाता जाता, एफ. ई. लॉसन मानवी शरीराच्या घटकांचा व्यावहारिक हिशेब कसा मांडताहेत ते बघा बरं!

"एका मनुष्याचे शरीर सर्वसाधारणपणे १४० पाउंड किंवा दहा गॅलनचा लाकडी पिंप भरण्यासाठी पुरेशा पाण्याने बनलेले असते. त्यासोबतच हवे साबणाच्या सात वड्यांसाठी लागणारे स्निग्धांश, ९००० लीड पेन्सिलींकरता लागणारे कार्बन, २२०० काडेपेट्यांच्या टोकाच्या मसाल्यासाठी लागणारे फॉस्फरस, क्षारांच्या एका डोस पुरते मॅग्नेशियम, एका मध्यम आकाराच्या खिळ्यात असलेले लोखंड, कोंबड्यांचे एक खुराडे पांढरे रंगवण्यासाठी लागणारा चुना आणि पिसवांपासून एका कुत्र्याला मुक्त करण्याकरता पुरेसे सल्फर! ही सगळी सामग्री अंदाजे

एका डॉलरमध्ये खरेदी केल्या जाऊ शकते. शरीर खेडेगावातील एखाद्या मूर्ख माणसाचे असो वा आइन्स्टाईनचे, सामग्री तीच अन तिचे मूल्य सारखेच! "

प्रिय मैत्रांनो, यात फक्त डॉलरचे मूल्य जुन्या जमान्यातील आहे, बाकी सारे आपल्याला जमिनीवर आणण्यासाठी पुरेसे आहे, होय ना?

**डॉ. मीना श्रीवास्तव, ठाणे मो. ९९२०१६७२११ ई-मेल - drmeenashrivastava21@gmail.com**

*(**टीप-** दोन गाण्यांच्या लिंक सोबत जोडत आहे. (लिंक न उघडल्यास यू ट्यूब वर शब्द टाकावेत) https://youtube. com/watch? v=F_74kfqw3mY&feature=share "देवा तुझे किती सुंदर आकाश"* https://youtu. be/LDcpRgWCIVw*

*"वसुंधरागीत-मराठी" https://m. facebook. com/story. php? story_fbid=5906695302690216&id=100000494153962 )*



## 28. चित्रकाव्य - मतदार राजा...?? - श्री आशिष बिवलकर






काय म्हणतोस मतदारा,
तू तर एक दिवसाचा राजा |
दर पाच वर्षांनी,
तुझ्यासाठी वाजे बँड बाजा |

तुझ्या त्या एका मताची,
लागते एक एक बोली |
आश्वासनांची खैरात बघून,
बजाव रे जोर से ताली |

कोणाची लाडकी बहीण,
कोणाचा लाडका भाऊ |
मतदान होईपर्यंत,
मिळणार पोटभर खाऊ |

तुझ्या मतांची किंमत,
उभा उमदेवारच ठरवतो |
आदल्या रात्री बाटली,
चिकन बिर्याणी भरवतो |

आजोबांना फुकटात प्रवास,
महिलांना हाफ तिकीट |
चाय बिस्कुट पत्रकारांना,
प्रेमाने भरलेलं पाकीट |

बिचाऱ्या बेरोजगार भावांना,
दर महिना बेरोजगार भत्ता |
कामधंदा करू नकोस कधी,
टिकवून ठेव आमचीच सत्ता |

कोणी बसलाय उपोषणाला,
आपल्या जातीचा घेऊन ठेका |
ज्याच्याशी जुळेल सेटलमेंट,
त्याच्या पारड्यात मत टाका |

निवडणूक निकाल लागताच,
पदोपदी होते तुझीच रे अडवणूक |
सहन करत बस आयुष्यभर,
लोकशाही बाजारात तुझीच पिळवणूक |

*रस्त्यात खड्डा, की खड्ड्यात रस्ता,*
*हा प्रश्न कधी नकोस विचारू।*
*टोल माफिया, कंत्राटदार सारे,*
*तुझ्याच करांचे बसलेत लुटारू।*

*चुकूनमाकून आजारी पडलास,*
*पैशाची करून ठेवतरतूद।*
*आरोग्य-व्यवस्थेच्या खोडात,*
*जागोजागी पेरलंय मोरचुद।*

*खासगी शाळांची फी भरून,*
*मुला-बाळांना देत रहा तू शिक्षण।*
*भविष्यात जातीच्या आधारे,*
*त्याच्या संधी खात रहाणार आरक्षण।*

*घराचे स्वप्न बघत आहेस,*
*किंमत गेलीय कोटींच्या घरात।*
*होम लोनचे हफ्ते भरून,*
*तेवत ठेव आयुष्याची वात।*

*अरे जगायचंच आहे तुला,*
*पोटात जायला हवं अन्न पाणी।*
*महागाईच्या वणव्यातून तुला,*
*वाचवायला येणार नाही कोणी।*

*लाजलज्जा रक्षणार्थ,*
*अंगावर नेसायला हवास कपडा।*
*लुटून नागवा केलाय तुला,*
*साफ झालाय तुझाच सुपडा।*

*तुझ्या मुली बाळी रे,*
*कुठे राहिल्यात सुरक्षित।*
*दररोजच्या बातमीत,*
*कुठे ना कुठे होतात भक्षित।*

*मुंबई, पुणे, ठाण्यात राहतोस,*
*नको मिरवूस मराठी बाण्याची ऐट।*
*परप्रांतीयांच्या घशात गेलंय सारं,*
*तुझ्याच शहरात तुझेच दिवस वाईट।*

*आपल्या मराठी माणसांचा,*
*ज्यांना समजत होतास कैवारी।*
*त्यांनीच रे तुझा घात केला,*
*तेच निघाले तुझ्या अस्तित्वाचे वैरी।*

*अन्न, वस्त्र, निवारा गरज तुझी,*
*पूर्ण करतांना आलास मेटाकुटीला।*
*तूच केल आहेस मतदान,*
*सांग कोण जवाबदार तुझ्या लुटीला?*

**श्री आशिष बिवलकर, बदलापूर मो 9518942105**

## 29. कथा - देवाच्या नावानं... - श्री जगदीश काबरे



काल मी माझ्या मित्राच्या घरी सहज गप्पा मारायला म्हणून गेलो होतो. दारात पाऊल ठेवतो तो काय, तो आणि त्याचा मुलगा यांच्यात जोरदार वादावादी चालू होती. म्हणून दारातच थबकलो आणि विषयाचा कानोसा घेऊ लागलो.

... तर मित्र मुलाला म्हणत होता, "कमवायची अक्कल नाही आणि चालला बापाला शिकवायला! मी माझे कष्टाचे पैसे गणपतीची वर्गणी म्हणून देतो आहे. त्यात तुला आक्षेप घ्यायचे कारण काय? "

त्यावर मुलगा म्हणाला, "अहो बाबा, तुम्ही कमवताय हे सत्य आहेच. पण तुम्ही चूक करताना दिसली तर आम्ही कोणीच तुम्हाला बोलायचं नाही का? "

"बापाला अक्कल शिकवणार तू कालचा पोर? तुझ्यापेक्षा कित्येक पावसाळे मी जास्त पाहिले आहेत. पहिल्यांदा आधी स्वतःचं शिक्षण पूर्ण कर. कमवायचं बघ. चार दमड्या कमाव आणि मग बापाला शिकव. "रागाने मित्राचा चेहरा लालबुंद झाला होता.

इंजीनियरिंगच्या शेवटच्या वर्षाला असलेला मित्राचा मुलगा, विवेक शांतपणे त्याला सांगत होता, " माझं मत असं आहे की, अस्तित्वात नसलेल्या देवाच्या नावाखाली पैसे गोळा करून धिंगाणा घालणाऱ्या मंडळींना कष्टाने कमावलेले तुमचे पैसे तुम्ही का द्यायचे? खरंतर एक रुपयाही द्यायला नको. यात तुम्हाला मी अक्कल शिकवतो असे वाटते, याचेच मला आश्चर्य वाटते आहे. खरंतर तुम्हाला ते मनाच्या एका कोपऱ्यात पटतंय; पण तो तुमचा अपमान वाटतोय तुम्हाला म्हणून तुम्ही माझं वय, शिक्षण वगैरे मुद्दे घेऊन मला धमकी देत आहात. हे योग्य आहे का? ही तर हुकूमशाही झाली ना? "

... आणि इथे मी मग घरात एन्ट्री घेतली.

मला पाहताच मित्र म्हणाला, "बरं झालं तू आलास. हा बघ माझ्या देवभक्तीवर संशय घेतोय आणि मला अक्कल शिकवायला निघालाय. माझे पैसे मी गणपतीच्या वर्गणीसाठी दिले तर इतर कोणाचा काय संबंध? आणि जर त्याचा आक्षेप असेल तर त्याने माझ्या घरात राहू नये. "

"बघा हो काका, बाबा कसे हुकूमशहासारखे वागताहेत. मी फक्त माझं मत मांडतोय आणि ते मांडायलासुद्धा हे हरकत घेताहेत. बाबांना माझं म्हणन पटत नाहीये. म्हणून ते अशा धमक्या देत आहेत."

मी म्हणालो, "हे पहा, तुम्हा दोघांचे थोडे थोडे बोलणे दारातून येताना मी ऐकलेले आहे आणि मला अंदाज आलेला आहे की, तुमची कशावर वादावादी चालू आहे ते... पण मला वाटते, हा प्रश्न आपण सामंजस्याने सोडवू शकू."

यावर ते दोघेही माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागले.

मी मित्राला म्हणालो, " हे बघ, आधी तुझ्या मुलाचं काय म्हणणं आहे ते आपण ऐकून घेऊया मग तुझं. हंऽऽ विवेक बोल, काय म्हणणं आहे तुझं? "

"माझं एवढंच म्हणणं आहे की, आत्तापर्यंत देवाच्या अस्तित्वाचा पुरावा मिळालेला नाही. उत्क्रांतीचा अभ्यास करताना माझ्या लक्षात आलंय की, देव ही संकल्पना माणसानेच निर्माण केलेली आहे. कारण उत्क्रांतीच्या काळात माणूस समाज करून राहू लागल्यानंतर देवाची कल्पना अस्तित्वात आली आणि समाज नितीनियमाने चालावा म्हणून धर्मही अस्तित्वात आला. आदिमानवाला देवाधर्माची कधी गरज लागलीच नाही. एवढेच काय आज माणूस सोडून इतर कुठल्याही प्राण्यांना देवाची गरज लागत नाही. आज विज्ञानाने विश्वाची निर्मिती कशी झाली, त्याचं कोडं उलगडलेलं आहे. त्यामुळे जगाचे चलनवलन कसे होते, त्याचा अंत कसा होणार आहे, या सगळ्या प्रश्नांची उत्तरे विज्ञानाने दिलेली आहेत. त्यामुळे काल्पनिक देवाच्या नावावर धंदे करणाऱ्या लोकांना आपण आर्थिक मदत देणं चूक आहे. पूजापाठ करण्याच्या नावाखाली ते आपले आर्थिक आणि मानसिक शोषण करत असतात. मग आपण शिकल्यासवरलेल्यांनी त्यांच्या शोषणाला का बळी पडावं? आपण जर विचारच करणार नसू तर आपल्या शिक्षणाचा उपयोग काय? "

त्यावर बाबा ताडकन म्हणाला, "हो, म्हणून काही श्रद्धा टाकता येत नाही ना? श्रध्देचं मूळच जर उखडलं तर आपल्या आयुष्यात राहिलं काय? तुझं विज्ञान कितीही पुढारलेलं असलं तरी ते सगळ्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाहीच. विज्ञानाच्या पलीकडे एक शक्ती आहे... ती म्हणजे देव. या देवाची वेगवेगळी रूपं वेगवेगळ्या दैवतांच्या रूपाने आपल्यासमोर येतात आणि देवाच्या आराधनेमुळे माणसाला संकटाशी दोन हात करण्याचं धैर्य येतं. माणूस माज न करता नम्र होतो. देवाच्या कृपामुळे चांगल्या गोष्टी होतात म्हणूनच त्याचा उत्सव सार्वजनिकपणे साजरा करणे आणि त्यासाठी खर्च करणे यामध्ये कोणाच्या पोटात दुखण्याचं कारण काय? हंऽऽ आता अतिरेकी आवाजाने आचकट विचकट धिंगाणा घालणे चूकच आहे, यातशंका नाही. म्हणून आपणच त्यात सहभाग घेऊन बदल केला पाहिजे ना? त्यासाठीच मी वर्गणी देतो."

"पण बाबा वर्गणी देणे एवढाच तुमचा सहभाग असतो. प्रत्यक्ष त्यांच्यात मिसळून कधीतरी त्यांचे तुम्ही प्रबोधन केले आहे काय? आणि दुसरं म्हणजे तुमच्या म्हणण्याप्रमाणे जर देवाला भजणारा भक्त माजोरडा न होता नम्र होतो असे असेल तर आज आपल्याला कित्येक तरुण देवाचे नाव घेत तोंडात गुटखा, मावा चघळत शिवराळ भाषेत विरोधकांना अत्यंत गलिच्छपणे बोलतांना दिसतात, त्यांना मारहाण करत असतात,

प्रसंगी झुंडबळीसुद्धा घेत असतात. त्याचे काय? देव ते बघत नाही का? की देवच त्यांना तशी बुद्धी देतो? म्हणजे ' देवाधर्मामुळे माणूस नीतीमान होतो आणि समाजात नीतिमत्ता टिकून राहते ', हा भक्तांचा भ्रमच आहे की नाही? डोळे उघडे ठेवून समाजात वावरलं तर असं दिसतं की, जे देवधर्म मानणारे आहेत ते बरेचदा सिग्नल तोडण्यासारखा लहानसा भ्रष्टाचार करण्यापासून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करत असतात. एवढंच नव्हे तर पुजारीही देवासमोरच देवळात बलात्कार करतात. अनेक बाबा, बुवा स्त्रियांचे शोषण करत असतात. विरोधी मत प्रदर्शित करणाऱ्यांना अंधभक्त अत्यंत गलिच्छ भाषेत आणि आईमाईवरून शिव्या देत व्यक्त होत असतात. की असे वागणे यालाच ते नीतिमत्ता समजतात? याचा अर्थ‘ देवधर्मामुळे नीतिमत्ता टिकून राहते ', हे विधानही आत्मवंचना करणारेच आहे, हेच सिद्ध होत नाही का? काका, मला तर असं वाटतं की, नीतिमत्तेने जगण्यासाठी देवाच्या भीतीपेक्षा विवेकी विचारांची गरज आहे. स्वतःच्या जबाबदारीवर जगण्याची आणि घेतलेल्या निर्णयाचे परिणाम भोगण्याची हिंमत बाळगण्याची गरज आहे."

यावर माझा मित्र परत काही बोलणार आणि परत वाद वाढणार हे लक्षण दिसायला लागल्यामुळे मी हस्तक्षेप करत त्या दोघांनाही थांबवत म्हटलं, " माझं जरा ऐकाल का? आता तुम्ही दोघे मला सांगा, तुम्ही ज्या विषयावर वाद घालत आहात आणि एकमेकांच्या उरावर बसत आहात त्याचा तुमच्या एकमेकांची असलेल्या नात्याशी काही संबंध आहे का? तुमचं नातं जीवशास्त्रीय, सामाजिक, भावनिक आणि कायदेशीररित्यासुद्धा अत्यंत जवळचं आणि घट्ट आहे. शिवाय ते तुम्हा दोघांनाही हवं आहेमग तुम्ही एवढे हमरीतुमरीवर यायचं कारण काय? दोन माणसांची भिन्न मतं असतात, हे साधं मूलभूत तत्व स्वीकारायला जड का जातंय तुम्हाला? ".. यावर दोघांनी पटल्यासारखी मान हलवली. तेव्हा मी तोच धागा पकडत दोघांनाही म्हटले, " तुम्ही दोघेही आपापल्या विचारांनी जगतांना नातं टिकवून ठेवायला तुम्हाला काय अडचण आहे? एकमेकांच्या मतांवर एकमेकांनी दबाव टाकला नाही म्हणजे झालं."

"हे बरोबर आहे काका, बाबांचा देवभोळेपणा मला पूर्णपणे अशास्त्रीय वाटतो, तरी ते त्यांचं मत म्हणून मी सोडून द्यायला तयार आहे. पण ते मात्र त्यांची सगळी मतं सतत माझ्यावर लादत असतात. सतत मला पूजेला बस, पूजा कर, देवाला नमस्कार कर, परीक्षेच्या आधी देवळात जा, असे सारखे माझ्या मागे लागलेले असतात. मी हे सगळं करायची टाळाटाळ केली की, ते मला सतत घालूनपाडून बोलतात, आणि सारखी चिडचिड करत असतात. मी धार्मिक समारंभात भाग घेत नाही याचा त्यांना संताप येतो. मग जग काय म्हणेल या भीतीपोटी ते माझ्यावर करवादत असतात. सगळ्यात त्रासदायक गोष्ट म्हणजे ते मला व्हाट्सअपवर सतत देवाच्या आरत्या, मंत्र, फोटो आणि काय काय पाठवत असतात, ज्याचा मला तिटकारा आहे."

त्यावर बाबा तवातावाने बोलू लागला, "अरे, हा विवेक, चार पुस्तकं काय शिकला, मुद्दाम माझ्या मताविरुद्ध वागायला लागला. म्हणजे असं बघ की, मी पूजा करत असताना हा मोठ्याने रेडियो काय लावतो, आम्ही

घरातल्यांनी मंदिरात जायचा प्लॅन केला की, हा कुठेतरी दुसरीकडेच जायचे ठरवतो. त्याच्या परीक्षेच्या आधी त्याच्याच भल्यासाठी मंदिरात जाऊन देवाची करुणा भाकून प्रसाद आणला तर प्रसाद खाताना - नशीब तो प्रसाद खातो तरी - पण खाताना ' मिठाई फार चांगली आहे ', म्हणून चेष्टा करतो. अरे, माणसात थोडी तरी श्रद्धा असावी की नाही? मी जेव्हा व्हाट्सअपवर त्याला देवाचे चांगले फोटो पाठवतो तेव्हा तो लगेच मला त्यावर तीर्थयात्रेला जाताना अपघात कसे झाले, देवाने भक्तांना कसे आपल्याजवळ ओढून नेले, असे कुचकट स्मायली टाकून प्रत्युत्तर देत असतो. मग राग येणार नाही तर काय होणार? अपघातात मेलेल्यांचं प्राक्तन म्हणून ते मेले. त्याचा देवाशी काय संबंध? "

गाडी परत रूळावरून घसरते आहे असे दिसल्यामुळे मी त्या दोघांनाही थांबवत म्हटले, "असं बघा, लहान रस्त्यावरून दोन मोठ्या गाड्या समोरासमोर आल्या तर दोन्ही गाड्यांचे अशिक्षित ड्रायव्हर समंजसपणे पुढे-मागे करून एकमेकांना जागा देत आपापल्या दिशेने निघून जातात आणि आपण एवढी शिकली सवरलेली माणसे एवढासुद्धा समंजसपणा आपल्या विरोधी मतांबद्दल दाखवू शकत नाही, याला काय म्हणावं? आपण खरंच सुशिक्षित आहोत का ते ड्रायव्हर? तुमच्या दोघांमध्ये टोकाचे मतभेद आहेत हे मान्य. पण त्या मतभेदामुळे तुमच्यात मनभेद होऊ नयेत एवढी तरी दक्षता तुम्ही घ्यायला हवीच ना? तेव्हा एकमेकांची मते एकमेकांना कितीही अप्रिय असली तरी आपण एकमेकांसमोर मांडायला हवीतच. फक्त ती एकमेकांवर लादायला नकोत. प्रत्येकाला आपापली स्पेस देणं महत्त्वाचं आहे. एवढा साधा नियम पाळला म्हणजे झाले. मग अशा प्रकारे वादावादी होणारच नाही आणि आपले संबंधही बिघडणार नाहीत."

"तुमच्या या आजच्या वादामुळे मला माझ्या तरुणपणातील एक प्रसंग आठवला. मी कॉलेजात असतांना आगरकर, गाडगेबाबा, विवेकानंद, काही प्रमाणात सावरकर, प्रबोधनकार ठाकरे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अशा विचारवंतांची पुस्तके वाचायला लागलो तेव्हापासून मला देवधर्मविषयक प्रश्न पडू लागले आणि त्याची योग्य उत्तरे माझ्या गुरुजनांनाच काय पण घरी धार्मिक कर्मकांड करायला येणाऱ्या गुरुजींनासुद्धा देता आली नाहीत. त्यांचे आपले एकच म्हणणे, 'आमचे वाडवडील करत आले म्हणून आम्ही करतो. त्यांनी 'धू' म्हटले आम्ही धुतले. प्रश्न विचारले नाहीतआणि सर्वात महत्वाचं म्हणजे, हे केल्यामुळे नुकसान तर होत नाही ना? मग झालं तर. पण त्यांच्या अशा वागण्यामुळे ते मानसिकरित्या धार्मिक गुलाम होत होते, हेच त्यांच्या लक्षात येत नव्हते. परिणामी मी मात्र देवाधर्मापासून लांब जाऊ लागलो. आमच्या घरातही कर्मठ वातावरण होते. लहानपणापासून माझ्यावरही देवाधर्माचे संस्कार थोपवले गेले होतेच. त्यामुळे अकरावीपर्यंत माझ्या गणपतीच्या आरत्या अगदी मंत्रपुष्पांजलीसकट पाठ होत्या आणि त्यासाठी लोक मला बोलवून घेऊन जायचे. माझ्या वडिलांना याचे फार कौतुक वाटायचे. पण हे करणे जसे मी बंद करू लागलो तसे माझे आणि वडिलांचे खटके उडू लागले. तेव्हा वडिलांना मी एकच सांगितले की, माझे विचार आणि तुमचे विचार यात दोन टोकाचे अंतर आहे. आता तुमच्या या वयात मी काही तुमचे विचार बदलू शकत नाही. तेव्हा तुम्ही

तुमच्या विचाराने जगा. मी माझ्या विचाराने जगण्याचा प्रयत्न करतो. आपण जर एकमेकांच्या विचारांचा एकमेकांवर दबाव टाकला नाही, एकमेकांवर ते लादले नाहीत, तर आपल्यात मतभेद असले तरीही मनभेद होऊन आपल्या संबंधात काही बिघाड होण्याचा प्रश्नच येणार नाही. एवढं जर तुम्ही मान्य केलंत तर यापुढे आपले खटकेही उडणार नाहीत. कसे कोण जाणे, पण वडिलांनी ते मान्य केलं आणि तेव्हापासून आमच्या घरातील या विषयावरील वाद बंद झाला. म्हणून मला वाटतं घरातील प्रत्येक निर्णय हा सगळ्यांनी मिळून चर्चा करून सगळ्यांच्या सहभागाने घ्यायला हवा. जर आपण घरातूनच अशाप्रकारे लोकशाही रुजवली तर मोठेपणी एक सुजाण नागरिक म्हणून देशाची लोकशाही टिकवण्यास मदत करू शकू. नाही का? "

यावर दोघांनी सहमती दर्शवली आणि बाबाने आपल्या मुलाच्या म्हणजे विवेकच्याखांद्यावर हात ठेवून सांगितलं की, "यापुढे मी तुझ्यावर कुठल्याही प्रकारची बळजबरी करणार नाही. तू आता मोठा झाला आहेस, स्वतंत्र विचार करू शकतोस, हे मी मान्य करतो. या माझ्या मित्राने कुठलाही उपदेश न करता अत्यंत साध्या सोप्या उदाहरणाने आज माझे डोळे उघडले. आतापर्यंत मी ' प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रः मित्रवदाचरेत् ' हे सुभाषित विसरलो होतो, ते आता यापुढे मी नक्कीच लक्षात ठेवीन."

मला मात्र मनातून वाटत राहिले की, एवढा समंजसपणा जर प्रत्येक घरातील बाप-लेकानी दाखवला तर अनेक घरातील प्रश्न आणि वाद मिटण्यास मदत होईल…. नाही का?

**श्री जगदीश काबरे, सांगली मो. 9920197680**



# 30. लेख - बाटली आख्यान - प्रा. डॉ.सतीश शिरसाठ



माझाजन्म पुण्यातला. मला आठवतं, तेव्हालहानमुलांना काचेच्या बाटलीतून कोमट दूधसाखर घालून प्यायला दिलं जाई. मी लहानपणी अशाच बाटलीतून दूध प्यालो. आमच्या घरी असलेल्या त्या दुधाच्या बाटलीच्या दोन बाजू उघड्याहोत्या. एका बाजूनेदूधटाकले जाई. दूध टाकल्यावर ती बाजू बंद करून ठेवली जाई. दुसऱ्या बाजूवर मेडिकलमधून आणलेलं प्लॅस्टिकचं बूच असे. त्याला छोटसं छिद्र पाडून त्यातूनलहान मुलं दूध पीत.

पुण्याहून आम्ही जुन्नर ला रहायला आलो. जास्त दिवस तिथं नाही राहिलो. तिथून आम्ही उदापूर या आमच्या गावी गेलो. तेव्हा गाव खूप लहान होतं. अनेक सोयी सुविधांचा अभाव होता. कुणी आजारी पडलंतर शक्यतो घरगुती उपाय केले जात. नाहीतरबाहेरचं (गंडे, ताईत वगैरे) पाहिलं जाई. डाॅक्टरचे उपचार करायचे असल्यास, जवळच्या ओतूर गावातील डाॅक्टरकडं जावं लागे. डाॅक्टरकडं जाताना औषधासाठी घरून एक बाटली स्वच्छधुवून न्यावी लागे. अनेकदा त्यात डाॅक्टर एक लाल रंगाचं औषध देत. बाटलीवर पांढरा कागद कापून त्याच्यावरषटकोनी खुणा केलेल्या असत. दिवसातून किती वेळा ते औषध प्यायचं, हे त्या खुणांवरून समजे.

हायस्कूलला जाईपर्यंत प्राथमिक शाळेत (त्याला आम्ही मराठी शाळा म्हणत असू) शाईने लिहिणे कंपल्सरी असे. त्यासाठी निळी आणि लालशाई छोट्या दौतींमधून भरावी लागे. या दोन दौती एका पत्र्याच्या डब्यात सिमेंटने पॅक केल्या जात. तो डबा धरायला तार किंवा जाड दोरी असे. त्या डब्यावर दोन टाक अडकवलेले असत. रोज शाळेत हा डबा न्यावा लागे. एकदा पाऊस खूप पडत होता. पाऊस लागू नये म्हणून डोक्यावर पोतं मुडपून केलेला घोंगता, एका हातात पिशवी (तिच्यात पाटी, पेन्सिल, वह्या आणि पुस्तकं) घेऊन मी अक्षरश: कसरत करत शाळेत जात होतो. रस्ता कच्चा होता. रस्त्यावर कढीसारखा चिखल झाला होता. पायात चप्पल नसायचीच. अशा परिस्थितीत रस्त्यातले दगड, काटेकुटे चुकवत मी सांभाळून चालत होतो. मागून एकजण सायकलवर चालला होता. तो अंगावर चिखल उडवून गेला. तोल जाऊन मी चिखलातरपकन आपटलो. डोक्यावरचा घोंगता, दप्तराची पिशवी, शाईच्या दौतीचा बाॅक्स चिखलात पडलं. सायकलस्वार पुढं जाऊनथांबला, त्याने एका दगडाला आपली सायकल उभी केली आणि माझ्याकडं येऊन मला त्यानं उठवलं.

अशा अवस्थेत शाळेत जायची सोय नव्हती. तसाच उठून घरी गेलो. घरामागच्या बंबातल्या पाण्यानं हातपाय धुतले, दुसऱ्या पिशवीत दप्तर भरून शाळेत गेलो. वडिलांनी (त्यांना मी काका म्हणत होतो) शाईच्या नवीन बाटल्या तयार केल्या आणि डब्यात भरून ठेवल्या होत्या.

मला आठवतं, घरी कुणीतरी पाहुणा आला होता. त्यालादारूची सवय होती. येताना त्याने पिशवीत दारूची बाटली लपवून आणली होती. दुपारी सगळीकडं सामसूम झाल्यावर पिशवीतून त्यानं ती बाटली घेऊन घरापासून दूर जाऊन अर्धीअधिक ढोसली. परत त्याने ती राहिलेली बाटली पिशवीत ठेवून दिली. काही वेळाने त्याला ती चढली आणि तो असंबद्धपणे बडबडू लागला. बाहेर जाऊन तो भडाभडा ओकलाही. घाबरून तो परत येऊन डोक्यावर गोधडी घेऊन झोपला. कुणीतरी काकांना हे सांगितलं. ते खूप संतापले. त्यांनी तो पाहुणा झोपला होता तिथं जाऊन त्याच्या डोक्यावरची गोधडी ओढून त्याला उठवलं. काकांचा तो अवतारपाहून तो गयावया करू लागला, त्याने काकांचे पाय धरले. काकांनी त्याची पिशवीजमिनीवर ओतली. त्यातून राहिलेली दारूची बाटली खाली पडली. काकांनी ती हातात घेऊनदूरफेकून दिली आणि ते तिथूननिघून गेले. थोड्या वेळाने पाहिलं तर तो पाहुणा आपली पिशवी घेऊन निघून गेला होता.

तेव्हा गावात लाईट नव्हती. अनेक घरांतून एखादाच कंदिल असायचा. घरातील लहान लहान बाटल्यांमध्ये रा ॅकेल भरूनबुचालाभोक पाडून जुन्या कापडाची वात करून दिवे केले जात. ते सगळ्या खोल्यांतून लावलेले असत. अनेक कुटुंबांतून रोजचे गोडेतेल आणि रा ॅकेलही बाटलीतून विकत आणले जाई.

पुढं मी शिकायला पुण्याला आलो. तिथं आल्यावर अनेक होस्टेलांवर मी नेहमी जाई. अशाच एका होस्टेलवरच्यामित्राने सांगितलेली एक आठवण —-

तिथं रहाणाऱ्याएका विद्यार्थ्यालासाप पाळायची सवय होती. बाटलीत तो साप बंद करून ठेवी. एकांतात तो बाटली उघडून सापाशी खेळे. त्याचा तो खेळ अंगाशी आला आणिएकदिवसबाटलीतला विषारी साप चावून तो मेला.

पुढे सावित्रीबाईफुले पुणे विद्यापीठात (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) नोकरीलालागलो. मला होमिओपॅथिकऔषध सूट होते म्हणून होमिओपॅथिक डा ॅक्टरांकडं जाऊ लागलो. ते साबुदाण्यासारख्या गोळ्या प्लॅस्टिकच्या लहान बाटल्यांमधूनदेत. औषध संपल्यावर मी त्या बाटल्या काहीतरी ठेवायला जपून ठेवू लागलो.

जीवनप्रवासात बाटल्यांनी मृत्यू दिला तसंच जगणं सुकर करण्यासाठीची औषधंही दिली. अनेक गरीब कुटुंबांनी बाटल्यांमधूनच जगण्यासाठी काहीबाही जिनसा आणलेल्या मी पाहिलं, अनुभवलं आहे.

**प्रा. डॉ. सतीश शिरसाठ, मोबाईल नं. ९९७५४३५१५२ ईमेल- sks.satish@gmail.com**



## 31. कविता - तीचित्रकार... - सौ. अर्चना गादीकर निकारंगे



*दूरवर बसून तिला आज*

*चित्र चितारताना पाहिले.*

*कॅनव्हा‍ॅसवर रेखाटलेल्या चित्रात*

*ती रंग भरताना दिसतहोती...*

*समोर पसरलेल्या रंगाच्या बाटल्या*

*जलतरंगाप्रमाणे जाणवत होत्या.*

*का कोण जाणे ती एक उत्तम*

*चित्रकार असल्याचे भासत होती...*

*पुस्तकातून कागदावर उतरवण्यात*

*ती ललना गर्क होती.*

*आजूबाजूचा विचार करायला ती*

*वास्तवात कुठे होती? ...*

*लांबसडक बोटांनी आधार मिळवून*

*कुंचला ती शिताफीने फिरवत होती,*

*त्या तिच्या कृतीतून*

*एक सुंदर कलाकृती जन्म घेत होती...*

*म्हणता म्हणता एक चित्र बनले,*

*ते पाहताच तिचे मन हरखून गेले...*

**सौ. अर्चना प्रमोद निकारंगे मो ९८२०३५०४०८**

## 32. कथा - असे ही रक्षाबंधन… - डॉ. शैलजा करोडे



हाॅस्पिटलच्या सर्व प्राथमिक पूर्तता केल्यानंतर मला बेड अॅलाॅट झाला. वाॅर्डमध्ये पोहोचताच मला ड्यूटीवरील मावशीने हाॅस्पिटलचे कपडे आणून दिले.

"ताई, तुमचे कपडे बदलून घ्या." मी कपडे बदलले

लगेच ड्यूटीवरील नर्स व ब्रदर आले. आय व्ही लावण्यासाठी माझी शीर (नस) लवकर मिळत नव्हती. दोन तीन ठिकाणी टोचले, मी खूप विव्हळले. एकदाची आय व्ही बरोबर लागली. त्यातूनच माझे ब्लड सॅंपल घेण्यात आले. लगेच व्हीलचेअर घेऊन वाॅर्ड बाॅय आला, "चला ताई X Ray साठी जायचंय, त्यानंतर टू डी एकोसाठी जायचंय. "एकामागे एक टेस्ट चालू होत्या. काल रात्रीपासूनच औषधे देऊन माझे बाऊल संपूर्ण रिकामे करण्यात आले होते. अशक्तपणा खूप आला होता. तहान तहान जीव झाला होता. बेडवर आणल्याबरोबर मला सलाईन लावण्यात आले. दरम्यानच्या काळात ज्यांच्या अंडर मी अॅडमीट होते ते आॅन्को सर्जनही येऊन गेले.

दुपारी चार वाजेला सर्जरी होणार होती. होय, माझे कॅन्सरचे निदान झाले होते. जेव्हा मला कळले तेव्हा तर माझी पायाखालची जमीनच सरकली होती. गर्भाशयाचा कॅन्सर ग्रेड टू पर्यंत पोहोचला होता. स्थिती मोठी गंभीर होती. आता काय, सगळंच संपलंय अशी माझी स्थिती झालेली. मन खिन्न, विदीर्ण झालेलं. शारीरिक वेदना तर होत्याच, पण मानसिक ताणही भरपूर होता… माझ्यासोबतच माझं कुटुंबही चिंतीत होतं,.. पण मला धीर देत होतं. माझी रात्रीची झोपही उडाली होती. अगदी जीवनाचा चलचित्रपट जणू डोळ्यांपुढून सरकायचा.

कॅन्सरसारख्या आजाराच्या उपचाराचा खर्चही भरपूर होणार होता. ऑपरेशननंतर आजाराच्या गंभीरतेप्रमाणे रेडिएशन व केमो थेरेपीचेही डोस लागणार होते. त्यावेळेसही हाॅस्पिटलायझेशन लागणार होतं. सोनोग्राफी, पेटस्कॅनसारख्या महागड्या टेस्टही कराव्या लागणार होत्या. शिवाय डाॅक्टरांचा दीर्घकालीन फॉलोअपही लागणार होता. एवढा पैसा आणायचा कोठून? माझ्या शिक्षिकेच्या नोकरीतील तुटपुंजे पेन्शन पासंगालाही पुरणार नव्हते. मोठा यक्ष प्रश्न होता.

कोणी सल्ला द्यायचा टाटा कॅन्सर हाॅस्पिटलला जा. तेथे मदत करणाऱ्या संस्थांचे पत्तेही मिळतील. शेवटी जनरल हाॅस्पिटललाच जायच्या निर्णयाप्रत मी आले. मुंबईला माझी भाची होती. तिच्यामुळे राहण्याचा प्रश्न तर सुटणारच होता, पण तिची मदतही खूप होणार होती.

... मुंबईसाठी मी रेल्वेने निघाले. आरक्षण असल्याने काही चिंता नव्हते. आरामात मी सीटवर विसावले. खिडकीतून येणाऱ्या गार वाऱ्याने माझा डोळा लागला. वडेवाला, चायवाला, आवाजाने मला जाग आली. कोणतेतरी स्टेशन आले होते. याच स्टेशनवरून साधारण तिशीच्या वयातील तरुण चढला. उंचापुरा देखणा रूबाबदार वाटत होता. त्याने सामान ठेवलंव थोडा विसावला. त्याची माझी नजरानजर झाली तशी तो बोलला, "अरे मॅडम तुम्ही कोठे निघालात? " माझ्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्ह पाहून तो वरमला. "मॅडम मला ओळखलं नाही? मी तुमचा विद्यार्थी प्रशांत".

"ओह प्रशांत. बालपणीचा चेहरा बदललाय रे तुझा. पटकन नाही ओळखता आलं मला. कसा आहेस? "

"हा बघा, तुमच्यासमोर आहे, कसा वाटतोय? "

"एकदम झकास"

"काय करतोस, शिक्षण झालं काय पूर्ण? "

"होय मॅडम, डॉक्टर आहे मी... एका नामांकित हॉस्पिटलला कॅन्सर सर्जन आहे मी."

"काय? प्रशांत तू कॅन्सर सर्जन आहेस? "

"होय मॅडम, असं का विचारलंत? "

"नाही रे तसं नाही. मी आता मुंबईला कॅन्सरच्या उपचारासाठीच निघालेय."

मग त्याला मी अथपासून इतिपर्यंत सगळं वृत्त सांगितलं.

"मॅडम मी असतांना जनरल हॉस्पिटलला जाण्यापेक्षा आमच्या हॉस्पिटलला या."

"नाही रे प्रशांत, एवढा खर्च मला नाही पेलवणार."

"पैशांची चिंता मी असतांना का करताय? मॅडम तुमची प्रेरणा, प्रेम, मायेनं मी इथपर्यंत येऊन पोहोचलोय... तुम्हीच मला घडवलंय मॅडम, आणि आज सेवेची संधी मला मिळतेय तर नाही म्हणू नका, हवं तर गुरूदक्षिणा म्हणा."

प्रशांत, माझा विद्यार्थी, अत्यंत हुशार, तल्लख बुद्धिमत्तेचा, शाळेत नेहमी पहिल्या क्रमांकावर... पण एक दिवस बहिणीसह शाळेतून घरी जातांना ॲक्सिडेंट झाला, प्रशांतची बहीण जागीच गतप्राण झाली. प्रशांतही जखमी होता, पण सुदैवानं वाचला. त्या दिवसापासुन प्रशांतचं आयुष्यचं बदललं, त्याचं कशात मन लागायचं नाही. अभ्यासात मागे पडला. अबोल, एकलकोंडा झाला. रक्षाबंधनाच्या दिवशी तर तो फारच हळवा व्हायचा.

मी प्रशांतला जाणत होते, त्याचं मन समजत होते, मी प्रशांतसाठी सुंदरशी राखी घेतली. कुंकू, निरांजन, दिवा, गोडाचा पदार्थ. मी प्रशांतला प्रेमानं घट्ट कवटाळलं, त्याला पाटावर बसवून औक्षण केलं, रक्षासूत्र बांधलं, तेव्हा प्रशांत धाय मोकलून रडला होता, मी त्याला रडू दिलं, त्याच्या दुःखाचा निचरा होऊ दिला. त्या दिवसापासुन सकारात्मक बदल दिसून आला. अभ्यासात त्याचं मन रमायला लागलं. पुढे माझ्या शाळेत असेपर्यंत मी त्याचं रक्षाबंधन केलं.

उच्च शिक्षणासाठी प्रशांत मुंबईला गेला. त्याच्या वडिलांची बदलीही मुंबईलाच झाली होती. सगळं कसं मनासारखं जुळून आलं होतं... आणि आज प्रशांत डाॅक्टर म्हणून माझ्यासमोर उभा होता. त्यानेच मला त्याच्या या मुंबईतील नामांकित हाॅस्पिटलला आणलं होतं, त्याच्या सिनियर सर्जनसोबत तो सुद्धा सर्जरीला उभा राहणार होता. मला धीर देत होता.

विचाराच्या भोवऱ्यात अडकलेली मी साडेतीन केव्हा वाजले मला कळलेही नाही. ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यासाठी वाॅर्डबाॅईजनी स्ट्रेचर आणले होते. प्रशांतची शिक्षिका म्हणून मी जणू व्ही आय पी पेशंटच होते त्यांच्यासाठी, कारण प्रशांतचं व माझं नातं गुरू शिष्याबरोबरचं, मातापुत्राचं, बहिण भावाचं सगळंच होतं.

मला ॲनेस्थेशिया देण्यात आला. डोळ्यात आसवांनी गर्दी केलेली. प्रशांतने अलगद मेडीकेटेड कापसाने माझे डोळे पुसले. आणि त्याने सोबत आणलेले रक्षासूत्र बाहेर काढले. "मॅडम एक दिवस हेच रक्षासूत्र बांधून तुम्ही मृतवत मन झालेल्या माझ्यात ही जीवनदायी संजीवनी फुंकून प्राणदान दिले होते. आज हेच रक्षासूत्र बांधून मी कॅन्सरसारख्या या जीवघेण्या रोगातून मुक्त करून तुम्हाला नवजीवन देईन. मला आशीर्वाद द्या मॅडम."

मी आशीर्वादाचा हात प्रशांतच्या माथ्यावर ठेवला. क्षणभर मलाही खूप बरं वाटलं. आणि कवी गोविंदाग्रजांची कविता मनात रुंजी घालू लागली

'क्षण एक पुरे प्रेमाचा ... वर्षाव पडो मरणांचा'

आणि ॲनेस्थेशियाच्या अधिपत्याखाली माझ्या नेत्र पापण्या केव्हा जडावल्या मला कळलेही नाही.

**डॉ. शैलजा करोडे, नेरुळ नवी मुंबई मो. 9764808391 ईमेल - karodeshailaja@gmail.com**



# 33. लेख - महाराज आणि तो... - श्री सुहास सोहोनी



१) सोन्याच्या सिंहासनावर बसून - सोन्याच्या दागिन्यांनी मढलेल्या महाराजांना - हातातून भस्म काढतांना बघून - तो अवाक् झाला!

२) महाराजांच्या हातून - अत्यंत मौल्यवान अशा भस्माचा प्रसाद घेतल्यावर - एका गरीब भक्ताच्या चेहऱ्यावरचा - गगनाला गवसणी घालणारा परमानंद - त्याने समक्ष पाहिला आणि त्याला गहिवरून आलं!

३) सुवर्णसिंहासनाच्या बाजूला ठेवलेल्या - सोन्याच्या टेबलावरच्या - खऱ्या खऱ्या द्राक्षांच्या घडातलं - एक एक द्राक्ष खाता खाता - डाव्या हाताच्या मुठीतून - एक हिरेजडित सोन्याची आंगठी काढून - ती एका धनवान भक्ताच्या ओंजळीत घालणाऱ्या - उदार महाराजांना पाहून - तो अक्षरशः भारावून गेला!

४) बृहस्पती, वाचस्पती आणि सूर्यासारख्या तेजस्वी अशा महाराजांच्या तोंडून बाहेर पडणारा - इंग्रजी प्रवचनातला प्रत्येक शब्द त्याने - सगळा अर्थ कळला नाही तरी - फुलासारखा झेलला आणि आपल्या कर्णसंपुटात साठवला!

५) सारा संसार असार आहे - विश्व म्हणजे मायेचा खेळ आहे - लोभ, मोह, संग्रहवृत्ती - म्हणजे नरकाप्रती नेणारा पापी मार्ग आहे - वगैरे वगैरे वगैरे - महाराजांच्या उपदेशामृताच्या महापुराच्या लाटेत - तो कुठल्या कुठे भेलकांडत गेला!

६) एखादी तरी सोन्याची प्रसादाची अंगठी - नाही तर एखादं लॉकेट - आपल्यालाही मिळायला हवं होतं, असा स्वार्थी, क्षुद्र, पापी आणि लोभी विचार त्याच्या मनाला शिवला - आणि दुसऱ्याच क्षणी आत्मनिर्भत्सना करून त्याला पश्चाताप झाला!

७) आणि तरी सुद्धा - आणि तरी सुद्धा - हाय फाय शिबिराच्या हाय फाय मंडपातून - रिकाम्या हाताने घरी परत जातांना - तो चिंतातूर जंतू -आणखीनच व्याकूळ झाला. महाराजांनी आपल्याला पाहिलं सुद्धा नाही याचं विलक्षण दु:ख त्याला झालं!

८) महाराजांच्या असीम कृपाप्रसादाचा लाभ मिळावा -म्हणून त्यांच्या चरणी स्वतःचे जीवन वाहण्याचा - त्याने त्याच क्षणी - निश्चय केला आणि मग मोठ्या समाधानाने तो रात्री गाढ झोपी गेला.

९) त्याच रात्री महाराजांच्या आश्रमावर धाड पडून - पाच हजार कोटींची माया पोलिसांनी हस्तगत केल्याची बातमी सकाळी त्याच्या कानांवर धडकली-आणि त्याला भूकंपाचा धक्का बसला. महाराजांसारख्या सात्विक, पवित्र, परम दयाळू, कनवाळू - आणि साक्षात ईश्वररूपी विरक्त संतावर होणारे हे पोलिसी अत्याचार पाहून त्याला पोलिसांचा संताप आला!

१०) पण मिळालेली संपत्ती पाच हजार कोटी रुपयांची नसून - केवळ एक हजार कोटी रुपयांचीच आहे - असा पोलिसांनी दुसऱ्याच दिवशी केलेला खुलासा ऐकून - त्याचा पोलिसांच्याही "प्रामाणिकपणाबद्दलचा" आदर द्विगुणित झाला!

११) महाराजांच्या जामीनासाठी दोन कोटी उभारण्याचा संकल्प - महाराजांच्या परमभक्तांनी केला -आणि याने बायकोच्या हातातल्या बांगड्या विकून - दहा हजारांचा आपला खारीचा वाटा - महाराजांची परम प्रिय शिष्या मैय्या मायादेवी - हिच्याकडे जमा केला!

१२) दोन वर्षानंतर - कारावासाच्या दिव्यातून - महाराजांची - सन्मानपूर्वक, निर्दोष सुटका झाल्यामुळे - त्याला जणू हर्षवायूच झाला! महाराजांच्या सत्कार मिरवणुकीमध्ये तो भान सुटल्यासारखा नाचत होता!

१३) त्यानंतर महाराजांचा भक्तगण लाखोंनी वाढला आणि त्यांच्या कीर्तीचा बोलबाला त्रिखंड भेदून गेला!

१४) आणि "तो"?

बायकोनं घटस्फोट दिलेला तो - अजूनही प्रसादाची अंगठी कधी मिळेल, याची वाट बघतोय!

**श्री सुहास सोहोनी, रत्नागिरी मो. ९४०३०९८११०**



## 34. कविता - मौन… - श्री प्रसाद साळुंखे



*मुक्याने पाहणे माझे, तुला कळलेच नाही.*

*शब्दांना धीट वागणे, कधी जमलेच नाही…*

*स्वप्नांची वाट चालुनी, पोचलो अंगणी तुझ्या,*

*धुक्याने तिथे रेंगाळणे, तुला कळलेच नाही…*

*चाहते भवती अनेक, गलबला भवती तुझ्या,*

*डोळ्यांनी मौन वेचणे, तुला सुचलेच नाही…*

*मन भावचिंब माती, अन तू सर ओझरती,*

*जसे सौम्य गंधाळणे, परी फुलणेच नाही…*

*अंधारमग्न राउळी, ठेवूनी कलेजा माझा,*

*एकचित्त तेजाळणे, पुन्हा विझणेच नाही…*

**श्री प्रसाद साळुंखे, २०१, रामेश्वरम को. ऑप. सोसायटी, प्लॉट नंबर २७६, वाशी गाव, सेक्टर ३१-अ, वाशी, नवी मुंबई - ४००७०३ मो - ९६ ६४०२७ १२७ ईमेल - salunkhe_prasad@yahoo.co.in**

# 35. कथा - उड्डाण... - श्री भरत खैरकर



मुंबईच्या भल्या मोठ्या सभागृहामध्ये अखिल भारतीय कुक्कुटपालन संघातर्फे संजयचा सत्कार होता... तो आपली पत्नी प्रिया सह सत्कार समारंभासाठी नागपूरहून मुंबईला संध्याकाळच्या फ्लाईटने निघाला होता... विमान आकाशात झेपावताच संजयला चार वर्षांपूर्वीचा कोरोना काळ आठवला... आणि ह्या वर्षातला संघर्ष त्याच्या नजरेसमोर आला.

संजय आणि त्याची पत्नी प्रिया पुण्याच्या एका नामांकित कंपनीत नोकरी करत होते. संजय स्वतः मेकॅनिकल इंजिनिअरहोता. तो एका नामांकित कंपनीमध्ये मेंटेनन्स मॅनेजर ह्या पदावर होता. त्याला जवळपास 20 ते 22 वर्षाचा अनुभव ह्या क्षेत्रातला होता. प्रिया सुद्धा एका नामांकित कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत होती. दोघांचा मिळून चांगला दीड दोन लाख पगार यायचा... पुण्यात असल्यामुळे दर विकेंडला आऊटिंगला जाणे, ट्रेकिंग करणे, कॅम्पिंग करणे, क्लबला जाणे, मित्रांसह पार्ट्या करणे, इत्यादी तथाकथित स्टँडर्ड लाईफ दोघेही जगत होते.

त्यांचा सुखी संसार चालू असतानाच अचानक आयुष्यात एक मोठा धक्का बसला. प्रियाचे बाबा म्हणजेच संजयचे सासरे, जे गावात कुक्कुटपालन व्यवसाय करत होते, त्यांचंकोरोनामुळे आकस्मिक निधन झालं. सासऱ्यांच्या जाण्यानं त्या व्यवसायाची सर्व जबाबदारी अचानक संजयवर आली. प्रियाएकुलती एक असल्याने तिचं कुटुंब संजयवर पूर्णपणे अवलंबून होतं, त्यामुळे त्याला हा व्यवसाय सांभाळणं भाग पडलं.

मध्यंतरी प्रियाचा चुलतभाऊ काकांच्या मृत्यूनंतर व्यवसाय बघायला लागला होता. त्याच्यावर विश्वास ठेवून पुण्यामधूनच संजय सगळे व्यवहार करू लागला... तो रोज फोनवरून रिपोर्ट घ्यायचा... पण जसजसे दिवस पुढे गेले... तसतसे चुलत भावाला रिपोर्ट देणे अपमानकारक वाटू लागले... तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला... व्यवस्थित रिपोर्ट न देता हळूहळू कंपनी कशी नुकसानीत आहे त्याबद्दल बोलू लागला... काकाने घेऊन ठेवलेले कर्ज वगहाण असलेली कुक्कुट पालनाची जागा याबाबत त्याने संजयला माहिती दिली. हे सर्व ऐकून प्रिया व संजयला दुसरा धक्का बसला. म्हणजे बाबांनी सर्व डोलारा केवळ कर्ज आणि लोन ह्या भरोशावर सांभाळला होता... 'बडा घर पोकळ वासा' म्हणतात तसा ते बिजनेस सांभाळत होते.

आता संजयच्या नागपूर-पुणे चकरा वाढल्या होत्या... तो दर शनिवारी नागपूरला जायचा व सोमवारी सकाळच्या फ्लाईटने पुण्यात येऊन नोकरी पकडायचा... हे मागील दोन वर्षे चालू होते... त्यामुळे त्याच्या तब्येतीची पार वाट लागली होती... इकडे पुण्यातही घरच्या कुठल्याही कामात त्याला लक्ष देता येत नव्हते...

मुलाचे दहावीचे वर्ष होते. नागपूरला वाढलेल्या चकराघराचं स्वास्थ्य बिघडवत होत्या... तरीही मुलाची दहावीची परीक्षा होऊ देणंमहत्वाचं होतं....

संजयने खूप विचार केला.... एवढ्या दिवसाची परमनंट नोकरी सोडायची का? आणि सोडल्यावर आपण ह्या नव्या व्यवसायात कसे टिकणार? त्यासाठी प्रियासह विचार विनिमय सुरू केला... तिनेही मगदुसऱ्याच्या घशातएवढी मोठी प्रॉपर्टी विनाकारण नको जायला... म्हणून कंबर कसली... आणि दोघांनीही नागपूरला येऊन व्यवसाय सांभाळायचा निर्णय घेतला...

कंपन्यांमध्ये रितसर राजीनामा देऊन मिळालेले पीएफचे, पीपीएफचे, ग्रॅज्युएटीचे पैसे काढून त्यांनी सगळेकर्ज पहिल्यांदा मिटवून टाकले...

संजयला कुक्कुटपालन व्यवसायाचं फारसं काही ज्ञान नव्हतं. पण कुटुंबाची जबाबदारी ओळखून त्यानं त्याच्या नोकरीचा राजीनामा दिला आणि व्यवसायात लक्ष घालू लागला. सुरुवातीच्या काही महिन्यांत त्यानं कामगारांवर विश्वास ठेवून व्यवसाय सुरू ठेवला, पण काही अडचणी येऊ लागल्या. कामगार त्याचा गैरफायदा घेऊ लागले, कधीही सुट्टी घेत, काही कामात हलगर्जीपणा करत. संजयला समजलं की व्यवसाय व्यवस्थित चालवायचा असेल तर त्याला नवीन मार्ग शोधावे लागेल.

त्यानं आधुनिक तंत्रज्ञानाचं सहाय्य घेऊन व्यवसायावर नजर ठेवायचं ठरवलं. त्यानं सर्व ठिकाणी CCTV कॅमेरे बसवले आणि व्यवसायावर ऑनलाइन नजर ठेवायला सुरुवात केली. त्यामुळं कामगारांचं वागणं बदललं, कारण आता त्यांना कळून चुकलं की त्यांच्या प्रत्येक हालचालींवर संजय लक्ष ठेवतोय. यामुळे कामात सुधारणा झाली.

संजयला अजूनही बऱ्याच अडचणी येत होत्या, पण त्यानं आपल्या कष्टानं त्या अडचणींवर मात केली. त्यानं कुक्कुटपालनासाठी काही नवीन तंत्रज्ञान आणलं आणि जोखमीनंव्यवस्थापन सुधारलं. लवकरच, त्याच्या व्यवसायाने भरभराटीला सुरुवात केली. आता त्याच्या कुक्कुटपालनातून मोठं उत्पन्न मिळू लागलं होतं, आणि गावात त्याचा व्यवसाय नावाजला जाऊ लागला.

संजयनेव्यवसाय वाढविण्यासाठी काही उपाययोजना केल्या. त्यामध्ये योग्य जातीच्या कोंबड्यांची निवड करणे, स्थानिक हवामानाशी सुसंगत आणि उच्च उत्पादन देणाऱ्या कोंबड्यांची जातीशोधणे, ब्रॉयलर मांस उत्पादनासाठी, लेयर्स अंडी उत्पादनासाठीतो वापरू लागला. कोंबड्यांना चांगल्या वातावरणात वाढण्यासाठी योग्य जागा आवश्यकअसते हे ओळखून त्याने फार्ममध्ये स्वच्छता, खेळती हवाराहील असे बदल केले. कोंबड्यांच्या आहारात योग्य प्रमाणात प्रथिने, खनिजे, आणि जीवनसत्त्वेयांचा विचार, नियमितपणे स्वच्छता,

लसीकरण, आणि योग्य औषधोपचार करणे यावर भर दिला. लसीकरण केल्यामुळे आजारांचं प्रमाण कमी झालं.

कामगारांची योग्य व्यवस्था आणि देखरेख अत्यंत महत्त्वाची असते हे संजयला माहिती होतं. कामगारांच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी CCTV कॅमेरे लावले. त्यांची येता जाता नियमित तपासणीसुरू केली. कोंबड्यांच्या आणि अंड्यांच्या विक्रीसाठी नागपूरसह संपूर्ण विदर्भात बाजारपेठामिळवल्या. स्थानिक बाजारपेठ, हॉटेल्स, रिटेल शॉप्स किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर विक्री वाढविली. कंपनीमध्ये वापरलेल्या सगळ्या मॅनेजेरिअल स्किल्स कुक्कुटपालना मध्ये संजयने वापरल्या... उपयोगी आणल्या... आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसायावर लक्षठेवू लागला. ऑनलाइन ॲप्स वापरूनसर्व व्यवसाय कॉम्प्युटराईज्ड केला.

स्वतःचे प्रशिक्षण व माहिती अद्ययावत ठेवत संजयने कुक्कुटपालनातील नवीन तंत्रज्ञान, फीड मॅनेजमेंट आणि बाजारातील ट्रेंड्सची माहितीमिळविली. फार्म चालवण्यासाठी येणाऱ्या खर्चाचं योग्य नियोजन केलं. खर्च कमी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान, उर्जेची बचत, आणि कचरा व्यवस्थापन यावर भर दिला.

कुक्कुटपालनासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेतसब्सिडी मिळविल्या. उत्पादन किती होतंय? अंडी किती मिळतायत? मांस किती तयार होतंय? यावर नियमित लक्ष ठेवूननफा-तोट्याचंचांगलं नियोजन केलं.

संजयचं धाडस आणि त्यानं कुटुंबासाठी केलेला त्याग हे सर्वांना प्रेरणादायी ठरलं. त्याच्या कामगारांनाही त्याचा आदर वाटू लागला आणि ते प्रामाणिकपणे काम करायला लागले. कुटुंबाची जबाबदारी ओळखून घेतलेला संजयचा हा प्रवास त्याला एक यशस्वी उद्योजक बनवून गेला. आणि तोच पुरस्कार, सत्कार स्वीकारण्यास आज विदर्भातील एका नामांकित कुक्कुटपालन कंपनीचा मालक संजय मुंबईसाठी उड्डाण करत होता...

**प्रा. भरत खैरकर, बी १/७, काकडे पार्क, तानाजी नगर, चिंचवड, पुणे ३३. मो. ९८८१६१५३२९.**



## 36. लेख - मळ्यातील सुंदर दिवस… - सौ. शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी)



-'माचीवरचा बुधा' या सिनेमातलं पशुपक्ष्यांनी गायलेलं आणि त्यांनीच संगीतबद्ध केलेल्या गाण्याचा व्हिडिओ लेकीनंमला व्हाट्सअपवर पाठवला. तो पहात ऐकत असताना वाटलं--' अरे हे तर सगळं अनुभवलंय आपण, आपल्या मळ्यात अन मळ्यातल्या त्या सुंदरदिवसांच्या आठवणींनी मन कातर झालं! --

आमचं मळ्यातलं घर थोडंसं उंचावरच होतं. दगड-मातीचं, सिमेंटचा गिलावा दिलेलं, पत्र्याचं छत असलेलं बैठं घर! दाराशी पायऱ्यांना लागून असलेला बाजूचा ओटा म्हणजे अप्पांची बैठकीची जागा. तिथे बसून अप्पा सकाळी गड्यांना मळ्यातली कामं वाटून द्यायचे. समोर अंगणात प्राजक्त, मोगरा, कर्दळी, कण्हेर ही फुलझाडं! तुळशी वृंदावनात असलेल्या कृष्णतुळशीला वाऱ्याने झोका दिला की पानांचा मंजिऱ्यांचा दरवळ पसरायचा… घराभोवती पपई, पेरू, शेवगा, हादगा, आणि दोन-तीन कडूनिंबाची मोठी झाडे अगदी राखणदारासारखे उभे! एकीकडे विहीर, गुरांसाठी डोणी अन् थोडे भाजीचे वाफे होते. दुसऱ्या बाजूला गायी वासरांचा गोठा, थोड्या अंतरावर निंबाच्या झाडाखाली रात्री बैल बांधले जात. घराला लागून शेतीच्या सामानाची अवजारांची खोली. घरासमोरून खालच्या बाजूने गाव-ओढ्याचा लहानसा पाट… फक्त पावसाळ्यात पाण्याने भरणारा आणि त्या पलीकडे आमचा समृद्ध मळा! ओढ्याचं पाणी मळ्यात जाऊ नये म्हणून सभोवती मोठी खडी मातीची ताल म्हणजे छोटा बंधारा… त्यावर चिंच, बोर, निंब, चंदन अशी काही झाडं. पांढऱ्या चाफ्याचे ही झाड आहे. या झाडांच्या मुळांनी ताल पक्की धरून ठेवलेली.

मळ्यांत तीन, अन घराजवळ एक अशा चार विहिरी आहेत. खालची, मधली अन् वरची अशीजमिनी -प्रमाणेच विहिरींची नावं. खालच्या विहिरीजवळ, आंब्याची डेरेदार चार झाडं होती. पूर्वी विहिरीला मोट होती नंतर इंजिनं आली. खूप मोठा दीडशे वर्षांहूनही जास्त वर्षाचा पिंपळ मळ्यात आहे. त्याच्या फांद्यांवर कित्येक पाखरांनी संसार थाटलेले. खारी, सरडे आणि साप नागही त्यावर आहे म्हणतात. पिंपळाखाली खोडात स्वयंभू श्री नृसिंहाची शिळा आहे. अप्पांनी पिंपळाला छान पार बांधून घेतला आहे. नरसिंहापुढे रोज तेलाचा दिवा व शनिवारी नारळ फोडला जात असे. पिंपळावरकुणीतरी मोठा नाग पाहिलेला होता. तो आमचा रक्षणकर्ता व आमच्या घराण्याचा मूळ पुरुष, पूर्वज आहे असेही म्हणतात. आम्हाला कधी त्याची भिती वाटली नाही…. विहिरीवर अंघोळ करून अप्पा ओल्याने रोजश्री नृसिंहाची पूजा करायचे. श्री नृसिंह आमचे कुलदैवत असल्याने आम्हा सर्वांचेच ते श्रद्धास्थान आहे. देव्हाऱ्यातहीनरसिंह मूर्ती आहेच.

या खालच्या विहिरीत घरातील लहान मुले पोहायला शिकली. अप्पा विहिरीत मुले पोहताना खालच्या पायरीवर निवांत बसून राहायचे. विहिरीच्या इंजिनने येणाऱ्या धो धो पाण्यात आम्ही बायका आडोसा करून आंघोळ करायचो. मुलं मनसोक्त पोहायची. धुणं धुवून पिंपळाजवळ वाळत घालायचं. पुरुषमाणसं वरच्या विहिरीत पोहून यायची मग सगळ्यांनी मिळून बरोबर बांधून आणलेली शिळी भाकरी, शेंगदाण्याची चटणी दही, कांदा अशी न्याहारी कितीतरी वेळा केली आहे. ती चव न्यारीच! ... मळा म्हटलं की आजूबाजूला मळेच मळे पसरलेले, दूरवर क्षितिजाची रेषा दिसायची पाटाच्या झुळुझुळू वाहणाऱ्या पाण्याने अन् सभोवतालच्या झाडांनी मळ्यात छान थंड वाटायचं.

दुपारच्या वेळी उन्हाची वा पत्र्यांची रखरख नको म्हणून पोती, सतरंजी घेऊन आम्हीमळ्यात झाडांखाली विश्रांती घ्यायचो... दुपार ओट्यावर रेंगाळू लागली की घरी! नाहीतर दुपारच्या वेळी आम्ही बायका जावा-नणंदा भुईमुगाच्या शेंगा फोडत बसायचो किंवा शेंगदाण्याचे लाडू, चटणी, कैरीचे लोणचे असे दुपारचे उद्योग असत. दुपारचा स्वयंपाक आई सोवळ्यात करीत. आम्ही फक्त मदत करायचो. ताक करायचं काम मी हौसेने करायचे. भिंतीजवळ खांबाला मोठ्ठी रवी त्याच्या दोरीसह कायम बांधून ठेवलेली असायची. ताक करायचं ते मोठ्या कासंडीत किंवा चक्क डेऱ्यात. त्यावेळी कुणीतरी कामाच्या बायका, त्यांची मुलं यायचीच. "वैनी ताक देता का वाईच" म्हणत वाडगा किंवा पेला पुढे करायच्या. ताक दिलं की जाताना दुवा द्यायच्या. तो पैशापेक्षा मोलाचा वाटायचा. ताक, दूध, तूप कशालाच कमतरता नव्हती. घरात नेहमी खरवसाच्या वड्या होत. एक वडी मुलांच्या हातात ठेवली की मुलं खूष होत... माझे सासरे पिंपळनेरचे वतनदार कुलकर्णी होते. गावात त्यांना मान होता व दिलदार म्हणून आदरही होता. तसाच दराराही होता.

.. संध्याकाळचा स्वयंपाक मात्र आम्हा सुनांकडे असायचा. सुरुवातीला चूल फुंकून फुंकून जीव कासावीस व्हायचा. नंतर मात्र सगळ्यांची पंगत बसली की प्रत्येकाच्या पानात गरम भाकरी पडेल एवढा सराव झाला. दिवेलागणीला गाई -गुर वासरांच्या ओढीने हंबरत आली की कोठा म्हणजे घराचा परिसर गजबजून जायचा गाई- वासरांची माया पाहून वाटायचं, यासारखी, म्हणजे गाय- वासरासारखीच माया आई -मुलात असावी म्हणूनच वसुबारसेला गाय -वासराची पूजा करतो आपण.! ही वेळ म्हणजे गाईच्या धारा काढायची वेळ. आई म्हणजे आमच्या सासुबाई गुडघ्यात चरवी धरून धारा काढायच्या. ते मात्र मला कधीच जमलं नाही.... संध्याकाळचे सूर्यास्ताचे रंग आकाशात फार सुंदर दिसायचे. ते विरघळून काळोख व्हायला लागला की त्यावर आजूबाजूच्या घरातले दिव्यांचे ठिपके उमलू लागायचे. मळ्यात लवकर रात्र व्हायची. विजेच्या दिव्यांचा सतत लपंडाव म्हणून जेवणं लवकर व्हायची. मग नातवंडापासून आजी-आजोबापर्यंत पत्त्यांचा नाहीतर सोंगट्यांचा डाव पडायचा. किंवा गप्पांची मैफल रंगायची. कौटुंबिक गप्पांतून एकमेकांची सुख दुःख, अडचणी, मांडल्या सोडवल्या जायच्या. कधी अंगणात बांधकरी, गडी यायचे. गप्पा व्हायच्या. भुताखेतांच्या गप्पा पण रंगायच्या. त्यात अंधारात थोडं जरी कुठे खुट्ट झालं किंवा गाई बैलांच्या गळ्यातील घुंगरू, घंटा वाजल्या की धडकी

भरायची. मनमोकळ्या गप्पांनी दिवसभराचा शिणवटा जायचा. रात्र चढायला लागली की अंगणात खाली, बाजांवर पथाऱ्या पसरायच्या. हे काम पुरुष मंडळी व मोठी मुले करीत... एक एक चांदणी उमलून आली की काळोखाचं भय वाटायचं नाही. दोन कुत्री होती.. मोत्या व वाघ्या, त्यांची गस्त चालायची. मांजरी व तिची पिले, मुलांच्या पांघरूणात पायाशी झोपायची. त्यामुळे विंचू काट्यांचं भय नव्हतं. गाई -बैलही सावध असत. रखवालदार ही सोटा आपटत मळाभर फिरायचा. रात्री मळ्यांत, तालीवरती झाडांवर काजव्यांची रोषणाई लक्ष वेधून घ्यायची. मंद वाऱ्यात चांदण्याची दुलई घेऊन शांत झोप लागायची. जाग यायची ती विहिरीतून पाणी काढतांना होणाऱ्या चक्र आणि दोरखंड याच्या तालबद्ध आवाजाने! ...

तांबड फुटूं लागलं की पक्षांचं मनोहारी गीत -संगीत, पंखांची फडफड, पानापानांतून त्यांचा कलरव सुरू व्हायचा. विहिरीच्या बाजूला सांडलेल्या पाण्याच्या तळ्यात ते आंघोळ पण उरकून घेत असावेत. अंगावरचंपांघरूण डोक्यापर्यंत ओढून सगळं शांतपणे नुसतं ऐकत राहावं असंच! पहाटेचे उषःप्रभेचे रंग मोकळ्या रानात फार सुरेख दिसायचे. पायरीवरूनच बालसूर्याचं दर्शन व्हायचं. अन् "दान पावलं.. दान पावलं" म्हणत वासुदेवाची स्वारी चिपळ्या वाजवत हजर व्हायची. त्याच्याभोवती बालगोपाळ जमा व्हायचे. थोडी ज्वारी अन पेलाभर दूध त्याला मिळायचं. घरातली मुलंही त्याच्याबरोबरच नाचायची. आईंनी गाईची धार काढली की, त्यांची आणि आमची मुलं, सुना, पेला भरून दूध घ्यायची. घट्ट दूध घातलेला चहा मात्र नंतर व्हायचा. खरंतर मला पहिला चहा घ्यायची सवय. आई म्हणायच्या "घेशील ग चहाआत्ता हे अमृत तर घे."

... वैशाख महिन्यात श्रीनृसिंह जयंतीला आम्ही सर्वजण आपल्या कुटुंबासह गावी मळ्यात जायचं हे अगदी ठरलेलंच! . नणंदाहीमाहेरपणाला यायच्या. मग वर्षभर प्रत्येकजण आपल्या सवडीप्रमाणे जात- येत होतो. पण वैशाखातली सर्वांची एकत्र येण्याची मजा वेगळीच. आंब्याच्या आढी लागायच्या. आंब्याच्या वड्या, पोळ्या, आंब्याचा रस घालून केलेल्या पोळ्या- भात, मजा येई. आंब्याचा रस करायची पद्धत मात्र वेगळीच. घरचा आंबा मोठा आणि गोड. मोठ्या पातेल्याला गुळाच्या ढेपेचंतरट स्वच्छ धुऊन बांधायचे. त्यावरच आंबा पिळायचा -घासायचा. श्रीखंडासारखा पातेल्यात घट्ट रस तयार व्हायचा. हे काम जरा ताकतीचं म्हणून पुरुष मंडळी करत. मग काय पैज लावून रसाच्या वाट्या फस्त व्हायच्या... हुरड्याच्या दिवसात पाखरांचे थवे, मोरांचा तांडा यायचा. त्यांना माचणावरुन गोफणीने गिलोरीने पळून लावावं लागायचं. माझी लेक त्यामुळे गिलोर खेळण्यात पटाईत झाली होती. अंगणातच आगटी करून ज्वारीची (गुळ भेंडी) कणसे भाजून, गोडसर कोवळा हुरडा त्याबरोबर हवं तर शेंगदाण्याची, लसणाची चटणी, गूळ, मीठ खाताना मजा येई. दोन वेळा हुरडा खाल्ला तरी मोकळी शुध्द हवा- पाणी.. सगळं पचायचं. पाहुणेरावळे येत.! ... सुगी म्हणजे वर्षभराची बेगमी.. तेव्हा 'खळं ' करायचं. कणसांच्या राशीची पूजा व्हायची. नंतर मळ्यातच मोठ्या चुलखंडावर नव्या ज्वारीच्या पिठाच्या भाकरी, झणझणीत वांग्याची भाजी, भरीत, भात, शेंगदाण्याची चटणी.. अन नव्या गव्हाची लापशी तर काहिली भरूनच गडी- बायका करायचे. गावजेवणाचा थाट व्हायचा. प्रत्येकाने आपली

थाळी -वाटी घेऊन यायचं. असं प्रत्येकाच्या रानामध्ये खळ्याचं जेवणं असायचं. खळ्याची गाणी ऐकताना छान वाटायचं.... नंतर ऊस आला. बरोबर गुऱ्हाळ आलं. सकाळी सकाळी आलं, लिंबूरस घालून उसाचा रस घेतला की न्याहरी नाहीच. मग घरचाच गूळ, त्याच्या साईच्या वड्या, गुडदाणी, काकवी हे नित्याचंव्हायचं. छोट्या फुलपात्रांनी लहानशा गुळाच्या ढेपी करून त्या येणाऱ्या जाणाऱ्याला दिल्या जायच्या. त्यांना रसही मिळायचा. गुळव्या, जाळव्या त्यांचे कुटुंबीय आणि मदतनीस या सर्वांची, आजूबाजूला लहानशी पालं पडायची. आमचं गु-हाळ तसं महिनाभर चालायचं पण आजूबाजूचा ऊस येऊ लागला आणि हळूहळू ते वर्षभर चालू राहू लागलं. त्यामुळे पाहुण्यारावळ्यांचाही राबता वाढला. मध्यम आकाराची गुळाची ढेप आणि काकवी, गुडदाणी देऊन त्यांचा पाहुणचार व्हायचा... गावापासून जवळच साखर कारखाना सुरू झाला आणि हे सगळं कष्टाचं काम बंद झालं. ऊस कारखान्याला जाऊ लागला. तरी पिवळ्या धम्मक, ताज्या, रवाळ गुळाची चव आजही जिभेवर रेंगाळते.!

खरं तर गावांत आमचा कुलकर्णी वाडा प्रसिद्ध, पण माझं लग्न झाल्यापासून आम्ही मळ्यांतच लहान घर बांधून राहात होतो. अनेकदा आम्ही मळ्यातच 'दिवाळी' साजरी केली आहे. सारवलेल्या अंगणात रांगोळ्यांचे रंग खुलून दिसायचे. आकाशात चांदण्या चमचमतात तसे पणत्या, दिवे, आकाशकंदिलाने घरं, कट्टा, कोठा, अंगण चमचमतं होतं. थंडीच्या शिरशिरेने वाऱ्याच्या लहरीवर कोवळ्या कणसांनी नटलेला हिरवागार मळा डौलदारपणे झुलत असायचा. असं देखणं लावण्य मंगलमय वाटत होतं... चैत्रात संध्याकाळी मावळतीच्या उन्हात झाडांच्या फांद्यांची सावली लांबवर पसरायची. मळ्यातला सोनेरी पाने झालेला पिंपळ सोसाट्याच्या वाऱ्याने सळसळायचा. वादळ येतंय असं वाटायचं. मृग नक्षत्राला सुरुवात झाली की पिंपळाची सळसळ थांबायची. तो शांत स्तब्ध व्हायचा. व मृगाच्या धारा अंगावर घेत.. पुढे सबंध पावसाळाभर तो पाऊस झेलत गप्प उभा असायचा.. एखाद्या तपस्व्यासारखा...!

घराच्या पत्र्यावर पावसाची अलवार सर आली की, -पावसाचा मंजुळ पावावाजायचा - तो ऐकत राहावा असाच..! पण पावसाचा ओला काळोख घरात आला की लहान मुले घाबरायची. आमची लेक तर बाबांच्या मांडीवरून उठायची नाही. मग तुळशीच्या कट्टयावरच्या गोष्टी आजी घरातच सांगायची. बाहेर चौफेर मृदगंध दरवळायचा. हळूहळू पाऊस थांबून सूर्यप्रकाशात मळ्याचा परिसर हिरवाईने नटलेला दिसायचा. अशावेळी हवाही छान असायची. मग काय.. धोतर, शर्ट आणि फेटा बांधून बैलाचे कासरे स्वतः धरून यांनी (स्वारींनी) कितीतरी वेळा आम्हा दोघी माय- लेकींना बैलगाडीतून फिरवून आणलंय.! ...

... आता किती वर्ष सरली.. वयही उताराला लागलंय. ऋतुचक्र, माणसं, बदलत आहेत. आता जुन्यांची जागा नव्यांनी घेतलीय. घराचे एक एक चिरे ढासळत गेलेत. अन् सगळंच हरवून गेल्यासारखं झालंय. जे होतं ते सारं आता सुंदर स्वप्नवत वाटते. माझ्याकडून मीही आठवणींची कवाडं बंद करतीय. पण.. विसरायचे ठरवले तरीही कितीतरी प्रसंग मनापुढे उभे राहिले. त्यांचे तुकडे जुळवताना आठवांचा एक एक मोती डोळ्यांतून

टपटपू लागलाय,... सगळंच अनावर झालंय...! डोळे टिपतेय तर.. तेवढ्यांत लेक दारात आलीच. "आई मला वाटलंच.. म्हणूनच मी... असं म्हणताना तिच्याही डोळ्यांत मेघ दाटून आलेत...

...खरंच मळ्यातले ते सुंदर दिवसविसरता येतील मला..?

***पिंपळाच्या पानांमधुनी***

***येई रानवाऱ्याची साद***

***वाट पहाते माझं रान***

***दूर तिथेच ओठंगून...***

***पाखरांची सुरात गाणी***

***झुळू झुळू पाटाचं पाणी***

***मोतीयांचा झुलतो मळा***

***सारा आनंदची आगळा...***

*(स्वरचित)*

**सौ. शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी), कोथरूड -पुणे मोबा. ९५९५५५७९०८**



## 37. काव्यानंद - “थट्टा अंगाशी आली” - रसग्रहण: सुश्री अमिता कार्णिक पाटणकर



*(चरणपूर्ती रचना- चरण -- मीच मला दिसेना)*

**☆ थट्टा अंगाशी आली ☆**

*निवांत वेळी नदी किनारी संध्याभेट झाली*
*नितळ जळावर प्रतिबिंबे सुंदरशी उमटली ||*

*हास्य विनोदे रंगून गेलो कौतुकात न्हाले*
*त्याच्या नयनी हासणारी मीच मला दिसले ||*

*हासत हासत त्याची थोडी थट्टा मी केली*
*संशयवात मनात शिरता अवतरला तो कली ||*



*सुश्री ज्योत्स्ना तानवडे*

*अंतरीचा डोह डहुळला काय करावे कळेना*
*किती पाहिले त्या दर्पणी मीच मला दिसेना ||*

*एवढेसे थट्टा विनोद का न याला रुचावे*
*मनाचे निर्मळपण का बरे न उमगावे ||*

*प्रेमभावनेत श्रेष्ठत्वाचा भाव कसा यावा*
*अहंकाराचा तोरा याचा कसा कमी व्हावा ||*

*ओळखते मी त्याला सारे जुळवून घेईन*
*नात्यात दोघेही समान त्यालाही पढवीन ||*

*शांत केले समजावूनी क्षमा याचना केली*

*गैर सारे दूर जाहले मने स्वच्छ झाली ||*

*अखेर हासला तो विजयाने घेई मज कवळुनी*

*हळूच पुसले अश्रू मी पण मानेला वळवुनी ||*

*असेन का मी नयनी त्याच्या मनास माझ्या कळेना*

*वेदनेचे धुके असे की मीच मला दिसेना ||*

***कवयित्री: सुश्री ज्योत्स्ना तानवडे. पुणे***

**रसग्रहण:**

संध्याकाळची रम्य वेळ. गर्दीपासून काहीशा दूर असलेल्या शांत ठिकाणी एक प्रेमी युगुल बसलं आहे. एकमेकांना बिलगून त्यांच्या गुजगोष्टी चालू आहेत- कधी प्रकट तर कधी मूक. क्वचित कधी रुसवे फुगवे, अबोला... पण काही क्षणातच पुन्हा मनोमिलन. अगदी श्रावणातल्या पावसाच्या खेळासारखं. आपल्या नजरेला हे एवढंच दिसतं. पण ते दोघे त्यांच्याच विश्वात हरवून गेलेले असतात. थोड्याशा अवधीत लक्ष लक्ष जीवनं जगत असतात.

*निवांत वेळी नदी किनारी संध्याभेट झाली*

*नितळ जळावर प्रतिबिंबे सुंदरशी उमटली ||*

*हास्य विनोदे रंगून गेलो कौतुकात न्हाले*

*त्याच्या नयनी हासणारी मीच मला दिसले ||*

कवयित्री ज्योत्स्ना तानवडे यांच्या ' थट्टा अंगाशी आली ' ह्या कवितेत हेच चित्र अगदी शब्दशः उतरलंय. प्रेमात अखंड बुडालेले 'तो' आणि 'ती' एका निवांत सांजवेळी भेटतात आणि एकमेकांत हरवून जातात. त्याच्या डोळ्यात तिला फक्त आणि फक्त तीच दिसते. त्याचं आपल्यावरचं प्रेम बघून ती हरखते. एक सुरेल प्रेम कथा कवयित्री आपल्यापुढे उलगडू लागते.

*हासत हासत त्याची थोडी थट्टा मी केली*
*संशयवात मनात शिरता अवतरला तो कली ||*

*अंतरीचा डोह डहुळला काय करावे कळेना*

*किती पाहिले त्या दर्पणी मीच मला दिसेना ||*

असंच एकदा गप्पांच्या ओघात तिने त्याची थोडी थट्टा केली. प्रेमाच्याच गप्पा नि प्रेमाचीच थट्टा! त्यात काय एवढं? पण नाही. मस्करीची कुस्करी झाली. तिच्या त्या अवखळ थट्टेने तो खवळून उठला. हा असा परिणाम तिला अजिबात अपेक्षित नव्हता. तिचं मन डहुळलं, विस्कटलं. त्याच्या डोळ्यातली तिची प्रतिमा तिला शोधूनही सापडेना. ती बेचैन झाली.

*एवढीसे थट्टा विनोद का न याला रुचावे*

*मनाचे निर्मळपण का बरे न उमगावे ||*

*प्रेमभावनेत श्रेष्ठत्वाचा भाव कसा यावा*

*अहंकाराचा तोरा याचा तसा कमी व्हावा ||*

*ओळखते मी त्याला सारे जुळवून घेईन*

*नात्यात दोघेही समान त्यालाही पढवीन ||*

*शांत केले समजावूनी क्षमा याचना केली*

*गैर सारे दूर जाहले मने स्वच्छ झाली ||*

*अखेर हासला तो विजयाने घेई मज कवळुनी*

*हळूच पुसले अश्रू मी पण मानेला वळवुनी ||*

तिला त्याचे वागणे उलगडेना. तो मला ओळखत नाही का? मी केली असेल थोडी थट्टा पण त्या मागचं माझं निर्मळ मन, माझं प्रेम त्याला दिसतच नाही का? त्याच्या अहंकारी स्वभावाची तिला चरचरीत जाणीव झाली. पण ती इतकी भाबडी, नितळ स्वभावाची आहे की सोशिकपणे, हर प्रयत्नांनी त्याला समजावत राहिली. शेवटी त्याची माफी ही मागितली. तेव्हा कुठे तो शांत झाला. शांत झाला; पण विजयाच्या भावनेने. हसला तेही जिंकल्याचे हसू. तिच्या क्षमायाचनेने त्याचा 'अहं' सुखावला आणि मग त्याने तिला मिठीत कवळले. पण तेव्हाच तिने मान वळवून हळूच आपले डोळे पुसले, ते तिला नमवल्याच्या आनंदात त्याला कळलेही नाही.

इथपर्यंतची ही कविता अगदी सरळ साधी प्रेम कहाणी. आपल्या अवतीभवती अगदी सर्रास दिसणारे दृश्य. पण शेवटच्या कडव्यात कविता वेगळंच वळण घेते.

***असेन का मी नयनी त्याच्या मनास माझ्या कळेना***

***वेदनेचे धुके असे की मीच मला दिसेना ||***

आता तिची बेचैनी वाढते. तिला प्रश्न पडतो की मघाशी हरवलेली मी त्याच्या नजरेत पुन्हा विराजमान झाले असेन का? माझं ते प्रेमाचं स्थान पुन्हा मला मिळाले असेल का? ती बघण्याचा प्रयत्न करतेही. पण आता तिच्याच नजरेसमोर वेदनेचं इतकं काही दाट धुकं पसरलंय की तिला काहीच दिसत नाही. अगदी ती स्वतःही नाही.

कवयित्रीने एका नवथर प्रेमिकेचे मनोव्यापार आपल्यापुढे अतिशय अलवारपणे उलगडलेले आहेत. नव्यानेच प्रेमात पडलेली 'ती', त्याच्या आपल्यावरच्या प्रेमाच्या जाणिवेने किंचित धीट होऊन त्याची थट्टा करणारी 'ती', तो रागावल्यावर आपलं काय चुकलं हे न कळून भांबावलेली 'ती', क्षणात समंजस होऊन, पड खाऊन त्याला समजावणारी 'ती' आणि त्याच्या वागण्याने खोलवर दुखावलेली, तो सल मनातच दडवून गुपचूपपणे अश्रू पुसणारीही 'ती'च. त्याच्या डोळ्यात पुन्हा डोकावण्याचं धाडस करेल तरी कशी? कदाचित ती असेल तिथे, पण तिच्या जीवाची वेदना, तिची घुसमट, कदाचित त्याच्या प्रेमाबद्दलची शंकाही, यांचं एक धूसर मळभ तिच्या डोळ्यांवर चढलं आहे. कालांतराने ते विरेलही. पण त्याचा व्रण मात्र तिच्या मनात कायम राहील.

.. एक विषण्ण हुरहूर लावून कवयित्रीची ही सुरेख कविता संपते. मात्र तिचे साधे सोपे शब्द, अनलंकृत भाषा आणि तरीही इतका मोठा आशय आपल्या मनात रुंजी घालत राहतो.

**कविता - सुश्री ज्योत्स्ना तानवडे, पुणे**

**रसग्रहण - सुश्री अमिता कर्णिक पाटणकर, मुंबई, ईमेल - amita7543@gmail.com मो - ९९२०४३३२८४**





## 38. कथा - सौदा - - - श्री सदानंद आंबेकर

नर्क चतुर्दशीला सकाळी दहा वाजताच तुषार बाजारात पोहोचला। ऐन दिवाळीच्या दिवशी गर्दी खूप होऊन जाते नि वस्तूंचे भाव उगाच वाढलेले असतात. म्हणून आजच सगळं घ्यायचं हा त्यानी विचार केला।

इतर वस्तूघेऊन झाल्यावर, मित्रमंडळी नि शेजाऱ्यांकरिता मिठाई म्हणून त्यानी शहरातील प्रसिद्‌ध दुकान-राजस्थान स्वीटस् मधून मिठाई घेतली नि रस्त्यावर उभ्या हातठेल्यावर सुटे फुलं, हार, आंब्याची पानं वगैरे घ्यायला थांबला।

ठेलेवाल्यानी सांगितले 'झेंडूची फुलं शंभर रुपये किलो ला येतील।'तुषार नी भाव कमी करा म्हटल्यावर तो दुकानदार आधी नाही म्हणाला, पण तुषार परत जाता पाहून तो एेंशी रुपयात किलो द्‌यायला तयार झाला। फुलं, पानं यांचे एकशे तीस रुपये झाले नि तुषारने त्याला शंभर नि पन्नासच्या नोटा दिल्या। शिल्लक वीस रुपये दुकानदार परत करत असतांना त्याला आठवलं की आत्ताच मिठाईच्या दुकानात साडेपाचशे रुपये किलोची मिठाई घेतली नि दहा रुपये सुध्दा कमी नाही झाले। हे आठवताच त्यानेठेलेवाल्याला म्हंटलं - 'दादा शिल्लक पैसे तुम्ही राहू द्‌या।'

पार्किंगमधून स्कूटर काढत असतांना तिथे एक दहा बारा वर्षांचा मुलगा हातांत मातीच्या पणत्या घेऊन आला नि पंचवीस रुपयांत वीस दिवे तरी घ्या अशी विनवणी करू लागला। तुषारने काही विचार करून वीस दिवे घेतले अन् घरी येऊन पोहोचला।


सामानाची पिशवी पत्नीला देताच तिनं इतर सामानासोबत फुलं आणि पणत्या पाहून विचारलं कीहे काय भावात आणले? शंभर रुपये सांगताच ती म्हणाली- 'तुम्हाला भाव करताच येत नाही, महागात वस्तू घेऊन येता। अन् हे दिवे कशाला आणलेत, मी कालच दारावर पंचवीस दिवे घेतलेत। तुषारने यावर काहीच उत्तर नाही दिले आणि तो आपल्या कामाला लागला।

दिवाळीच्या संध्याकाळी लक्ष्मीपूजन झाल्यावर घराच्या दारावर काल आणलेल्या फुलांची झालर आणि नवीन पणत्यांमधून येत असलेला निर्मळ प्रकाश बघून तुषारच्या चेहऱ्यावर एक वेगळा आनंद फुलला आणि... 'काल आपण जास्त पैसे खर्चून महागाचा सौदा नाही केला। त्या ठेलेवाल्याच्या दिवाळीच्याआनंदात आपण ही सहभागी झालो' असं त्याला वाटलं।

**श्री सदानंद आंबेकर, म नं सी 149, सी सेक्टर, शाहपुरा भोपाल मप्र 462039 मो - 8755 756 163 E-mail : ambekar.sadanand@gmail.com**

## 39. पुस्तक परिचय - प्रतिसाद - परिचय - सुश्री वीणा रारावीकर






***पुस्तकावर बोलू काही : प्रतिसाद***

***परिचय : सुश्री वीणा रारावीकर***

***लेखक - मनोज अंबिके***

***प्रकाशक - माय मिरर पब्लिशिंग हाऊस***

***पृष्ठ संख्या - ३८०***

***मूल्य - २९५ रुपये***

प्रतिक्रिया आणि प्रतिसाद यातील फरक काय? असा प्रश्न जेव्हा विचारला जातो, तेव्हा सर्वांनाच व्हॉट्सॲप स्नातकात फिरणारा हॉटेल - झुरळ- समस्त महिला वर्ग आणि वेटर ही पोस्ट आठवते. प्रतिक्रिया देणे म्हणजे मागचा पुढचा कोणताही विचार न करता तात्काळ उत्तर देणे. प्रतिसाद म्हणजे प्राप्त परिस्थितीत विचार करून उत्तर शोधणे. समस्येवर तोडगा शोधणे. लेखक मनोज अंबिके लिखित ‘प्रतिसाद’ या कादंबरीतील नायक अचानकपणे त्याच्या जीवनात उद्‌भवलेल्या परिस्थितीला कसा ‘प्रतिसाद’ देतो, याचे वर्णन केले आहे.

लेखक मनोज अंबिके यांनी व्यवस्थापन, मानसशास्त्र व अध्यात्म या विषयांवर गाढा अभ्यास केला आहे. एक तज्ज्ञ प्रशिक्षक, व्यवस्थापक, संपादक, लेखक म्हणून ते गेली २५ वर्षे काम करत आहेत. संवाद कौशल्य, मनाचे व्यवस्थापन, नेतृत्व अशा चाळीसहून अधिक विषयांवर त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात कार्यशाळा घेतल्या आहेत. त्यांचा हा सर्व अनुभव आणि ज्ञान या कादंबरीत प्रतिबिंबित झाला आहे.

सामान्य माणसाला अध्यात्म म्हणजे काय? ध्यान करायचे म्हणजे नक्की काय करायचे? ध्यान करताना मनात विचार इकडून तिकडे पळत असतात. हे बरोबर का चूक? साक्षी भाव म्हणजे काय? सर्वसाधारणपणे कोणताही भारतीय माणूस राम, हनुमान किंवा कृष्ण यांची भक्ती करत असतो. देवता म्हणून त्यांची पूजा

करत असतो. पण उपासना करायची म्हणजे काय? रामायण किंवा महाभारतातले संदर्भ वापरून या देवतांच्या गुणांचा उपयोग आपले जीवन परिपूर्ण होण्यासाठी कसा उपयोग करून घ्यायचा? हनुमानाचे गुण आपल्यात आत्मसात करायचे म्हणजे काय? अशा छोट्या मोठ्या शंका सामान्य वाचकाला नेहमीच पडलेल्या असतात. अशा असंख्य शंकांची उत्तरे या कादंबरीत सहजपणे वाचायला मिळतात.

अशा प्रकारची स्वतःला स्वतःची मदत करणारी अनेक पुस्तके बाजारात आहेत. तसेच अनेक युट्यूब वाहिन्यांवर अनेक गुरूंची भाषणे आहेत. पण सैद्धांतिक तत्वज्ञान असे वाचून किंवा ऐकून आपल्याला त्याचा व्यावहारिक जीवनात कसा उपयोग करायचा ते चटकन समजत नाही. एखादे व्याख्यान किंवा खूप मोठा गहन सल्ला देत आहे असा कोणताही भावनावेश न बाळगता लिहिलेली ही कादंबरी वाचकाला आकर्षित करते. आणि सामान्य माणसांच्या सर्व शंकाची उत्तरे इथे सापडून जातात. अतिशय ओघवत्या, सोप्या सहज, पचनी पडेल अशा भाषेत संवादरूपाने लिहिलेली ही कादंबरी आहे.

कादंबरीचा नायक, आदित्य एक तरुण. आपले कॉलेज जीवन संपवून आपल्या नवीन आयुष्याला सुरुवात करणार असतो. परीक्षेच्या शेवटी शेवटी मारुती त्याच्या स्वप्नात येऊन दर्शन देत असतो. ते स्वप्न पाहून तो घाबरून जात असे. पण त्यावेळी त्याला पुसटशी कल्पनाही नसते की पुढे काय मांडून ठेवले आहे. उद्या मुंबईला जायचे असे स्वप्न बघत तो शेवटचा पेपर देऊन हॉस्टेलवर परत येतो. आणि 'शेवटच्या पहिल्या दिवशी' अशा शीर्षकाने कादंबरीच्या पहिल्या प्रकरणाची सुरुवात होते.

आदित्यचे आई-वडील, आजोबा तो लहान असतानाच स्वर्गवासी झालेले असतात. होशगड येथे त्यांनी जीवनविद्या शिक्षण संस्था सुरू केलेली असते. आदित्यचे संपूर्ण शिक्षण हॉस्टेलवर राहून झालेले असते. आजोबांच्या सांगण्यानुससार आदित्यच्या शिक्षणाचा खर्च या संस्थेमार्फत केला जात असतो. हॉस्टेलच्या शेवटच्या दिवशी रानडे नावाचे एक सद्गृहस्थ त्याला होशगडला घेऊन जायला येतात. आदित्यचीमनःस्थिति दोलायामान असते. परंतु प्रिन्सिपलसरांच्या व रानड्यांच्या सांगण्यावरून तो तिथे जाऊन बघायला तयार होतो. अशा रीतीने कथानकाला सुरुवात होते.

आदित्य गावात पोहचतो. अर्थात इतकी अनेक वर्षे शाळा चालवणाऱ्या काही शिक्षकांना ते आवडत नाही. त्याच्या स्वागतासाठी सभा आयोजित केलेली असते. त्याने बोलायला सुरवात करताना माईक मधून जोरात शिट्टीचा आवाज येतो. सर्व विद्यार्थी जोर जोरात हसू लागतात. टाळ्या वाजवू लागतात. आदित्य एक-दोन वाक्ये बोलल्यावर परत तोच प्रकार. आदित्यच्या शाळेतील कामाला अशी सुरुवात होते.

गावाततल्या राजकारणारी लोकांना हाताशी घेऊन शिक्षकांचा एक ग्रुप आदित्यला "तुम्ही ही शाळा, हे गाव सोडून जा. नाहीतर शाळा बंद पडेल. यातच मुलांचे भवितव्य आहे. "असा दम देतात. आदित्य गाव सोडून जाण्याच्या तयारीत असतो. पण "ज्याने संकट दिलं, समस्या दिली तोच समाधान पण देत असतो. फक्त

जिथे समस्या आहेत, संकट आहेत, तिथे जाऊन थांब." गुरुजींच्या या सांगण्यानुसार तो संकटाला सामोरे जायचे ठरवतो.

शाळेतील पाण्याचा प्रश्न, मुलांना शाळेत येण्याचे गेट बंद झाल्यानंतर दुसरा पर्याय उपलब्ध करून देणे, प्रज्ञा परिक्षेला शाळेतील २०० मुलांना बसवण्याची व्यवस्था करून देणे, आदित्य असे एकामागोमाग एक प्रश्न सोडवत जातो. त्यातून हळूहळू शिक्षकांचा आणि विद्यार्थ्यांचा त्याला पाठिंबा मिळू लागतो. हे सर्व करत असताना गुरुजींचे आशीर्वाद, मार्गदर्शन याचा त्याला उपयोग होतो.

आपल्याला जीवनातील उद्देश समजत नाही. जीवनाकडून मिळणाऱ्या संकेतांवर अभ्यास केला तर आपल्या कार्याची दिशा समजते. जसा आदित्यच्या जीवनातील हनुमानजींचा प्रवेश हा कार्ययोजनेचा एक भाग होता.

गुरुजींनी प्रसाद म्हणून दिलेल्या पुस्तकाचे तो मनन करू लागतो. स्वप्नात पाहिलेल्या हनुमानाचे दर्शन त्याला गावात आल्या-आल्या होते. तेच चित्र तो या पुस्तकावर बघतो. मारुतीच्या एक एक गुणांचा अवलंब करत येणाऱ्या एक एक समस्या तो सोडवत जातो. पहिला धडा त्याला मिळतो तो म्हणजे समस्यांना सामोरे जायचे, तिथून पळ काढायचा नाही.

हनुमानाचे गुण - तो युद्धशास्त्रनिपुण होता. आपले दैनंदिन जीवनदेखील एक प्रकारचे युद्ध असते. घरी-व्यवसायाच्या ठिकाणी लहान-मोठे प्रश्न आपल्याला रोज सोडवावे लागतात. अशावेळी आपण हनुमानाचे गुण लक्षात घेऊन वागलो तर मदत होते. या कथानकातून हनुमानाची युक्ती, शक्ती, भक्ती अंगात कशी बाणायची हे सांगितले आहे.

युद्ध चालू करायच्या आधी कोणत्या भागावर प्रथम लक्ष केन्द्रित करायचे हे समजले पाहिजे. शत्रूला कामकुवत करायचे असेल तर त्याच्यासाठी कोणत्या प्राथमिक गोष्टी महत्वाच्या असतात हे ओळखले पाहिजे.

माणसाला आयुष्यात यशस्वी होण्यासाठी त्याची मूल्ये चांगली असायला हवीत. त्याचबरोबर त्याच्यावर योग्य संस्कार होणे आवश्यक असते. पण याला जेव्हा अध्यात्माची जोड मिळते, एखाद्या गुरूंचा आशीर्वाद पाठीशी लाभतो, तेव्हा तो माणूस समोर येणाऱ्या समस्यांनी डगमगून जात नाही. ते प्रश्न सोडवताना तो स्वतःचा, काम करत असलेल्या संस्थेचा, आजूबाजूच्या लोकांचा आणि समाजाचा विकास साधतो.

शाळेसमोर जोरजोरात भजन म्हणणाऱ्या लोकांना चहा-नाश्ता देऊन आदित्य त्यांना गारद करतो. प्रश्न सोडवण्यासाठी शत्रूशी देखील संवाद साधायचा असतो. हे मुत्सदी आदित्यने भजनी मंडळाचा प्रश्न सोडवताना दाखवून दिले.

कितीही मोठं वादळ आलं तरी जो माणूस त्याच्या मूल्यांना घट्ट धरून ठेवतो, अशा माणसाचा जीवन प्रवास कधीच भरकटत नाहीत. नाहीतर अनेक उच्च पदस्थ लोक कठीण प्रसंगात आपली मूल्ये हरवून बसतात आणि तिथून त्यांचा ऱ्हास सुरू होतो. "आपल्या जीवनातही चांगल्या गोष्टी वाईट केव्हा होतात? ज्या वेळेस ती चांगली गोष्ट नवीन चांगल्या गोष्टींना आत यायला बंदी घालते. "योग्य वेळेला योग्य गोष्टी घडणे आवश्यक आहे. हे समजून सांगताना गुरुजींनी, जेवणाचे आणि जेवणाच्या ताटाचे उदाहरण देऊन अतिशय सोप्या शब्दात आदित्यला समज देतात. प्रेम ही सुद्धा एक नैसर्गिक भावना आहे. पण खेळ खेळत असताना खेळाच्या बाहेर राहून आपली सर्व कर्तव्ये पार पाडायची असतात. भातुकलीच्या खेळाचे उदाहरण देत गुरुजींनी आदित्यचे शंका निरसन केले.

याच गोष्टी आदित्यने किशोरवयातील म्हणजे दहावीच्या मुलांना एक दिवसातील सुर्याच्या स्थित्यंतराचे उदाहरण देऊन समजावून सांगितली.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. नऊ वर्षात या पुस्तकाची सातवी आवृत्ती निघाली आहे. यावरून या पुस्तकाची लोकप्रियता लक्षात येते. या कादंबरीला मराठी वाङ्मय परिषदेचा सर्वोतकृष्ट पुरस्कार प्राप्त झाला आहे.

एखादी वेब मालिका चालू आहे अशी ही कादंबरी पुढे पुढे जात रहाते. घडणाऱ्या घटना, समस्या यांची आपण नीट नोंद केली, पेपरवर एक एक गोष्ट लिहून काढली, तर आपल्याला स्वच्छ स्पष्ट उत्तरे मिळू लागतात. "जीवन तुला शिकवेलच. जीवनाने तुला शिकवायच्या अगोदर तुझा अभ्यास पूर्ण झाला असला पाहिजे. त्यामुळे जीवनाची कुठलीही परीक्षा तू सहजपणे पार पाडू शकशील." गुरुजी हा संदेश जणू काही सर्व तरुणांनाच सांगत आहेत. समस्यांना विकासाची शिडी कशी बनवायची याचा मंत्र तरुणांना मिळतो. त्यांच्या जीवनाचा उद्देश शोधायला आणि तो पूर्ण करायला ही कादंबरी मदत करते.

गुरुजी आणि रानडे यांच्या तोंडून लिहिलेले अनेक संवाद जीवनाचे सार सांगून जातात. पण त्याचवेळी प्रसंगानुरूप अतिशय सोप्या शब्दात हे तत्वज्ञान मांडले असल्यामुळे कोणत्याही सामान्य वाचकाच्या ते सहज पचनी पडतं. वाचकांच्या छोट्या मोठ्या शंकांचे निरसन होते. घरात प्रत्येक घटनेला उत्तरे, प्रतिक्रिया दिलीच पाहिजे असे गरजेचे नसते. जीवनात प्रतिसाद कसा द्यावा हे लेखकाने इथे सांगितले आहे. सर्वांसाठी उपयुक्त आणि म्हणूनच सर्वांनी संग्रही ठेवावी अशी ही कादंबरी आहे.

**सुश्री वीणा रारावीकर, चर्चगेट, मुंबई मो ९८१९९८२१५२.**

## 40. कथा - सुखाचा त्रिकोण... - सुश्री रश्मी पटवर्धन



दुपारचे जेवण झाल्यावर रोहिणीताई आरामात पेपर वाचत बसल्या होत्या. तेवढ्यात कर्कश्यपणेदारावरची बेल वाजली. रोहिणीताईंनी जरा वैतागूनच दार उघडलं. दारात घामाघूम झालेले विनायकराव उभ्याउभ्याच विचारू लागले. “अहो, रोहिणीताई, रोहन आत्ता शाळेत गेला असेल ना? ”

“हो. तो शाळेत गेलाय.”

“नाही हो. त्याला पोलिसांनी पकडून नेलंय. मी पाहिलं आत्ता.”

“अहो, विनायकराव, काय बोलतायं तुम्ही. रोहनला कशाला पोलीस पकडतील? तो तर शाळेत गेलाय.”

“अहो, मी सावीला शाळेत सोडायला गेलो होतो. तेव्हा घरी परत येताना एका गल्लीच्या तोंडाशी मला पोलिसांची गाडी दिसली. पाच-सहा मुलांना पोलीस गाडीत बसवत होते. पंधरा-सोळा वयाचीच होती सगळी मुलं. सगळ्यात शेवटी शाळेच्या युनिफॉर्ममधील एका मुलाला पोलिसांनी गाडीत ढकललं. मला तो मुलगा रोहनसारखा वाटला म्हणून मी गाडीच्या जवळ जाऊन पाहिलं. तर तो रोहनच होता. दप्तरानं चेहरा लपवायचा प्रयत्न करत होता. मी पोलिसांना म्हटलंसुद्धा, “अहो, मी या मुलाला ओळखतो. त्याला कशाला गाडीत चढवलं? काय केलंय त्यानं? ” “य केलंय या मुलांनी? अहो, गर्दच्या पुड्या सापडल्यात या सगळ्यांजवळ. ही मुलं दिसतात लहान, पण महाबिलंदर आहेत. काळाचौकी पोलीस चौकीतनेतोय सगळ्यांना. चार फटके दिले की बोलतील घडाघडा सगळे. एवढे बोलून पोलिसांनी गाडी चालू केली. आणि क्षणार्धात ती गाडी दिसेनाशीझाली. कशीबशी रिक्षा पकडून मी तुमच्याकडे आलो.”

विनायकरावांना बोलताना धाप लागली होती. छातीवर हात ठेवून ते थोडावेळ शांतपणे बसले. रोहिणीताईंनाही गरगरायला लागले होते. दोन्ही हातांनी डोकं गच्च दाबून धरून त्या बसून राहिल्या. शेवटी विनायकरावच घाईघाईने रोहिणीताईंना म्हणाले, “चला आपण लगेच काळाचौकी पोलीस चौकीत जाऊ. चला उठा पटकन.”

अर्ध्या तासात दोघेजण पोलिसचौकीत पोहोचले. सगळ्या मुलांना एका बाकड्यावर बसवले होते. रोहन दप्तरात डोकं खुपसून रडत होता. रोहिणीताईंनी मायेनं त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. “काय झालं रोहनबाळा. का रडतोयंस? काय झालं?”

रोहनला रडण्याचा आणखीनच उमाळा आला. तो आजीच्या गळ्यात पडून हमसून हमसून रडू लागला. रोहिणीताईंनी थोपटून त्याला पोटाशी धरले.

एव्हाना पोलिसांनी मुलांना त्यांच्या पालकांचे फोन नंबर विचारून चौकीत बोलवून घेतले होते. थोड्याच वेळात रुचा आणि विवेक पोलिसचौकीत येऊन पोचले. तिथे आईला बघून रुचाला आश्चर्य वाटले.

“अगं, आई, तू इथं कशी? काय प्रकार आहे हा सगळा? ”

“रुचा, मलाही काही माहित नाही गं. विनायकरावांनी रोहनला पोलीस पकडून नेताना पाहिलं. धावतपळत येऊन मला सांगितलं आणि आम्ही इथे आलो. बस एवढंच.”

दरम्यान विवेक पोलीस इन्स्पेक्टरला भेटला होता. इन्स्पेक्टरनी रोहनकडे गर्द सापडल्याचं ऐकून तो हादरलाच. कसं शक्य आहे हे? विवेक कळवळून इन्स्पेक्टरला म्हणाला, “साहेब, तुमचा काहीतरी गैरसमज झालेला दिसतोयं. रोहनकडे गर्द असणं शक्यच नाही. किती लहान आहे तो. तो कुठून आणेल गर्द? आणि ही मुलं कोणआहेत? त्यांच्याबरोबर का बसवलंय तुम्ही रोहनला? त्याचा काय संबंध आहे त्या मुलांशी? ती काही त्याच्या शाळेतली नाहीत. झोपडपट्टीतली वाटतात.”

इन्स्पेक्टर शांतपणे म्हणाले, “बरोबर आहे तुमचं. तुमचा मुलगा वेगळाच आहे त्या मुलांपेक्षा. शिवाय शाळेच्या युनिफॉर्ममध्ये आहे. म्हणजे शाळेत जात असणार. पण शाळेत जाऊन तो काय उद्योग करतो ते कधी विचारलंत का त्याला? गर्द सापडलंय त्याच्या दप्तरात. शाळेच्या मागच्या बाजूच्या ग्राउंडवर सापडली ही सगळी मुलं. गर्द अजूनही त्याच्या दप्तरातच आहे. आम्ही हातही लावला नाही त्याच्या दप्तराला. तुम्ही हवंतर खात्री करून घ्या.”

विवेकनं इन्स्पेक्टरांच्या टेबलवरचं रोहनचं दप्तर ओतलं. त्यातून गर्दची पुडी बाहेर पडली. विवेकला काय बोलावं तेच सुचेना. पोलिसांनी रोहनला रंगेहात पकडलं होतं. पोलीस आता त्याला काय शिक्षा देणार या विचारात तो होता. तेव्हढ्यात इन्स्पेक्टर त्याला म्हणाले, “रोहन चांगल्या घरातला मुलगा दिसतो. पण त्याला संगत वाईट लागलेली दिसते. वेळीच सावध व्हा. रोहन पहिल्यांदाच सापडलाय. शिवाय वयही कमी आहे म्हणून फक्त वॉर्निंग देऊन सोडून देतोय. पण सांभाळा तुमच्या मुलाला. पुन्हा जर असा गुन्हा करताना सापडला तर आम्ही काही करू शकणार नाही. शिक्षा म्हणून सुधारगृहात पाठवावे लागेल त्याला. या आता तुम्ही. घेऊन जा तुमच्या मुलाला.”

विवेक रोहनला इन्स्पेक्टरच्या केबिनच्या बाहेर घेऊन आला. बाकीची पोरं निर्ढावल्यासारखी इकडेतिकडे बघत बाकड्यावर बसून होती. पोलिसचौकीच्या बाहेर दहा-बारा बायकामाणसांचा आमच्या पोरांना सोडा म्हणून गलका चालला होता. हवालदार कोणालाच आत सोडत नव्हता.

रोहनला घेऊन सगळेजण रोहिणीताईंच्या घरी आले. रोहनला कोणीच काही विचारले नाही. तोही मानखाली घालून गुपचूप बसून होता. झाल्या प्रसंगाने ओशाळला होता. खरंतर गर्द म्हणजे काय हे त्याला माहितही

नव्हतं. शाळेच्या ग्राउंडवर खेळत असताना त्यानं त्या मुलांना पाहिलं होतं एक दोनदा. बोलला नव्हता कधी त्या मुलांशी. तसाही रोहन शाळेत फारसा कुणाशी बोलत नसे. एकटा एकटाच राहत असे. टिफिनही एकट्यानेच खात असे. अधूनमधून मम्मी-पप्पाचं वागणं आठवून रडत असे. असेच एकदा तो रडत असताना त्याला त्या मुलांनी पाहिले. खुणेनंच त्याला शाळेच्या कंपाऊंडजवळ बोलावलं. का रडतोस म्हणून विचारलं. पण त्यावेळी रोहननं त्यांना काही सांगितलं नाही.

ती मुलं रोजच रोहनला पाहत होती. त्याच्या रडण्याचं कारण विचारत होती. हळूहळू रोहनची भीड चेपली. ती मुलं त्याला जवळची वाटायला लागली. तो त्यांना पप्पाचं दारू पिणं, घरात रोज मम्मी- पप्पांची होणारी भांडणं, दोघांचं घरी उशिरा येणं, त्याच्याकडं दुर्लक्ष करणं अशा एकेक गोष्टी सांगू लागला.

ती मुलं त्याला धीर देत. "अरे, हमरा बाप भी दारू पिके आता है. हमे पिटता है. मगर हम उसकी बाते सुनते ही नहीं. वो घर आया की हम घरसे भाग जाते है. तू डर मत. तेरे पापाभी सुधर जायेंगे."

एक दिवस ती मुले त्याला म्हणाली, "रोहन, तेरे दर्दके लिये हमरे पास एक भन्नाट आयडिया है. लेकीन उसके लिये तेरे पास पैसे चाहिये. तू तेरे घरसे पैसे लेके आ, फिर हम तेरेकु वो चीज देंगे. एक बार तुमने वो दवा ली, तो तेरे सब दर्द खतम. एकदम हल्का लगता है. हम हवामे उडने लगते है. सपनोंकी दुनियामे चले जाते है. सोच ले एक बार और पैसे लेके आ."

दुसऱ्या दिवशी रोहनला ती मुलं भेटली. त्यानं त्यांच्याकडं ते स्वप्नाच्या दुनियेतलं औषध मागितलं. त्याच्याकडं पैसे नव्हते. पण एक महागडी कॅडबरी होती. ती त्याने त्या मुलांना देऊ केली. कॅडबरी पाहून मुलांच्या तोंडाला पाणी सुटलं. कॅडबरीच्या बदल्यात एक पुडी द्यायची का त्याला? त्यांच्यात वाद सुरु झाला. गर्दच्या बदल्यात पैसेच घ्यायचे असं त्यांच्या म्होरक्यानं त्यांना बजावलं होतं. पण कॅडबरीचा मोहही त्यांना सुटत नव्हता. त्यामुळं दादाचा मार खावा लागला तरी चालेल पण आज कॅडबरी खायचीच म्हणून त्यांनी शाळेच्या कंपाऊंडच्या फटीतून गर्दची एक पुडी हळूच त्याच्याकडे सरकवली होती. पण ती पुडी त्याच्याकडं सरकवत असताना नेमकं गस्तीवरच्या पोलिसानं पाहिलं आणि गुपचूप पोलिसांची गाडी बोलावून घेतली. एकेकाला हंटरने बडवत गाडीत चढवत असतानाच विनायकराव तिथे आले आणि त्यांनी रोहनला पोलिसांच्या गाडीत बसताना पाहिलं.

घरी आल्यावर रोहिणीताईंनी सगळ्यांना सांगितलं की "आत्ता रोहनला काहीच विचारू नका. घाबरलाय पोर. जरा त्याच्या कलानं घेऊ. सांगेल सगळं हळूहळू. आजच्या दिवस राहू दे त्याला इथंच. उद्या इथूनच मी त्याला शाळेत सोडून येईन. शाळेत कळायला नको कुणाला उगीच."

"बरं. ठीक आहे." म्हणून रोहनचे मम्मी-पप्पा ऑफिसला निघून गेले.

रोहिणीताईंनी रोहनला बळेबळे जेवायला घातले. त्यानं कसेबसे चार घास खाल्ले आणि बेडरुममध्ये जाऊन पलंगावर पडून राहिला. रोहिणीताई त्याच्याजवळ येऊन बसल्या. त्यांना आलेले पाहताच रोहननं पांघरूण डोक्यापर्यंत घेऊन झोपेचं सोंग घेतलं. रोहिणीताईंनी थोडावेळ वाट पाहिली. रोहन मुसमुसत होता. त्याला आपली चूक कळली होती. त्याला रोहिणीताईंना सगळं सांगायचं होतं. पण त्याचा धीर होत नव्हता.

थोड्यावेळानं रोहिणीताईंनी हळूच त्याच्या डोक्यावरचं पांघरूण दूर केलं. रोहननं हातांनी तोंड झाकूनघेतलं आणि पुन्हा मुसमुसू लागला. रोहिणीताईंनी त्याचं डोकं मांडीवर घेतलं. त्याला थोडावेळ शांत होऊ दिलं. मग रोहनच बोलायला लागला.

“आज्जी, माझं चुकलं गं. मी त्या मुलांचं ऐकून ती पुडी घ्यायला नको होती. पण मला माहित नव्हतं आणि अजूनही माहित नाही त्या पुडीत काय होतं ते. त्या मुलांनी मला सांगितलं होतं की, या पुडीतलं औषध घेतलंस की तू तुझं सगळं दु;ख विसरून जाशील. तुला एकदम हल्क वाटेल आणि तुला हवेत उडत असल्याचा भास होईल.”

रोहिणीताई समजुतीच्या स्वरात म्हणाल्या, “पण रोहन, मला एक सांग, तुला असं कोणतं मोठं दु;ख आहे, जे तुला विसरायचंय. तुझे मम्मी-पप्पा तुला हव्या त्या सगळ्या वस्तू तू मागितल्याबरोबर आणून देतात. कधीकधी तर तू न मागताच तुला सगळं काही मिळतं. मग तुला आणखी काय हवंय? ”

“मला फक्त माझे मम्मी-पप्पा हवेत. त्यांचा वेळ हवाय मला. माझ्याकडं लक्षच देत नाहीत ते. सारखं आपलं ऑफिस, मित्र-मैत्रिणी, पार्ट्या, शॉपिंग, आऊटिंग, मोबाईलवर चाटिंग आणि उरलेल्या वेळात भांडणे. त्यांना आऊटिंगला जायचं असलं की मला पाठवतात तुझ्याकडं. मी नकोय त्यांना. आणि ते तरी एकमेकांना कुठे हवे आहेत? सारखे एकमेकांशी भांडत असतात. कोण चुकीचं आणि कोण बरोबर यावरून रोज भांडण असतं. कधीच शांतता नसते घरात. सारखी आपली दोघांची वटवट चालू असते. मला कंटाळा आलाय त्यांचा. मला नकोत माझे मम्मी- पप्पा. मी सोडणार आहे त्यांना... रोज मला वाटतं, मम्मीने मला जवळ घ्यावं. आज शाळेत काय गमतीजमती झाल्या ते विचारावं. मम्मीने स्वतः स्वयंपाक करावा. मग आम्ही तिघांनी मिळून एकत्र जेवायला बसावं. हसत-खेळत जेवण झाले की मम्मीने किंवा पप्पाने जवळ बसून माझा होमवर्क घ्यावा... पण असं कधीच होत नाही. मी शाळेतून आल्यावर फ्रीजमधलं काहीतरी गारढोण अन्न खाऊन खेळायला जातो. खेळून आल्यावर माझ्या खोलीत जाऊन होमवर्क करतो. नंतर रात्रीच्या जेवणात बाहेरून मागवलेलं ते बेचव सूप, नूडल्स किंवा पुलाव, बिर्याणी खाऊन माझ्या खोलीत जाऊन चित्र काढत बसतो किंवा गेम खेळत बसतो.”

“हल्ली मम्मी-पप्पा रोज भांडत असतात. दोघंही उशिरा घरी येतात. मग उशीर का झाला त्यावरून वादावादी. मी घरी एकटाच असतो याचं कोणालाच काही वाटत नाही. पूर्वी मम्मा लवकर घरी यायची. आल्यावर मला

जवळ घेऊन बसायची. पण आता मम्मा उशिरा येते. पार्टीहून आली असेल तर ड्रिंकही घेतलेले असते. कधीकधी डायरेक्ट झोपायला निघून जाते. कधीकधी टीव्ही बघत बसते. लहर असेल तर जेवते. नाही तर तशीच झोपते. मी दिवसभर काय करतो, जेवलो की नाही, अभ्यास केला की नाही हे काही विचारत नाही.”

“आणि पप्पा नाही का तुझी चौकशी करत? ”

“पप्पाचंही तेच. पूर्वी आठवड्यातून एक-दोनदा बाहेरच ड्रिंक घेत असे. पण आता रोजच ड्रिंक घेतो. मग त्याला माझी आठवणही येत नाही. मी माझ्या खोलीत बराच वेळ जागाच असतो. मला आता अभ्यास करावासा वाटत नाही आणि शाळेतही जावंसं वाटत नाही. माझे अभ्यासात लक्ष लागत नाही. मी कदाचित नापासही होईन.”

“रोहन, अरे, लहान मुलांनी मोठ्या माणसांच्या गोष्टीत लक्ष घालू नये. किती कष्ट करतात ते दोघंजण. दमून जात असतील.”

“त्यांना काय झालंयं दमायला? दिवसभर ऑफिसात बसायचं आणि नंतर पार्ट्या करायच्या. मला काय हवंयं ते नको का समजायला त्यांना? .. आता बघं हं, दोन दिवसांपूर्वी मम्मा वेळेत घरी आली होती. पप्पाने घरी यायला उशीर होईल म्हणून फोन केला होता. मी आणि मम्मानं जेवण केलं आणि आम्ही दोघं आईस्क्रीम खायला गेलो. आम्ही परत येत असताना पप्पाची गाडी दिसली. मी पप्पाला हाक मारली. पण पप्पा गाडी न थांबवता जोरात पुढे निघून गेला. गाडीत पप्पाबरोबर कोणीतरी बाई होती. कोण होती ते आम्हाला नीट दिसलं नाही. पप्पा घरी पोचला असेल म्हणून आम्ही घाईघाईने घरी आलो. पण पप्पा घरी आलेला नव्हता. बराच वेळ आम्ही पप्पाची वाट पाहिली. तो घरी आला नाही म्हणून मम्मानं त्याला फोन केला. पण त्यानं फोन उचलला नाही. शेवटी कंटाळून आम्ही दोघे झोपायला गेलो. खूप दिवसांनी मम्मा बरोबर फिरल्याने मला बरं वाटत होतं. मला लगेच झोप लागली. मध्यरात्री जाग आली तेव्हा मम्मी-पप्पा जोरजोरात भांडत होते. शेवटी मम्मा वैतागून हॉलमध्ये सोफ्यावर येऊन झोपली. नंतर थोड्या वेळाने पप्पा हॉलचे दार जोरात आपटून घराबाहेर निघून गेला. नंतर रात्री परत घरी आलाच नाही.”

“अरे बापरे, मग केव्हा घरी परत आला? ”

“दुसऱ्या दिवशी रात्री मम्माने त्याला बऱ्याच वेळा फोन केल्यावर घरी आला. त्याने ड्रिंक घेतले होते. मम्माने त्याला तू इतका वेळ कुठे होतास म्हणून विचारले तर वसकन तिच्या अंगावर ओरडला व स्वतःची bag भरून घराबाहेर निघाला होता. मम्मीने त्याला खूप वेळा सांगितले की तू घराबाहेर जाऊ नकोस. पण तो ऐकतच नव्हता. `मला तुमच्याबरोबर राहायचे नाही. मी तुमच्यापासून लांब निघून जाणार` असे सारखे म्हणत होता. शेवटी मी त्याचे पाय घट्ट धरून ठेवले व मी पण तुझ्याबरोबर येणार म्हणून हट्ट धरला.

मग थोड्या वेळाने पप्पा बेडरूममध्ये निघून गेला व दार आतून लावून घेतले. मम्माने बराच वेळ दार वाजवले पण त्याने दार उघडलेच नाही. दाराच्या पीपहोल मधून पहिले तर पप्पा कपडे न बदलता, बूट न काढता तसाच झोपला होता. मग मी व मम्मा माझ्या खोलीत झोपलो."

"दुसऱ्या दिवशी सकाळी मी उठून शाळेची तयारी केली तरी दोघेही उठले नव्हते. सुमननं मला टिफिन दिला. मी शाळेत गेलो आणि तेव्हाच मला त्या मुलांनी त्या औषधाबद्दल सांगितलं. मग दोन-तीन दिवसांनी मला म्हणाले, तू घरातून पैसे आण, मग तुला आम्ही ते औषध देतो. माझ्याकडे त्यांना देण्याइतके पैसे नव्हते. मग मी एक भारीची कॅडबरी त्यांना दिली व त्यांनी मला ते औषध दिले."

"पण तू तर शाळेत होतास. मग ती पुडी त्यांनी तुला दिली कशी? "

"शाळेच्या मधल्या सुट्टीत मी शाळेच्या मागच्या बाजूच्या ग्राउंडवर बसलो होतो. सारखे घरातून पळून जाण्याचे विचार मनात येत होते. पण घरातून पळून कसे जाणार याचा विचार करत मी मान खाली घालून बसलो होतो. तेवढ्यात त्या मुलांनी मला खुणेनं कंपाऊंडजवळ बोलावलं. पैसे आणलेस का म्हणून विचारलं. मी नाही म्हणताच मग दुसरे काहीतरी दे म्हणाले. मग मी कंपाऊंडवरून उडी मारून बाहेर गेलो. त्यांना एक भारीची कॅडबरी दिली व ती पुडी मागितली. पण नेमकी ती पुडी घेत असताना आम्हाला एका पोलिसाने पाहिले आणि पोलिसांची गाडी बोलावून पोलीसचौकीत नेले."

"मला त्या पुडीतील औषधाबद्दल काहीच माहित नव्हते. मी ती पुडी दप्तरात ठेवली होती. पोलीसचौकीत गेल्यावर पोलिसांनी पप्पाला ती पुडी माझ्या दप्तरात आहे म्हणून सांगितले. पप्पाने दप्तर टेबलावर ओतले तेव्हा ती पुडी सापडली. म्हणजे मी रंगेहात पकडला गेलो असं पोलीस म्हणाले."

"अच्छा, असं झालं तर... बरं. ठीक आहे. तू आत्ता थोडावेळ आराम कर. रात्री तुझे मम्मी-पप्पा आले की बघू."

आजीच्या कुशीत रोहन शांतपणे झोपून गेला. त्याच्या निरागस चेहऱ्याकडे पाहून आजीला खूप वाईट वाटलं. रात्री ते दोघं आले की चांगलं खडसावयाचं असा विचार करत रोहिणीताई रात्रीच्या स्वयंपाकाची तयारी करायला उठल्या. रात्रीचा स्वयंपाक करून दोघांची जेवणं झाली तरी रुची-विवेकचा पत्ता नव्हता. रात्री दहानंतर दोघं आले ते तणतणतच. आल्या आल्या त्यांनी रोहनला रागवायला सुरुवात केली. शांतपणे त्या दोघांकडे वळून रोहिणीताई म्हणाल्या, "रुची- विवेक तुम्ही रोहनला रागावताय. पण तो असा का वागतोय याचा विचार केलात का कधी? रोहननं मला सगळं सांगितलं आहे. किती गुणी पोरगं आहे ते. पण तुमच्या वागण्याने बिथरलयं... रोहनला तुम्ही दोघेही हवे आहात. त्याला नुसती महागडी खेळणी आणून दिली आणि कधीतरी हॉटेलात जेवायला घेऊन गेलात म्हणजे आई-वडिलांचं कर्तव्य संपत नाही. त्याला तुमचा वेळ हवायं, तुमचं

प्रेम हवंय. अडनिडं वय आहे त्याचं. याच वयात मुलांना जपायचं असतं... तुमच्या वागण्याचा परिणाम होतोयं त्याच्या मनावर. शाळेत पहिला-दुसरा नंबर येणारा मुलगा नापास होण्याच्या मार्गावर आहे. बेजबाबदार रोंहन नाही तर तुम्ही दोघं वागतायं... तुम्ही दोघंही उशिरा घरी येता. बऱ्याच वेळेला ड्रिंक घेतलेलं असतं. दोघांची भांडणं होतात. आणि रुची तू सुद्धा ड्रिंक घेतेस? केव्हापासून प्यायला लागलीस? ”

“अगं आई, `कॉर्पोरेट कल्चर` जपण्यासाठी आणि या Rat रेसमध्ये धावण्यासाठी कराव्या लागतात काही मनाविरुद्ध गोष्टी.”

“अगं पण स्वतःचा संसार, मुलगा, नवरा महत्वाचा की ती Rat- रेस? कशाला महत्व द्यायचं ते आपणच ठरवायचं. तुझं स्वतःकडेही नीट लक्ष नाहीयं. गालाची आणि मानेची हाडं वर आलीतं त्या Rat रेसमध्ये धावताना. विवेक तुझंही लक्षण काही ठीक दिसत नाही. तुझे तांबारलेले डोळे बघ जरा. ते डोळेच सांगतायंत तू कसा वागतोस ते.”

दोघंही मान खाली घालून बसले होते. आपण गृहीत धरलेला सुखाचा त्रिकोण असा कसा बिघडला? रोहनला सगळी सुखं देऊनही तो बाहेर सुख का शोधतोय? - -

नंतर थोडे दिवस रोहन रोहिणीताईंकडेच राहिला. तिथूनच तो शाळेत जात होता. शाळेत त्याने इतर मुलांशी मैत्री केली. आता तो एकटा ग्राउंडवर जातही नव्हता. रोहन सुधारलेला पाहून सगळ्यांनाच बरं वाटलं.

रोहिणीताईंच्या खडसावण्याने रुची-विवेकचे ही डोळे उघडले. त्यांनी आपल्या वागण्यात सुधारणा केली - - - आणि त्यांचा सुखाचा त्रिकोण परत जुळला. पुन्हा कधीच न मोडण्यासाठी...

**सुश्री रश्मी पटवर्धन, पुणे मो. - ९१६८८९४३८०**



## 41. लेख - शृंगार रस... - सुश्री अरुणा मुल्हेरकर



नाट्यगृह एकदम हाऊसफुल होतं त्या दिवशीच्या संगीत स्वयंवर नाटकाच्या प्रयोगाला. सगळेच नाट्यप्रेमी आणि त्यातील संगीताने वेडावलेले... माझे वय असेल तेरा चौदा वर्षांचं त्यावेळी, म्हणजे कौमार्यावस्था नुकतीच संपलेली, किंवा संपत आलेली. तारुण्यवस्थेच्या वाटेवर म्हणाना...

तिसरी घंटा झाली, आणि नांदीचे स्वर कानावर पडताच मी भानावर आले. नांदी संपली. रंगमंचावरील पडदा उघडला. पाठीमागे राजवाड्याच्या पुष्पवाटिकेचा सुरेख असा पडदा, आणि विंगेतून नाचत नाचत मोदभरे रुक्मिणी प्रवेश करते. तिच्या सखीला ती सांगत असते, " अग सखये, तुला माहित आहे का? मी त्यांना पाहिलं, अगदी सगळ्यांच्या आधी मी त्यांना पाहिलं, दादाच्या आधी, बाबांच्या आधी मी त्यांना पाहिलं, हो, मी त्यांना पाहिलं! "

रुक्मिणीची ही वाक्यं माझ्या मनावर फारच ठसली. बोलताना तिच्या मुखकमलावरचा लालीमा, ती स्त्रीसुलभ लज्जा आणि एकूणच तिची देहबोली पाहताना मला मीच कुठेतरी हरवल्यासारखं वाटू लागलं, आणि तो सगळाच प्रसंग माझ्या मनात रुंजी घालू लागला.

या रुक्मिणीने कृष्णाला पाहिले होते आणि मी? मी त्याला पाहिले होते.. आमच्या दिवाणखान्याच्या खिडकीतून. सर्वांगातून क्षणार्धात वीज थिरकली होती जशी काही. मला कळत नव्हते, त्याला पाहून माझ्या मनात अशी वेगळीच भावना काय आहे? असं का होतं मला? तो मुलगा आहे म्हणून? छे! छे! मुळीच नाही. अरुण, शरद, चंदू, बंडू, असे कितीतरी शेजारी मित्र आहेत माझे. आम्ही मुलं, मुली, सगळेच एकत्र खेळतो की, तेव्हा कुठे असं होतं? विचार करकरून छाती धडधडू लागली, आणि गालावरून कोणीतरी हळुवार मोरपीस फिरवावं तसा सुखद स्पर्श जाणवला मनाला. मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी हुरहुरही लागली.

आता रुक्मिणी तिच्या सखीला गाण्यातून तिच्या भावना व्यक्त करीत होती...

*सुजन कसा मन चोरी*

*अगं हा चोरी यदु कुल नंदन*

*सहज नेत्र भिडे, सहज मोह पडे*

*सहजची करी मम ह्रदय हे वेडे...*

काही दिवसांनी कळले की समोरच्यांकडे येणारा हा मुलगा त्यांचा पुतण्या आहे. त्या दिवशी प्रथम पाहिल्यानंतर आता हा मुलगा वारंवार दिसायला लागला का? त्याचे येणे वाढले का? त्यानेही मला पाहिले का? नाना शंकांनी मनाला अगदी घेरून टाकले....

आणि तो दिवस उजाडला. आमची नजरा नजर झाली. सहजच ओठ विलग झाले… ‘सहज मोह पडे, सहजची करी मम हृदय हे वेडे‘ अशीच अवस्था झाली की हो माझी.

दिवस उलटत होते. आज तो येईल का? आपण त्याला पाहू शकू का? काही बोलणे होईल का? एकच विचार! याला काय म्हणायचे? हेच का ते प्रेम? प्रेम म्हणजे नेमकं काय ते कळतच नव्हतं, पण इतकं मात्र खरं की एक अनामिक हुरहुर आणि सतत भेटण्याची इच्छा हे काहीतरी खास होतं. नकळतपणे ओठांवर ‘ एक होता म्हातारा ‘नाटकातील‘ ये झणी येरे येरे माघारी ‘हेच गाणं सारखं येऊ लागलं होतं.

एक दिवस त्या मुलाने त्यांच्या दारातील टोपलीभर पेरू आणि टोमॅटो आमच्या घरी आणले आणि माझ्या हातात दिले. मी एकदम अवाक्! अजूनपर्यंत एका शब्दाची ही देवाण-घेवाण नसताना हा अचानक घरी येतो आणि पेरू व टोमॅटो भेट देतो याचा अर्थ काय समजायचा? मनात लाडूही फुटत होते आणि कुठेतरी भीतीही वाटत होती. त्याचवेळी मला कळले होते की त्याचे आई-वडील कटणीला मध्य प्रदेशात राहत होते, आणि हे दोघे भाऊ ठाण्याला त्यांच्या मावशीकडे शिक्षणासाठी राहत होते. वडिलांची रेल्वेत नोकरी असल्यामुळे त्यांच्या सतत बदल्या होत असत. हे पेरू आणि टोमॅटो कटणीचेच होते.

हे मूक प्रेम असेच चालू होते. तो यायचा, गॅलरीत उभा राहायचा, मलाही चोरट्या नजरेने त्याच्याकडे पाहणे फार सुखद वाटायचे. हळूहळू काही ना काही कारणाने त्याने आमच्या घरी येण्यास सुरुवात केली, तेव्हा माझे मन मला सांगू लागले, ‘ त्यालाही मी आवडते. हे एकतर्फी नाही बरं का? ’

मार्च १९५९… माझी एसएससी बोर्डाची अकरावीची परीक्षा…. आयुष्यात पुढे आलेल्या अनेक कॉम्पिटिटिव्ह परीक्षांपैकी ही पहिली परीक्षा. माझे परीक्षा केंद्र शोधून, पेपर सुरू व्हायच्या आत त्याने अचानक यावे, मला एक्स्ट्रा ॅ स्ट्रॉंगच्या गोळ्या द्याव्या आणि परीक्षेसाठी शुभेच्छा द्याव्या ही तर माझ्यासाठी जशी आनंददायी तशीच धक्कादायक अशी स्थिती होती. त्यावेळी पहिलाच पेपर आणि परीक्षेचे टेन्शन असूनही, यस! याचा अर्थ तोही माझ्यावर नक्की प्रेम करतो … ही भावना एक वेगळाच अविस्मरणीय आनंद देऊन गेली.

त्या काळी पाश्चात्य संस्कृतीचा आजच्या एवढा पगडा आपल्यावर नव्हताच मुळी, त्यामुळे 'आय लव यू' असे कोणी कोणाला सांगण्याचा प्रश्नच नव्हता. मात्र शब्दांच्या पलीकडची एकमेकांची नजरेची भाषा सर्व काही स्पष्ट सांगून गेली.

ते गुलाबी दिवस फुलपाखरासारखे उडून गेले, मात्र या मधुर स्मृतींचा गंध आज आयुष्याच्या संध्याकाळी दरवळत आहे, काया रोमांचित होत आहे…

**सुश्री अरुणा मुल्हेरकर, डेट्रा ॅईट (मिशिगन) यू.एस्.ए.**

## 42. कथा - वृंदाचा लेखन प्रवास... सुश्री अर्चना देशपांडे



सुहास नऊ वाजता पोळी भाजीचा डबा घेऊन ऑफिसला गेला. पाठोपाठ मुले ही शाळेत गेली. वृंदाने पाठीमागची कामे भराभर उरकली आणि हुश्श करून खुर्चीवर बसली. आदले दिवशी संकष्टी असल्याने उकडीच्या मोदकाचा नैवेद्य गणपतीसाठी केला होता आणि कधी नव्हे ते "मोदक छान झाले आहेत" असे सुहासने कौतुक केले होते. आज स्वयंपाक घरात फारसे काम नव्हते त्यामुळे वृंदाची स्वारी आज खुश होती. 'ओंकार स्वरूपा सद्गुरू समर्था...', हे गाणेगुणगुणत तिने रिमोटचे बटन दाबलेपण टी. व्ही काय बोलायला तयार नव्हता. तिने देवघरातील लाईटकडे पाहिले तर तोही बंदच.. म्हणजे हाय रे दैवा! आज वीज गायब तर! ‘छे काय मेली कटकट या भारनियमनाची. आज चांगला वेळ होता म्हणून निवांत बसून टी. व्ही बघावा म्हटलं तर भारनियमन कडमडलं. ’तिला खूप संताप आला.. पण काय करणार? थोडा वेळ ती पलंगावर आडवी झाली पण झोप काही प्रसन्न होईना. आता काय करावं? महिनाअखेर असल्यामुळेमुले दुपारी आणि सुहास संध्याकाळी येणार होते. मासिक चाळावे म्हटलं तर चाळीशी कुठेतरी गायब झाली होती.

ती वैतागून उठली. रस्त्यावरील रहदारी तरी पहावी म्हणून खिडकीशी उभी राहिली. रस्त्यावरून जाणारी वाहने आणि माणसे पाहण्यात थोडा वेळ गेला. तेवढयात शेजारच्या दिक्षितकाकू सिल्कची साडी, मॅचिंग ब्लाऊज आणि त्याच रंगाची पर्स खांद्याला अडकवून बाहेर पडतांना दिसल्या, लगेच "बाय आई" म्हणत वरच्या मजल्यावर असलेली नटमोगरी मीनल बाहेर पडली. वृंदाला त्यांचा हेवा वाटला. त्या दोघींना नोकरीला जाताना बघून आपण मात्र काहीच करत नाही हा विचार तिच्या मनात चमकून गेला. लग्नाआधी छान नोकरी होती, पण लग्न होऊन दुसऱ्या गावी आल्यावर नोकरी सोडावी लागली. लग्नानंतर नोकरी करणे सुहासला मान्य नव्हते आणि सासूबाईंना लवकर नातवंड हवे होते. त्यामुळे लग्नानंतर लगेचच मुलगा व त्याच्या पाठोपाठ मुलगी झाली व घरी कोणी नसल्यामुळे त्यांचे करण्यातच बरेच दिवस गेले. आता आपण काहीतरी करावे हा विचार बरेच दिवस घोळत होता.. पण आज. त्या दोघींना पाहून मनाने उचल खाल्ली.

तिला आठवले की सुमीच्या लग्नात पर्यावरणावर गप्पा चालू असताना आपणही " पर्यावरण रक्षण केले पाहिजे " या विषयावर आपली मतं तावातावाने मांडली होती, आणितेव्हा बळवंतराव म्हणाले, "अग वृंदा तुझ्याकडे एवढी शब्दसंपदा आहे तर तू कथा, लेख.. वगैरे लिहीत जा. आणि दिवाळी अंकासाठी पाठव. काही वेळा कथा-स्पर्धा असतात. त्यात तुझी कथा सिलेक्ट झाली तरबक्षीसही मिळेल. ह्या गोष्टीची आठवण होताच तिने ठरवले की आपणही लिखाणाला सुरुवात करू या. आणिती सकाळ वर्तमानपत्रातील निवेदने दररोज चाळू लागली.

एक दिवस तिने जुने दोन तीनदिवसाचे पेपर काढले. ते पसरून चाळत होती. त्यात बराच वेळ गेला. एवढ्यात बेल वाजली. तिने दचकून घड्याळ पाहिले तर ३ वाजलेले.. आज शिक्षकांची मुख्याध्यापकांबरोबर मिटिंग असल्याने शाळा २, ३० वाजता सुटणार हेमुलांनी सांगितले होते, पण हे ती पार विसरून गेली होती. "आई दार उघडं ना! ".. मुलांचा आवाज ऐकताच तिने दार उघडले. समोर तीन चार पेपर पसरलेले पाहून समीर म्हणाला, “आई, अग एवढे पेपरका पसरलेत? काय शोधते आहेस? “

"काही नाही रे जरा पेपर चाळत होते ". तेवढ्यात स्वप्ना म्हणाली, "आई मला भूक लागली आहे. मला काहीतरी खायला दे."

"ठीक आहे, पेपर घडी करून ठेवते आणि तुला चिवडा आणि दूध देते, तोपर्यंत युनिफॉर्म काढून घरचे कपडे घालआणि हातपाय धुवून ये"... मुलांनी दारात भिरकावून दिलेले बुट व दप्तरे पाहून तिचा पारा चढला. “आधी दप्तरे आणि बूट जागेवर ठेवा आणियुनिफॉर्मच्या घड्याकरून हँगरवर ठेवा. मगच तुम्हाला खायला मिळेल. आणिहो उद्यापासून असंच वागायचं, मलातुमच्या वस्तू जागच्या जागी दिसल्या पाहिजेत, मला तुमचा पसारा आवरायला जमणार नाही.“

आईचा आजचा नूर पाहून. मुले आईकडे आ वासून बघतच राहिली. तिचा रागरंग बघून मुकाट्याने बूट व कपडे जागेवर ठेवून टेबलाजवळ, खुर्चीवर येऊन बसली. दूध पिऊन झाल्यावर घरचाअभ्यास करून खाली अंगणात खेळायला गेली. वृंदाने घड्याळाकडे पाहिले. साडेसहा वाजले होते. तिने घर आवरले. बऱ्यापैकी साडी नेसून सुहासची वाट पाहत खिडकीसमोर उभी राहिली. थोड्याच वेळात सुहास एका हातात डब्याची पिशवी.. दुसऱ्या हातात भाजीची पिशवी घेऊन येताना दिसला. वृंदाने लगबगीने त्याच्या हातातली भाजीची पिशवी घेतली. रोज यावेळी ती आपली आवडती मालिका पहात असते, आपण आल्याची तिला खबरही नसते.. ‘मग आज काय बाबा विशेष‘ असा विचार करत सुहासने घरात प्रवेश केला.

"तुम्ही हातपाय धुवून या, मी चहा टाकते" या गोड वक्तव्याने सुहास चक्रावून गेला. कपडे बदलून येईपर्यंत टेबलावर चहाचा कप आणि चिवडा भरलेली बशी तयार होती. आपणही हातात चहाचा कप घेऊनवृंदा त्याच्यासमोर बसली.

"सुहास, तुम्ही ऑफिसमध्ये आणि मुलं शाळेत गेली की मला करमत नाही. वेळ कसा घालवावा हे समजत नाही. म्हणूनत्यासाठी मी काहीतरी करावे म्हणते."

"शिवण क्लास, कॉम्प्युटर क्लास करायचा आहे का तुला? पण सध्या नको. एक तर महागाई खूप झाली आहे आणि आत्ताच मुलांची फी आणि युनिफॉर्म यामध्ये बरेच पैसे खर्च झाले आहेत"

"तुम्हाला पैसे न मागता मी काहीतरी करण्याचा विचार केला आहे"

“अरे वाह! मग काय उकडीच्या मोदकाची ऑर्डर घेते का? " सुहास कुत्सितपणे हसत म्हणाला

"छे छे! एवढे मोदक करायचे म्हणजेकायचेष्टा आहे काय? नारळ खिसा, सारण करा, उकड काढा, पारी तयार करून सारण भरून मोदक बनवा व नंतर उकडवा, हे कोण करणार बाबा? ते नाही बाबा जमणार मला! "

"मग आपल्या चाळीतील मुलांच्या शिकवण्या घेतेस काय? तू पदवीधर आहेसच, शिवाय मुलांचा अभ्यास घेतलेस की..“

"नाही हो! शिकवणी म्हटली की डोकेफोड आली.. आधी आपल्याला अभ्यास करायला हवा.. हल्ली शाळेत परीक्षा नसल्यामुळे मुलांना अभ्यास करण्याची सवयच राहिलेली नाही. त्यांना नुसत्या टिवल्या बावल्या करण्यात आनंद वाटतो."

"अहो, मी कथा स्पर्धांमध्ये भाग घ्यावा म्हणते. मला छान कल्पना सुचतात असे तुमचेच काकासुमीच्या लग्नात म्हणाले होते ना? तेव्हा मी कथा लिहून दिवाळी अंकात प्रकाशित करण्यास देणार, आणि एकदा कथा लिहिणे जमू लागले की आपण कथासंग्रह छापून घेऊया“.. हे ऐकून सुहास दोन फूट उडालाच, तो डोळे विस्फारून वृंदाकडे पाहतच राहिला.

"अगं वृंदा, उकडीचे मोदक करण्याइतके लिखाण करणे सोपे आहे का? त्यासाठी खूप वाचन केले पाहिजे त्यामुळे शब्द संपदा वाढते आणि तुला तर वाचण्याचा अतिशय कंटाळा! ”

"वाटलंच मला तुम्ही असंच म्हणणार! मला प्रोत्साहन देण्याऐवजी तुम्हाला माझे पाय ओढण्यातच आनंद वाटतो." असेपुटपुटत तोंड फुगवून वृंदा स्वयंपाक घरात गेली. सुहास उठून बाहेर आला आणि पेपरवाचून लागला.

वृंदाच्या डोक्यात लिखाणाचा किडा वळवळत होता. तिने समीरची जुनी वही शोधून काढली आणि बरीच कोरी पाने पाहून वरती श्री लिहिले. पण अजून विषय ठरत नसल्यामुळे वही बंद करून कुकर लावायला उठली. एका वर्तमानपत्रात निवेदन या सदराततिने कथा स्पर्धेसंबंधी निवेदन पाहिले, मुख्य म्हणजे विषयाचे बंधन नव्हते. त्यामुळे वृंदाचा एकदम उत्साह वाढला. लेखनासाठी तिने हौसेने चांगल्या क्वालिटीचे पांढरेशुभ्र फुल स्केप कागद अर्धा डझन आणले. निदान पेपराची क्वालिटी पाहून, लेखन आवडले नाही तरी कथा पसंतीस पडेल... पण तिच्या लाडक्या लेकाने चार कागद होड्या विमाने बनवण्यासाठी वापरले. हे कळताच तिचा संताप अनावर झाला. तिने त्याच्या कानाखाली वाजवली. कथा पाठवण्यासाठी दहा दिवसाचा अवधी होता. त्यातील दोन-तीन दिवस विषयाचा विचार करण्यात गेले. एक दिवस मुलांच्या पाठोपाठ वृंदा बाहेर पडली. दुकानातून दोन डझन कोरे कागद घेऊन आली. येताना वाटेत दीक्षित काकू दारातच भेटल्या. हातात कागद पाहून म्हणाल्या,“. कागद घेऊन आलात.. काय कथा वगैरे लिहिणार आहेस की काय? “ वृंदा एकदम उत्साहाने म्हणाली, "हो, कथा लिहिण्याचा विचार आहे."

झाले! वृंदाताई कथा लिहित आहे हे अख्ख्या चाळीभर झाले आणि “तुम्हाला बक्षीस मिळाले की आम्हाला कळवा आणि पार्टी पण द्या. विसरू नका बर का! ” असे सर्वजणांनी तिला बजावलं. आता तिला आपल्या कथेला बक्षीस मिळाल्याची स्वप्ने पडू लागली. तिने निग्रहाने लेखन सुरू केले.

वृंदा लिखाणाला बसली की दोन-तीन ओळी लिहून होईपर्यंत दारावरील घंटी तरी वाजे, फोन तरी येई, कचरा गाडी येई.. या सर्व गडबडीत जागेवरून उठावे लागते, खाडाखोड होई.. मग वृंदा त्या कागदाला फाडून चुरगळून कचऱ्याची टोपली दाखवी. कधीतरी शब्द लिहिताना चुके.. एखादा शब्द ऱ्हस्व का दीर्घ या घोटाळ्यात कागद फाडवा लागे. एक दिवस सुहास कागदाचे बोळेआणि चहाचे कप पाहून म्हणाला, "काय हे वृंदा.. लिखाण करतेस का नुसता कचरा करतेस? ”

हे ऐकून वृंदारागाने म्हणाली, "तुम्ही मला लिखाणात मदत करत नाही. नुसती माझी उणीदुणी काढण्यात तुम्हाला असुरी आनंद वाटतो. निदान लिहिलेले तरी डोळ्याखालून तरी घाला ना! मला थोडे मार्गदर्शन करावे असे तुम्हाला वाटत नाही"

"अगं मी साधासुधा क्लार्क! मला साहित्यातील काय समजते? " वृंदाने आटापिटा करून दोन पाने लिहून काढली. त्या गडबडीत एक दिवस दुधाचे पातेले करपून काळे झाले. ‘काकू दुधाचे पातेले एवढे करपले कसे? का शेगडी वर दूध ठेवून शेजारच्या घरी गेला? ” भांडी घासायला असलेल्या बाईने कुत्सितपणे विचारले. तिला राग आला पण तिच्यावर डाफरलं तर ती दुसऱ्या दिवशी दांडी मारायची या भितीने ती मूक गिळून गप्प बसली. एक दिवस तर कुकरमधील पाणी संपून कुकरची रिंग कामातून गेली...

... पण तिने लिखाणाची पाठ सोडली नाही. शेवटी अगदी आदल्या दिवशी कथा पूर्ण केली आणि नवऱ्याने. ती नजरेखालून घालावी म्हणून वाट पाहिली. नेमकी त्या दिवशी सुहासला सकाळी ऑफिसमध्ये मीटिंग असल्यामुळे लवकर जावे लागले, त्यामुळे वृंदाचा तो दिवस नवऱ्याची वाट पाहण्यातच गेला. त्याच दिवशी रात्री वृंदाच्या आईने फोन केला पण फोन समीरने उचलला. "हॅलो समीर आई कुठे आहे? मी तिला फोन करते आहे पण ती उचलतच नाहीये. एवढी कशात बिझी आहे? का तिची तब्येत बरी नाही? ”

"अगं आजी तिला काय झाले? उलट आमच्यावरच सारखी डाफरत असते.. का तर तिने कथा स्पर्धेत भाग घेतला आहे.. तिला कथा पाठवायची आहे."

तेवढ्यात बाबाला, सुहासला पाहताच रिसिव्हर त्याच्याकडे देऊनत्याने आपली सुटका करून घेतली. “अहो जावईबापू तुमची पत्नी काय कथा लिहिते आहे म्हणे! का तिचे कादंबरी लिखाण सुरू आहे? बाकी लहानपणापासून तिला लिखाणाची फार आवड होती." सुहासने येणारे हसू दाबत म्हटले “अहो कादंबरी वगैरे नाहीएक कथा लिहिण्याचा प्रयत्न सुरू आहे. बरं मी तिला डिस्टर्ब करत नाही" असे म्हणून त्यांनी फोन ठेवला आणि पुढील प्रश्नांची सरबत्ती वाचल्यामुळे सुहासने हुश्श करत फोन खाली ठेवला.

अशा रीतीने " वृंदाचे लेखन पुराण" ही वार्ता सर्व दूर पसरली. त्या रात्री बिचारीने पाठ मान एक करून कथा पूर्ण लिहिली. त्या रात्री तिला शांत झोप लागली.

दुसऱ्या दिवशी वृंदा सुहाससह संपादकाच्या ऑफिसमध्ये जाण्यासाठी निघाली. एकतर कार्यालय खूप दूर होते. संध्याकाळी नोकरी करणाऱ्या लोकांची घरी जाण्यासाठी गर्दी होती. त्या गर्दीतून वाट काढत ते कार्यालयात पोहोचले.. संपादक महाशय घरी जाण्याची तयारी करत होते. धापा टाकत ती पोचली. तिने आपले कागद त्यांच्यासमोर ठेवले. संपादकांनी तिची कथा पाहिली. पहिला परिच्छेद वाचताना त्यांना असंख्यशुद्धलेखनाच्या चुका दिसल्या, बरीच खाडाखोड झाली होती आणि कागदाच्या पाठपोट लिहिलेगेले होते.

संपादक वैतागून म्हणाला, "अहो मॅडम एक तर तुमचे अक्षर इतके खराब आहे की वाचणे अवघड आहे. वाचून माझ्या चष्म्याचा नंबर वाढेल. तुमची कथा तपासणे म्हणजे परीक्षकाची एक परीक्षाच आहे. दुसरे म्हणजे तुमच्या लेखनात शुद्धलेखनाच्या असंख्य चूका आहेतआणि कागदाच्या एका बाजूलाच लिहायचे असते हा साधा नियम तुम्हाला माहीत नाही का? “ अशी बडबड करून झाल्यावर तो म्हणाला, “ अगदीच तुम्हाला तुमची कथा द्यायची असेल तर चुका सुधारून, कागदाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरात लिहूनउद्या संध्याकाळी पर्यंत आणून द्या. ” असे सांगून संपादकांनी तिचे कागद तिच्यासमोर टाकले. अशारितीने तिला अपमानास्पद वागणूक मिळाली.

ह्या सर्व प्रकारामुळे वृंदाच्या डोळ्यात पाणी तरळले.. एक तर लिखाणासाठी तिने नवऱ्याकडे, मुलांकडे आठ दिवसदुर्लक्ष केले होते, चिडचिड केली होती. भांडी घासायला येणाऱ्या बाईचे कुत्सित बोलणे सहन केले होते. शिवाय लिहण्याची सवय नसल्यामुळे दोन दिवस हात दुखत होता. कोणालाही न सांगता डॉक्टर कडे जाऊन तिला " पेन किलर "आणावी लागली होती. वृंदा उतरलेल्या चेहऱ्याने बाहेर आली. सुहास बाहेर उभाच होता. तिचा चेहेरा पाहून त्याला थोडीशी कल्पना आली. तीजवळ येताच तो चालू लागला. वृंदा त्याच्याजवळ आल्यावर फणकारुन म्हणाली, " संपादक कोण समजतो स्वतःला? मला म्हणतो तुम्हाला हवे असेल तर उद्या संध्याकाळपर्यंत तुमची कथा सुवाच्य अक्षरात लिहून आणून द्या. बोलताना नेहमी पुढच्या व्यक्तीचा विचार करून बोलावे, कारण शब्द जरी ओठातून बाहेर पडतात पण तेच शब्द पुढच्या व्यक्तीच्या हृदयात सलत राहतात एवढे त्या संपादकाला समजू नये? मला काही गरज नाही. उद्यापासून लिखाणाचा नाद बंद, एवढेच काय सकाळचा टुडे पेपरही पाहणार नाही. "

निराश झालेल्या पत्नीची. सुहासनेसमजूत घातली. तो तिला जवळच्या हॉटेलमध्ये घेऊन गेला. तिच्या आवडीचा डोसा खाऊ घातला, कॉफी मागवली आणि ती थोडी शांत होताच दोघेही घरी परतले. दारात बसून वाट पाहणारी मुलं पाहताच तिला गलबलून आले. तिने त्यांना पोटाशी धरले. मुलेही तिला बिलगली. रात्री त्यांच्या आवडीचा शिरा करून गप्पा मारत, खेळीमेळीत जेवण उरकले. लिखाणाचे वेड डोक्यातून काढून टाकल्यावर शांत झोपलेल्या पत्नीकडे पाहून सुहास समाधानाने झोपी गेला.

**सौ. अर्चना देशपांडे, पुणे मो ९९६०२१९८३६**

## 43. पुस्तक परिचय - भयापासून अभयापर्यंत - सुश्री तृप्ती कुलकर्णी




### एक अनोखा प्रयोग

*('भयापासून-अभयापर्यंत'... श्री सचिन मधुकर परांजपे यांच्या चार पुस्तकांचा आढावा)*

सत्ता, संपत्ती, संतती, आरोग्य असं सारं काही असलं तरी माणसाला भय हे व्यापून असतंच. जन्मापासून त्याच्या नेणीवेत बाय डिफॉल्ट बसलेलं. हे भयच आपल्याला अनेक गोष्टी करण्यासाठी प्रवृत्त करतं. यातली सगळ्यांत मोठी भीती असते ती म्हणजे मृत्यूची. मृत्यू म्हटलं की सारं काही संपलं अशीच आपल्यात एक भावना असते. कारण मृत्यू पश्चात जीवन याबाबत आपण अनभिज्ञच असतो. असं असलं तरीही आपल्या जाणिवेच्या 'पलीकडे'देखील एक विश्व आहे... ज्या विश्वाची आपल्याला पुर्ण ओळख नाही पण त्याबद्दल काहीशी जाणीव झालेली असते. काही अर्तक्य गोष्टी इतरांच्या अनुभवातून आपण ऐकलेल्या असतात. काही प्रसंगात स्वतःदेखील वैचित्र्यपूर्ण अनुभव घेतलेले असतात. मात्र या सगळ्याची तर्कसंगती लावणं हे आपल्याला जमत नाही...

... सुप्रसिद्ध लेखक सचिन मधुकर पराजंपे यांच्या.. मानवी आकलनापलीकडच्या अशाच काही अतार्किक गोष्टी कथेतून प्रभावीपणे मांडणाऱ्या पुस्तकांचा घेतलेला हा धांडोळा...

१)




'पलीकडलं' हा सचिन मधुकर परांजपे लिखित भयकथा संग्रह. सचिन मधुकर परांजपे यांनी लिहिलेल्या या कथा त्यांच्या ध्यानधारणेतील काही अनुभवांवर आधारित आहेत असे त्यांनी अर्पण पत्रिकेतून सुचित केले आहे. आणि तसे त्यांनी सूचित केले नसते तरीदेखील या कथेत तथ्य नाही असे म्हणता येणे अवघड आहे. मुळात काल्पनिकता किंवा फँटसी म्हणजे काय? जे आपण प्रत्यक्ष याची देही याची डोळा अनुभवू शकत नाही मात्र मानसिक पातळीवर आपण ते पूर्णपणे अनुभवलेलं असतं. ब्रम्हांडामध्ये आपल्या कल्पनेपलीकडे अनेक गोष्टी क्षणोक्षणी घडत असतात. आपल्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमतेनुसार त्यातल्या काही गोष्टी आपल्याला जाणवतात तर काही नाही. परंतु काही गोष्टी आपण वैचारिकदृष्ट्या कल्पनेत, स्वप्नांत अनुभवू शकतो. आणि त्यालाच आपण कल्पना किंवा फॅन्टसी म्हणतो. पण मुळात हे विचार, कल्पना येतात कुठून? त्याचा स्त्रोत काय? ज्याची निर्मिती झाली नाही ती गोष्ट इतक्या तीव्रतेने

आपल्यापर्यंत कशी पोहोचते? ती इतरांना कशी भावते? असे खूप सारे प्रश्न निर्माण होतात. ज्याची उत्तरं आपण ठोसपणे देऊ शकत नाही. आणि अशा गोष्टींचे अस्तित्व आपण ठामपणे नाकारूही शकत नाही.

'पलीकडलं' या कथासंग्रहात एकूण ११ कथा आहेत. अपवादात्मक चारपाच कथा सोडता उरलेल्या सर्व कथा बाधित जागेसंबंधीच्या आहेत. त्या जागांमध्ये पिशाच्चांचा वावर आहे. आणि जो तिथं येणाऱ्या मनुष्याला हानिकारक आहे. तर या जागा बाधामुक्त करताना आलेल्या अनुभवांच्या या रहस्यमय कथा... यात त्या जागा बाधित कशा झाल्या? तिथे नक्की काय काय अनुभव येत होते? आणि त्या जागा बाधा मुक्त करताना यातील परिक्षीत या अवलिया व्यक्तिरेखेला काय काय संघर्ष करावा लागला... त्याचं हे कथन. यातला भयप्रद भाग म्हणजे या अमानवी शक्तींचं अफाट रूप, क्षमता आणि संहार करण्याची तसंच फक्त आपलंच वर्चस्व प्रस्थापित करण्याची वृत्ती. सृष्टीमध्ये अनादी कालापासूनच सुष्ट आणि दुष्ट असा संघर्ष चालूआहे आणि तो निरनिराळ्या रूपांत चालू राहणार आहे. त्या सनातन संघर्षाचीच झलक आपल्याला या कथांमधून वाचायला मिळते.

एखाद्या जीवाची किंवा आत्म्याची बदला किंवा सूड घेण्याची होणारी भावना ही त्याला दिल्या जाणाऱ्या त्रासामुळे निर्माण झालेली असते आणि ती इतकी प्रखर असते की त्याच्या मृत्यूनंतरदेखील ती भावना नष्ट होत नाही. तर देह नसला तरी विचित्र असे रूप धारण करून ती इतरांना त्रास देऊ पाहते. ही सूड भावना नाहीशी करणं, त्या जिवाला मुक्ती देणं आणि त्याला मुक्ती देता येत नसेल तर त्या वाईट शक्तीचा कायमचा बंदोबस्त करणंहे या कथानायकाचं म्हणजे परिक्षीतचं काम. अद्यायवत शिक्षण घेतलेला, आधुनिक सोयी सुविधा वापरणारा, प्रसन्न आणि आकर्षक व्यक्तीमत्त्वाचा परिक्षित आपल्या गुरूंच्या आज्ञेनुसार हे सारं करत असतो. त्यासाठी गुरुंनी सांगितलेली आवश्यक ती मंत्र-तंत्र साधना नियमितपणे करणे, साधन शुचिर्भूतता राखणे आणि आपली आध्यात्मिक बैठक, ध्यान यात सातत्य राखणे अशा सर्व गोष्टींचं तो मनापासून पालन करत असतो. आणि त्याच्या आधारे, गुरूंच्या आशीर्वादाने या समस्या सोडवत असतो. यातल्यापरिक्षित आणि गुरु यांच्यातल्या संवादावरून सुष्ट आणि दुष्ट शक्तीबद्दल त्यांचं स्वरूप, त्यांची प्रकृती अशी तपशीलवार माहिती मिळते. या लढ्याची वर्णनं वाचून खरोखरच भय वाटते. मात्र एक गोष्ट यातून जाणवते की दुष्ट शक्तीला लढण्यासाठी सतत ताकद लागत असते आणि त्यासाठी ती आपल्या सारख्या कुविचारांच्या वृत्तीच्या शोधात असते. वाईट शक्तीचं संघटन रोखणं ही याची महत्वाची पायरी आहे. ती साधल्यावर तिचा नाश करणं ही अंतिम पायरी आहे. आणि यासाठी सुष्ट म्हणजे चांगल्या शक्तीनं संघटीत होणं गरजेचं आहे. ज्यामुळे हा लढा जिंकणं साध्य होईल. विशेष म्हणजे यातली अद्भुतता बाजूला काढली तर आपल्या दैनंदिन जीवनातही ही गोष्ट अगदीच लागू पडते.

यातल्या उर्वरित कथा या भय भावनेपासून थोड्या अलिप्त परंतु एका वेगळ्या विश्वाची जाणीव करून देणाऱ्या आहेत. 'जन्मभय' ही कथा मृत्यू लोकातील जीवन यावर भाष्य करते. मृत्युलोकात 80 वर्षाहून

अधिक काळ व्यतीत केलेला एक आत्मा जेव्हा पुन्हा जन्म घेऊन पृथ्वीवर येणार असतो तेव्हा त्याची होणारी घालमेल, आणि आपल्या इतर जीवलगांसाठी तजवीज करताना त्याची उडणारी तारांबळ, पृथ्वीवर जन्म न घेण्यासाठीचीधडपड बघून आश्चर्य वाटतं.


'द व्हर्चुअल वर्ल्ड' ही कथा म्हणजे एका जीवाने आपल्या विशिष्ट शक्तीद्वारे आपल्या भोवती निर्माण केलेले काल्पनिक, आदर्श जग. हे जग सर्व बाबतीत मायावी असते. त्याला मानवी स्पर्श, भावभावना नसतात. मर्यादाही नसतात. परंतु या जगाला कंटाळलेला त्याचा निर्माता 'आकाश' खऱ्या माणसांना त्या जगात आणू पाहतो आणि मग पुढे काय घडतं त्यावर आधारित असलेली ही कथा.

'कोऽऽहं' या कथेत तर ब्रम्हा, विष्णू, महेश या त्रयींचं अनोखं दर्शन आपल्याला घडतं. पृथ्वीवर जीवसृष्टी कशी निर्माण झाली आणि त्यामध्ये या देवतांना कसं स्थान निर्माण झालं हे या कथेतून सांगितलं आहे. इथे स्वर्गातील ‘काळ’ आणि पृथ्वीवरील ‘काळ’ या संकल्पनेतला मोठा फरक दिसून येतो. आणि या फरकामुळेच पृथ्वीवर काय काय घडामोडी घडतात ते यातून पाहायला मिळतं.

'प्रमोशन' या कथेतून आधी नरक मग स्वर्ग आणि पुढे देव लोकातील एखादा देव असा आत्म्याच्या प्रवास दाखवला आहे. स्वर्ग आणि नरक यामध्ये करावी लागणारी कामे उत्तमरीतीने करत हा आत्मा देवांच्या पसंतीस उतरतो आणि स्वतःचं स्थान निर्माण करतो.

अशा पूर्णपणे वेगळ्या धाटणीच्या, विचारांच्या या कथा या संग्रहात वाचायला मिळतात. सचिन मधुकर परांजपे यांना मानवी मन, त्याचं सामर्थ्य, त्याचा कमकुवतपणा याची उत्तम जाणीव आहे. आणि ही जाणीव त्यांच्या सगळ्या कथांमधून प्रकर्षाने दिसते.


(२)




एकीकडे असा भयकथा संग्रह लिहिणारा माणूस दुसरीकडे मात्र अध्यात्मामधील आलेल्या स्वतःच्या अनुभवांवर आधारित ' चैतन्य स्पर्श ' यासारखे अप्रतिम पुस्तक लिहितो. या पुस्तकाच्या नावातच अध्यात्माचा स्पर्श आहे. अध्यात्म म्हणजे काय? धर्म म्हणजे काय? आणि कर्म म्हणजे काय? आणि या सगळ्याचा एकमेकांशी असलेला संबंध म्हणजे काय? हे सगळं साध्या-सोप्या शब्दांत कथांच्या माध्यमातून त्यांनी उलगडून सांगितलेलं आहे.

लेखकाला त्याच्या अध्यात्ममार्गात मार्गदर्शक म्हणून भेटलेल्या 'अवलिया' आणि 'सिद्‌धचेतसा' या महान विभूतीं त्याला आध्यात्मिक जीवनाचे दर्शन कशाप्रकारे घडवतात हे आपल्याला यातून पाहायला मिळतं. त्यांच्या एकमेकांच्या संवादातुन ध्यानधारणा कशी करावी? मंत्रांचं सामर्थ्य काय असतं? ते केव्हा, कधी आणि कशाप्रकारे उच्चारावेत? अस्तित्व म्हणजे काय? सगुणत्व-निर्गुणत्व म्हणजे काय? निर्मिती म्हणजे काय? विनाश म्हणजे काय? संकल्प म्हणजे काय? संकल्पाचं सामर्थ्य काय असतं? त्याच्या पुर्ततेमध्ये अडथळे कसे येतात? अशा अध्यात्मामध्ये येणाऱ्या सर्व अडीअडचणींवर मार्गदर्शन केलेलं आहे. ज्यांना अध्यात्म म्हणजे काय हे खरोखर जाणून घ्यायचं आहे आणि अध्यात्ममार्गावर आपली वाटचाल करायची आहे त्यांच्यासाठी हे पुस्तक एक उत्तम मार्गदर्शक ठरेल, प्रेरणादायक ठरेलयात शंकाच नाही. तत्वज्ञान आणि अध्यात्मातल्या संकल्पना कथांच्या आणि संवादाच्या माध्यमातून सांगितल्यामुळे त्या समजायला सोप्या वाटतात आणि लक्षात राहणेही सोपे जाते. पुस्तक वाचताना सुरुवातीपासून शेवटपर्यंत उत्कंठा वाढत जाते. अध्यात्माबाबत आसक्ती निर्माण होण्यासाठी हे पुस्तक निश्चितच सहाय्यक ठरेल. मात्र असं असलं तरीही ऐहिक जीवनाचंही महत्त्व यातून सांगितलं आहे. सर्वसामान्य माणूस आपली संसारिक कर्म करूनसुद्‌धा स्वतःची आध्यात्मिक प्रगती कशी साधू शकतो याबाबतही यातून माहिती मिळते.

(३)





भारतीय धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ मनुष्य जीवनात महत्त्वाचे आहेत असं आपण मानतो. यातील धर्म आणि मोक्ष यावर भाष्य केल्यानंतर काम या पुरूषार्थावर आधारित असे आणखीन दोन कथासंग्रह सचिन मधुकर परांजपे यांनी लिहिले आहेत. त्यांचीही आपण थोडक्यात ओळख करून घेऊ.

'सॉल्ट अँड पेपर' या कथासंग्रहामध्ये 'तो' आणि 'ती' यांच्या प्रेम कथा आहेत. परंतु या प्रेम कथा नेहमीसारख्या पठडीतल्या नसून त्यामधले फक्त महत्त्वाचे प्रसंग मांडले आहेत. यात संवादरूपी कथा आहेत. यात निवेदन आढळत नाही. यातील 'ती' आणि 'तो' हेदेखील प्रसंगांनुरूप वेगवेगळे आहेत. स्त्री आणि पुरुष यांच्यातील वेगवेगळ्या पातळ्यांवरच्या प्रेमावर या कथा भाष्य करतात. मग त्यात कधी शारीरिक आकर्षण... तर कधी आध्यात्मिक पातळीवरील प्रेम... तर कधी आत्मिक पातळीवरचं ज्याला प्लॅटॉनिक लव्ह म्हणतात असं प्रेमही दाखवलं आहे. यातला प्रत्येक प्रसंग स्वतंत्र असल्याने तो कधीही काढावा आणि कधीही वाचावा. त्यासाठी

मागच्या आणि पुढच्या संदर्भाची गरज नाही असा आहे. आणि या संवादात अध्यात्म, जिव्हाळा, काळजी अशा सर्व भावना आहेत. वाचकांना एका नितळ आणि तरल प्रेमाची अनुभूती देण्यात हे पुस्तक यशस्वी ठरते.

(४)




वरच्या पुस्तकाच्या अगदी उलट.... म्हणजेगुन्हेगारी विश्वाचं स्वरूप दाखवणारा 'द डार्क एज..' नावाचा कथासंग्रहदेखील सचिन मधुकर परांजपे यांनी लिहिला आहे. यामध्ये अंडरवर्ल्ड डॉनचं विश्व, त्यांचं जगणं, त्यांच्या भावना, त्यांची स्वप्नं सांगणाऱ्या कथा आहेत. पैसा त्याच्या जोरावर उपभोगता येणारी सत्ता आणि त्याबरोबर येणारी मग्रुरी ही या कथांतून जाणवते. इथल्या वातवरणात वावरणाऱ्या माणसांची मानसिकता अचूक रेखाटली आहे.

या कथांचं वैशिष्ट्य म्हणजे या मधली भाषाशैली हे आहे. अंडरवर्ल्ड जग हे आपल्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तींसाठी पूर्णतः अनभिज्ञ असते. त्यामध्ये वापरले जाणारे शब्द, भाषा, त्या जगतातल्या बारीकसारीक तपशीलवार गोष्टी, तिथल्या वस्त्यांची, घरांची वर्णनं, माणसांच्या सवयी-लकबी, तिथली प्रेम प्रकरणं, एकमेकांविषयीच्या भावना यांचं इतकं अप्रतिम चित्रण केलं आहे, की अध्यात्माचा गाढा अभ्यास असणारी, मुक्ती आणि मोक्ष यावर अधिकारवाणीने बोलणारी ही व्यक्ती गुन्हेगारीक्षेत्राच्या इतक्या तपशीलात कशी काय रमू शकते हा एक प्रश्न पडतो. पण याच उत्तर लेखकाने मनोगतात सांगितलं आहे की या खलनायकाबद्दल मला पहिल्यापासून एक सुप्त आकर्षण वाटत आलं आहे. याला कारण चित्रपटात दाखवलं जाणारं त्यांचं रुबाबदार जगणं, श्रीमंती थाट, वागण्याबोलण्यातला आत्मविश्वास हे आहे. त्या मानाने नायक हे खूपच साधे आणि सामान्य दाखवले गेलेत. आणि पूर्वीपासून चालत आलेल्या सत्-असत् प्रवृत्तीचं संघर्षाच प्रतिक म्हणजे आजचं हे गुन्हेगारी जगत आहे त्यामुळे या कथा मला लिहाव्याशा वाटल्या. आपण जेव्हा या कथा वाचतो तेव्हा एखाद्या आध्यात्मिक पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीने त्या लिहिल्या आहेत असं बिलकुलही वाटत नाही. चुकूनसुद्धा कुठल्याही बाबतीत येथे अध्यात्म, देव, धर्म या गोष्टी येत नाहीत.

---लेखकाच्या या भिन्न भिन्न प्रकाराच्या लेखन शैलीची मला खरंच कमाल वाटते. एकीकडे भय ही भावना निर्माण करणारे कथासंग्रह लिहिणं तर दुसरीकडे अध्यात्माच्या मार्गावर जाऊन शांत परिपूर्ण जीवन

जगण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणारे लेखन करणं. असे दोनटोकाचे विचार आपल्या लेखन शैलीतून अत्यंत सामर्थ्यानं मांडणं हे खरंच कौशल्याचं काम आहे. एक वेगळ्या प्रकारची जडणघडण, संवेदनशीलता, निरीक्षण शक्ती आणि जीवनाबद्दलची स्वीकारशील आत्मीयता यासाठी आवश्यक आहे, जी सचिनजींकडे आहे. म्हणूनच त्यांचं प्रत्येक पुस्तक लोकप्रिय ठरलेले आहे. आणि त्यांची प्रत्येक कथा ही लोक पुन्हा पुन्हा वाचतात.

एकाच लेखकाच्या लेखणीचे हे इतके रंग पाहता 'रंगात रंगुनी साऱ्या रंग माझा वेगळा' असं जे म्हटलं जातं त्याची प्रचीती येते. कारण सर्वसामान्यांच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी ते गेल्या दोन दशकांहून अधिक काळ प्रबोधनाचं काम करत आहेत. निरनिराळ्या फेसबुक पोस्टमधून अध्यात्मिक प्रगतीसाठी ते मार्गदर्शन तर करतातच. परंतु तुमच्या अडचणीसाठी काही उपाय आणि तोडगे सुचवतात. कर्म सिद्धांताला प्रमाण मानून आचरण करा आणि विश्व नियंत्याचं कायम स्मरण करा हे त्यांचे सातत्याने सांगणं असतं. त्यामुळे त्यांच्या सर्व प्रकारच्या कथांमध्ये घडणाऱ्या प्रसंगांमध्ये कर्म सिद्धांताचा संबंध दिसून येतोच येतो. आणि म्हणूनच कदाचित तर्काने विचार करणाऱ्या लोकांनाही त्यांच्या कथा जास्त जवळच्या वाटतात.

चांगल्या-वाईट दोन्हीची जाणीव करून देणाऱ्या या लेखकाचा हा " भयभावनेच्या निर्मितीपासून अभय देणाऱ्या शांतीच्या निर्मितीकडे" वाचकाला नेणारा प्रवास सुफळ संपन्न होवो. या त्याला आणि त्याच्या वाचकाला शुभेच्छा!

**सुश्री तृप्ती कुलकर्णी मो. 98811573333**



## 44. कथा - मेनका... सौ पुष्पा नंदकुमार प्रभूदेसाई



रघुनाथला एकूणच प्राण्यांचं भारी वेड. त्याच्याकडे इमानदार असा "सोन्या" कुत्रा होता. तसेच" "सुंदरी" नावाची कुत्रीही जोडीला होती. "चिंगी" मांजरीही होती. रघुनाथ बाहेर कुठेही निघाला की, सोन्या आणि सुंदरी जणू पाठीराख्यासारखे त्याच्यामागे असायचे. लोक त्याला म्हणायचे, "अरे रघू, तुला कोण काय करणार रे? तुझे पाठीराखे, अंगरक्षक आहेत ना तुझ्याबरोबर." रघूला बरं वाटायचं. रघू या लाडक्या प्राण्यांचे खूप लाड करायचा. त्यांच्या अंगावरून हात फिरवत बसायचा. त्यांच्याशी गप्पा मारायचा. दिवसाचा काही वेळ तो या प्राणी-मुलांसाठी राखून ठेवायचा. या कुत्र्या-मांजरांबरोबर एक "राणी" म्हैस आणि गायही सांभाळली होती. गाईची बाकदार शिंगं, पांढरा शुभ्र रंग, चालण्याची ढब ऐटबाज असं तिचं सुंदर रूप होतं. रघूला अप्सरेसारखं भावायचं ते तिचं रूप. म्हणून या गाईचं नाव त्यांनी "मेनका" ठेवलं. या सगळ्यांची सेवा करण्यात रघुची बायको आशाही सहभागी व्हायची. तिलाही आनंद वाटायचा. स्वतःला मूल नाही, पण ही सगळी आमची मुलं आहेत असं ते दोघे म्हणायचे. सकाळी उठल्याबरोबर समोर बांधलेल्या मेनका गाईचे दर्शन व्हायचे. आणि आपोआप त्यांचे हात गाईला जोडले जायचे. आणि आजचा दिवस चांगला जाणार शी श्रद्धा ते बाळगायचे.

रोज सकाळची साफसफाई झाली की, 'मेनकेला' ते मोकळे सोडायचे. फिरून, फिरून परत आपण होऊन घरी यायची. कुठे लांब तर जात नाही ना, म्हणून दोघांचं मधून मधून लक्ष असायचं. 'मेनकेला 'आता बाळाची चाहूल लागली होती. रघू आणि आशा दोघांनाही आनंद झाला. 'मेनका' चांगली ताकदवान 'आई' व्हायला हवी, बाळालाही भरपूर दूध मिळायला हवं, असं म्हणून दोघेही तिला पौष्टिक खाद्य घालायला लागले. रोज तिच्या अंगावरून, पोटावरून हात फिरवायचे. तिला गोंजारायचे. यथा- वकाश मेनकेला खोंड झाला. रघू आणि आशाला आनंद गगनात मावेनासा झाला. एखाद्या बाळंतिणीसारखी ते तिची काळजी घेत असत. खोंड कोसा रंगाचा, म्हणून त्याचे नाव "कुश" असं ठेवलं गेलं. प्रथम मेनका बाळाला सोडून कुठेही जात नव्हती. हळूहळू फिरायला जायला लागली. पण बाळाची आठवण झाली की ती पळत पळत घरी यायची. बाळाला चाटायला लागायची. 'कुशही' ढुशा देत, देत दूध प्यायला लागायचा.

आता 'कुश' थोडा मोठा झाला. आणि मग ती जरा जास्त वेळ बाहेर राहायला लागली. गल्ली बोळातून फिरताना, तिला कोणी गोग्रास, कोणी भाजीच्या साली, काड्या घालायचे.. घरी आली की, कडबा, वैरण, भरडा असायचाच.

एके दिवशी 'मेनका' मलूल झाल्यासारखी दिसली. दुसरे दिवशी तिचं खाणंही कमी झालं. काय झालंय ते काहीच कळेना. तीन-चार दिवस असेच चालले. ती आणखीनच रोडावली. काहीच खाईनाशी झाली. रघूने डॉक्टरना सांगून औषध आणले. पण काहीच उपयोग झाला नाही. आता मात्र रघू आणि आशाला काळजी लागली तिची. कोण काय सांगतील ते उपचार चालू होते. तिच्या आवडीच्या गोष्टी दिल्या तरी ती तोंड लावायला तयार होईना. 'कुशही' सारखा आईकडे ओढ घ्यायचा. आलटून पालटून रघु आणि आशा तिच्या

अंगावरून, तोंडावरून हळुवार हात फिरवत बसायचे. तिलाही बरं वाटायचं. पण "शब्देविण संवादू", असं डोळ्यानं ती विचारयची जणू! "मला काय झालंय हो?" तिला उठायचीही ताकद नव्हती अगतिकपणे आपल्या बाळाकडे पाहत राहायची. "जवळ ये रे बाळा. काय करू रे? मला तुला जवळ घ्यायची ताकत नाही रे". असं म्हणायची. 'कुश' तिच्याजवळ जाण्यासाठी धडपड करायचा. "मला माझ्याकडे आईकडे जाऊ द्या ना "असं म्हणायचा.

रघू डॉक्टरांना घरी घेऊन आला. डॉक्टरांनी तपासणी केली. पोट खूप फुगलंय. लवकर ऑपरेशन करायला हवं असं म्हणाले. लवकरच ऑपरेशनची तयारी केली. औषधे आणली.. रघू आणि आशा घरात जाऊन देवासमोर प्रार्थना करायला लागले, "देवा आमच्या मेनकेला बरं कर रे बाबा".

डॉक्टरांनी हातात ग्लोवज घातले. मेनकेला इंजेक्शन देऊन भूल दिली. आता तिला पोट कापताना वेदना होणार नव्हत्या. हळूहळू पोटाचा भाग कापला. आणि चित्र बघून डॉक्टर चकित झाले. पोटामध्ये अन्न, खरकटे भरलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या! डॉक्टरांना प्लास्टिक पिशव्या, (खरकटे भरून तोंड बांधलेल्या) आणि घाण काढताना पुरेवाट झाली. साफसफाई करून ओपन केलेले पोट टाके घालून परत शिवले. सलाईन चालू होते. अँटिबायोटिक इंजेक्शन दिली. आईकडे बघून 'कुशही ' बेचैन झाला होता. "काय चाललंय? माझ्या आईला काय करताय?“ असं जणू तो विचारत होता. त्याला आता दुसरीकडेच बांधलं.

दुसरा दिवस उजाडला. मेनकाथोडा थोडा हळुवार पाय हलवायला लागली. रघू आणि आशा त्यांनाही जेवण गोड लागत नव्हते. आलटून, पालटून ते तिच्याजवळ बसून तोंडावर, अंगावर हात फिरवत बसायचे. तिच्याशी बोलत बसायचे. मधेच ती डोळे किलकिले करून, "मला काय झालंय" असं डोळ्यांनी विचारायची. दुरून केविलवाण्या नजरेने बाळाकडे पाहत राहायची.

दोन दिवस गेले तिची शक्ती आणखी कमी झाली. डोळे उघडणं बंद झालं. क्षणभर रघू आशा आणि आपल्या बाळाकडे पहात तिने एक दीर्घ श्वास घेतला. आणि तो शेवटचा श्वास सोडला.

रघू आणि आशा दोघांनाही दुःख अनावर झाले. आपल्या लाडक्या लेकीचे, मेनकेचे कलेवर पाहताना दोघांच्याही डोळ्यातली अश्रूंची धार थांबत नव्हती. रघू पुन्हा पुन्हा म्हणत होता, "कोणी काढलंय हे प्लास्टिक? कोणी अन्न टाकलं प्लास्टिक पिशवीतून गाईला..? जनावराला कळत नाही. पण स्वतःला शहाणे समजणाऱ्या माणसाला तरी कळायला हवं ना?” त्याच्या डोक्यातून प्लास्टिक जाता जाईना. त्याने निर्धार केला प्लास्टिक नाही वापरणार. आणि "प्लास्टिक हटाव" साठी काम करणार…

लोकहो, या अन्न घालून उकिरड्यावर टाकलेल्या प्लास्टिक पिशव्यांनी किती घात केला बघा बरं! रघू-आशाची मानसकन्या 'मेनका', देवा घरी गेली. तिचं बाळ पोरकं झालं. अशा बेदरकारपणे टाकल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्या वापरायच्या सवयीविरुद्ध लोकांमध्ये जागरूकता निर्माण करायचे काम करणार ना? मेनका गेली …. पण पुढे तरी असे मुके जीव वाचतील ना!

**सौ पुष्पा नंदकुमार प्रभूदेसाई, बुधगावकर मळा रस्ता, मिरज मो. ९४०३५७०९८७**

# 45. लेख - बा सूर्या... प्रा. सौ. सुमती पवार



“बा सूर्या, तुझ्याशी बोलावे म्हणते. बघ, केवढे माझे धाडस! तू तर जगाचा चालक, मालक आहेस. आणि मी एक सामान्य, समुद्रातल्या थेंबासारखी, तुझ्या तुलनेत कणस्वरूपही नाही. पण, तरीही तुझ्याशी बोलण्याचे धाडस करते कारण तू आमचा आहेस, आमची काळजी घेणारा आहेस. सकाळ होताच मी खिडकीतून प्रथम तुला पाहते, हो, कारण मला माहित आहे.

माझ्यासारख्या अगदी छोट्या नगण्य माणसासाठीही तू तुझ्या सोनेरी सुंदर किरणांची ओंजळ घेऊन माझ्यासाठी दारात, खिडकीत तिष्ठत उभा असतोस व मी केव्हा खिडकी, दार उघडेल याची एखाद्या सेवकाने मालकाची अदबीने वाट पहावी तसा तू माझ्या स्वागतासाठी दारात माझी वाट पहात उभा असतोस... जणू म्हणत असतोस, ‘येऊ का मी आत? ‘

मी खिडकी उघडताच.. थोडी किलकिली करताच तू थोडाSSSच आत येतोस. हलकीशी किरणांची प्रभा

खोलीत पसरते न् पसरते तोवर मी पूर्ण खिडकी उघडते नि मग तू ही दिलखुलासपणे हसत तुझ्या किरणांचा सोनेरी पिसारा घेऊन समोर उभा राहून माझी खोली लख्ख उजळून टाकतोस, नि अगदी ऐसपैस हसत विचारतोस, “कशी आहेस? बघ मी आलो आता.. लाग कामाला.” आणि मलाही वाटते, बाप रे! सूर्य वर घरात आला.. चला चला, तो अगदी वेळेवर कामावर हजर झालाय ना? मग आपण आळस करून कसे चालेल.. चला चला, आपणही कामाला लागू या..“

समजा तू अगदी वेळेवर आलाच नाहीस तर.. अंधार पाहून आम्ही तर उठणारच नाही अंथरूणातून.. बाप रे, मुलखाचे आळशी आम्ही. आम्हाला तर निमित्तच हवे, काम चुकवायचे.. पण तू पडला सिन्सियर,.. एक मिनिट उशिरा येणार नाही. अगदी ठरल्या वेळी दारात हजर.. उठा उठा म्हणत.

तेवढ्यात दारातल्या आंब्याची पाने बुलबुलशी गप्पा मारतांना दिसली. बुलबुल मारे गिरक्या घेत पानांना हलवत मोठमोठ्याने गोडगोड शिळ घालत उलट्या सुलट्या कोलांटउड्या मारत गोड गोड गाणे गातांना दिसला.. ”आले हो आले, सूर्यदेव आले.. रान कसे सारे छान उजळले ”.....

तेवढ्यात शिंप्याने तुला पाहून अशी काही गोड शीळ घातली की माझी नजर वळलीच नि शिंप्याच्या पिवळ्या पंखांवर मला सोनेरी किरणांची पखरण दिसताच मला ही तो हिरवा पिवळा चमत्कारच वाटला. सारी पानेच हिरवी सोनेरी चमकून हसत तुझे स्वागत करत होती. हात हलवून आपला आनंद व्यक्त करत होती. झाड नखशिखांत हिरव्या पिवळ्या सोनसळी रंगात उजळून निघाले होते. फारच मोहक दिसत होते आंब्याचे झाड.

मी जरा खिडकीतून लांबवर नजर टाकली तर.. सारे रस्ते, झाडे, वेली, शाळेची इमारत, दूरवरच्या माड्या सारेच कसे जणू हसत हसत तुझ्या किरणांचे स्वागत करत ' आम्ही कसे सारे खुश आहोत ' याचे संकेत देत होते.

सारे व्यवहार तू आल्यामुळे सुरू होऊन घड्याळाबरहुकूम सारेच कामाला लागले होते. हळूहळू फुलपाखरे बागडू लागली. तुझी सोनेरी किरणे पंखावर घेऊन मोठ्या मजेत ती फुलाफुलांवर जाऊन बसत होती. सृष्टीत जणू चैतन्य उसळले होते. वारा फुलाफुलाला बिलगत सुगंध साठवत हवेत उधळत होता.

पूर्वेला तुझ्या रथाची घोडदौड सुरू होऊन तू धुके व लालिमा पार धुवून काढत तुझी किरणे हळू हळू प्रखर होऊ लागली. तू नजर मिळवू देईनासा झाला.

किती तुझ्यावाचून अडते पण तू कधीच गर्व केला नाहीस, की आखडूपणा केला नाहीस. तुझ्याशिवाय जगाचे पानच हलत नाही. तुझ्याशिवाय एकही गोष्ट होऊच शकत नाही. वाफ होऊन वर जाणे.. ते पाऊस पडणे, नद्या सागर तळी विहिरी भरणे, पिके येणे..... किती गोष्टी आहेत ज्याचा कर्ताकरविता तू आणि फक्त तू आहेस, फक्त तूच.

तू म्हणजे जीवन, तू म्हणजे चेतना, उर्जा, शक्ती काय नाहीस तू? तू आहेसतर आम्ही आहोत. नाही तर पृथ्वीचा बर्फ व्हायला वेळ लागणार नाही. तुझे येणे म्हणजे जीवन आहे जीवन.. तू नसल्याच्या नुसत्या कल्पनेनेही आमचा थरकाप होतो. पुढचा तर विचारही आम्ही करू शकत नाही.

तुझ्या कडून शिकाव्यात अशा किती गोष्टी आहेत. खूप लोक तुला अनुसरतातही. पण खूपसे आळशीच आहेत रे बाबा. स्वत:ला सूर्यवंशी म्हणवत स्वत:चे कौतुक करतात. पण तुझा एकही गुण घेत नाहीत. मग सांग ते कसे सुखी होतील बरे? तुझ्यासारखे रात्रंदिवस काम करणारे खरोखर सुखात राहतात. तुझा नियमितपणा व काम एवढे जरी प्रत्येकाने केले तर.. गरीबी नावाची गोष्टच विश्वात राहणार नाही. कष्टाचा महिमा शिकावा तो तुझ्याकडूनच.

ऋतू आले ऋतू गेले पण तुझे येणे कधी चुकले नाही, नि चुकवू नकोस रे बाबा. अर्थात तू चुकणे कधीच शक्य नाही. चांगलेच माहित आहे आम्हाला.

तुझी स्तुती करावी तेवढी थोडीच आहे बाबा...

बरं आहे, खूप बोलले तुझ्याशी. येते आता... बाय बाय...

तुझीच भक्त...

**प्रा. सौ. सुमती पवार नाशिक मो ९७६३६०५६४२ svpawar6249@gmail.com**

# 46. पुस्तक परिचय - द हिडन हिंदू (भाग १, २ व ३): परिचय - श्री हर्षल सुरेश भानुशाली






*पुस्तक: द हिडन हिंदू (भाग १, २ व ३)*

*मूळ लेखक: अक्षत गुप्ता*

*मराठी अनुवाद: मुक्ता देशपांडे*

*पृष्ठे: ६५८ (संच)*

*मूल्य: ८१०₹*

*परिचय हर्षल भानुशाली*

**हिडन हिंदू १**

एकवीस वर्षांचा पृथ्वी ओम शास्त्री या मध्यमवयीन रहस्यमय अघोरीच्या शोधात आहे, ज्याला पकडून एकाकी असलेल्या एका भारतीय बेटावरच्या उच्च तंत्रज्ञानानी युक्त अशा सुविधाकेंद्रात नेऊन ठेवण्यात आलं होतं. जेव्हा या अघोरीला औषधांच्या अंमलाखाली संमोहित करून तज्ज्ञ लोकांच्या टीमनं प्रश्न विचारायला सुरुवात केली तेव्हा त्यानं हिंदू पुराणांमध्ये वर्णन केलेल्या चारही युगांचा साक्षीदार असल्याचा आणि रामायण व महाभारतातल्या घटनांमध्ये सहभागी असल्याचा दावा केला. मर्त्य जगाचे नियम धुडकावणार्या ओमच्या अतर्क्य भूतकाळाच्या या साक्षात्कारामुळे तिथे असणारा प्रत्येक जण चक्रावून गेला. त्या टीमला असाही शोध लागला की, प्रत्येक युगातल्या इतर चिरंजीव व्यक्तींच्या शोधात ओम होता. ही विलक्षण गुपितं जगासमोर आली असती तर प्राचीन काळापासून चालत आलेल्या धारणांना धक्का बसू शकला असता आणि येणारं भविष्य बदलून गेलं असतं. तर मग, हा ओम शास्त्री आहे तरी कोण? त्याला का पकडण्यात आलं? पृथ्वी त्याचा शोध का घेत आहे? चला तर मग, या उत्कंठावर्धक प्रवासात ओम शास्त्रीची गुपितं, पृथ्वीचा शोध आणि हिंदू पुराणकथांमधील इतर गूढ चिरंजीवांची साहसं यांचे आपणही सहप्रवासी होऊ यात.

*****

**हिडन हिंदू२**

ओम अनोळखी ठिकाणी डोळे उघडतो, त्याच्या भूतकाळासंबंधीची उत्तरं तो अजून शोधतोय. दृष्ट प्रवृत्तींनी मृत संजीवनीचं पुस्तक हस्तगत केलंय, अशा परिस्थितीत जो सदाचारी आहे तो विजयी होईल? सद्‌गुणांचा विजय होईल? मृत संजीवनीत अशी कोणती गुपितं दडली आहेत, जी चुकीच्या हातात पडली तर गहजब माजेल आणि विनाश होईल? ओम कोण आहे? LSD चं आणि परिमलचं वास्तव काय आहे? बाकीचे चिरंजीव कुठे लपले आहेत? विचित्र, गूढ ठिकाणी विखुरलेले हे शब्द आहेत तरी काय आणि नागेंद्र ते का गोळा करतोय? मर्त्य मानव, देवता आणि दानव या सगळ्यांसाठी अमरत्वापेक्षाही मोठं उद्‌दिष्ट ज्यात दडलं आहे अशा शब्दांचा शोध ती अतूट त्रयी घेत असताना, त्यांच्यासोबतच 'द हिडन हिंदू २' मधून तुम्ही कधीही न पाहिलेल्या प्रदेशांची उत्कंठावर्धक सफर करायला सज्ज व्हा."

*****

हिडन हिंदू३

देवध्वज नक्की कोण आहे, नागेंद्र की ओम? परिमल आणि एलएसडी एकमेकांवर विश्वास ठेवण्यासाठी धडपडत आहेत, तर नागेंद्र मृतातून पुनरुत्थित झाला आहे. असुरक्षित आणि पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली आहे. परशुराम आणि कृपाचार्य ओमच्या कोलमडलेल्या भूतकाळात अडकले आहेत तर वृषकपी निश्चित मृत्यूशी लढत आहेत, ज्याने आधीच मिलारेपाला संपवलं आहे. पराक्रमी अश्वत्थामाला अनभिज्ञ सोडून, इतर सर्व चिरंजिवी सर्व आघाड्यांवरून निघून गेले आहेत. उरलेले शब्द कुठे लपले आहेत? नागेंद्र त्या सर्वांना शोधून श्लोक पूर्ण करेल की अमर त्याला रोखू शकेल? काळाशी झगडत असलेल्या चिरंजिवीच्या अनपेक्षित रहस्याचा उलगडा... "

*****

पृथ्वी नावाचा एक युवक ओम शास्त्री नामक एका अघोरी साधूच्या शोधात आहे ज्याला काही वर्षांपूर्वी एकाअज्ञात स्थळी विशेष सुरक्षेसोबत नजर कैदेत ठेवले आहे. ओम शास्त्रीचा असा दावा आहे की त्याने चारही युगे पाहिलेली असून त्यातल्या बहुतांश गोष्टी त्याला ठाऊक आहेत. पृथ्वी या ओम शास्त्रीचा शोध का घेत असतो? त्याचा शोध पूर्ण होतो का? सरकारने ओम शास्त्रीला नजरकैदेत का ठेवले आहे? इत्यादि प्रश्नांची उत्तरे म्हणजे या पुस्तक त्रयीची कथा होय.

अक्षत गुप्ता यांच्या "द हिडन हिंदू" त्रयीमध्ये आधुनिक कथा आणि पुराणकथांचा एक अनोखा संगम आहे. यामध्ये मुख्य पात्र अमर्यादाच्या माध्यमातून एका वेगळ्या जगातली प्रवास कथा उलगडते. गुप्ता यांनी रहस्य, विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालत एक विचारप्रवर्तक कथा निर्माण केली आहे हे नक्की!

**परिचय : हर्षल सुरेश भानुशाली, पालघर मो 9619800030**

## 47. कथा - वंध्यत्व… - प्रा डॉ जी आर प्रवीण जोशी



पौषाची हुडहुडी भरणारी बोचरी थंडी, अन गार गार वारा. जिकडे तिकडे बनशांकरीच्या देवळात, घरोघरी नवरात्र झोकात चाललं व्हतं. नैवेद्याची रेलचेल, भजन काकडा आरती समदीकडे जोमात सुरू व्हतीच. पण गजाभाऊंच्या घरी येगळीच वर्दळ चालू व्हती. राधाकाकू तर भल्या पहाटे उठून रांधत व्हत्या. चपात्या, वाटलेली डाळ, घट्ट झुणका, दहीभात, लोणचं इत्यादी दुरडीत भरून घेत व्हत्या.

दारात सवारीची बैलगाडी उभी व्हती. शेतातला वाटेकरी सिध्दाप्पा बैल जुंपून तयार व्हता. तस गजाभाऊ अन राधाकाकू लगबगीनं गाडीत बसल्या.

शुक्राची चांदणी इरघळत व्हतीच. कोंबड्याची बांग बी झाली. घराघरात छप्परावरून धूर भैर पडत व्हता. आंबाबईच्या देवळात घंटा वाजत व्हती. चिमण्यांची चिवचिवाट चालू झाल्याली. अन बैलगाडी पानंदीच्या वाटला लागल्याली. धुकं शाल पसरून बसल्याल. दहिवर चौकडं पडल्याल. गाडी ओढ्याजवळ आली. तस मोराचंकेकाटनं चालू झालं. मधीच कुठंतर वटवाघूळ फडफडत जाऊन झाडाला उलट टांगल्याल व्हत. आता गाडी मुख्य रस्त्याला आली. तस झुंजूमुंजू झालं. गाडी मुत्नाळच्या रस्त्याला लागली. मुतनाळ गाव तस छोटंसं पण तिथला ज्योतिषी व्होरा पंडित गुंडाचार्य लै परसिध्द गडी. त्याच्या अंगणात सकाळ दरण लोकांची गर्दी! अडीअडचणी घेऊन लोक त्याच्याकडे येत व्हत व गुण पण येत व्हतंच!

गजाभाऊ अन राधाकाकू आज त्याच कामगिरीसाठी चाललं व्हत. बघता बघता दिस कासराभर वर आला, हवेत जरा ऊब पण आली. गाडीच चाक करकरत एकदा मुत्नालच्या येशीत धडकली. जवळच् वडाचा पार, तिथंच सिद्धाप्पांन गाडी थांबवली. अन बैलाचा जु रिकामा केला. गाडीतन दोघंबी उतरल्यालीच. गाडीतला कडबा बैलाम्होरं टाकून बैल बांधली.

गजाभाऊ कदम अन राधाकाकू गुंडाचार्यच घर जवळ केलं. बघत्यात तर काय! त्याच अंगण सोडून गल्लीतबी लोकांची तोबा गर्दी! कसंबसं राधाकाकू अंगणातून सोप्यात आल्या. सोप्यात समदिकडंजाजम घातल्याल. दाटी वटीन लोक अन बाया पण बसल्याल.

गुंडाचार्यला जरीकाटी धोतर, अंगात बारबंदी अन डोईवर कोषा पटका. खांद्यावर लाल जरिकाटी उपरणं, कपाळावर उभं गोपीचंदी टिळा, गळ्यात तुळशीची माळ अस साग्रसंगीत बसल्याल. त्याच्या म्होर चौरंग त्यावर चार पाच नमुन्यांची पंचांग! बाजूला कवड्याची रास!

एकेक गडी म्होर येत त्याला डोकं टेकवून नमस्कार करीत व्हता अन आपलं गाऱ्हाणं घालीत व्हता! तसं गुंडाचार्य काहीतरी बोटांची आकडेमोड करीत व्हता, पंचांग बघून त्याला काहीतर तोडगे सांगत व्हता. असंकरताकरता जवळपास बारा वाजलं तसंराधाकाकू अन गजाभाऊचा नंबर लागला! तसंगुंडाचार्यन ईचारल “बोला, काय अडचण हाय.”

त्यावर दोघं बी पंचांगलाडोस्क टेकवून नमस्कार केला, अन बोललं … "काय सांगणार गुरुजी -"

**गुरुजी -** "काय असलं ते भीडभाड न ठेवता बोला."

**राधाकाकू -** "आमचं एकुलता येक ल्योक अन सून. लगीन व्होहून बारा वरीस झालं! अजून घरात पाळणा हलना, अन आम्हाला वारीस घावना! "

अस म्हटल्याव गुंडाचार्य डोळ मिटून शांत बसलं अन हातानी आकडेमोड केली. घड्याळ बघितलं अन पंचांग मांडलं. जवळच्या पाटीवर पेन्सिलने कुंडली मांडली. गजाभाऊंच्या हातात कवड्या देऊन फासंफेकायला सांगितलं. त्याचं दान पडल्यावर गुरुजींना डोळं जरा किलकिल करून, पांडुरंग पांडुरंग असंम्हटलं!

दोघांचं बी गुरुजी काय सांगत्यात ह्याचाकड लक्ष्य व्हत.

**गुंडाचार्य -** "भिऊ नकोस इत्याल्या बुधवारी, मुलावरून अन सूनं वरून सात पिठाची दामटी, केळ, लिंबू, तेल तिखट असंघेऊन, दोघांच्या वरून उतारा कर अन गावच्या येशी भैर टाक! "

**राधाकाकू -** "आणि काय दोष हाय म्हणायचं? "

**गुंडाचार्य -** "दोघांना पण कालसर्प दोष आहे! त्याची शांती नरसिंहवाडीला करून घे! म्हणजेतुच्या घरात एक वर्षात पाळणा हललाच म्हणून समज! "

तसं दोघं गुंडाचार्यला परत नमस्कार करून जवळ असल्याला नारळ धोतर जोडी अन पान सुपारी दक्षणा ठेऊन, भैर पडलं.

दुपारचं एक वाजला होता, परत वेशीबाहेर येऊन जवळच्या मारुती देवळात बसून आणलेली शिदोरी सोडली. जेवणंझाली तस सिद्धाप्पांनंपरत गाडी जुंपली. अन परतीच्या मार्गाला लागलं!

घरी आल्याव गुंडाचार्यनी सांगितलेला सर्व तोडगा केला. दिस, मास करीत कॅलेंडर फिरू लागला. दोन वरीस झालं तरी, इकडची काडी तिकडं झाली न्हाय.

गावच्या ग्रामदेवतेचंनैवेद्य, ओटी अन दंडवत बी झालं. गजाभाऊ कटाळून गेलं. तसं एकदा वडाच्या पारावर बसलं व्हत. गावची भावकी बी बसल्याळी. सीतारामनं उगाचच खाकरून इशय काढला… "गजाभाऊ काय काय केलसा औंदा शेतात". म्हटल्याव गजाभाऊनी पानांची चंची भैर काढली. अन सुपारी कातरत सीतारामला दिली. पान अन चुना बी दिला.. तसं तांबकुची चिमट बी दिली. सीताराम गडी खुश झाला. अन म्हणाला 'वरच्या अळीतला, नाम्याच्या पोराला मुलगा झाला. एक वरीस दवाखाना करीत व्हता.' असा विषय काढल्यावर, गजाभाऊच्या काळजात चरर झालं. 'अरर इसरलो गड्या मला रानात जाय पाहिजे! '

'आता सांच्याला कस काय काम हाय बा तुझं' इति सीताराम.

'त्याच काय हाय सीताराम, म्या रानात मेंढरं बसवल्यात, त्यांचं रातच जेवण शिदोरी द्यायचं ठरलं हाय. बर झालं तू राना ची आठवण करून दिली.' असंम्हणूनश्यान गजाभाऊनंपिचकारी टाकली अन तडक गप्पगुमान वरच्या आळीतील नाम्याच्या घरी गेला.

नाम्या म्हसरांचं धार काढीत व्हता. गजाभाऊ अलगदपणे आतल्या सोप्यात जाऊन बसला. धार काढल्यावर भैर येऊन बघतोय तर गजाभाऊ दिसलं! तस.. “राम राम गजाभाऊ आज हिकड कुठंवाकडी वाट केलायस“, अस नाम्या म्हणताच, “काय न्हाय तुझ्या नातवाला बघाय आलो व्हतो.” अस गजाभाऊ म्हनला. तस नाम्यांनी चहाची अर्डर सोडली, अन नातवाला बी भैर घेऊन यायला सांगीतलं.

चहा झाला, नातवाला धुपट्यात गुंडाळून नाम्याच्या बायकोनं सोप्यात आणलं अन त्याला सुपात गजाभाऊ समोर ठेवलं. तस गजाभाऊनंशंभर रुपयांची नोट तीन आठवड्याच्या बाळाच्या मुठीत ठेवली. बाळाला सरस्पतींन मुलाला सुपासकट आत न्हेल.

मग गजाभाऊन प्रश्न केला? “नाम्या तुझ्याबी घरात चारपाच वर्स पाळणा हलत नव्हता, तू काय केलंस? ” तस नाम्या म्हणाला “आरं माज्या सरस्पतीच्या भावान, माझ्या मेव्हन्यांनं सूनबाईला मिरजला दाखवाय दवाखान्यात नेली. अन औषधांचा मारा चालू केला. तस दोघबी नवरा बायकू मिरजला एक वरीस खेटेघालत व्हत! तवा कुठं हे दिस बघाय मिळालं“. गजाभाऊनंमिरजचा पत्ता घेतला. दुसऱ्याच दिशी, गंप्या अन गोदावरीला टकोटाक मिरजचा दवाखाना गाठला. पण गप्प बसला न्हाय.

मरणाचा उन्हाळा! उन्ह जरा मावळतीला कलल्यालं! सावल्या लांब लचक व्हत हुत्या! कागवाड तसं मोठं गाव, शिरमंत पटवर्धन सरकारचंसंस्थानिक गाव! पण गावाला यष्टी स्टॅन्ड नव्हतं! गावच्या येशी भैर मोती तळं! आता त्याला मोतीतळं का म्हणत्यात कुणाला बी म्हैत नव्हतं! त्या तळ्याच्या म्होरं एक फर्लांगवर, मोठं लिंबऱ्याच झाड, ततच समद्या यष्टी बस थांबत व्हत्या! झाडाला लागून एक हॉटल, त्याच्या म्होर म्हमद्याचा पानाचा ठेला. बाजूला बाजी मोरेच सायकलीच दुकान. दुकानाम्होरं भाड्याने द्यायच्या सायकली, तीस पैसे भाडं तासाला. पंचर झाली तर पन्नास पैसे ज्यास्त!

तेवढ्यात येक यष्टी मिरजकडून अथणीकड जाणारी आली. गाडी थांबली तस धुरळा उडाला. गाडीतुन बरीच लोक उतरली. सगळ्याच तोंड घाम्याजलेली. अन मळकट! मरणाचाउन्हाळा! कसबस धोतऱ्याचा सोगा पकडून गजाभाऊ उतरले. त्यांच्या मागोमाग त्यांची सून गोदावरी अन मुलगा गंप्या पण उतरला.

पडक्या सिनेमा टाकीजमधून गेलेल्या रस्त्याने आडवी वाट करत जाऊ लागले. तस बाजीरावनंत्यांना हटकले, म्हनला ‘ तात्या असल्या उन्हात कुठं गेला व्हता? ‘अस म्हनताच गंप्याला राग आला, पण गप्पगार बसला. बोलणार कसं! त्यावर गजाभाऊ म्हनलं ‘ काय न्हाय पावण्याच्या लग्नाला गेलं व्हतो ‘. गजाभाऊ मनातल्या मनात त्या बाजीला शिव्या हसडत व्हते. नसत्या चांभार चवकश्या लागतात ह्यांना!

येशीतनं मारुती देवळाम्होरन चालत वरच्या डांबर कट्ट्यावरून त्यांनी वळसा घातला अन घर जवळ केलं. चार पायऱ्या चढून सोप्यात येऊन बसलं. तोंडातील तंबाकू काढली. डोक्यावरील काळी टोपी बाजूला करून, हातानी घाम बाजूला केला. तेवढ्यात राधाकाकू म्हणजे गजाभाऊच्या पत्नी माठातील गार पाणी आणून गजाभाऊ म्होर ठेवलं. तसं गजाभाऊनी तांब्या तोंडाला लावून गट गट आवाज करत पाणी खतम केलं. अन गार फरशीवर आडवे झाले!

गजाभाऊ कदम म्हणजे मोठी गावची आसामी! गावात चिरेबंदी दुमजलीवाडा, मोठं ऐसपैस आंगण! अंगणात पडवी त्यात खिल्लारी बैलजोडी ढवळ्या अन पवळ्या. चार म्हसर, दोन गायी, दोन कालवड. अंगणातन वरच्या बाजूला चौसोपी कट्टा अन सोपा. मधोमध मोठा दरवाजा. बाजूला चबुतरा, माजघर, माजघरातल्या आतल्या बाजूस चार खोल्या. कोठीच्या खोलीत धान्यांनी भरल्याली पोती. मधल्या बाजूला ऐसपैस कडेपाट! त्यावर राधाकाकू बसून हिंदोळे घेऊ लागल्या!

गंप्या नवसाचा पोरगा! एकुलता एक! त्याच लगीन होउन बारा वरीस उलटली तरी बी पाळणा हलीत नव्हता! त्यासाठी राधाकाकूंनी लै उपाय केलं, पण गोष्ट काय जमून येत नव्हती! देव देवरूशी, अंगारे धुपारे, समद करून झालं व्हतंच! कोण काय म्हणतील ते करत व्हती बिचारी. चोळाप्पा मंत्रिकाकडे तर त्यांनी खेट घातलं! त्यो सांगिल ते केलं. उलट्या पखाची कोंबडी उतरून टाकली. समद झालं पण वीस एकर रानाला वारस घावंत नव्हता!

यल्लमाचाजग आणून घरी बसवला! देवीचा गोंधळ झाला पण, काय बी उपेग झाला न्हाय. गंपू दादा अशी कोणतरी हाळी मारली तस त्या तंद्रीतनं भानावर आल्या! गोदानी चहा आणून हातात ठेवला. मग त्यानी कडेपाटवर बसून चहा घेतला

भैर रानातला सालगडी गोप्या अन गोप्याची बायको आली व्हती. दोघांना एकदम बघून गजाभाऊ चमकलेच! गजाभाऊ म्हनलं आज जोडीने आलायस? त्यावर काय न बोलता गप्पगुमान आत माजघरात गेले. गोप्या गेली कित्येक वर्स त्यांचा घरगडी व्हताच. वहिवाट पण लै दिसची व्हती. गोदानी समद्याना चहा दिला. तस राधाकाकू म्हंल्या आज काय काढलंय बाबा!

त्यावर गोप्याची बायकू म्हणली, 'काकू एवढं समद करतायसा एकडाव मरगुबाईल का जात न्हाईसा '. तस राधकाकू म्हंल्या समद झालाय बघ. तीत बी जाऊन देवीची ओटी भरून पाळणा पण बांधून आले. आता देवच डोळे झाकून गप्प बसलाय तर आम्ही काय करणार. आमच्या हातात जेवढं जेवढं होत ते समद केलं. आता भार देवावर च! '

पुढं गंप्या अन गोदा जवळपास वरीसभर, मिरजला औषधाला जात व्हती, हे गावच्या लोकांना बी कळलं. अन एकदिस असा आला की गजाभाऊ अन राधाकाकू हरकून गेल्या. त्यांना काय करावं काय नकु अस झाल्याल.

कारण बी तसच व्हत, गोदाला दिस गेलं व्हत, अन तिची चोर चोळी करायचा घाट गजाभाऊनी आखला व्हता. तीन महिन्याच्या आत चोरचोळी केली अन आख्ख्या गावाला जेवणाच आवतान बी दिल!

**प्रो डॉ प्रवीण उर्फ जी आर जोशी, मुपो नसलापुर ता रायबाग, अंकली, जिल्हा बेळगाव कर्नाटक, भ्रमण ध्वनी - 9164557779**

## 48. मी प्रवासिनी... 'चारधाम यात्रा' - सुश्री सुलभा सुभाषचंद्र तांबडे



सेवानिवृत्तीनंतर प्रवासाला सुरवात केली. या प्रवासात अनेक नवनवीन ठिकाणं बघता येतात. तिथले वातावरण, संकृती, भाषा, पोशाख, नैसर्गिक विविधता समजते. त्यामुळे या सगळ्यात आपण कुठे आणि कसे आहोत ही समज येते त्यामुळे फिरलं पाहिजे असं ठरवलं. असाच योग आला.. चारधाम यात्रेचा.

मैत्रिणी म्हणाल्या म्हणून तयार झाले. पण प्रवास किती? चारधाम म्हणजे नेमके कोणते? हेही माहित नाही. 200८ ला हरिद्वारला सहयोग शिक्षक शिबिराला गेलो होतो. त्यावेळी आईचं म्हणणं होतं की ' इतक्या लांब जात आहोत तर आसपासची ठिकाणं बघुन येऊ. ' पण त्यावेळी फक्त दिल्ली फिरणं झाले. मग हरिद्वार मधील शिबीर, गंगा आरती, ऋषिकेश करून परत आलो. पुन्हा इतक्या वर्षांनी चारधाम योग आला.

पुणे - मुबंई - हरिद्वार असा प्रचंड लांबचा प्रवास करून हरिद्वारमध्ये पोहचलो. संध्याकाळी गंगेच्या आरतीसाठी 'हर की पौडी' घाटावर गेलो. गंगामाईच्या दोन्ही तीरावर अनेक भाविकांनी गर्दी केली होती. देवदर्शन व आरती करून, मार्केटमध्ये फिरत फिरत रूमवर परतलो. पहाटे उठून गंगेत डुबकी मारायला, पूजा करण्यासाठी पुन्हा गंगातीरी. भगवान शंकराच्या जटेतुन निघालेली गंगा - खळखळता प्रवाह -पण प्रदूषणाच्या विळख्यात -त्यामुळे भाविकांनी तिचे पवित्र्य राखले नाही हे पाहून मन विषण्ण झाले. मनोभावे नमस्कार करून परतलो.

आता आमचा प्रवास सुरु झाला तो यमनोत्रीकडे. अनेक छोटी छोटी गावं लागली व डेहराडून -उत्तराखंडची राजधानी, या हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या मोठ्या शहरातून प्रवास करत दुपारी दोन वाजता मध्येच जेवणासाठी थांबलो. दोन तास थांबून पुन्हा प्रवास -संपूर्ण घाट, प्रचंड मोठे डोंगर, खोल दरी आणि दरीतुन वाहणारी यमुना नदी -निसर्गाचा अजब अविष्कार पाहून थक्क व्हायला झाले. प्रचंड वळणावळणाचा रस्ता पार करणं म्हणजे चालकाची कसरतच. चारधाम यात्रा नुकतीच सुरु असल्यामुळे रस्त्यावर रहदारी पण जास्त आणि या सर्वामध्ये गाडी चालवणे म्हणजे कौशल्यच.

संध्याकाळी सात वाजता खराडी येथे पोहचलो. रात्रीचे जेवण आटोपून थोडं इथेच फिरून विश्रांती घेतली. पहाटे चार वाजता चहा घेऊन यमनोत्रीकडे प्रवास सुरु झाला. पहाटे पाच वाजताच तिथे संपूर्ण उजेड असतो. रस्ता नागमोडी वळणाचा, यमुनेच्या काठावरूनच गोल गोल फिरत कधी एकदम खाली तर कधी अती उंचीवर असा प्रवास सुरु होता. रस्त्यावर पाठोपाठ वाहनं होती - यमुना मैय्याच्या दर्शनाला चाललेली. निसर्गाची विविधता आणि महाकाय दरी, डोंगर आणि त्यातून वाहणारी यमुना नदी... अत्यंत सुखावणारे निसर्गाचे सौंदर्य पण मनात कुठे तरी भीती - अशी संमिश्र भावना. सकाळी आम्ही साडेसहाला यमनोत्रीच्या पायथ्याशी पोहचलो.

गाडीतच सूचना दिल्याने आम्ही घोड्यावरून जायचा निर्णय घेतला होता. घोड्यावर बसण्याचा अनुभव वैष्णवी देवीला गेल्यावर घेतल्याने आम्ही योग्य ती काळजी घेऊन घोड्यावर बसलो. तिथेही भरपूर गर्दी, पाऊस पडल्याने चिखल आणि ग्राहक मिळविण्यासाठी घोडेवाल्यांची गर्दी - कसंतरी एकमेकींचा हात धरून आम्ही तिघीच एकत्र राहिलो. आम्हाला घोड्यावर बसवून तो मालक तिकीट काढायला निघून गेला. घोडा हलला की आमचा भीतीने थरकाप व्हायचा. शेवटी एकदाचा तो आला आणि आमचा घोड्यावरून यमुनामैय्याकडे प्रवास सुरु झाला.

रस्ता अरुंद, गर्दी, एकीकडे प्रचंड डोंगर, दुसऱ्या बाजूला खोल दरी आणि दरीतून खळखळ वाहणारी यमुना नदी. डोंगर कपारीतून जाणारी वाट. पायी चालणारे भाविक, डोलीतून जाणारे आणि घोड्यावरून जाणारे भाविक - त्यामुळे ढकलाढकली करत आम्ही वरती चढत होतो. एकमेकांना पाय लागायचे - मनातून त्यांची माफी मागत, जीव मुठीत धरून प्रवास सुरु होता. निसर्गाची किमया काही औरच. आणि मनात प्रश्न उभरला- “ सर्वात पहिल्यांदा हे ठिकाण कुणी शोधले असेल? पावसाळ्यात इथे कुणी फिरकत असेल का? ” असे मनात उठणारे प्रश्न, भीती आणि आजूबाजूला कुणाला तरी पाय लागेल या गोंधळात आजूबाजूला निसर्गाचा आस्वाद घेणं राहूनच जातं. वरती जाताना काही ठिकाणी अत्यंत उंच दगडी पायऱ्या आहेत. कधी कधी या पायऱ्यावरून घोड्यांचे पाय घसरतात. वरती बसणारी व्यक्ती सावध बसली असेल तर तिला स्वतःचा तोल संभाळता येतो, अन्यथा अपघात ठरलेलाच. खालून वरती म्हणजे यमुना मैय्याचे मंदिर हे अंतर सहा कि. मी. - पण घोड्यावरून जाण्यासाठी दोन तास लागतात.

मध्यंतरी घोडयांना विश्रांती दिली जाते. तेवढ्या वेळात आम्ही तिथल्या तिथे फोटो काढले. डोळे भरून डोंगर कपारी बघून घेतली. उंच डोंगरातून वेगाने वाहणारे पाणी, दोन्ही बाजूला इतके उंच डोंगर की सूर्यप्रकाशही अंधुक होता. मोठमोठे वृक्ष, -- यामध्ये किती तरी वनऔषधी असाव्यात. किती तरी वन्यजीव - त्यांचे आवाज कानाला, मनाला प्रसन्न करत होते. भारताच्या कानकोपऱ्यातून आलेली ही सर्व वयाची भक्त मंडळी जात, धर्म, भाषा ही विविधता घेऊन दर्शनाला चालली होती.

थोडं अंतर राहिले असता तिथे तुम्हाला खाली उतरवून दर्शनाला जायला सांगतात. वरती पोहचल्यावर गरम पाण्याच्या कुंडात डुबकी मारली. सभोवताली यमुनेचा प्रवाह आणि मध्येतो गरम पाण्याचा कुंड हा निसर्गाचा चमत्कारच. तिथून आम्ही मंदिरात पोहचलो. मंदिर छोटेच आहे. दर्शन खुप व्यवस्थित झाले. पुन्हा तिथे तांदळाची पुरचुंडी करून, नैसर्गिक असणाऱ्या गरम पाण्याच्या कुंडात दोन मिनिटे. धरून तुम्हाला घरी नेण्यासाठी दिले जाते. मंदिरापासून अजून खूप पुढे दुर्गम ठिकाणी यमुना नदी उगम पावते. बहुतेक लोक मंदिरातूनच परत फिरतात. दर्शन घेऊन खूप वेळ यमुना मैय्याकडे पहात होते. श्रद्धेच्या नावाखाली पात्रात अनेक वस्तू सोडल्या होत्या. साड्या, नारळ, दिवे, प्लास्टिक बाटल्या इ. ‘मैय्या यांना सद्बुद्धी दे‘ इतकंच मागणं. ---पुन्हा परतीचा प्रवास. आता घसरण त्यामुळे अगदी सावध बसायचे. पण छान घोड्यावरचा अनुभव.. अत्यंत प्रामाणिकपणे त्यांनी आम्हाला खाली आणून सोडले.. खूप बरं वाटलं. मुक्या प्राण्याच्या

पाठीवरून हात फिरवून त्याची माफी मागितली व धन्यवाद दिले. हॉटेलवर येऊन विश्रांती घेतली. जिथे मुक्काम होता तिथे मागेच विस्तीर्ण असे यमुनेच पात्र. सकाळी लवकरच आवरून नदीच्या पात्रात मनसोक्त थंड पाण्याचा अनुभव, ॐ, भ्रमरी, ध्यान – आणि फक्त पाण्याचा खळखळाट - मन शांत झाले.

जेवण करून पुढील प्रवास सुरु झाला. उत्तरकाशी येथे चार वाजता पोहोचलो. तिथे काशी विश्वनाथाचे दर्शन घेतले. स्वयंभू मंदिर अशी त्याची ख्याती आहे. तिथूनच पुढे गगोरी हे मुक्काम ठिकाण होते तिथे पोहचलो. हॉटेलमध्ये चहा घेऊन जवळच असलेल्या अस्सी गंगा मंदिरामध्ये दर्शनाला गेलो. नदीच्या काठी अस्सी गंगा - गणपती, विष्णू - लक्ष्मी मंदिरं आहेत. दर्शन व भजनसंध्या झाली. इथेच अस्सी गंगा आणि भागीरथी या दोन नद्यांचा. संगम आहे. पाऊस पडून गेला होता आणि पुन्हा ऊन पडले होते. उंच डोंगरावरती फक्त कडयावर ऊन पडलेलं - हे दृश्य फारच आल्हाददायक दिसत होते. नद्यांची पात्र विस्तीर्ण -थंड आणि स्वछ पाणी, गुळगुळीत गोल आकाराचे दगड, वेगवेगळ्या प्रकारची फुलांची झाडं, अनेक प्रकारची झाडं हे सर्व पाहून किमयागार कसा असेल असा प्रश्न पडतो.

पहाटे चार वाजता चहा घेऊन गंगोत्रीकडे प्रवास सुरु झाला. ९० कि.. मी. चा प्रवास - पण संपूर्ण उंचच्या उंच कडा - खोल दरी व दरीतुन वाहणारी भागीरथी नदी -. निसर्गाचे हे भव्यरूप मनात भीती निर्माण करणारे आहे. हर्षील गावामध्ये राम 'तेरी गंगा मैली' चे शूटिंग झाले होते. जेवढ्या वरवर चढत जातो तेव्हढाच पुन्हा खाली प्रवास. -- रस्ता अरुंद, वळणं, रस्त्यावर आलेले दगडाचे सुळके, वाहनांची गर्दी, - मधूनच अगदी वरून कोसळणारे धबधबे, गुलाबांच्या फुलांचे रंग, आकार आणि ताटवा, सफरचंदाची झाडे आणि त्याला लागलेली छोटी छोटी सफरचंद, दगडांचे रंग, रेती सर्व सुखावणारी -पण मनात भीतीचा सावट…असा आमचा प्रवास गंगोत्रीकडे सुरु होता. साधारणपणे सकाळी 9 वाजता गंगोत्री इथे पोहचलो. गंगामैय्याच्या मंदिरात जात असता रस्त्याच्या दोन्हीही बाजूला गगनाला भिडणारे उंच कडे, वरच्या कडयावर बर्फ - इथे रस्ता संपतोच. गंगामैय्याचे पांढरे शुभ्र मंदिर…प्रचंड गर्दी … यावर उपाय म्हणजे पुजारी पकडून त्याचे हात ओले केले. लगेच दर्शनाला पुढे… गर्दीतून दर्शन घेतले. बराच वेळ मंदिर आवारात निवांत बसून राहिलो. काठावरती गेलो तिथे गोलाकार बसलेली मंडळी आणि पुजारी मध्ये माईक घेऊन पूजा सांगत होते. आम्हीही नदीवर येऊन गंगानदी मध्ये हात-पाय धुवून घेतले. मन भरून आले. खळखळणारी नदी पाहून नतमस्तक झालो. शास्त्राप्रमाणे पाणी (तीर्थ) भरून घेतले. त्या पाण्याची पूजा, पितरांची शांती, गंगेची आरती केली. आईच्या आठवणीने मन भरून आले. आम्ही सर्वांनी पूजा केली. बऱ्याच ठिकाणी पात्र फोडून बांधकाम सुरु आहे. मंदिर तिथे आहे पण नदीचा उगम अजून बराच पुढे दुर्गम ठिकाणी आहे. २४० कि.. मी. प्रवास करून आम्ही संध्याकाळी गुप्तकाशी येथे पोहचलो.

यमनोत्री ते केदारनाथ या प्रवासात पंचप्रयाग लागतात. प्रयाग म्हणजे जिथे दोन नद्या एकत्र मिळतात ते ठिकाण – संगम.

उत्तराखंड राज्यामध्ये असलेल्या पुढील पाच संगमांना पंचप्रयाग म्हणतात. …

1. **देवप्रयाग** - अलकनंदा आणि भागीरथी या नद्यांचा संगम

2. **रुद्रप्रयाग** - अलकनंदा आणि मंदाकिनी या नद्यांचा संगम

3. **नंदप्रयाग** - अलकनंदा आणि नंदावती या नद्यांचा संगम

4. **कर्णप्रयाग** - अलकनंदा आणि कर्णावती या नद्यांचा संगम

5. **विष्णूप्रयाग** - अलकनंदा आणि विष्णू या नद्यांचा संगम.

इथे जायची भाविकांची इच्छा असते, पण रस्ते अगदी उंच आणि खोल दरीत संगम त्यामुळे वरूनच बघता येतं. आम्ही फक्त एकाच संगमावर गेलो -तेही पाण्यात नाहीच. पण प्रयाग सौंदर्यपूर्ण -दोन नद्यांचे पाणी -रंग वेगळा - दोन्ही नद्यांचं एकमेकींत सामावून जाणं आणि त्यातून तिसराच रंग – हे दृश्य बघण्यासारखे आहे. गुप्तकाशी येथे मुक्काम होता. रात्री १२. ३० ला आवरून सर्व तयार झाले. तिथून ४० कि. मी. वरच्या सीतापूर गाडी पार्किंग पर्यत प्रवास केला. परत २ कि. मी. चालत सोनप्रयाग पर्यत गेलो. तिथे परत गाडी करून गौरीकुंडपर्यंत –तिथे आम्ही पोहचलो साधारण पहाटे 3 वाजता. तिथे आम्हाला घोडा पार्किंगपर्यत जाणाऱ्या गाडीची वाट बघत दोन तास थांबावं लागले. बरोबर ६. १० ला घोड्यावर बसून प्रवास सुरु झाला. अंधार असल्यामुळे फारसं लक्षात येत नव्हतं, पण जसजसं सूर्यनारायण वरती येऊ लागले तसं सभोवतालचा नजारा बघताना आश्चर्य वाटत होते. दाट झाडी, त्यातून वाहणारे पाण्याचे झरे, नजर पोहचत नव्हती तिथंपर्यंत खोल आणि उंच डोंगर -दरी आणि त्यातून वाहणारी अलकनंदा नदी. मनात प्रचंड भीती -कारण जो महाभयंकर प्रलंय झाला तो याच भागात. निसर्गाचा कोप तिथल्या नागरिकांनी व भक्तांनी अनुभवला होता. पुन्हा सर्व सुरळीत सुरु झाले होते. ७ कि. मी. वरती थांबून चहा - नाष्टा, घोडयांना विश्रांती दिली जाते.

आम्ही सकाळी १० वाजता वरती केदारनाथला पोहचलो. सगळीकडे बर्फाच्छादित डोंगर, जर मनोभावे तो डोंगर पाहत असाल तर तुम्हाला तिथे वेगवेगळी दृश्य नजरेस पडतात. तो सर्व मनमोहक परिसर पाहून मन प्रसन्न झाले. रात्रभर जागरण झाल्याने थकवा व ऑक्सिजनची कमतरता जाणवत होती. त्यामुळे पराठे खाऊन टेन्टमध्ये विश्रांतीसाठी थांबलो. इच्छा असूनही दिवसा केदारनाथ दर्शन घेणं जमले नाही. प्रचंड थंडी, मधेच पाऊस पडत होता, तरीही रात्री १२. ३०ला आवरून मंदिराकडे रवाना झालो. रात्री 2. 30 ला नंबर आला आणि प्रत्यक्ष केदारनाथाच्या गाभाऱ्यात प्रवेश केला. भोळ्या, अज्ञानी भक्तांनी आतील मूर्तीला तूप लावून ठेवले आहे. आत गाभाऱ्यात पांडवाच्या मूर्ती आहेत. दिवस रात्र मंदिर खुले असल्यामुळे मंदिरातस्वच्छता दिसत नव्हतीच. सगळीकडे प्लास्टिक पिशव्यांचे साम्राज्य - असो. अगदी आत गेल्यावर नेमका आकार कशाचा हे समजेना, नंतर सर्व माहिती मिळाली. सर्वांनी अगदी हात लावून दर्शन घेतले, अभिषेक केला. मागील बाजूची उत्सुकता होती -ज्या प्रचंड मोठया शिळेमुळे पाण्याचा लोंढा विभागला गेला आणि मंदिर त्या प्रलयातही व्यवस्थित राहिले. -- ती मंदिरामागील भीमशीला -एवढी मोठी शिळा अगदी लहानश्या दगडावर उभी आहे. निसर्गाचा चमत्कार, किमया हे शब्दही अपुरे पडावेत. तो सर्व चमत्कार

डोळ्यात साठवून पुन्हा एकदा केदारनाथाचे दर्शन घेऊन पायी उतरण्यास सुरुवात केली. निसर्गाची विविधता, पाण्याचे झरे, शॉर्टकट करत आम्ही खाली उतरलो. खाली आलो आणि वरती पावसाने दरड कोसळल्याने मार्ग बंद करण्यात आला. केदारनाथ परिसरात पुन्हा नव्याने बांधकामे सुरु आहेत. सतत हेलिकॉप्टरची घरघर सुरू असते. प्लास्टिक बाटल्यांचे ढीगच्या ढीग जागोजागी दिसतात. घोड्यावर प्रमाणापेक्षा जास्त वजन - यामुळे डोळ्यादेखत मुक्या प्राण्यांचा मृत्यू आणि त्यांना फरफटत नेवून दरीत ढकलून देतात. --- अशा गोष्टी मनाला क्लेशदायक ठरतात.

सकाळीबद्रीनाथाकडे प्रवास सुरु केला. प्रचंड वळणावळणाचा रस्ता, रस्ता अरुंद, बाजूला खोल दरी, गाडी चालवीणाऱ्याचा कस लागतो. काही ठिकाणी तर महत्प्रयासाने दुसरी गाडी पास होते. जाताना वाटेत लागणारे प्रयाग ( दोन नद्यांचा संगम )-- काही ठिकाणी गाडीतून तर काही ठिकाणी खाली उतरून दर्शन घेतले. रात्री बद्रीनाथ येथे पोहचलो. गर्दीत घुसूनच दर्शन घेतले. मंदिर परिसरात दहा मिनिटे बसलो. सर्व देशभरातून भाविक येत असल्यामुळे गर्दी भयंकर. सकाळी पुन्हा बद्रीनाथ मंदिराजवळ, गंगा नदीच्या किनारी लक्ष्मी - नारायण पूजा विधी केला. मार्केटमध्ये फेरफटका, इतक्या लांबून जाणार म्हणजे घरच्यांना काही थोडी खरेदी केली.

इथल्या मार्केटमध्ये लोकरीचे कपडे, चारधाम असलेल्या वेगवेगळ्या वस्तू होत्या. रबडी बासुंदीचा आस्वाद घेतला. बद्रीनाथहून अवघ्या काही अंतरावर माण गाव लागते. चीन व भारत सीमारेषेवरील हे गाव. मुक्त हस्ते निसर्गाची उधळण. छोटंसं गाव, सरस्वती नदीचा उगम आणि पुढे ती लगेच लुप्त होते. प्रचंड मोठी शिळा आणि तिथून वाहणारी सरस्वती नदी. इथूनच पांडव स्वर्गात गेले असे मानले जाते.. इतके दिवस हे गाव भारतातील शेवटचे होते. पण 2022 ला भारताचे पहिले गाव म्हणून ते घोषित केले आहे. हे गाव पायीच फिरून बघावं लागतं.

आता आमचा परतीचा प्रवास सुरु झाला. --पुन्हा हरिद्वारकडे. ऋषिकेश, लक्ष्मण झुला हे खास आकर्षण होते. पण बांधकाम चालू असल्यामुळे तो बंद ठेवला होता. तिथली काही मंदिरं बघितली. त्यामध्ये विशेष म्हणजे ११ फूट उंचीचे शिवलिंग असलेले महादेव मंदिर पहिले. ऋषिकेशमधील मार्केटमध्ये रुद्राक्ष, आणि स्फटिकाच्या अनेक वस्तू बघता आल्या. एका दुकानात एकमुखी, दोनमुखी, पंचमुखी रुद्राक्ष पहिले. श्रीयंत्र, लक्ष्मीयंत्र बघितले. स्फटिक यंत्र, माळा, कानातले असे खरेदी करून मुक्कामी परत. हरिद्वारमध्ये सकाळी मनसादेवीला रोपवेनी जाऊन दर्शन घेतले. आणि दुपारी हरिद्वार स्टेशनहून दिल्लीकडे रवाना झालो.

अशा रीतीने आमची चारधाम यात्रा यशस्वीपणे पूर्ण झाली. -- त्या यात्रेत मन भरून मिळालेले समाधान आणि आनंद खरोखरच आयुष्यभर पुरेल इतका आहे.

**सुश्री सुलभा सुभाषचंद्र तांबडे मो ९६५७२११९६६**

## 49. लेख - माझी मातृभाषा… माझा अभिमान… (पत्रलेखन). - सुश्री दीपा नारायण पुजारी



**।। श्री ।।**

लाडू आत्या, कागवाडे मळा,

इचलकरंजी

दि. २६/२/२०२४

**चि. इशा,**

अनेक आशिर्वाद

माझं पत्र बघून तुला आश्चर्य वाटलं ना? आपण कधीच एकमेकींना पत्र लिहिलं नाही. कधी कारणच पडलं नाही. मोबाईलसारखं जिवंत खेळणं असताना दुसऱ्या संपर्क- साधनाची गरजच काय? दृकश्राव्य फोन कॉल तर किती आनंद देतो!! गळाभेट, स्पर्श सुख मिळत नसलं तरी दृष्टीभेट होते. आणि डोळे फसवत नाहीत आपले. फितुरी करतात, दगा देतात. न बोलता खूप काही सांगून जातात. हो ना?

मग काय कारण बरं पत्राचं? तुला गंमत वाटेल, पण तुझ्याशी मराठी गप्पा मारायच्या आहेत म्हणून. हो, केवळ म्हणूनच. बघ ना गं. माझ्या मराठी बोलण्याला तू इंग्रजी प्रतिसाद देतेस. तुझं बोलणं मला थोडंसं समजतं; बरचसं समजत नाही. अमेरिकन pronunciation माझा गोंधळ उडवतं. मग तुझी आई किंवा बाबा मदतीला येतात. तू आणि शंभू मला हसता. हसा बापडे. मला बिलकुल राग येत नाही. अगं परक्या भाषेत बोलायचं अवघड असतं. पण शिवाय उच्चारण पद्धत वेगळी असते तुमच्या देशात. बोबड्या बोलीत, जीभ न उचलता, तोंड न उघडता कसं बाई बोलता तुम्ही!! उच्चार न कळल्यानं समजत नाही. आम्ही बघ कसे ओठ उघडून, जीभ, दात, घसा सगळ्याचा वापर करतो.

आपली मराठीबघ बरं किती साधी सोपी. किती सरळ. जसं लिहितो तसं बोलतो. तुला समजतं किनई मी बोलते ते सगळं? शब्द समजला नाही उच्चार समजला नाही असं तर नाही ना होत.? फक्त सतत कानावर पडत नाही. मग काही ठिकाणी अडतं. सगळ्या अक्षरांना न्याय देते मराठी बोली. शांत (सायलेंट) शब्दांना थारा नाही. हेच तर कारण आहे आपली भाषा समजण्याचं. पटलं ना! दे टाळी!!

असो. प्रत्येकाला आपल्या मातृभाषेचा अभिमान असायलाच हवा. तसा तो मलाही आहे. तू या भाषेशी अनभिज्ञ आहेस. तुला थोडी ओळख करून द्यावी यासाठी हा पत्रप्रपंच. माझ्या मताशी तुझे मम्मा डॅडा पण सहमत आहेत. तुला खूप चांगलं नाही तरी बऱ्यापैकी देवनागरी लिपी वाचता येते. आणि शंका आली तर

मदतीला आहेतच की मम्मा डॅडा. अट फक्त एकच की तूही मला पत्र लिहायचंस. इंग्रजीमध्ये चालेल गं. माझं इंग्रजी सुधारेल. ठरलं तर मग!!

आज मी तुला मराठी भाषेतल्या एका काव्य-प्रकाराची ओळख करून देणार आहे. तुला आठवतंय? आपल्या सानिकाच्या लग्नात जात्याची, उखळाची पूजा केली होती. तू व्हिडिओ बघीतलायस नं लग्नाचा? तर पूजा करताना आम्ही एक गाणं म्हणत होतो. खास गोष्ट ही की ते गाणं तुझ्या प्रेमाआजीनं लिहिलंय बरं का…

***"दळण दळीते बाई मी दळण दळीते***
***वरती स्वर्गाचे पाते***
***खाली पाताळाचे पाते***
***मध्ये पापपुण्याचे जाते***
***दळण दळीते…"***

पुढील कडव्यात तिनं आपली घरच्यांची नावं ओवली होती. अशा गाण्याला ओवी असं म्हणतात. किती गोड वाटलं ना ऐकताना!!

पूर्वी घरातील कामं करताना बायका शब्द रचना करायच्या. जात्यावर दळताना या प्रकारच्या रचना गायल्या जात. जातं म्हणजे घरगुती floor mill. मी वर्णन करत नाही. विषयांतर होईल. तुला गुगलबाबा सांगेल. छोट्या छोट्या दोन ओळींच्या, तीन किंवा चार ओळींच्या या ओव्या देवाला नमन करून गात असत. माहेरची, आईवडिलांची, भावंडांची वर्णन करणाऱ्या अशा रचना ऐकताना डोळे ओलावतात. अतिशय भावपूर्ण रचना. जसं की…

***"बाप माझा वड आई माझी फुलजाई***
***काय सांगू बाई दोघांची गं मायामाई"***
***"माया आईवानी न्हाई कोणत्या गं गोताला***
***जणू जिरून गेलं तूप साळीच्या गं भाताला"***

… पटलं ना? इशाची आई पण अशीच आहे ना प्रेमळ!!

अशा नात्यांची माया पसरविणाऱ्या ओव्या गायल्या जात. हो अगं, या ओव्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे केवळ ऐकून ऐकून सरकत. मुखोद्‌गत करून भाषा टिकून राहिली हे किती कौतुकास्पद आहे ना…. लोकगीत या प्रकारात या ओव्या येतात. बहिणाबाईंनी या गीतप्रकाराला अनोखं रूप दिलं. माहेर, नाती यापलिकडे जाऊन निसर्गाशी जवळीक निर्माण करणाऱ्या ओव्या त्यांनी रचल्या. ….

***"काया काया शेतामंधी घाम जिरव जिरव***
***तेव्हा उगल उगल कायामधून हिरवं"***

… जमिनीला माय मानून तिची कृपा सांगणारी गाणी

***"मन पाखरु पाखरु***
***त्याची काय सांगू मात***
***आता हुतं भुईवर***
***गेय गेय आभाळात"***

... असं मनाच्या पाखराचं वर्णन करणारी पदं...

या सगळ्या गाण्यात लय आहे. गोडवा आहे. कुणालाही गाता येतात ही गाणी. या गाण्यांचा अर्थ आणि चाल मनात ठसतात. मनाला वेड लावतात. सहजच लोकप्रिय होतात. यात सामान्य माणसाचं भावविश्व आहे. त्यामुळंच ही गाणी लोकप्रिय झाली.

लोकगीतांप्रमाणंच ग्रंथांमधून देखील ओव्या आढळतात. बघ हं ...रोज संध्याकाळी शुभंकरोतीनंतर पसायदान म्हणतेस ना तू शंभू सोबत. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ओव्याच आहेत पसायदानात. आहे ना यातही गेयता, माधुर्य.

***"दुरितांचे तिमिर जावो.. विश्व स्वधर्म सूर्य पाहो***
***जो जे वांछील तो ते लाहो.. प्राणी जात।"***

तुला तिथल्या वाचनालयात म्हणजेच लायब्ररीत 'बहिणाबाईंची गाणी' हे पुस्तक मिळेल. सुट्टीत ते आण आणि आवर्जून वाच. तुला यू ट्यूबवर ती गाणी ऐकायला मिळतील. मला खात्री आहे आवडतील तुला. पाठही होतील. गाण्यांचा अर्थ मम्मा सांगेल. मलाही विचारु शकतेस. गुगलडुडल तर धावतच मदतीस येईल.

असो. आज आवरतं घेते. माझ्या भाचीला बोअर नको व्हायला. पुढच्या पत्रासाठी नवीन विषय शोधू. शंभू कसा आहे? त्याला एक मस्तीखोर बुक्की.

आईबाबा बिझी असतील. त्यांनाही भेटून खूप दिवस झाले. या सुट्टीत भारतात येण्याचं ठरलं तर छानच होईल.

सर्वांना आशिर्वाद.

तुझ्या उत्तराच्या प्रतिक्षेत ...

तुझी लाडू (दीपा) आत्या

*(व्हॉट्स एप वर पत्र पाठवलंस तरी आवडेल)*

**सौ दीपा नारायण पुजारी, इचलकरंजी मो नं ९६६५६६९१४८ ईमेल deepapujari57@gmail.com**

## 50. लेख - प्रेम माझ्या नजरेतून… सुश्री संगीता कुलकर्णी



सृष्टीची निमिर्ती करणाऱ्या त्या विधात्याने या जगात अनेक रंगांची निमिर्ती करून मनमोहक छटा निर्माण केल्या आहेत. त्यापैकीच एक छटा म्हणजे प्रेम रंग…

प्रेम ही एक अशी भावना आहे, जी शब्दात व्यक्त करता येत नाही. ती फक्त अनुभवता येते…

प्रेम हा असा शब्द आहे की त्याच्याबद्दल ऐकताच आपण आपल्या विचारांच्या दुनियेत हरवून जातो आणि आपल्या आयुष्यात ज्या व्यक्तीवर आपण सर्वात जास्त प्रेम करतो त्या व्यक्तीची आठवण करून देतो… प्रेमाबद्दल प्रत्येकाचे मत वेगळे असते, कारण प्रत्येकाच्या आयुष्यात प्रेमाची व्याख्या वेगवेगळी असते…

प्रत्येक माणूस प्रेम करतो. प्रत्येकाची प्रेम करायची स्टाईल वेगळी असते आणि प्रत्येकाच्या प्रेमाचा रंगही वेगळा असतो…

प्रेम परिभाषित करणे कठीण आहे, मोजणे कठीण आहे आणि समजणे कठीण आहे. ही एक भावना आहे जी आपल्या अंतःकरणात इच्छा, आकांक्षा आणि आदर निर्माण करते. प्रेमात कोणत्याही अटी, अपेक्षा नसतात… प्रेमाचे दुसरे नाव काय आहे माहित आहे का..?

**प्रेमाचं नातं घट्ट**

**जगणं होईलएकत्र**

**विश्वास रुजवणं फक्त**

**प्रेमदान अनुभव एकमात्र**

प्रेम हे एक अनोखे नाते आहे ज्यामध्ये लोकांची मने कायम जोडलेली असतात. "माझं तुझ्यावर प्रेम आहे" हे एक लहान वाक्य.. पण प्रत्यक्षात ते समुद्राच्या खोलीइतकं आणि आकाशाच्या उंचीइतकं खोल आणि मोठं आहे…

'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं …. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं- '(मंगेश पाडगावकर)

प्रेम ही संकल्पना आणि त्याहीपेक्षा वास्तव आहे. अनेक प्रसिद्ध कवींनी प्रेमाचे वेगवेगळे अर्थ व भावना समजावून सांगितल्या आहेत…

मंगेश पाडगांवकर यांनी रसिकप्रिय कवितांची मांडणी करताना, ''हात तुझ्या हातातून धुंद ही हवा.... रोजचाच चंद्र आज भासतो नवा'' ... असे सांगितले आहे. कविवर्य कुसुमाग्रज, विं. दा. करंदीकर, सुधीर मोघे यासारख्या कवींनी अनेक प्रकारे प्रेमाची मांडणी केलीय. ''प्रेम म्हणजे काय असतं'' असं कुसुमाग्रजांनी सांगितलंय.. ' प्रेम कर भिल्लावरती 'या त्यांच्या उक्तीतून त्यांनी हेच सांगितलं की, प्रेमाला वय नसतं, प्रेमाला रंग नसतो, प्रेमाला फक्त भावनेचा गंध असतो...

**"मी प्रेम केलं तुझ्या श्वासावर**

**मनापासून मनापर्यंत"**

मी प्रेम केलं काळजाला भिडणारे... प्रेम करताना कसला विचार करायचा, विचार करून कधी प्रेम केलं जात नाही...

प्रेम असतं आई-बाबांवर, बहिणी-भावांवर, मित्र-मैत्रिणीवर ...पण या प्रेमात स्वच्छ आणि निरागस अर्थ असतो... निरागस नितळ रंग...

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात प्रेमाचा प्रसंग येतोच. प्रेम फक्त तरुण-तरुणी करतात एवढाच त्याचा अर्थ नाहीये, तर दोन मनं कुठलाही स्वार्थ न ठेवता जुळून येतात.. त्यांचे विचार जुळताचतिथे मैत्री आणि प्रेम होतं. इथे फक्त आवडीचा अथवा वयाचा विचार केला जात नाही, तर कुणीही कुणाजवळ जेव्हा आपली मतं मांडतो, समजून घेतो तेव्हा त्यांच्यातल्या भावनांची जी ओढ असते ती मैत्री... मैत्रीचा रंग ...

पती-पत्नीमध्येही प्रेम असावं अगदी मित्र-मैत्रिणीसारखं... त्यात जिव्हाळा असावा... एकाने पसरवलं तर दुस-याने आवरण्याची भावना असावी लागते. अथवा पुरुष प्रधान संस्कृतीत अजूनही स्त्रियांनीच घरातील कामे करावीत हा अट्टहास अजूनही आहे.. पुरुषांच्या बरोबरीने वावरणारी स्त्री, तिलाही मानाने जगता आलं पाहिजे, तिचा सन्मान केला पाहिजे... त्यांच्यातला सुसंवाद वाढला पाहिजे. तेव्हा त्यांच्यातल्या त्या भावनांना प्रेम म्हणता येईल... भावनांचा रंग..

प्रेम म्हणजे फक्त आकर्षण असेल तर मुळीच नाही आणि असे हे प्रेम सात्त्विक असूच शकत नाही.. फॅशनच्या दुनियेत मूळ प्रेमाची कथाच संपुष्टात येत असल्याचे जाणवते.

प्रेम हे अथांग आहे.. त्याचा कधीही अंत नाही ...ही एक स्वच्छ, सुंदर आणि सात्त्विक भावना आहे. प्रेम खूप सुंदर आहे. उमलत्या कळीच्या फुलासारखे आहे. त्याचा सुगंध सुवास सर्वदूर आहे. त्यामुळे प्रेम एका ठराविक वयात होते असेही नाही. चांगल्या विचारांची माणसे एकत्र येणे, समजून घेणे, विचारांची देवाण-घेवाण करणे हाही एक प्रेमभावनेचाच रंग आहे नाही का...!

प्रेमात सामंजस्य फार महत्त्वाचे.. तर समजून घेण्याची भावनाही तेवढीच महत्वाची...! न बोलता व्यक्त होणा-या भावना हेच प्रेम. समोरच्या माणसाच्या न बोलण्याचा अर्थ आणि रागावण्यामागचं कारण समजणं हे आहे प्रेम...!

वाट पाहण्याची भावना आणि आतुरतेने आपुलकीने मनाच्या कोप-यात ठाण मांडलेली एक मनस्वी इच्छा हेच खरे प्रेम...!

प्रेमामध्ये एवढी प्रचंड ताकद असते कीमाणसाला सहज एकमेकांपासून अलिप्त होऊ देत नाही... ती एकऋणानुबंधाची गाठ असते...!

सौंदर्य म्हणजे प्रेम नव्हे... तर मनाचं सौंदर्य सर्वात महत्त्वाचे..

***मोगरा जो बहरून येई.. असेच काही प्रेम असावे***

***तर प्राजक्ताच्या फुलांमध्येही सूर्याचे तेज दिसावे..***

***रातराणी बहरून जाई त्यामध्ये चंद्राचेही प्रेम दिसावे...!***

इतके स्वच्छ प्रेम आहे. ... प्रेमाच्या भावना म्हणजे दोन मनांच्या मीलनाची परमेश्वराने दिलेली देणगीच असते...!

नातं जुळायला भावना समजून घेता आल्या तर त्याच जाणीवेतून प्रेम निर्माण होतं..!

**सुश्री संगीता कुलकर्णी, ठाणे लेखिका/ कवयित्री मो 9870451020**



## 51. लेख - जीवनातील संस्कृत भाषेचे स्थान आणि महत्त्व - सुश्री सुरेखा सुरेश कुलकर्णी



*भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती ।*
*तस्याहि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम् ॥*

... अशी संस्कृत भाषा ही देववाणी आहे. मधुर काव्येआणि सुंदर सुभाषिते असलेली ही आमची प्राचीन भाषा आहे याचा आम्हाला अभिमान आहे. लहानपणी मला आठवतंय, आमचे वडील सांगायचे " मुलांनो श्रीमद्‌भगवद्‌गीता अध्याय पाठ करा, संस्कृत सुभाषिते स्तोत्रे पठण करा. त्यामुळे वाणी शुद्‌ध होते स्मरण वाढते आपल्या मेंदूला छान सात्विक खुराक मिळतो. मन प्रसन्न होते शिवाय स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षिसेही मिळवता येतात. ".. ही त्यांची प्रेरणा व आमच्यावर चांगले संस्कार होते. त्या वयात थोडंत्रासदायक वाटायचं! आज मात्र त्याचे महत्त्व व आमच्या व्यक्तिमत्वावर झालेला सुपरिणाम जाणवतो. आम्ही तर शिक्षकी पेशात असल्यामुळे भाषा-शुद्‌धता, वाणीचा प्रभाव, पाठांतर, सुभाषितांचा संदर्भ, या साऱ्याचाच उपयोग जाणवतो व होतो. विद्‌यार्थ्यांची पुढील पिढी घडवताना संस्कृत भाषेचे बाळकडू बाळगुटीसारखे पोषक आहे हे आवर्जून सांगावेसे वाटते. ही भाषा - जननी आपल्याला अनेक ठिकाणी मार्गदर्शक व सहाय्यक ठरली.

म्हणूनच विद्‌यार्थीदशेत भाषा निवडताना मी संस्कृतची निवड केली. मातृभाषा - राष्ट्रभाषा - जागतिक भाषा यात सर्व भाषांची जननी संस्कृत भाषा अभ्यासासाठी निवडली. या भाषेचे अनेक विशेष मला जाणवले पूर्वापार वेदशास्त्रे, पूर्वीचे ग्रंथ संस्कृत भाषेमध्ये आहेत आदीकवी वाल्मिकी यांनी रामायणकथा संस्कृतमध्ये रचली. इसवी सन पूर्व काळापासून संस्कृत भाषा प्रचलित आहे. यज्ञ व पूजाविधि याच भाषेत आहेत. आज मंत्र पूजाविधि संस्कृतमध्येच म्हटले जातात व ते अधिक प्रभावी ठरते. कवी कालिदास यांनी 'मेघदूत' सारखी उत्तमोत्तम नाटके संस्कृतमध्ये लिहिली. ती आजही रसिकतेने वाचली व अभ्यासली जातात, कारण त्यातील मधुर भाषा, सुंदर शब्द व अलंकारिक उत्कृष्ट नमुने!

संस्कृत सुस्पष्ट असून त्याची रचना-शब्द बदलून ठेवले तरी अर्थ न बदलता होते. या भाषेचे शब्दभांडार समृद्‌ध आहे व ते वाचकांना आवडणारे, गोडी वाटणारे असे आहे. याचे व्याकरण शास्त्रशुद्‌ध असून नावाप्रमाणे ही 'संस्कारित' भाषा आहे. म्हणूनच तिला देवभाषा 'सुरभारती' असे म्हणतात. याचा खास विशेष म्हणजे यात द्‌विवचन असते. इतर भाषांमध्ये 'दोन' यासाठी वेगळी संकल्पना नाही. तसेच संस्कृत मधील 'संधी' हे शब्दांचे विशेष आहे. शब्द एकत्र करून तो संधीयुक्त वाचता येतो. अशी ही तर्कसंमत भाषा आहे. याच्या वाचनाने व पठणाने स्मरणशक्तीची वाढ होते, हा पूर्वीपासूनचा व आजही अनुभव आहे म्हणूनच इतर विषयांच्या अभ्यासातही संस्कृत भाषेच्या अभ्यासाची मदत होते. शिवाय इतर भाषेत आलेले शब्द हे संस्कृतमधून आलेले आहेत हे जाणवते. उदाहरणार्थ इंग्रजीत I am असे म्हणताना अहम् हे मूळ रूपसमजते.

असे अनेक शब्द विविध भाषांमध्ये संस्कृतमधून आलेले आहेत. काही तद्भव शब्द हेसुद्धा आहेत म्हणूनच संस्कृतचा अभ्यास चांगला असेल तर इतर भाषा शिकताना अधिक सोपे जाते.

संस्कृत ही केवळ एक भाषाच नव्हे तर तो एक चांगला विचार व एक संस्कृती आहे आधुनिक युगातही विज्ञान समजून घेताना व आपले ज्ञान वाढवताना तांत्रिक शब्दांना संस्कृतचा आधार अधिक चांगला आहे. या अभ्यासातून आपण अधिक प्रगती शक्य करू शकतो. यासाठी संस्कृत भाषेचा प्रसार व प्रचार आपण अधिक प्रमाणात केला पाहिजे. विशेषतः महाराष्ट्रात सध्या संस्कृतकडे दुर्लक्ष होत आहे असे वाटते. म्हणून मी एका दर्जेदार मासिकात संस्कृत सुभाषितांचा परिचय व अर्थ देत आहे. वाचकांना अर्थ समजला की त्याची अधिक गोडी वाटते. अनेक वाचक वाचतात व चांगल्या प्रतिक्रिया देतात. अशाप्रकारे संस्कृत भाषेचा प्रचार व प्रसार होत आहे ही चांगली गोष्ट आहे.

आत्ताच्या या संगणक-युगात आपण संगणकावर अधिक काम करतो. संगणकाची भाषा समजणे व त्यातून अधिक चांगले काम करणे हा आपला प्रयत्न असतो. यासाठी संस्कृत भाषा अधिक उपयोगी ठरते. कारण ही भाषा संगणकीय भाषेला जवळची आहे विशेषतः तांत्रिक वैज्ञानिक शब्द आपल्याला संस्कृतमधून चांगल्या प्रकारे मिळतात व संस्कृतच्या अभ्यासाने त्यात अधिक प्रगती करता येते हे सिद्ध झाले आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपली राज्यघटना लिहिली. त्यांनी अभ्यासानंतर असे मत मांडले होते की पूर्ण भारताला एकत्र बांधू शकणारी अशी राजभाषा 'संस्कृत' हीच असू शकते. आपल्या कायदे व नियमांच्या भाषेत संस्कृत शब्दांचा अधिक प्रभाव दिसतो - ही भाषा आहेच तशी प्रभावी!

माझ्या जीवनात संस्कृत भाषेला महत्त्वाचे स्थान व प्राधान्य हे आहेच. अध्यात्म-क्षेत्रात मला अधिक गोडी आहे त्यातील ग्रंथ, स्तोत्रे यांची भाषा अधिकतर संस्कृत असते. आता निवृत्तीनंतर असे ग्रंथ, भगवद्गीता यांचे वाचन अधिक चांगले वाटते. संस्कृत भाषेचा अभ्यास व पठण केल्यामुळे आता हे वाचन सोपे सुरस वाटते. शिवाय ' जे जे आपणासी ठावे ते इतरांसी शिकवावे 'या उक्तीप्रमाणे गीता-अध्याय, संस्कृत सुभाषिते पुढील पिढीला शिकवताना सात्विक समाधान मिळते. हे समाधान संस्कृत अध्ययनाने प्राप्त झाले.

संस्कृत भाषेचा आपल्या देशात व परदेशातही प्रचार व्हावा यासाठी आपण प्रयत्न करूया. संस्कृत भाषेतील सुंदर साहित्य-ठेवा आपण रसिक वाचकांपुढे आणू. ह्या भाषेला अभ्यासकांबरोबरच समाजातही मानाचे स्थान मिळावे. हे स्थान आपण मिळवून देऊया आणि ही भाषा अधिक समाजप्रिय जनवाणी होईल अशी सदिच्छा व्यक्त करूया!

**"शुभं भवतु।"**

**सुश्री सुरेखा सुरेश कुलकर्णी, सातारा मो ९४२११४२४६६**

## 52. कविता - आनंद – सुश्री दीप्ती कोदंड कुलकर्णी



*कुठं शोधायचा आनंद?*
*कसा मिळतो आनंद? ...*

*कुणाला सापडतो ज्ञानार्जनात!*
*कुणाला सापडतो, धनसाठ्यात!*

*कुणाला कथनात.!*
*कुणाला श्रवणात.!*

*कुणाला अर्चनात!*
*कुणाला भक्तीत!*

*कुणाला देण्यात! कुणाला घेण्यात*
*कुणाला जिंकण्यात! कुणाला जिंकू देण्यात!*

*कुणाला सत्ताप्राप्तीत! कुणाला सेवाव्रतात!*
*कुणाला झोपडीत! कुणाला बंगल्यात!*

*कुणाला निसर्गात! कुणाला ध्यानात!*
*कुणाला बोलण्यात! कुणाला मौनात!*

*कधी कुणाला, अनाथांचे अश्रू पुसण्यात!*
*तर कधी कुणाचे सुखदु:ख जाणण्यात!*

*स्वानंदाचेगणितच वेगळे!*
*येथील मापदंडच निराळे!*

*त्यागाचे तर मूल्यच आगळे!*
*हिशोबी जगाला कधी ना कळे!!*
*हिशोबी जगाला कधी ना कळे!!!*


सुश्री दीप्ती कोदंड कुलकर्णी, कोल्हापूर. मो ९५५२४४८४६१

## ई-अभिव्यक्ती (मराठी) सम्पादक मंडळ






सौ. उज्ज्वला केळकर  श्री सुहास रघुनाथ पंडित  सुश्री मंजुषा सुनीत मुळे  सौ. गौरी गाडेकर






'फ्लिपबुक' स्वरूपातला भारतातील पहिला आणि एकमेव दिवाळी विशेषांक

e-abhivyakti

नि:शुल्क